म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
9192

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

९४९ | सौ. शैलजा दीक्षित

ज. ना. आपटे यांची

व्याख्याने

निबंध

हेत

क. द करण्याचा हेतु काय आहे हें थोड
क्कळविणें अवश्य आहे. नं०

मुलांस व मुलींस लहानपणीं कोणत्या धाटणीचीं पुस्तकें वाचूं द्यावीं याविषयीं आमचे प्रमाणें बहुश: तीं चालतात हें सर्वांस विदित आहे. यास्तव कांहीं बोधपर अशा पुस्तकाच्या द्वारें त्यांस लहानपणापासूनच नीतिपथास लाविलें असतां तीं थोरपणीं कुमार्गाकडेस न वळतां सुमार्गाकडे वळतील, ह्मणून हें चिमकुलें पुस्तक प्रसिद्ध करीत आहों. यास्तव सर्व लोक यास आपला उदार आश्रय देऊन तो हेतु सिद्धीस नेतील अशी आशा आहे.

अशींच दुसरीं पुस्तकें सवडीनुसार प्रसिद्ध करण्यांत येतील. यांत मोठमोठ्या इंग्रजी, मराठी आणि संस्कृत ग्रंथांतील चांगल्या चांगल्या नीतिपर गोष्टी सारांशरूपानें देण्यांत येतील. मधून मधून लहान लहान निबंधही येत जातील.

ह्या आमच्या उद्योगास कदाचित् आमचे कित्येक तरुण मित्र नांवें ठेवतील, तरी हें जग त्रिविध आहे असें जाणून त्यांस न ुमानतां प्रख्यात कवि वामन पंडित यांच्या पुढील श्लोकाकडे नजर ठेवून हा उद्योग आरंभीत आहों. त्यास ईश्वर यश देवो:—

श्लोक.

वानोत निंदोत सुनीतिमंत ॥
चालो असो वा कमला गृहांत ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं ॥
सन्मार्ग टाकूनि भले न जाती ॥ १ ॥

कर्ते.

सुबोध.

शाळा.

सुशिक्षण देण्याकरितां शाळा स्थापित केल्या अहेत. त्यांत मुलांना आणि मुलींना चांगलें शिक्षण मिलत असतें.

दोन वर्षांहून अधिक वयाच्या मुलांस व मुलींस शिक्षण देण्याकरितां ज्या शाळा स्थापिल्या आहेत, त्यांस अनुक्रमें मुलांच्या व मुलींच्या शाळा असें म्हणतात. तरुणांस अन्य भाषा, कला, आणि शास्त्रें ज्या शाळांतून शिकवितात, त्यांस पाठशाळा असें म्हणतात.

शाळांमध्यें बहुतकरून वाचन, लेखन, भूगोलविद्या, इतिहास, गणित, आणि अन्य भाषा शिकवितात. कित्येक शाळांत गाणें, वाद्य वाजविणें शिकवितात. आणि कांहीं शाळांत तर भूमिति, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र आणि यंत्रशास्त्र शिकवितात.

शिक्षणास उत्तेजन देण्यासाठीं सरकारानें 'विश्वविद्यालय' नांवाची पाठशाळा स्थापिली आहे. परीक्षा घेण्यास्तव नेमिलेल्या पंडितांनीं, शिकलेल्या उमेदवारांची परीक्षा घेतल्यावर त्यांस या पाठशाळेकडून पदव्या देण्यांत येतात.

शाळेंतील पंतोजी हा आपला शिक्षक होय. तो, आपण कोणतीं पुस्तकें वाचावीं, आणि कोणत्या विषयांचा अ-

भ्यास करावा, हें सांगतो. कोणकोणत्या वर्गांतील मुलांनीं कसकसें शिकावें हें दाखवून देतो. आणि शाळेंत शिकायाचें विषय चांगल्या प्रकारें समजावून देतो. वर्गांतील मुलांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप जागा देतो, आणि धडे वेळच्यावेळीं घेतो.

आळशीपणाच्या आणि निष्काळजीपणाच्या चाली मोडून टाकणें हें पंतोजीचें कर्तव्य होय; आणि पंतोजीच्या सांगण्याप्रमाणें वागणें हें शिष्यांचें कर्तव्य होय. पंतोजीशीं सन्मानानें वर्तावें; धडे लक्षपूर्वक ऐकावे; आणि एकमेकांशीं ममताळुपणानें वागावें.

ज्ञानाची वृद्धि हें उद्योगाचें आणि लक्ष पुरविण्याचें बक्षीस होय. याकरितां प्रत्येक मुलानें व मुलीनें शाळेंत जात जावें.

आज्ञा पाळणें.

"एल् ओरियन्ट" नामक जाहाजावरील अधिकाऱ्याचा एक मुलगा होता, त्याचें नांव 'कासेब्रयांका.' तो लहान असतां, आफ्रिकेमध्यें 'नाईल'ची लढाई झणून जी लढाई झाली, तिकडे त्याला बापानें आपल्याबरोबर नेलें होतें. जेव्हां लढाई चालू झाली, तेव्हां "मी परत येई तोंपर्यंत तूं सुकाणाजवळून हालूं नकोस" असें बापानें त्यास सांगितलें होतें, आणि त्याप्रमाणें मरे तोंपर्यंत तो मुलगा तेथून हालला नाहीं.

तोफांतून सुटलेल्या कुलपी गोळ्यांच्या धडाक्यामुळें जाहाजास एकाएकीं आग लागली. तेव्हा तो एक कासेब्रयां-

काशिवाय करून जाहाजावरील सर्व मनुष्यें पळालीं; आणि कित्येक आगींत सांपडलीं. अग्नीच्या ज्वाळा चोहींकडून एकसारख्या भडकल्या, तरी तो वीर मुलगा आपल्या नेमलेल्या जागेवरून ढळला नाहीं. तो जणू काय वादळांचा राजा त्या भडाक्याला धिट्टाईनें धमकावण्यालाच जन्मला आहे असा भासूं लागला.

ज्वाळा अधिकाधिक बळावत चालल्या. पण बापाच्या आज्ञेशिवाय सुकाणूं सोडून त्याच्यानें निघून जाववेना. म्हणून तो मोठ्यानें हाक मारून म्हणाला, "बाबा, अहो बाबा, सांगा, अजून माझें काम संपलें नाहीं काय?" पण बाप बिचारा अग्नींत सांपडून मेला, हें त्याला ठाऊक नव्हतें.

पुनः एक वेळ तो ओरडून म्हणाला, "बाबा, मला सांगा, अजून मी एथून हलूं नये काय?" पण विस्तव अधिकाधिक चेतला आणि कडाकड आवाज होऊं लागला.

विस्तवाच्या शेकामुळें त्याच्या भिवया आणि डोक्याचे केंस अगदीं होरपळून गेले. त्याच्या तोंडचें पाणी पळालें. त्याला मृत्यूची ओढ लागूं लागली. असें असतां आणखी एकवार तो ओरडून म्हणाला, "बाबा, मी आतां येथेंच राहावयाचें ना?" एवढ्यांत जाहाज चोहींकडून पेटलें. अग्नीनें, शिडें, खांब, डोलकाठी वगैरे जाळून राख रांगोळी केली; आणि शेवटीं कासेबयांकावर झडप घातली.

जेव्हां हें मूल अग्नींत सांपडून मेलें तेव्हां मेघगर्जना झाली; वीज चमकूं लागली; आणि आकाशांतून जणूं

काय तारा तुटून पडताहेत असा भास झाला.

मुलांनों व मुलींनों, ह्यालाच आज्ञा पाळणें ह्मणतात. कांसेवयांकाला बापाची आज्ञा मोडून जाण्यापेक्षां मरणें बरें वाटलें. पण त्यानें आज्ञा मोडली नाहीं. [चि. ट्रे.]

शिफारशीचीं पत्रें.

एका युरोपियन व्यापाऱ्याच्या पेढीवर एका कारकुनाची जागा रिकामी झाली होती. ती गोष्ट उमेदवारांस समजतांच. सुमारें पन्नास उमेदवार आपापले अर्ज घेऊन तेथें आले, त्या पन्नासांपैकीं व्यापाऱ्यानें एक उमेदवार पसंत केला; आणि बाकीच्यांस जावयास सांगितलें.

व्यापाऱ्याचा मित्र जवळच होता. तो त्यास ह्मणाला, " ह्या उमेदवारानें शिफारशीचें एकही पत्र आणले नसतां तुह्मी ह्यास कोणत्या बरें कारणानें पसंत केलें ? " व्यापारी ह्मणाला, " तुह्माला ठाऊक नाहीं. त्यानें पुष्कळ पत्रें आणिलीं आहेत:--

पहिलें.—आंत येण्यापूर्वी, त्यानें आपलें चिखलांत भरलेले जोडे दाराजवळच्या पायपुसण्याला नीट पुसले; आंत आल्यावर दार लावून पुढें आला; ह्यावरून तो टापटिपीचा मनुष्य आहे असें समजून आलें.

दुसरें.—तो लंगडा मनुष्य आंत आलेला पाहतांच त्यानें उठून त्याला आपली खुर्ची दिली. ह्यावरून तो विचारी व दयाळू आहे असें दिसण्यांत आलें.

तिसरें.—जेव्हां तो आंत आला तेव्हां त्यानें टोपी काढली, आणि माझ्या प्रश्नांस झटपट पण नम्रपणानें

उत्तरें दिलीं. ह्यावरून तो सभ्य आहे असें दिसून आलें.

चौथें.– मी हें जाडें पुस्तक बुद्धया मध्येंच टाकलें होतें; कित्येक उमेदवार याला ओलांडून आले व कित्येक याला एकीकडे ढकलून पुढें आले. पण या गृहस्थानें तें पुस्तक उचलून मेजावर जेथल्या तेथें ठेविलें. ह्यावरून त्याला प्रत्येक गोष्टीची काळजी आहे असें समजून आलें.

पांचवें.–इतरांस एकीकडे सारून आपणच पुढें न येतां तो आपली पाळी येईपर्यंत तसाच थांबून राहिला. ह्यावरून तो मर्यादशील आहे असें दिसून आलें.

सहावें.–जेव्हां मी त्याशीं भाषण करूं लागलों, तेव्हां मला असें दिसून आलें, कीं त्याचे कपडे नीट काळजीनें स्वच्छ ठेविलेले आहेत; डोक्याचे केंस नीट विंचरलेले आहेत; आणि त्याचे दांत दुधासारखे शुभ्र आहेत. जेव्हां त्यानें आपलें नांव लिहून दिलें तेव्हां त्याचीं नखें इतरांच्या नखांप्रमाणें वाढलेलीं किंवा मळकट नाहींत, स्वच्छ आहेत, असें दिसून आलें.

तर मग तुम्ही ह्या सर्व गोष्टींस शिफारशीचीं पत्रें म्हणत नाहीं काय ? मी तर म्हणतों. आणि तुम्हांला काय सांगू, त्या मुलानें आपलीं हीं शिफारशीचीं पत्रें दहा पळांच्या आंत माझ्या दृष्टीसमोर आणून ठेविलीं.

वर सांगितल्या गुणांप्रमाणें वागण्याचा, मुलांनो, आतांपासूनच तुम्ही अभ्यास ठेवावा, म्हणजे हे गुण पुढें तुमच्या अंगीं स्वाभाविकपणें वास करूं लागतील.[रॉ. री. नं.२.]



सूड घेणें.

रामा आणि वेणू हीं दोघें भावंडें होतीं. रामा बारा वर्षांचा होता; पण दांडगा आणि फार रागीट असा होता. कोणीही त्याच्या बऱ्याची गोष्ट सांगितली तरी तो ऐकत नसे. तो आपलें तें खरें करी. वेणू ही त्याच्याहून दोन वर्षांनीं लहान होती, स्वभावानें तीही त्याच्याचसारखी होती. पण तिच्यांत येवढाच एक चांगला गुण होता कीं, कोणीही तिच्या बऱ्याचें कांहीं सांगितलें तर ती तें ऐके.

त्या दोघांनाही घरीं एकेक तास शिकविण्याकरितां त्यांच्या बापानें एक पंतोजी ठेविला होता. तो नित्य सकाळीं सात वाजतां येई.

एके दिवशीं तो नित्याप्रमाणें त्यांस शिकविण्याकरितां आला. त्यानें पहिल्यानें रामाचे धडे वाचून घेतले. पण त्यानें ते मुळींच वाचून ठेवले नव्हते. तो आदले दिवशीं नव्या वाडीच्या जत्रेला गेला होता; म्हणून त्याचे धडे तयार झाले नव्हते. म्हणून पंतोजी त्याला रागें भरला; आणि म्हणाला, 'तूं आतांच्या आतां हे धडे तयार करून दिले पाहिजेत.' नंतर त्यानें वेणूचे धडे घेतले. ते तिनें आदले दिवशीं जत्रेंतून आल्यावर तयार करून ठेविले होते. पंतोजीनें 'म्हण' म्हणून सांगितल्याक्षणींच तिनें ते चक्क तोंडपाठ म्हणून दाखविले. तेव्हां पंतोजीला रामाचा अधिकच राग येऊन तो त्याला म्हणाला; "कायरे रामा, ती मुलगी असून हिनें पहा कसे धडे तोंडपाठ केले ते.

आणि तूं मुलगा असून कांहीं कामाचा नाहींस. वेणू हुशार खरीच. ती आपले धडे तयार करून, जत्रेची जत्रा पाहून पुनः मोकळी ती मोकळी.'' पंतोजी असें बोलतांच रामाला अतिशयित राग आला. तो आपलीं पुस्तकें दुकानासारखीं आपल्यापुढें पसरून ठेवून, एक पुस्तक तोंडा आड धरून, ओठांतल्या ओठांत कांहीं पुटपुटूं लागला. त्या पसरून ठेवलेल्या पुस्तकांत एक नवेंसें पुस्तक दिसल्यामुळें तें कशाचें आहे हें पाहण्याकरितां वेणूनें तें वर उचललें. हें पाहतांच रामानें "वड्याचें तेल वांग्यावर" काढून वेणूच्या पाठीवर जो एक ठोसा दिला, त्यासरशी ती अगदीं हिरवीपिंवळी झाली. पण मुलांची जात त्यांस कोणी मारलें तर तीं त्या माराची फेड करायास पहायाचींच. मग तो मारणारा थोर असो किंवा लहान असो. वेणूच्यानें तो ठोसा सोसवला नाहीं; म्हणून पंतोजीचीही कांहीं भीति न धरतां, तिनें त्यास उलट मारण्यास हात उगारला. एवढ्यांत पंतोजी तिला गोड शब्दांनीं म्हणाला, "मुली, तुला जर त्याचा सूड घ्यायाचा आहे, तर त्याचा मुका घे.'' वेणू रागानें लाल होऊन गेली होती; आणि रामाचा सूड कसा उगवावा ह्या विचारांत होती. म्हणून पंतोजी काय म्हणाला हें ती नीट समजली नाहीं. ती एकसारखी पंतोजीच्या तोंडाकडे टक लावून पाहूं लागली. पंतोजीलाही वाटलें कीं, मी काय म्हणालों, हें ही समजली नाहीं खरी, म्हणून पुनः तो म्हणाला. "वेणे, तूं त्याचा मुका घेऊन सूड उगीव.'' हे पंतोजीचे शब्द ऐकतांच तिनें रामाच्या गळ्याला घट्ट मिठी मारून त्याच्या

गालाचा मुका घेतला. हें पाहून रामा अगदींच ओशाळला. आपण केलें काय, आणि हिनें त्याचा सूड कोणत्या प्रकारें घेतला, हें पाहून रामास रडूं कोसळलें; आणि त्यानें निश्चय केला कीं आपण पुनः अशी गोष्ट करूं नये; आणि आपल्यास कोणीही अशा रीतीनें छळिलें, तर त्याचा सूडही असाच घ्यावा.

मुलांनो, हें रामाचें आणि वेणूचें उदाहरण तुमच्या डोळ्यांसमोर असूं द्या.

व्यारन् एल्डरसन् यानें मुलास पाठविलेलें पत्र.

"कोणाही तरुण पुरुषाला योग्य अशा प्रकारचें तूं आपलें कर्तव्यकर्म शिकावेंस, या हेतूनें मी तुला "ईटन्" शहरास पाठविलें आहे. अशा पुरुषाचें पहिलें कर्तव्य म्हटलें म्हणजे सदाचारी आणि सद्धर्मी होणें; दुसरें, उत्तम विद्यार्थी होणें; आणि तिसरें, मानवी जातीच्या खेळांत व व्यायामांत, म्हणजे:—वल्हीं मारणें, पोहणें, उड्या मारणें, चेंडूफळी खेळणें, इत्यादि अनेक खेळांत पटाईत होणें. पुष्कळ मुलें शेवटाकडून आरंभ करतात; म्हणजे प्रथमतः खेळाकडे लक्ष लावितात. तेणेंकरून ते सद्धर्मी व उत्तम विद्यार्थी बनत नाहींत. तूं चांगला मुलगा व्हावास अशी माझी इच्छा आहे. तूं चांगला, सत्यवादी, आणि प्रामाणिक अहेस असें ऐकणें ही माझी पहिली इच्छा. तूं आपल्या सर्व शाळेंत अतिशय श्रम करणारा अहेस, असें ऐकणें

ही माझी दुसरी इच्छा; आणि आळशी मुलांपैकीं एखादा मुलगा जसा चेंडूफळी खेळण्यांत, खंदकावरून उडी मारण्यांत, आंणि कड्यावरून उडी मारून निभावून जाण्यांत जसा पटाईत असतो, तसा उद्योगी मुलगाही पटाईत असूं शकतो, असें आळशी मुलांस तूं दाखवावेंस ही माझी तिसरी आणि शेवटची इच्छा होय."

ह्या पत्राचा सारांश मुलांनीं नीट ध्यानांत ठेवावा.

प्रामाणिक विठू.

पात्रें–विठू (एक गरीब मजूर), बाळया (विठूचा मुलगा) आणि दुर्गाबाई (शेजारीण.)

बाळू येतो. [स्थल] झोपडी.

बा०–बाबा लवकर येतील तर बरें होईल. मला फार भूक लागली आहे. हो! ते आले! (विठू एक मोठी भाकर घेऊन येतो.)

वि०–बाळया, मी आलों वरें का!

बा०–बाबा मला मोठा आनंद झाला. आई गेल्यापासून मी अगदीं उघडा पडलों आहें; आणि मला—

वि०–(गहिवरून) होय, माझ्या लाडक्या,तुला भूक लागली आहे, हें मला ठाऊक आहे. "पुष्कळ भाकरी करावी आणि पुष्कळ भाकरी मिळवावी," असे हे दिवस नाहींत. सध्यां दिवस कठीण आहेत; पण मी तुला सांगून ठेवतों कीं हे आपले कठीण दिवस लवकरच निघून जातील. ते निघून जात तोंपर्यंत आह्मांला उत्तम रीतीनें वागलें पाहिजे.

बा०–अहाहा ! बाबा, काय सुंदर तरी भाकर ही ! ही बघतांक्षणीं माझ्या तोंडाला पाणी सुटलें !

वि०–(आपणाशींच) ही कसची सुंदर ? राहिलेल्या कोंड्याची भाकर ही. पिठाची भाकर सुंदर असते. (उघड) (भाकर मोडून) बाळया, ही घे आणि खा. चांगलें खाणें मिळत नाहीं, ह्मणून अगदींच उपाशीं राहतां येत नाहीं.

बा०–अहो बाबा, हें कांहीं ठीक नाहीं !

वि०–काय ठीक नाहीं ?

बा०–तुह्मी मला मोठा तुकडा दिला हें !

वि०–तुझी ज्यांत त्यांत कुरकुर आहेच. हातावर पडला तो चट करावा. उगीच बडबड लावूं नये.

बा०–पण तुह्मी सर्व दिवसभर खपतां आणि थकतां, त्या तुह्मी कांहींच खाऊं नये काय ?

वि०–अहाहा ! बाळया, तुला माझी देखील काळजी ना ! पण मी खरोखर सांगतों कीं, मी खाल्ली काय, आणि तूं खाल्लीस काय, एकच !

बा०–पण जर तुह्मी खाल्ली नाहीं तर उद्यां काम करायाला कसे जाल ? आणि जर एखादें काम मिळालें, तर तें तुह्मी कसें बरें कराल ? यासाठीं यांतली अर्धी तुह्मी घेतलीच पाहिजे. ही घ्या अर्धी पाहूं. (असें ह्मणून आपणास दिलेली अर्धी भाकर पुढें करतो.)

वि०– बरें तर बोवा ! तुझ्याच खुशीप्रमाणें करतों. तुझी प्रीति खाण्यावर असण्यापेक्षां मजवर अधिक आहे. (विठू बाळ्याची भाकर मोडतो, तींतून कांहीं पैसे पडतात.)

बा०–अहो बाबा, तें भाकरींतून काय हो पडलें ? (आनंदानें) अहो पैसे ! पैसे ! !

वि०–त्याला हात लावूं नकोस. ते पैसे आपले नव्हत.

बा०–तर मग ते कोणाचे ? अहो बाबा पैसे !

वि०–ते कोणाचे असतील हें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं. मी एवढेंच जाणतों कीं ते आपले नव्हेत. आह्मांला चौकशी केली पाहिजे. धांवत जा आणि समोर गोविंदरावाची आई दुर्गाबाई आहे कीं नाहीं, तिला लाऊन विचार. तिनें भाकर दिली होती, लौकर जा पाहूं.

बा०–पण बाबा, आह्मी फार गरीब आहों ना ? आणि दुर्गाबाईनें तुह्मांला भाकर दिली होती ना ?

वि०–मला भाकर दिली होती खरी; पण यावरून आंतले पैसे दिले होते, असें कांहीं होत नाहीं. आह्मी गरीब आहों खरे, पण आह्मी लबाडी कां बरें करावी ?

बा०–आवडते बाबा, माझ्या ध्यानांत आलें. तुह्मी सत्यवादी आहां, मी लौकर जाऊन त्या दुर्गाबाईला सांगतों. (धांवत जातो.)

वि०– (एकटाच) अरेरे, विचाऱ्या बाळ्या ! (गहिंवरून) तूं उपाशीं मरतोस, हें पाहून मला दुःख वाटतें खरें; पण तुला खोटसाळपणानें आणि गैर रीतीनें घासिलें आहे हें पाहून तर माझें काळीज तिळातिळ तुटतें. आपण परमेश्वराशीं आणि लोकांशीं विश्वासूपणानें वागलों, तर परमेश्वर आपलें कल्याण करील, ह्यांत काडीमात्र संशय नाहीं.

(बाळ्या दुर्गाबाईला घेऊन येतो.)

बा०–बाबा, ही पहा दुर्गाबाई. मी ह्यांस सर्व गोष्ट सांगितली.

वि०–अहो बाईसाब, कांहीं तरी घोंटाळा झाला आहे. हे पैसे तुमचे काय ?

बा०–अहो, बाईसाहेब ! माझे बाबा फार गरीब अहित, यास्तव त्यांना क्षमा करा.

वि०– बाळया, थंड हो. आपण कांहीं चोर नव्हों, आणि भिकारी नव्हों. (दुर्गाबाईस) जर हे पैसे आपले असले, तर घेऊन जा.

दुर्गा०–(आनंदानें) वरें. मी त्याला तसेंच सांगितलें होतें.

वि०–कोणाला काय सांगितलें होतें ?

दु०–आमच्या गोविंदाला. मी त्याला सांगितलें होतें कीं, शेजारच्या विठूसारखा प्रामाणिक मनुष्य ह्या शहरांत दुसरा कोणीही मिळावयाचा नाहीं ह्मणून. आणि तो ह्मणाला होता, "आई तुझे ह्मणणें खरें आहे." ह्मणून त्याची आतां साक्ष पटली.

वि०–बाइसाब, तुह्मी काय ह्मणतां, तें मला समजत नाहीं.

दुर्गा०–या पैशाची सर्व गोष्ट. मी तुला सांगतें ऐक. काल एका परकी गृहस्थानें ते पैसे मजकडे आणून दिले; आणि तो ह्मणाला, हे पैसे जो कोणी ह्या शहरांत गरीब आणि मोठा प्रामाणिक मनुष्य असेल त्याला द्या. मला ठाऊक होतें कीं, तूं आज संध्याकाळीं आमच्या घरीं नित्याप्रमाणें येशील; ह्मणून तुझ्याकरितां एक भाकर भाजली, आणि आंत हे पैसे घातले. आतां हे तुझे आहित; तुला

ते योग्य अहित, असें तूं आपल्या प्रामाणिकपणानें सिद्ध करून दाखविलेंस.

वि०—(आनंदानें) आहाहा ! माझ्या लाडक्या ! (असें म्हणून बाळ्याला मिठी मारतो.)

दुर्गा०—आणखी त्यानें आपल्या नांवाची ही चिठी दिली आहे; आणि मला सांगून ठेविलें आहे कीं, जर तो प्रामाणिक मनुष्य तुम्हांला आढळला तर त्याला सांगा कीं, तूं माझे घरीं ये, म्हणजे तुला चांगलें काम आणि चांगला मुशारा मिळेल. हें घे त्याचें नांव आणि पत्ता. (चिठीदेते).

वि०—(चिठ्ठी घेऊन) काम आणि मुशारा ! हें तर पैशापेक्षांही चांगलें. फुकाचें बसून कोणी खावें ? बाईसाहेब तुमचे मजवर फार उपकार झालें. आतां तुम्ही यावें, बाईसाव. (बाळ्यास) बाळ्या, चल पाहूं ह्या गृहस्थाचें घर शोधून काढूं. आतां आम्हांला पुरेशी भाकर खचीत मिळेल. देवा ! तूं आम्हांला खरेपणानें वागूं दिलेंस आणि आम्हांला पुरेशी भाकर दिलीस, हे आम्हांवर तुझे फार उपकार आहेत ! (निघून जातात).

मुलांनो, आणि मुलींनो. आपत्काळ आला असतांही प्रामाणिकपणा सोडूं नये. [सि. न. ४]

मित्र.

प्रत्येक मनुष्याला मित्र आहेच आहे. कोणाला नाहीं असें क्वचित्. मित्र दोन प्रकारचे असतात. एक खरा मित्र आणि दुसरा खोटा मित्र.

खरा मित्र न्यायानें वागतो. तो आपल्या मित्राचे दोष

व दुर्गुण जे कांहीं आहेत ते सुधारण्याचा प्रयत्न करितो, आणि आपणही त्याप्रमाणें वागतो. तो आपल्या मित्राच्या पाठीमागें त्याचे गुण गातो. आणि त्याच्या समोर त्याच्या वाईट चालीची निर्भत्सना करितो. वैद्य जो आहे तो एखादा शारीरिक रोग बरा करितो, पण त्याच्यानें मानसिक रोग बरा करवत नाहीं. तो खऱ्या मित्राच्या योगानें बरा होतो.

खरा मित्र जो आहे तो आपण व आपला मित्र हे वेगवेगळे मानीत नाहीं. आपल्या मित्रावर जर एखादें संकट आलें, तर तें आपणावरच आलें आहे असें त्याला वाटतें. तो आपल्या मित्राला आपत्काळीं मदत करितो, आणि हरएक प्रकारें त्याला सुख देतो. किंबहुना प्रसंग पडल्यास त्याच्या जिवासाठीं आपला जीवही देतो. खोटा मित्र जो आहे, तो या गोष्टींच्या उलट वागतो. तो आपल्या मित्राला वाईट रीतीनें वागण्याला प्रवृत्त करतो. आपल्या मित्राच्या तोंडावर गोड बोलतो, आणि पाठीमागें त्यास पाण्यांत पाहतो. त्याच्या जिभेवर अमृत आणि अंतःकरणांत विष असतें. जोपर्यंत मित्राच्या घरीं संपतीचा हीरा आहे तोंपर्यंत तो त्याच्या दारीं नेहमीं जोडे फाडतो, आणि त्याची सद्दी फिरली म्हणजे त्याचें तोंड देखील पाहूं इच्छीत नाहीं.

ह्याप्रमाणें खरा मित्र आणि खोटा मित्र यांतील भेद आहे. थोड्या दिवसांच्या सहवासानें ते ओळखतां येतात.

खऱ्या मित्राच्या संगतीनें काय काय लाभ होतात हें पुढील उदाहरणांवरून कळून येईल.

उदाहरण पहिलें. महापराक्रमी शिवाजी, जो मराठ्यांचा पहिला राजा तो सत्संगमानें येवढ्या थोरल्या पराक्रमास चढला. श्री समर्थ रामदासस्वामी हा त्यानें आपला मित्र करून घेतला. तो खरा मित्र होता. जर तो खोटा असता तर त्यानें शिवाजीसारख्या राजाजवळून पावड्यानें पैसा ओढून केव्हांच आपला तळीराम गार केला असता; पण त्यानें तसें केलें नाहीं. रामदास स्वामी हे खरे साधू, विवेकी आणि विद्वान् होते. त्यांच्याच समागमानें शिवाजीला अलभ्य वस्तु प्राप्त झाल्या.

दुसरें उदाहरण—श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचें. त्यांनीं रामशास्त्रीबुवांस आपलेंसें करून घेतलें, आणि नीतीनें राज्य चालविलें.

तिसरें उदाहरण—ग्रीस देशांतील प्रसिद्ध वक्ता दिमास्थनीस्. हा वक्तृत्वकलेंत हुशार जो कालिस्त्रेतस् ह्याच्या संगतीनें, त्याच्यापेक्षांही चांगला वक्ता झाला.

ह्मणून वाचकहो, तुह्मी सुमित्राची संगती धरा. ह्मणजे त्याच्या संगतीनें तुह्मी नीतिमंत व्हाल. तसा मित्र मिळाला नाहीं तरी, नीतिपर पुस्तकें वाचा आणि स्वतः खऱ्या मित्रत्वानें सर्वांशीं वागा. "पुस्तकासारखा दुसरा मित्र नाहीं" असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे.

रमा.

रमा ही एका ब्राह्मण गृहस्थाची एकुलती मुलगी होती. तिला भाऊ ना बहीण. ती फार चाणक्ष होती. तिला

लहानपणापासून चांगलें शिक्षण मिळालें होतें. ती पांच वर्षांची झाली, तेव्हां बापानें तिला एकदोन भुपाळ्या, विसांपर्यंत फाडे, आणि सर्व बाराखड्या शिकविल्या. तिची जीभ फारच हलकी होती. जें शिकवावें तें तिला तोंडपाठ.

ती नित्य सकाळीं सहा वाजतां आपल्या आईबरोबर उठे. तोंड धुवून मोकळी होतांच भुपाळ्या आणि परवाचा ह्मणे. दुसऱ्या दिवसासाठीं तयार करून ठेवण्याकरितां बापाजवळून धडे नेमून घेई. नंतर शाळेंतले धडे करून आंग धुण्यास जाई. आंग धुतल्यावर, बापानें शिकविलेलें गणपतिस्तोत्र ह्मणे. अंगणांतल्या तुळशीला दररोज पाणी घाली. पाणी घालतेवेळेस काय ह्मणावें तें तिला आईनें शिकविलें होतें. नित्य पांच प्रदक्षणा घाली. हा सर्व विधि आटपून मग जेवावयाला जाई. ती नित्य वेळचेवेळेस शाळेंत जाई. शाळेंत जाण्याची वेळ अकरा वाजतांची होती. ती पांच वाजतां सुटे. घरीं आल्यावर ती दुसरा परकर नेसे. कारण शाळेंत कित्येक मळकट मुली येत, त्यांना शिवून घरांतील पाण्यास शिवणें हें तिच्या आईला आवडत नसे. शाळेंतून घरीं आल्यावर ती थोडासा चपातीचा तुकडा खाई; आणि पुन्हा सकाळचे धडे करावयास लागे.

जेव्हां ती नऊ वर्षांची झाली, तेव्हां तिला चांगलें वाचतां येऊं लागलें. तिला कशीदा व शिवणकाम चांगलें येऊं लागलें. ती आपल्या आईस रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप असे मोठमोठे ग्रंथ वाचून दाखवूं लागली. ती आपल्या आईच्या हाताखालीं शिंतोडा घालण्याचें, भांडीं विसळण्याचें आणि कातण्या वाटण्याचें काम करूं लागली.

ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

अशा प्रकारें ती हळू हळू घर संसारच्या कामांतही निष्णात झाली.

जेव्हां ती उपवर झाली तेव्हां तिच्या आईबापांस चिंता पडली. रमेच्या नवऱ्यास देणगी देण्याचें तिच्या बापाला सामर्थ्य नव्हतें. देणगी म्हणजे जिवघेणी झाली होती. हजार दीड हजारांशिवाय हात हालत नव्हता. पण रमेचें दैव मोठें. एक तर ती रूपानें सुंदर. दुसरें, तिचे गुण सोन्यानें बांधविण्यासारखे होते. म्हणून तिला भराभर लोकांच्या मागण्या येऊं लागल्या. त्यांत एक श्रीमंत गृहस्थ होता. तो तर तिच्या बापाजवळून एक पै सुद्धां न घेतां तिला आपल्या मुलाला करण्यास तयार झाला. रमेच्या बापाच्या मनांत तिला त्याला द्यायाचें नव्हतें. पण तिची आई म्हणाली कीं, " मुलगा चांगलासा नाहीं तरी त्याजवळ चार पैसे आहेत. रमेला अन्नवस्त्रास कांहीं कमी होणार नाहीं. त्यांत एक दमडी न खरचतां लग्न होत आहे तर मग त्यांत तोटा तो काय? " रमेचा बाप म्हणाला, " गांठ खर्चायाची पडली तरी कांहीं चिंता नाहीं. पण असल्या अक्षरशून्य मुलास आपली मुलगी काढून द्यावी हें बरें नाहीं. रमेस तिच्या योग्यतेनुरूप नवरा पाहिजे." रमेच्या आईनें हट्टच धरिला कीं, " रमेला दुसऱ्यास द्याल तर मी जिवंत राहाणार नाहीं." ह्यामुळें रमेला त्यासच देणें रमेच्या बापास प्राप्त झालें.

आपली आणि अशा अक्षरशत्रूशीं गांठ पडली हें पाहून रमेला फार वाईट वाटलें. पण दैवापुढें कोणाचें चालत नाहीं हें पाहून तिला चूप बसावें लागलें.

रमा ज्याप्रमाणें माहेरीं उद्योग करी त्याप्रमाणेंच सासरींही करी. ती नित्य नवऱ्याच्या व सासू सासऱ्यांच्या आधीं उठे. घरांतील झाड लोट करी. शिंतोडा घाली. लवकरच आंग धुवून आपला देवदेव आटपून पतिसेवेस लागे. ती पतीची व सासऱ्याची तांब्या पंचपात्री जागच्या जागीं मांडी. पण तिची सासू महाखष्ट होती. इनें सर्व जरी केलें तरी, " कुत्र्याची शेपटी वांकडी ती वांकडीच " सासूबाईच्या कांहीं मनास यावयाचें नाहीं. ह्या प्रकारें तिला सासूबाईचा जाच काढावा लागे.आणि ती तो शांतपणें काढी.

ती उठल्या पावलीं माहेरीं जात नसे. जेव्हां तिला तेथलें बोलावणें येई तेव्हांच ती जाई. माहेरीं गेल्यावर ती पुष्कळ दिवस रहात नसे. ती संध्याकाळीं परत येई. सासूच्या चहाड्या आईला सांगत नसे. तिची आई तिला खोदून खोदून विचारी, पण ती दाद देत नसे. ती म्हणे कीं, " आपली आणि सासूची जन्माची गांठ आहे. तर तिच्या चहाड्या आईबापांस सांगून, त्यामध्यें वैमनस्य पाडणें बरें नाहीं."

नंतर रमा मोठी झाल्यावर रीतीप्रमाणें सोहळा समारंभ होऊन ती नवराबायको दोघेंही मोठ्या आनंदानें राहूं लागलीं

एकदोन वर्षांनंतर रमेला कांहीं दिवस गेले, आणि शुक्ल पक्षांतील चंद्रा प्रमाणें तिचा गर्भ वाढूं लागला. तिला डोहळे होऊं लागले. तिला असें वाटावें कीं, देवांची गाणीं म्हणावीं; गरीब गुरीबांस अन्नवस्त्र द्यावें; लंगड्या पांगळ्यांस दानधर्म करावा. असो, ह्या प्रमाणें पूर्ण मास

होतांच ती प्रसूत झाली. पुत्र रत्न झालें. त्याचे बारसें करून त्याचें नांव आनंदराव ठेविलें. 'आनंदराव' नांव ठेवण्याचें कारण असें, कीं तो जेव्हां जन्मला, तेव्हां तिच्या सासूसासऱ्यांस व आईबापांस फारच आनंद झाला.

सासूस व सासऱ्यास ह्यातारपणीं नातू झाला ह्मणून, आणि रमेच्या आईबापांस मुलाचें लेकरूं नव्हतें ह्मणून, फारच आनंद झाला.

मुलाला दाई न्हाऊं माखूं घालीत असतां ती तिजवर आपली पक्की नजर ठेवीत असे. दाई कदाचित् मुलाला थंड पाणी घालील कदाचित् फारच उन पाणी घालील, अथवा न्हाऊं घालतांना नाकांतोंडांत पाणी शिरेल आणि मुलाला तेणेंकरून पडसें होईल आणि जन्माचा तो तसा राहील, असें तिला भय वाटे. ह्मणून ती आपला अर्धा जीव करी. तीन महिने झाल्यावर ती स्वतः त्यास तेल पाणी करूं लागली, ह्याप्रमाणें ती स्वतः त्याची पहिल्यापासून बडदास्त ठेवीत असे.

पुढें तो आठ दहा महिन्यांचा झाल्यावर त्यास हळू हळू बोलावयास शिकवूं लागली. पुढें तो चालूं लागला, इकडे तिकडे उड्या मारूं लागला, खेळूं लागला. या प्रमाणें तो सुखानें वाढत असतां आईबापांनीं व आजा आजी यांणीं त्याचें पुष्कळ कौतुक करावें. परंतु त्याला माती खाणें किंवा मळकटपणानें वागणें, किंवा वेडीं वांकडीं भाषणें करणें, याची खोड न लागूं देण्याविषयीं त्यांनीं फार सावधगिरी ठेविली होती.

मुलास लहानपणीं हट्ट करण्याचा नाद सहज लागतो

आणि मग तो लवकर सुटत नाहीं. ह्मणून एकादे समयीं मुलगा जी कांहीं वस्तूं मागे, ती वस्तु देण्याजोगी असल्यास कांहीं अडचण न आणतां चटकन् त्याला देत. पण ती वस्तु देण्याजोगी नसल्यास, युक्तीनें दुसऱ्या कांहीं वस्तू कडे त्याचें लक्ष लावून, तिचा विसर पाडीत. आणि अमुक वस्तु घ्यावी, अमुक घेऊं नये, वगैरे गोष्टी सोईनें त्याच्या मनांत भरवून देत. याप्रमाणें हट्टी स्वभावाचे बीजच त्याच्या मनांत उत्पन्न होऊं न देण्याचा त्यांनीं यत्न करावा. मुलानें कांहीं वस्तु मागितली, आणि एकदा ती त्याला देत नाहीं ह्मणून सांगितलें, आणि मुलगा रडूं लागला असतां मग ती जर त्याला दिली, तर त्याला वाटू लागतें, कीं रडणें हें एक आपल्या हातीं मोठें शस्त्र आहे; पाहिजे ती वस्तु त्याच्या योगानें आपणास मिळवितां येते या करितां मुलाची समजूत तशा प्रकारची न होण्याविषयीं फार जपलें पाहिजे. हें त्याना चांगलें समजत असे. एकदा जी वस्तु देत नाहीं ह्मणून ह्मटलें, ती त्याला त्या वेळीं न देण्याविषयीं फार सावधगिरी ठेवीत, व ती दुसऱ्या कोणत्याही वेळीं ती देण्याजोगी असल्यास, तो ज्या दिवशीं आनंदात असें, त्या दिवशीं ती त्याला देत. ह्यामुळें मुलांस असें वाटावें कीं, आपण रडल्यास आपणास कांहीं एक मिळत नाहीं. तर न रडतां आनंदानें खेळत असल्यास ती आपणास प्राप्त होते.

तिनें त्यास पैसा ह्मणून कधींही देऊं नये. तिला ठाऊक होतें कीं मुलांस लहानपणीं पैसे दिले असतां तीं मोठेपणीं चोऱ्या करूं लागतात.

ह्या प्रमाणें तिनें त्यास लहानपणींच नीति पंथास लाविल्यामुळें पुढें तो मोठा धार्मिक निपजला. आणि ह्मटलें आहे " डोहळ्यावरून मुलाची परीक्षा ! !

आनंदरावाला आईबापांनीं व आजोबा आणि आजी बाई यांनीं चांगली चागलीं सोपीं गाणीं, श्लोक, आर्या, इत्यादि नित्य ह्मणायाला शिकवावीं, आणि दिवसेंदिवस त्याच्या अंगीं सद्गुणाचीं वृद्धि करण्याचा प्रयत्न करावा. पुढें तो पांच सहा वर्षांचा झाल्या नंतर त्याला धुळाक्षरें शिकवून हळू हळू त्याच्या विद्याभ्यासाकडे थोडथोडें लक्ष लावून जसजसा तो मोठा होत चालला, तसतशी त्याला आपोआप शिकण्याची गोडी उत्पन्न होईल असा प्रयत्न चालविला.

ह्या प्रमाणें रमाबाई आणि तिचा नवरा मोठ्या शहाणपणानें व आनंदानें आपल्या मुलासहित संसार करीत आहेत असें पाहून त्याच्या वृद्ध मातापितरांस अत्यानंद झाला.

मुलींनो तुह्मी मोठ्या व्हाल आणि जेव्हां नवऱ्याच्या घरीं जाल, आणि रमेप्रमाणें जेव्हां मुले बाळे होतील तेव्हां तुह्मीही तिजप्रमाणें उत्तम आचरण ठेवून सासू, सासरा, नवरा, मुलें, आणि इतर मंडळी यांस ज्या रीतीनें संतोष होईल, आणि सर्वांस सुख होईल त्या रीतीनें वागण्याचा प्रयत्न करावा. ह्मणजे सर्व प्रकारें तुमचा थोरपणा वाढून तुमची प्रशंसा होईल, आणि सर्व प्रकारें तुमचें कल्याणच होत जाईल.

बालविवाह.

डॉक्टर पेची-फिप्सन्‌बाई एम्. डी. यांनीं इंग्रजी भाषेंत दिलेलें व्याख्यान.

सद्गृहस्थहो,

सात वर्षांपूर्वी मी पहिल्यानें या देशांत आलें तेव्हां या देशांतील लोकांच्या रीतीभाती व विचार पश्चिमेकडील राष्ट्रांच्या रीतीभाती व विचार यांहून पुष्कळ अंशीं भिन्न असल्यामुळें त्यांजविषयींची माहिती मिळविल्यास ती फार उपयुक्त होईल असें वाटल्यावरून ती मिळविण्याचा मीं निश्चय केला. त्यापूर्वी पूर्वेकडील देशांत मीं केवळ मजेखातर व विश्रांतीखातर बराच प्रवास केला होता, व अशा घाईघाईनें केलेल्या प्रवासांत जी कांहीं थोडीशी वरवर माहिती मिळते तिजवरून पूर्वेकडील व पश्चिमेकडील राष्ट्रांच्या रीतीभातींत परस्परविरुद्ध अशा पुष्कळ गोष्टी आहेत हें माझ्या पाहण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांत आलें तेव्हां माझ्या वैद्यकीच्या धंद्याच्या संबंधानें ह्या देशांतील लोकांच्या गृहस्थितीचें खरें स्वरूप प्रत्यक्ष पाहण्यास मला बरीच सवड मिळेल व तुह्मां लोकांच्या सहवासानें तुमच्या रीतीभाती व स्वभाव ही समजून घेण्यास पूर्वी कधीं प्राप्त झाली नाहीं अशी अपूर्व संधि मला मिळेल हें मी जाणत होतें. मी आलें त्यावेळीं तुह्मां लोकांच्या रीतीभातींच्या संबंधानें माझ्या मनावर वरा किंवा वाईट असा कोणताच ग्रह झाला नव्हता असें स्पष्टपणें एथें सांगण्यास मला कांहीं एक प्रत्यवाय दिसत नाहीं. फक्त

तुह्मां लोकांच्या रीतीभातींचें निरालस्यपणें ज्ञान प्राप्त घ्यावें व त्यांत जें कांहीं बरें दिसेल त्यास वरें ह्मणावें व होईल तेथवर त्याचा आपल्या आचरणामध्यें स्वीकार करावा अशा प्रकारची एकंदरींत माझ्या मनाची स्थिति होती. व आजपर्यंत मी कोणत्याही देशांत गेलें व तेथें शिकण्यासारख्या असलेल्या गोष्टी मी शिकलें नाहीं व माझ्या शिक्षणांत त्यांच्या अनुरोधानें सुधारणा केली नाहीं असें कधींही झालें नाहीं. तुह्मां लोकांच्या गृहस्थितींत देखील अशा रीतीनें माझ्या पाहण्यांत बऱ्याच अशा कांहीं गोष्टी आल्या आहेत कीं त्यांच्या संबंधानें तुह्मां लोकांची मी खरोखर फार तारीफ करतें. ईश्वराची सात्विक भक्ति हा तुह्मां हिंदुलोकांमध्यें एक मोठा विलक्षण गुण आहे आणि त्याबद्दल माझ्या मनांत तुह्मांविषयीं खरोखर एका प्रकारची पूज्यबुद्धि वसत आहे. शिवाय, अनादिकालापासून इतर धर्मांविषयीं समभाव ठेवणें हा जो तुमच्या धर्माचा उपदेश तो तुमच्या अंत:करणावर पूर्णपणें बिंबलेला असून त्याप्रमाणें तुमचें आचरण होत आहे. ह्या गोष्टीच्या संबंधानें तर सर्व जगांतील लोकांनीं तुमचें अनुकरण करणें हें माझ्या मतें तर अत्यंत इष्ट आहे. कारण, इतर धर्मांच्या संबंधानें हा जो समभाव तुह्मी दाखवीत आहां तो तुमच्या धर्मावर तुमची श्रद्धा कमी आहे, त्याजविषयीं तुह्मी बेफिकीर आहां, ह्मणून नव्हे, तर तुमच्या धर्मावर तुमची पूर्ण श्रद्धा आहे हें मशहूर असून त्याच्या खरेपणाविषयीं तुमची मनोभावें खात्री झालेली असते; तथापि इतर धर्मांच्या संबंधानें समभाव ठेवणें हें जें तुमचें धर्मतत्व तें तुह्मीं अशा रीतीनें पाळीत आहां कीं इतर लोकांच्या धर्मांत कोणत्याही रीतीनें ढवळाढवळ न करितां, त्यां-

शीं मोठ्या प्रीतीनें व सलोख्यानें राहण्यास तुमची नेहमीं तयारी असते.

तथापि, प्रस्तुतप्रसंगीं मला जें कांहीं बोलणें आहे तें तुह्मांमध्यें अशा ज्या कांहीं चांगल्या चाली आहेत त्यांच्या संबंधानें नसून, माझ्या वैद्यकीच्या धंद्याच्या संबंधानें, बालविवाहाची तुह्मांमध्यें फार जारीनें चालू असलेली अनिष्ट चाल माझ्या विशेष पाहण्यांत आली आहे तिच्या संबंधानें चार शब्द बोलण्याची माझी इच्छा आहे. ही तुमच्या इतर चांगल्या चालींप्रमाणें अन्यलोकांनीं अनुकरण करण्यासारखी नाहीं एवढेंच नव्हे, तर तिच्यापासून होणारे तात्कालिक परिणाम अतिभयंकर असून एकंदरींत तुह्मां लोकांच्या भावी स्थितीस पुढें मागें ती इतकी अनर्थकारक होण्याचा संभव आहे कीं तिचा तुह्मीं एकदम अटकाव करणें जरूर आहे. तुह्मांपैकीं खरोखर शहाणे व समजूतदार असे जे लोक आहेत त्यांचे यासंबंधानें माझ्यासारखेच विचार असून ते या कामांत माझे सहायकर्ते आहेत हें मी जाणत आहे. अर्थात् माझी अशी समजूत आहे कीं ही दुष्ट घातकी चाल समूळ नाहींशी करणें इष्ट आहे अशी तुमची खात्री झाली असल्यामुळें त्यासंबंधानें आतां तुमचीं मनें वळविण्याविषयीं विशेष खटपट करण्याची जरूरी राहिली नाहीं. याकरितां या गोष्टीच्या पुष्ट्यर्थ जीं कांहीं प्रमाणें आहेत तेवढींच फक्त आतां मी तुह्मांपुढें मांडतें. माझ्या धंद्यांत मिळविलेल्या प्रत्यक्ष अनुभवावरून ह्या चालीपासून होणारे तात्कालिक परिणाम व मीं संपादन केलेल्या वैद्यकीच्या ज्ञानावरून हिंदुराष्ट्राच्या भावी संततीस ह्या चालीपासून होणारें नुकसान हीं मला पूर्ण अवगत

आहेत, आणि हीं तुह्मांस व्याख्यानरूपानें सांगितल्यास तुह्मांस या कार्मीं कांहीं मदत होईल असें जाणून मीं हा विषय आज हातीं घेतला आहे.

हिंदु लोकांत बालविवाह चालू असल्याबद्दल वर्तमानपत्रांच्या व पुस्तकांच्या वाचनावरून हिंदुस्थानांत येण्यापूर्वीच मला माहित झालें होतें. परंतु ही गोष्ट जेथें जेथें पुस्तकांत किंवा अन्यत्र माझ्या वाचण्यांत आली होती तेथें तेथें असा आणखी एक शेरा माझ्या पाहण्यांत येत असे कीं थंड हवेच्या प्रदेशांतील मुलींपेक्षां हिंदुस्थानांतील मुलींस फार लौकर प्रौढावस्था प्राप्त होते. परंतु मी इकडे येऊन पाहिलें तों वास्तविक प्रकार तसा नसून हिंदु मुली सदरील पुस्तकांत वगैरे लिहिल्याप्रमाणें लौकर प्रौढावस्थेंत येत नाहींत एवढेंच नव्हे तर त्यांच्या शरीराचा बांधा प्रौढ व पक्व अशा दशेंत येऊन पोचण्यास बराच उशीर लागतो, व एखाद्या पंधरा वर्षांच्या हिंदु मुलीची वाढ अकरा वर्षांच्या इंग्रज मुलीच्या वाढीपेक्षां जास्त नसून ती फार तर तिच्या एवढी दिसते न दिसते. यावरून उक्त लेखांच्या संबंधानें मला जें कांहीं आश्चर्य वाटलें असेल त्याची, सद्गृहस्थहो, तुह्मीच कल्पना करा! सारांश, ज्या इंग्रज ग्रंथकारांनीं सदरील लेख लिहिले त्यांस हिंदु लोकांची गृहस्थिति समजण्यास योग्य सवड मिळाली नसावी व त्यांमुळें त्यांचे लेख केवळ भ्रमोत्पादक होत असें ह्मणणें मला प्राप्त झालें. ह्या ग्रंथकारांची पहिल्यानें अशी चुकी झाली कीं हिंदु लोकांत मुली प्रौढावस्थेंत आल्याशिवाय त्यांचा विवाह (पुरुषांशीं संबंध) होत नाहीं असा त्यांचा समज झाला, व दुसरी चुकी अशी झाली कीं हिंदु लोक प्रौढावस्थेचें जें लक्षण (ऋतुदर्शन)

करितात तेंच त्यांनीं ग्राह्य केलें. पहिला [illegible] तुम्हांस माहितच आहे कीं दुर्दैवानें तसा सर्वत्र प्रकार नसून [illegible] च्याच (व मुख्यत्वेंकरून गुजराथी) लोकांत तुमच्या मतें जें प्रौढावस्थेचें लक्षण तें देखील प्राप्त होण्याच्या पूर्वीच मुलींचा पुरुषांशीं संबंध होत असतो. दुसऱ्या गोष्टीच्या संबंधानें म्हणजे प्रौढावस्थेचें खरें लक्षण असें जें त्यांनीं गृहीत केलें त्यासंबंधानें मी तुमची अशी खात्री करून देण्यास तयार आहे कीं तें त्यांचें प्रौढावस्थेचें लक्षण अगदीं चुकीचें आहे. आतां, पहिली गोष्ट म्हणजे ऋतुदर्शन—ज्याला प्रौढावस्थेचें लक्षण असें समजण्याचा खोटा संप्रदाय पडला आहे तें—होण्याच्या पूर्वीच पुरुषाशीं संबंध ठेवणें (ह्या गोष्टीच्या संबंधानें खरोखर काय बोलावे हें मला समजत नाहीं !) ह्या विषयीं माझेचसे काय पण सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांचे—सर्व सुधारलेल्या राष्ट्रांचे असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय तर नाहींना ?— विचार इतके कांहीं सक्त आहेत कीं तो आमच्या मतें पीनलकोडाप्रमाणें शिक्षा करण्यास योग्य असा एक केवळ गुन्हा होतो. सद्गृहस्थहो, कलकत्त्यांतील फुलमुनीदासीच्या संबंधानें घडून आलेली हृदयद्रावक विना वाचून तुम्ही सांप्रत तत्संबंधीं चालू असलेल्या कायद्यांत सुधारणा जरूर करावी म्हणून सरकारांत अर्ज पाठविण्यास प्रवृत्त झाला आहां. परंतु अशा प्रकारच्या कितीएक विना आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आल्या आहेत व तुम्हांपैकींही कित्येकांच्या त्या पाहण्यांत आल्या असतील. यांशिवाय दुसऱ्या अशा कांहीं बिना घडून येतात कीं त्यांत मरण बरें पण ती यावज्जीव दीनावस्था व शरीराची तळमळ नको अशी स्थिति कित्येक

स्त्रियांस प्राप्त झालेली असते. सद्गृहस्थहो, अशा अघोर कृत्यांस दासपणाची ह्मणून जी कांहीं शिक्षा ह्मणतात ती देखील कमी आहे असें माझ्याप्रमाणेंच तुह्मांलाही वाटत नाहीं काय ? तुह्मांकींं पुष्कळांचे माझ्या सारखेच या संबंधानें विचार आहेत हें पाहून मला खरोखर एका प्रकारचें समाधान वाटत आहे. ह्या विषयाच्या संबंधानें तुह्मांपैकीं पुष्कळांनीं मला आपले विचार कळविले आहेत, व ज्या जातींत विशेषेंकरून असे भयंकर प्रकार घडून येतात अशा जातींतील लोकांनींही सरकार या कामीं हात घालून हा दुष्ट प्रघात बंद करील तर बरें होईल अशी आपली इच्छा माझ्याजवळ प्रदर्शित केली आहे. अशा बाबतींत गुन्हेगारांस योग्य शिक्षा करण्यास जातिनिर्बंधाचा कितपत उपयोग होईल हें मला माहित नाहीं, तथापि मला असें वाटतें कीं साधल्यास या कामीं जातीकडून कांहींतरी योग्य शिक्षा करविण्यांची तजवीज होणें अवश्य आहे. जातिनिर्बंधाचें वास्तविक तुह्मांमध्यें इतकें कांहीं प्राबल्य आहे कीं उंच वर्णांत.ल सुशिक्षित लोकांनीं नेट धरून काम केल्यास ही घातकी चाल समूळ नाहींशी करतां येणार नाहीं असें मला वाटत नाहीं. सद्गृहस्थहो, ह्या घातकी चालीपासून तुह्मां लोकांच्या स्त्रियांची व भावी संततीची खराबी होत आहे एवढेंच नव्हे, तर संसारांत स्त्रीपुरुषांच्या परस्परप्रेमापासून जें कांहीं सुख ह्मणून आहे त्यास देखील तुह्मी या चालीच्या पायीं अगदीं अंतरत आहां असें ह्मणणं प्राप्त आहे. कारण, ज्या पुरुषाच्या अशा प्रकारच्या अविचारी कृत्यापासून एखाद्या स्त्रीस यावज्जन्म दुस्सह क्लेश व यातना भोगाव्या लागतात

त्याच्याविषयीं तिच्या मनांत किती वेरं पराकाष्टेचा तिरस्कार उत्पन्न होत असेल? व अशा स्थितींत परस्पर प्रेम उत्पन्न होण्यास काडीमात्र तरी अवकाश मिळत असेल असें तुह्मांस वाटतें काय? अर्थात् ही लहान अर्भकांवर चोरून छपून अगर उघडपणें वलात्कार करण्याची जी तुह्मांमध्यें चाल आहे ती तुमचें सर्वस्वीं नुकसान करीत आहे. प्राचीन काळीं तुह्मां लोकांत जी सुधारणा झाली होती तिच्यापासून या अमानुष चालीचा स्वीकार केल्यानें तुमची पिछेहाट होत आहे हें तुह्मी जाणत नाहीं. ही चाल तुमच्या धर्मास कलंक लावणारी व तुमच्या माणुसपणास वट्टा आणणारी अशी असून सर्व सुधारलेल्या राष्ट्रांच्या दृष्टीनें—त्यांच्या खरोखर समजण्यांत आल्यास—तुमच्या कीर्तीस काळिमा आणणारी आहे. ह्याकरितां, तुह्मांमध्यें स्वाभिमान किंवा पौरुष ह्मणून कांहीं अवशिष्ट असेल तर लोकापवादाच्या अगर इतर कोणत्याही संबंधानें कांहीं जरी तुमचें नुकसान झालें तरी ही दुष्ट चाल तुह्मांमधून अगदीं नाहींशी करा व तुमच्या कीर्तीस लागलेला हा डाग काढून टाका असें माझें पुनः पुनः तुह्मांस बजावून सांगणें आहे.

ही घातकी चाल तुह्मांपैकीं पुष्कळांस पसंत नाहीं व तुह्मी तिचा तिरस्कार करतां हें मला माहित आहे, तरी ह्याशिवाय अशाच प्रकारची दुसरी एक चाल आहे व तिचा प्रचार अद्याप तुह्मांमध्यें, कांहीं अपवाद शिवाय करून, सार्वत्रिक आहे असें ह्मणतां येईल. ह्मणून ह्या दुसऱ्या चालीविषयींच मी आतां चार शब्द बोलतें. तुह्मी असें ह्मणतां कीं "आमच्या मुली मोठ्या झाल्या, त्यांस ऋतु प्राप्त झाला, ह्मणजे आह्मीं त्यांचा पुरुषांशीं संबंध होऊं देतों." परंतु हें

तुमचें ह्मणणें देखील मला पसंत नाहीं, कारण, ऋतुप्राप्ति हें प्रौढावस्थेचीं जीं एकाहून अधिक लक्षणें आहेत त्यांपैकीं फक्त एक लक्षण व तेंहो अगदीं अनिश्चयात्मक असें लक्षण असून, या अशा प्रकारच्या एका लक्षणावरून संपूर्ण प्रौढावस्थेचें तुह्मांकडून अनुमान करण्यांत येतें हें बरोबर नाहीं. अनिश्चयात्मक असें ह्मणण्याचें कारण असें कीं ऋतुदर्शन ह्मणून जें कांहीं आहे त्यांत कोणत्याच प्रकारचा नियमितपणा नसतो व तें केवळ हवा, खाण्यापिण्याची व्यवस्था, व राहण्याचा प्रकार वगैरे बाह्य गोष्टींवर अवलंबून असतें, व शरीराच्या प्रौढ व पक्व अशा स्थितीशीं त्याचा अवश्य असा बिलकुल संबंध नसतो, अर्थात् ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वीच, वर सांगितलेल्या कारणांवरूनही ऋतुदर्शन होण्याचा अनेक प्रसंगीं संभव असतो. शहरापासून दूर खेडेगांवाच्या वस्तींत राहणाऱ्या एखाद्या तेरा वर्षांच्या मुलीचा बांधा, शहरांतील कोंडलेल्या व रोगी हवेंत राहणाऱ्या एखाद्या अकरा वर्षांच्या मुलीपेक्षां अधिक चांगला जमलेला असून विशेष पूर्णत्वाप्रत आलेला असतो ही गोष्ट खचित कोणाच्यानें नाकबूल करतां येणार नाहीं. तथापि शहरांत राहणाऱ्या त्या अकरा वर्षांच्या खुजट व नाजूक ह्मटलेल्या मुलीस वर सांगितलेल्या बाह्य कारणांवरून ऋतु प्राप्त झाला असल्यामुळें ती स्त्रीत्वाप्रत आली, अर्थात् तिला प्रौढावस्था प्राप्त झाली असें तुह्मी समजतां, व ती खेडेगांवांतील तेरा वर्षांची मुलगी शरीराच्या प्रशस्त वाढीमुळें हिडिंबेसारखी जरी दिसत असली तरी तिला ऋतु प्राप्त न झाल्यामुळें तिची गणना तुमच्या मतें अप्रौढ स्त्रियांतच होत असते. असो, प्रौढाप्रौढावस्थेचें खरें लक्षण तुह्मांस बरोबर समजत नसल्यामुळें तुमच्या

व्यवहारांत अशा प्रकारचा खोटसाळपणा उत्पन्न झाला आहे. ह्या माझ्या ह्मणण्याच्या खेरपणाविषयीं प्रमाणें देण्यास इंद्रियविज्ञानशास्त्र धुंडण्याची जरूरी नाहीं. फक्त या संबंधाची तुमच्या नेहमी पाहण्यांत येणारी अशी एकच गोष्ट येथें सांगितल्यास तुमचो खात्री होणार आहे. ती गोष्ट अशी कीं ऋतुप्राप्ति होण्याबरोबर ज्या मुलींचा पुरुषांशीं एकदम संबंध सुरू होतो त्यांच्यासंबंधानें बहुतेक व्यापकसारखा असा एक नियम आपल्यास दिसून येईल कीं त्यांस कांहीं वर्षेंपर्यंत ह्मणजे खरी प्रौढावस्था प्राप्त होई तोंपर्यंत संतति होत नसते. आतां ऋतुदर्शन व प्रौढावस्था ह्यांच्या संबंधाचा अशा प्रकारचा गैरसमज तुमचाच झालेला आहे असें नाहीं. हा समज अर्वाचीन इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ते खेरीज करून बहुशः सार्वत्रिक आहे, ह्मणजे तो सर्व देशांतील लोकांत कमी जास्त मानानें वसत आहे, हें खरें आहे. तथापि उलट पक्षीं एवढें सांगणें रास्त आहे कीं ग्रीक लोक व त्यांच्या मागून उदयास आलेलीं राष्ट्रें यांच्यामध्यें ऋतुदर्शन व संभोगावस्था अशा प्रकारच्या दोन निरनिराळ्या अवस्था मानण्याचा संप्रदाय आहे, व या दोहोंमध्यें कांहीं वर्षांचें अंतर असतें. तसेंच जगामध्यें आजपर्यंत जीं जीं बलाढ्य अशीं राष्ट्रें होऊन गेलीं त्यांच्यामध्यें हा नियम सार्वत्रिक असल्याविषयीं पुष्कळ प्रमाणें देतां येतील. तरी माझ्या ह्मणण्याच्या प्रतिपादनार्थ अमेरिकेंतील एका इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्त्याच्या ग्रंथांतून एकच उतारा दिल्यास बस होणार आहे.—"प्रौढावस्था (ह्मणजे तुमचें ऋतुदर्शन नव्हे, तर त्यानंतरची बरीच पूर्णत्वाप्रत आलेली स्थिति) सुरू होतांच स्त्रियांस संतति होण्याचा संभव असतो, तरी अशा पूर्ववयांत संत-

त्युत्पादनासारखें जोखमाचें काम घडून येणें हें शास्त्र व अनुभव ह्यांस अगदीं संमत नाहीं. पुरुषजातीस ज्याप्रमाणें लहान वयांत जननेंद्रियांचे व्यापार सुरू केल्यास अपकारक होतात व त्यामुळें जरावस्थेचा निश्चयेंकरून शरीरांत प्रवेश होतो, त्याचप्रमाणें स्त्रीजातीस अकालीं मातृत्व प्राप्त होणें हें शुद्ध निरनिराळ्या रोगांस व प्रसंगीं मृत्यूस बोलावूं पाठविण्यासारखें आहे. त्यापासून स्त्रियांचे तर अशाप्रकारें नुकसान होतेंच, परंतु त्याशिवाय त्यांजपासून होणारी जी संतति ती देखील खुज्जट, नेभळी, रोगी, व अल्पायुषी अशी होते. परंतु तेंच त्यांचें मातृत्व जर कांहीं काळपर्यंत लांबणीवर टाकण्यांत आलें तर त्यांची स्वतांची पूर्वी सांगितल्याप्रमाणें खराबी न होतां त्यांजपासून होणारी संततिही हाडामासानें मजबूत, कुवतदार, निरोगी, व चिरायुषी अशी होण्याचा विशेष संभव असतो. आणि प्राणीवर्ग असो किंवा वनस्पतीवर्ग असो, त्यांच्यामध्यें साधारण नियम ह्मटला ह्मणजे असाच दिसून येतो कीं त्यांपासून अल्पवयांत झालेली पैदाज बहुधा कनिष्ठ प्रकारची असते. वीस वर्षांचें वय झाल्याशिवाय स्त्रियांचा बांधा नियमेंकरून चांगल्या पूर्ण दशेस येऊन पोंचत नाहीं. पोटाचा खालचा भाग ज्यास ओटी असें ह्मणतात, व जो जननसंबंधीं सर्व व्यापार घडून येण्याचें स्थान, त्याचा पूर्ण आकार त्यांच्या वयाचें सदर्हू मान झाल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. ह्मणून ह्या वयाच्या पूर्वीच मातृत्व प्राप्त होणें इष्ट नाहीं. शिवाय मुलांचें योग्य रीतीनें संगोपन करणें हें फार जोखमाचें काम आहे, व तें पार पाडण्यास अवश्य असा बुद्धीचा विकास ह्या वयाच्यापूर्वी स्त्रियांच्या ठिकाणीं

झालेला नसून कर्तव्याकर्तव्यविचारांचाही एकंदरीत त्यांच्यांत ठिकाणीं अभावच असतो. ह्या संबंधानें ग्रीक लोकांतील महान् तत्वेत्ता प्लेटो ह्यानें हजारों वर्षांपूर्वी 'स्त्रियांनीं वीस वर्षांचें वय झाल्यानंतर देशहिताकरितां संतत्युत्पादन करावें' असा जो शहाणपणाचा नियम करून ठेविला आहे तो अर्वाचीन इंद्रियविज्ञानशास्त्र व अनुभव ह्यांस पूर्ण संमत आहे. ह्या संबंधानें दुसरी एक गोष्ट एथें सांगणें रास्त आहे ती अशी कीं वैद्यानें रोग्यास औषध देऊन बरें करणें हें जसें त्याचें एक काम आहे त्याचप्रमाणें रोगाचा प्रतिबंध करणें व अशा रीतीनें मनुष्यजातीची सुधारणा करून तिच्या सुखाचीं साधनें वाढविणें, अर्थात् स्त्रिया व पुरुष ह्यांमध्यें त्यांच्या परस्परसंबंधाच्या अवश्य अशा ज्ञानाचा फैलाव करणें हेंही त्याचें एक काम आहे. लहान वयांत स्त्रीपुरुषांचा संबंध झाल्यानें काय अनहित होतें ह्यासंबंधाचें उपयुक्त ज्ञान त्यांस त्याच्याकडून मिळालें पाहिजे. तसेंच ऋतुदर्शन व संभोगावस्था ह्या एकाच अर्थाच्या वाचक अशा संज्ञा नसून ह्या दोन निरनिराळ्या अवस्था आहेत व ह्या निरनिराळ्या काळीं कांहीं वर्षांच्या अंतरानें प्राप्त होतात, व पहिल्या स्थितींत संतति होण्याचा केवळ संभव असतो व दुसऱ्या स्थितींत तत्संबंधी अवश्य अशी योग्यता अंगीं येते, वगैरे गोष्टी, स्त्रतांच्या दुःखदायक अनुभवावरून कित्येक स्त्रियांस माहीत झालेल्या असतात तरी त्या वैद्याकडून सर्व स्त्रियांस समजाव्या हें योग्य आहे." (पार्व्हिनकृत प्रसवविद्या, पृ० ९१).

असो, यावरून इत्यर्थ काय निघतो, तर स्त्री असो किंवा पुरुष असतो, त्यांच्या शरीरांतील सर्व अवयव जेव्हां

पूर्ण दशेस येऊन पोंचतात, अर्थात् प्रौढावस्थेच्या सर्व लक्षणांचा जेव्हां त्यांच्या ठिकाणीं प्रादुर्भाव होतो, तेव्हांच संतत्युत्पादनाचे कामीं त्यांची योग्यता ठरते, व ही योग्यता सदरील लक्षणांपैकीं फक्त एखाद्या क्षुल्लक व अनिश्चित अशा लक्षणाचा प्रादुर्भाव झाल्यानेंच ठरवितां येत नाहीं. पुरुषास दाढी येणें, आवाजांत बदल होऊन त्यांत घोगेरपणा प्राप्त होणें, शरीराच्या बांध्यांत प्रशस्त फेरफार होणें, व स्वभावांत पोक्तपणा येणें इतक्या गोष्टी जेव्हां घडून याव्या तेव्हां त्यास प्रौढावस्था प्राप्त झाली असें समजावें. त्याचप्रमाणें स्त्रियांची छाती, त्यांचा कटिपश्चाद्भाग, व त्यांच्या शरीरांतील अस्थि व स्नायु, यांत जे या वयांत प्रशस्त फेरफार होतात ते एकदम होत नसून मध्यंतरी बराच काल जावा लागतो, ह्मणजे ते सर्व फेरफार व्हावे त्याप्रमाणानें होण्यास व स्त्रियांस प्रौढावस्था पूर्ण रीतीनें प्राप्त होण्यास सुरुवाती पासून बरींच वर्षें लोटतात व नंतर खरोखर स्त्रीत्व ह्मणून जें कांहीं आहे तें त्यांस प्राप्त होतें. ह्या सर्व घडामोडी त्यांच्या वयाच्या वीसाव्या वर्षाच्या आंत घडून येत नाहींत, आणि ह्या मुदतीच्या पूर्वीच जर त्यांच्या शरीरावर नुकसानीच्या अनेक बाबी येऊन थडकल्या व त्यांत ओढाताणीचा प्रकार सुरू झाला, तर उघडच आहे कीं त्यांपासून त्यांच्या शरीराची ओढाताण होऊन प्रौढावस्था प्राप्त होण्याची ती न होतां तिला अवश्यमेव प्रतिबंध होईल, अर्थात् माता व बालक या उभयतांसही त्यापासून वाईट परिणाम भोगावे लागतील, व ते तसे भोगावे लागतात हें तुह्मी पाहतच आहां. वीसाव्या वर्षापासून पंचवीसाव्या वर्षाच्या दरम्यान ज्या देशांत स्त्रियांचा पुरुषांशीं संबंध होतो, अर्थात्

पूर्ववयांत मातृत्व प्राप्त न झाल्यामुळें जेथें स्त्रियांची पूर्वीं सांगितल्याप्रमाणें खराबी होत नाहीं, अशा देशांत देखील असें झटलेलें ऐकूं येतें कीं आईच्या पंसतीसाव्या वर्षापासून तों चाळीसाव्या वर्षाच्या दरम्यान जी मुलें होतात तीं फारच सशक्त निपजतात, व आईचें हें जे तारुण्याच्या भराचें वय तें संतति होण्यास फारच उत्तम ठरतें.

आतां स्त्रियांत प्रौढावस्था प्राप्त होण्याच्या पूर्वीच पुरुषांशीं संबंध ठेविल्यानें जे अनेक व लक्षांत ठेवण्यासारखे तोटे होतात ते येणें प्रमाणें:—

(१). प्रथमतः या देशांतील स्त्रियांच्या ठिकाणीं संततीचा अटकाव करणारें हें एक मुख्य कारण होऊन बसलें आहे. ह्या संबंधानें मला असा एक मोठा चमत्कार वाटतो कीं, संततीची तुह्मांमध्यें जात्याच अत्युत्कट इच्छा वसत असते, व संततीशिवाय इहलोकीं व परलोकीं आपलें जिणें व्यर्थ असा तुमचा खरोखर समज झालेला असतो, तथापि त्या संबंधानें तुमच्या कृति मात्र विलक्षण रीतीनें उलट प्रकारच्या होत आहेत. किंबहुना ह्या संबंधाच्या तुमच्या इच्छा सफळ न होण्याच्या कामीं मानवाच्या बुद्धीस जे जे कांहीं उपाय सुचण्यासारखे आहेत ते ते सर्व तुमच्या हातीं तुह्मी करीत आहां. प्रौढावस्था प्राप्त होण्यापूर्वीच मुलांची व मुलींची लग्नें करणें, स्त्रियांस परतंत्र ठेवणें, प्रसवानंतर माता व बालक या उभयतांची शुश्रूषा गैरशिस्त प्रकारें ठेवणें, ह्या सर्व गोष्टी, तुमच्या संततीचा केवळ अमानुष व भयंकर अशा रीतीनें उच्छेद करीत असून, तिचा प्रसार होऊं देत नाहींत, व या गोष्टीकडे तुमचें अद्याप लक्ष पोंचत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे.

परंतु वास्तविक यांत आश्चर्य वाटण्यासारखें तरी काय आहे ? कारण, स्त्रिया ह्मणजे केवळ पुरुषांच्या सुखास साधनीभूत होणारे केवळ गाईह्मशींसारखे प्राणी, त्यांस स्वतांचें सुखदुःख असें कांहींच नाहीं, त्यांचा पुरुषांनीं आपल्या सुखाकरितां पाहिजेल तसा उपयोग करावा, व असें करणें हें केवळ धर्मसंमत आहे, असा जेथें सार्वत्रिक समज होऊन बसला आहे तेथें असाच परिणाम व्हायाचा हें उघड आहे. परंतु त्यांत तुमच्या स्वतांच्या संबंधाचा असा दुसरा एक प्रकार होत आहे तो तरी निदान तुह्मीं अवश्य लक्षांत ठेवण्यासारखा आहे. मनुष्य स्वार्थास गुंतून केवळ क्षणिक अशा सुखाच्या एकेवेळ नादीं लागला, ह्मणजे तो मोठ्या व कायमच्या अशा दुसऱ्या सुखांस अंतरतो हा जो सृष्टिनियम आहे त्यास अनुसरून तुमची हल्लीं स्थिति होत आहे. मोठमोठीं कामें करण्याचें तुमच्या पूर्वजांचें सामर्थ्य तुह्मां मधून नाहींसें होत चाललें आहे व दिवसेंदिवस तुह्मीं कमकुवत होत चाललां आहां हें केवळ तुमच्या स्वार्थी-पणाचें फळ आहे ही गोष्ट तुह्मांस विसरतां कामा नये. असो, स्त्रियांच्या ठिकाणीं अशा प्रकारें संतताचा अभाव हाणें हा देखील त्यांचाच दोष आहे असें समजण्याचा या देशांत स्त्रियांमध्यें देखील परिपाठ पडून गेला आहे. परंतु हाही एक तुह्मां लोकांचा गैरसमजच आहे असें ह्मणणें प्राप्त आहे. युरोप व अमेरिका खंडांत, संततीचा अभाव असणाऱ्या अशा प्रत्येक सहा स्त्रियांत एक स्त्री नवऱ्याच्या दोषामुळें संततीविरहित राहते असा एक अजमास काढण्यांत आला आहे. परंतु तुह्मां हिंदु लोकांत बालविवाह जारीनें चालू असल्यामुळें पुरुष व स्त्रिया हीं उभयतां प्रौढावस्थेप्रत

जाण्यापूर्वीच त्यांचा वैवाहिक संबंध सुरू होतो, व संपूर्ण प्रौढावस्था प्राप्त झाल्यानंतर जो संबंध वास्तविक सुरू होणें इष्ट आहे त्याजविषयीं बाल्यावस्थेपासूनच त्यांच्या मनांत एकसारखे विचार घोळत असतात, व यामुळें स्त्री-पुरुषांचा होणारा जो संबंध त्याच्या संबंधानें अनेक प्रकारचा अनियमितपणा व अनाचार घडून येतो, याकारणां वरून हें जें संतति न होण्याच्या संबंधाचें स्त्रीपुरुषांतील दोषांचें मान तें याहूनही पुष्कळ अधिक आहे, ह्मणजे स्त्रियांपेक्षां पुरुषांकडे त्या दोषाचा पुष्कळ अंशीं अधिक संबंध दिसून येतो. मी या मुंबई शहरांत आल्या दिवसापासून ज्या अनेक स्त्रियांना दवाखान्यांत किंवा त्यांच्या घरीं औषधोपचार केले आहेत त्यांपकीं निम्मेहून अधिक स्त्रियांच्या संबंधानें मला असें ह्मणण्यास कांहीं एक हरकत दिसत नाहीं कीं त्यांची विकृति नवऱ्याच्या संबंधाच्या कांहीं ना कांहीं तरी कारणावरून उत्पन्न झालेली असावी. स्त्रिया प्रौढावस्थेत येण्यापूर्वी त्यांच्याशीं संबंध ठेवणें हें अशापैकींच एक सबळ कारण असून तें नवऱ्याच्याच माथीं लादलें पाहिजे हें उघड आहे, कारण त्यांत स्त्रीचा कांहींएक दोष नसून केवळ तिच्या इच्छेविरुद्ध तो अशा कृत्यास प्रवृत्त होत असतो. दुसरीं अशीं कांहीं उदाहरणें माझ्या पाहण्यांत आलीं आहेत कीं त्यांत अल्पवयांतच स्त्रियांना मूल झाल्यामुळें त्यांचीं पक्व दशेस न आलेलीं अशीं जननेंद्रियें इतकीं कांहीं प्रसवकाळच्या त्रासांनीं—मूल बहुधा गर्भांतच मेलेलें असल्यामुळें-बिघडून गेलेलीं असतात कीं तीं पुढें गर्भधारण करण्यास अगदीं असमर्थ होतात. या संबंधानें मीं पुढील तीन

अनुमानें काढिलीं आहेत तीं, सद्गृहस्थहो, तुमच्या स्वतांच्या अनुभवास पटत असल्यास पहा.

(१). तेराव्या किंवा चौदाव्या वर्षीं स्त्रीचा पुरुषाशीं वैवाहिक संबंध सुरू झाल्यास त्यापासून तिच्या जीवास धोका जरी न प्राप्त झाला तरी, तिची प्रकृति सतत कांहीं ना कांहीं कारणावरून बिघडलेली असते व तिच्या ठिकाणीं संततीचा अभाव दिसून येतो.

(२). ज्या स्त्रियांस अशा अल्पवयांत मूल होतें, त्यांस पुनः गर्भधारणाची शक्ति राहत नाहीं व मुलें होत नाहींत.

(३). चौदाव्या वर्षापर्यंत पुरुषाशीं संबंध होऊं न दिला तरी ज्या स्त्रियांच्या ठिकाणीं भर्गधारण नंतर ताबडतोब घडून येतें त्या स्त्रियांमध्यें पुढें संततीचा अभाव दिसून येतो. सशक्त व निरोगी स्त्रिया असल्या ह्मणजे तीन चार वर्षें गेल्याशिवाय त्यांस मुलें होत नाहींत—वास्तविक त्यांस तोंपर्यंत प्रौढावस्था प्राप्त झाली नसते याचा हा एक पुरावाच होय. सदरील गोष्टींस अपवाद ह्मणून आहेच, परंतु एकंदरींत तुमच्या अनुभवावरून हाच बहुशः घडून येणारा सार्वत्रिक प्रकार असें तुह्मांस ह्मणतां येणार नाहीं काय ?

२. प्रौढावस्था प्राप्त होण्यापूर्वींच स्त्रीपुरुषांचा वैवाहिक संबंध सुरू झाल्यामुळें दुसरा एक तोटा होतो तो असा कीं, अशा रीतीनें झालेली अल्पवयी स्त्रियांची संतति अगदीं खुरटी व रोगी अशी निपजते. सारांश, या चालीच्या पायीं, हजारों मुलें जन्मास येण्या पूर्वींच काळाच्या मुखांत पडतात व हजारों जन्मास येऊन नंतर हा लोक सोडून परलोकची वाट धरतात, व शिवाय मरतमढे, कयाहीन,

व्याधिग्रस्त व कुरूप अशा लोकांची संख्या तर दिवसेंदिवस तुह्मांमध्यें वाढत आहे, आणि या सर्व गोष्टी तिचा घातकीपणा व्यक्त करीत आहेत. सद्गृहस्थहो, जनावरांच्या ठिकाणीं देखील तुमची दयार्द्र बुद्धि फार दिसून येते, परंतु तुमच्या स्त्रिया व तुमचीं मुलें यांचा तुह्मीं केवळ संहार मांडला आहे असें ह्मणणें प्राप्त होतें. तुमच्या पायीं तुमच्या स्त्रियानां असह्य अशीं दुःखें प्राप्त होतात, व त्या अकाली मृत्यूच्या स्वाधीन होतात किंवा यावज्जन्म दुःखांत रेंगाळत पडतात. ही दुसरी स्थिति तर फारच भयंकर होय. कारण, अशा स्थितींत त्या गरीब बिचाऱ्या स्त्रियांस संसारांत जीं कांहीं सुखें ह्मणून असतात व ज्यांच्यायोगें मनुष्यास या जगांत राहावें असें वाटतें त्यांपैकीं एकही प्राप्त होत नसून तें पुढेंमागें प्राप्त होण्याची त्यांस आशाही नसते. वरें शरीरांतील वैधना एकीकडेस ठेवून परमार्थाच्या किंवा तशासारख्या दुसऱ्या कांहीं गोष्टींत मन घालावें तर त्यास अवश्य असें जें मानसिक शिक्षण तेंही पण त्यांस मिळालेलें नसतें. ही त्यांची अल्पवयांत ह्मातारपणासारखी झालेली बापुडवाणी स्थिति पाहून, तुह्मांपैकीं कोणास बरें, सांगा पाहूं, आपल्या अविचारी कृतीचें स्मरण होत नाहीं, व आपण स्वतां त्यांच्या नाशास कारण झालों अमून त्यांच्याकडून सर्वस्वीं दोष लावले जाण्यास पात्र झालों आहों अशी कल्पना कोणाच्या बरें मनांत येत नाहीं ! तसेंच ज्या तुमच्या मुलांवर तुह्मी इतकी प्रीति करतां व ज्यांस आपल्या वृद्धापकालचा आधार असें समजतां अशा तुमच्या मरतमड्या मुलांच्या पांढऱ्या फिकट तोंडांकडे पाहून तुमच्या मनांत असा विचार कधींच कां येत नाहीं कीं अशा मुलांनीं जर

अन्यरीतीनें तुह्मीं त्यांजवर केलेले उपकार न स्मरतां त्यांचा योग्य मोबदला तुमच्या ह्मातारपणीं तुह्मांस दिला नाहीं, व अशा रीतीनें दुःख भोगण्याकरितां त्यांस जन्मास घातल्याचें श्रेय तुह्मीं घेतलें ह्मणून त्यांनीं तुमचा तिरस्कार केला, किंवहुना तुमची वल्गना केली, तर त्यांचें हें करणें गैरवाजवी असें तुह्मांस ह्मणतां येणार नाहीं? या संबंधानें वास्तविक तुमची कशीही समजूत असो, परंतु माझी तर अशी पक्की समजूत झाली आहे कीं त्यांत त्यांच्याकडून कांहीं एक गैर होणार नाहीं. कारण, त्यांच्या नानाविध भयंकर क्लेशांस तुह्मी, व केवळ तुह्मी, कारण झालां आहां. रात्रंदिवस सतत व्याधीनें पीडित असल्यामुळें त्यांच्या तोंडांवर पांढरकी आली आहे, त्यांची मुद्रा भेकड झाली आहे, शरीरें वेडींवाकीं झालीं आहेत, हीं सर्व तुमच्या कृतींचीं फळें होत. अशा जरत्करू मुलांचे जन्मदाते ह्मणविण्यास तुह्मांस खरोखर लाज वाटावी! अशा संततीच्या योगें तुह्मी आपलें नांव मागें ठेवूं पाहतां, परंतु लक्षांत ठेवा कीं त्यांच्याकडे पाहून लोकांच्या मुखावाटें "हे पाहा आपल्या वडिलांच्या पापांचे अधिकारी होऊन बसले आहेत!" असे उद्गार आल्यावांचून कधीं राहणार नाहींत.

आतां कदाचित् तुह्मी असें ह्मणाल कीं "जर प्रजोत्पादनाचें काम एखाद्या मनुष्याकडून होत आहे तर अर्थात् त्याच्या ठिकाणीं ती योग्यता असलीच पाहिजे, व अशीं योग्यता असल्याशिवाय प्रजोत्पादन त्याजकडून होणेंच नाहीं." परंतु असें नाहीं. जगांत तुमच्या भोंवतालीं काय चाललें आहे तें तुह्मी नीट लक्ष लावून पहा, ह्मणजे तमच्या ह्मणण्याचा खोटेपणा तुह्मांस दिसून येईल. पक्ष्यां-

मध्यें देखील त्यांचीं पहिलीं अंडीं जीं असतात तीं आकारानें लहान व पोचट असून प्रजोत्पादनाचे कामीं त्यांचा उपयोग बहुधा होत नसतो. एखादी नवी तरणी कोंवडी असली ह्मणजे तिची पहिलीं अंडीं खराब होण्याचा विशेष संभव असून, पिलें काढण्याच्या कामीं त्यांचा उपयोगे केलाच तर खराड्यांतील सर्व कोंबड्यांची खराबी होते हें कदाचित् तुह्मांपैकीं पुष्कळांस माहित नसेल. परंतु या संबंधानें वास्तविक प्रकार मला माहित आहे तो असा कीं एखाद्या तरण्या कोंबडीनें अंडीं घालण्यास पहिल्यानेंच सुरूवात केली ह्मणजे लागलीच त्या अंड्यांचा पिलें काढण्याच्या कामीं उपयोग करीत नसतात. परंतु तीच कोंबडी कांहीं महिने गेल्यानंतर शरीरानें चांगली भरली व पुष्ट दिसूं लागली व तिच्या अंड्यांचा आकारही व्हावा तसा मोठा झाला ह्मणजे खुराड्याचा मालक वरील कामीं त्यांचा उपयोग होऊं देतो, आणि अशा रीतीनें जी संतति पैदा होते तींत कांहीं एक गोम राहत नाहीं व तिच्यामुळें खुराड्यांतील सर्व कोंबड्या पुष्टच्या पुष्ट राहून त्यांची अवलाद बिघडत नाहीं.

२. हे अनिष्ट परिणाम सुरू झाले ह्मणजे कालांतरानें प्रत्येक कुटुंबांत अधिकाधिक वाढत जातात. पूर्वी सांगितलेंच आहे कीं स्त्रियांच्या वीसाव्या वर्षीं पुरुषांशीं संबंध झाला ह्मणजे त्यांचें वय चाळीस वर्षांचें होई तोंपर्यंत त्यांच्यापासून होणारी संतति अधिकाधिक सशक्त व जोरदार होत जाते. परंतु तोच याच्या उलट प्रकार झाला, अर्थात् प्रौढावस्था प्राप्त होण्याच्या पूर्वीच मातृत्वाचा अधिकार त्यांस प्राप्त झाला तर परिणामही उलटच होणार हें उघड

आहे. प्रत्येक प्रसवकाळच्या होणाऱ्या त्रासामुळें माता अधिकाधिक कमकुवत होत जाते, व तिचीं बालकेंही अधिकाधिक रोगी निपजत जातात. मातृत्वास अवश्य अशी पौढावस्था प्राप्त होण्यापूर्वींच प्रसवाची ताण तिच्यावर येऊन पडते यामुळें, तिच्या योगें मुलाची, व मुलाच्या योगें तिची अशी परस्पर खराबी होऊन शेवट परिणाम असा होतो कीं उभयतांच्या शरीरांत कांहीं त्राण राहत नाहीं व उभयतांचीही वाढ खुंटत जाते.

४. प्रत्येक कुटुंबांत अशा प्रकारें अनिष्ट प्रकार घडून येऊं लागले, तर सद्गृहस्थहो, एकंदर राष्ट्रावर त्याचा काय वेरें परिणाम होईल ? माझ्या मतें तर आस्तेआस्ते त्या सर्व राष्ट्राची अशानें खचित पायमल्ली झाली पाहिजे; अर्थात् तें सर्व राष्ट्र निःसत्व होऊन शेवटीं निकृष्टावस्थेप्रत जाऊन पोंहोचलें पाहिजे, व, सद्गृहस्थहो, सांप्रत तुह्मांलोकांस अशी स्थिति प्राप्त झाली नाहीं असें तुह्मांस वाटतें काय ? मुसलमान लोकांच्या ह्या देशावर स्वाऱ्या झाल्या त्यावेळेपासून या देशांत ही बालविवाहाची व स्त्रियांस पडद्यांत ठेवण्याची चाल सुरू झाली. त्या पूर्वींची जी तुह्मां लोकांची स्थिति इतिहासांत वाचण्यांत येते तशी सांप्रत तुमची स्थिति आहे असें तुह्मी समजतां काय ? तर मग त्या काळचे ते बलाढ्य व शूर रजपूत व मराठे, व त्यांचीं तीं मेहनतीनें कसलेलीं शरीरें तसेंच त्यांचें तें बुद्धिवैभव हीं आतां कोठें बरें आहेत ? माझ्या मतें तर आज कितिएक शतकें ही बाल-विवाहाची अनिष्ट चाल तुह्मांमध्यें चालू असल्यामुळें तिऱ्या पायीं तुह्मी केवळ अर्भकांचीं अर्भकें होऊन वसलां आहां, व असाच क्रम कांहीं काळ पर्यंत चालू राहिल्यास तुमचें

स्वातंत्र्य अगदीं नष्ट होऊन जाईल व तुह्मांस गुलामांचें गुलाम बनविण्यास दुसरा बलवत्तर असा उपाय शोधण्याची जरूरी राहणार नाहीं.

आतां, तुह्मांपैकीं कोणी असें ह्मणतील कीं "ही आमच्या धर्माची आज्ञा आहे व ही आह्मांस पाळलीच पाहिजे." तर त्यास माझें असें उत्तर आहे कीं धर्म ह्मणून जो कांहीं आहे त्यांत आपला ईश्वराशीं संबंध व मानव जातींशीं आपलीं कर्तव्यकर्में ह्यांचाच फक्त समावेश होत असतो, व ह्या दोन्ही बाबी मनुष्यजातीचें अनहित करणारी अशी कोणतीही गोष्ट करण्यास कधींही सांगणार नाहींत, एवढेंच नव्हे तर उलट तिचा प्रतिबंधच करतील. या संबंधानें येथें दुसरी अशी एक गोष्ट सांगणें जरूर आहे कीं स्त्रीजातीच्या संबंधाच्या जेवढ्या ह्मणून अपकारक अशा चाली आहेत तेवढ्या सर्व त्यांच्यावर धर्माच्या नांवानें आजपर्यंत लादण्यांत आल्या आहेत, आणि यामुळें असें झालें आहे कीं स्त्रियांस त्या किती जरी त्रासदायक होत असल्या तरी त्यांत बदल करण्याच्या कामीं पुरुषांपेक्षां त्या नेहमी मागेंच असतात, व अशा कामीं त्यांची संमति बहुधा मिळत नसतें. शिवाय मानवानें मानवास छळण्याकरितां युगांतरापासून ज्या ज्या युक्ति लढविल्या आहेत व जीं जीं अपकारक कृत्यें केलीं आहेत त्या सर्वांत असें एकही कृत्य तुमच्या दृष्टीस पडणार नाहीं कीं ज्याला त्यानें धर्माचें स्वरूप देऊन अज्ञानी जनांस तें ग्राह्य होईल असें केलें नाहीं. गुलामगिरीचा धंदाच कां घ्याना ? त्यालाही आमच्या या एकूणीसाव्या शतकांत देखील धर्माचें स्वरूप देऊन खरा ह्मणणारे अनेक लोक आहेत. मनुष्याचे व इतर प्राण्यांचे बळी देण्यांत येतात तेही धर्मा-

च्याच नांवानें देण्यांत येतात ही गोष्ट तुह्मीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अशा धर्माच्या नांवानेंच थोड्या वर्षांपूर्वी इंग्लंड देशांत स्त्रियांनां चेटकी समजून ठार मारीत असत व अद्यापही हिंदुस्थानांतील कांहीं भागांत हा प्रकार सुरू आहे. असें जर आहे तर तुह्मां लोकांतील बालविवाहाच्या चालीस धर्माची संमति खरोखर मिळाली असल्यास त्यांत आश्चर्य ते कोणतें !

असो, आतां शेवटीं माझी तुह्मांस एवढीच विनंति आहे कीं ह्या सर्व गोष्टींचा तुह्मीं नीट विचार करून ही बालविवाहाची चाल एकदम बंद पाडण्याची तुह्मीं अवश्य तजवीज करावी. कारण, माझी तर खरोखर अशी खात्री आहे कीं जर केवळ दुराग्रहानेंच या उपर तुह्मीं आपला प्रस्तुत क्रम चालू ठेवाल, व सृष्टिक्रमाविरुद्ध पूर्ववत् आचरण करूं पाहाल, तर तुमच्या राष्ट्रास दिवसेंदिवस अधिकाधिक निकृष्टावस्था प्राप्त होत जाईल, व जें इंग्रज सरकार सांप्रत तुह्मांवर राज्य करीत आहे त्याजकडून तुमच्या संरक्षणार्थ कितीही अन्य उपाय योजण्यांत आले तरी त्या सर्वांचा तुमचें नष्टचर्य टाळण्यास कांहींएक उपयोग होणार नाहीं, व कांहीं विघ्नसंतोषी लोक कंठरवानें ह्मणत असतात त्याप्रमाणें जरी कदाचित् इंग्रज लोकांस ह्या देशांतील राज्य सोडून स्वदेशीं जावें लागलें, तरी अशा प्रसंगीं दुसरें एखादें बलिष्ट राष्ट्र पुढें सरसावून त्यांच्या जागीं येईल व तुह्मांस हांहां ह्मणतां पादाक्रांत करून टाकील, किंवहुना जे कोणी तुह्मांप्रमाणें जरत्कारूच्या वंशांतले नाहींत व ज्यांनीं सशक्त, निरोगी व सदृढ अशा आईबापांच्या पोटीं जन्म घेतला आहे व अशा आईबापांचें रक्त ज्यांच्या शरीरांत वाहत आहे अशा कोणत्याही एखाद्या बलिष्ठ

राष्ट्राचे तुह्मीं केवळ दास वनाल, व लाकूडफोडे, मोळीविके अगर पाणी भरणारे अशांची योग्यता तुह्मांस प्राप्त होऊन त्यांच्या आश्रयानें दिवस काढण्याची तुह्मांस पाळी येईल हें तुह्मी खचित समजा.

विवाहितबालाविलाप.

शेवटची मागणी.

पद.

सखियानो ! कारण माझ्या दुखण्याचें ऐका वाई ! ॥ धृ० ॥
सातवेच वरुषीं वडिलीं कुतुकास्तव वन्हाड केलें;
साहजीक सासुरवासें रात्रंदिन भय मज जडलें;
म्हणूं नये ' अधाशी ' म्हणुनी, अन्न वळें मींच त्यजीलें;
पोरपणें थोडें खावें, इतरांच्या पूर्वी उठावें,
उद्योगीं दक्ष असावें; झाली मग निःशक्ताई !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका वाई ! ॥ १ ॥
वर्ष तें दहावें जातां, " न्हाण नये " ऐसी चिंता
वाटगून, सासूवाई युक्ति पुसति कोणी येतां;
एकें मग म्हातारीनें कसलेसें औषध देतां,
घाया परि कंचर दुखुनी, कोसळली अविरत धुपणी !
हर्ष परी उभय स्वजनीं ! म्यालें मी पण करुं-काई !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ॥ २ ॥
सोहळा पुरा तिहिं केला आनंदें; मज तें मरण !
तेच दिनीं, नातू व्हावा म्हणुनीयां, भीतें शरण
जाउन, मज सासूबाई करवीति व्रत आचरण;
दैववशें तिसरी पाळी चुकुनी, तें आलें भाळीं
गर्भिणीत्व भलत्या काळीं; करवाया मृत्युस घाई !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ३ ॥

आंयरुणावर म्यां क्रमिले मास नऊ मोठ्या आसें;
पुत्रवदन नांवापुरतें पाहियलें तैं सायासें;
अतिशय कृश बालक बघतां, दिसलें मज वांचेनासें,
त्यांत मला तापहि भरला; दुग्धाचा थेंबहि नुरला;
अनुबंध ऋणाचा सरला; कुठची मग त्याला आई
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ४ ॥
बाराव्या वर्षीं बसला सुतशोकाचा हा धक्का;
तापहि तो गेला नाहीं; अस्थिज्वर बनला पक्का;
बाळंतरोगाचा तैं मजवरती बसला शिक्का;
खोकला हळू सुरु झाला; पूर्विंच जी शक्ति लयाल
गेली, नी येइ कशाला ? खातें तरि कोठें कायी ?
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ५ ॥
अस्तु; अतां सौभाग्यानें मरतें, हें मोठें भाग्य !
मानुनियां, अंतःकरणीं समाधान धरणें योग्य;
परि, सुनांमुलींचें तुमच्या राहावें स्थिर आरोग्य,
एवढीच इच्छा धरुनी, मरतानां आमह करुनी,
मागें मी; तें द्या स्मरुनी, पूर्वींचा प्रेमा कांहीं !
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ६ ॥
हीच असे शेवटची हो ! मागणी पदर पसरून;
कीं, अतिशय लहान मुलिंचें न करावें सहसा लग्न;
लग्नांतीं यद्यपि आलें आपापचि लौकर न्हाण,
तरि, सोळा वर्षें होती तोंवर, तिस पुरुषा हातीं
घालुं नका, इतुक्या साठीं आळवितें, बहु शपथांहीं
सखियानो, कारण माझ्या दुखण्याचें ऐका बाई ! ॥ ७ ॥

पथ्यबोध मासिकपुस्तक (गोवें), पु० १, अंक

मराठी वाङ्मयाचा अभ्यास.

व्याख्यान.



हरि नारायण आपटे

पुणें "ज्ञानप्रकाश" छापखाना.

मराठी वाङ्मयाचा अभ्यास.

ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचे दहाने
वार्षिक समारंभाचे वेळीं दिलेलें

व्याख्यान.

हरि नारायण आपटे

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥
दुरितांचें तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥

सन १९०३.

किंमत ४ आणे.

पुणें येथें हरि नारायण गोखले यांनीं आपल्या
"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

सूचनापर दोन शब्द.

ता० २८ जून १९०३ रोजीं ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचा दहावा वार्षिक समारंभ झाला ते वेळीं त्या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळींनीं मला अध्यक्षस्थान दिलें होतें. संस्थेनें असा संप्रदाय पाडला आहे कीं, अध्यक्षानें मराठी वाङ्मयासंबंधाचा कांहीं तरी विषय घेऊन त्यावर भाषण करावें. त्या संप्रदायास अनुसरून मीं 'मराठी वाङ्मयाचा अभ्यास' या विषयावर भाषण केलें. यांत इंग्रजी राज्याच्या पूर्वीपर्यंतच्या वाङ्मयाचबद्दल मात्र मी बोललों. त्याच्या पुढील वाङ्मयाचा उल्लेख करावयाचा माझा हेतु नाहीं असें प्रारंभींच सांगितलें. तें व्याख्यान लिहून काढून छापावें अशी सूचना माझ्या बऱ्याच मित्रमंडळीकडून आली, तेव्हां, व्याख्यान दिलें त्या वेळच्या टिपणांवरून तें जरा अधिक विस्तृतपणें लिहून काढून ज्ञानप्रकाश पत्रांत भागशः प्रसिद्ध केलें. आणि आतां पुस्तकरूपानें काढलें आहे. यांतील महानुभाव ग्रंथांची माहिती मला कृष्णभक्तिपरायण संन्यासी **भास्करभाऊ** महानुभाव यांनीं दिली, त्याजबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे. यांचेकडून महानुभाव श्री **कवीश्वर** यांचा भागवत एकादशस्कंध मिळाला आहे, तो लवकरच मी प्रसिद्ध करणार आहें.

पृष्ट १४ वर महानुभावांच्या **लीलाचरित्र**ग्रंथाचें परिशिष्ट निरुक्त म्हणून आहे, तो शब्दकोश असें मीं लिहिलें आहे ती चूक आहे. त्या निरुक्तांत महानुभाव पंथास साधक अशा श्रुत्यादि वचनांचा संग्रह व विवेचन आहे, असें कळतें. तथापि जुन्या भाषेंतील शब्दांचे कोश महानुभावांच्या वाङ्मयांत "टीप" या नांवानें उपलब्ध आहेतच.

या व्याख्यानांत मीं अगदीं सुप्रसिद्ध अशा ग्रंथकारांचा मात्र उल्लेख केला. अर्थातच कित्येक कवींचा नामनिर्देशही करतां आला नाहीं. व्याख्यानांत नवीन असें कांहीं नाहीं हें मी जाणून आहें. परंतु जुन्या ज्ञानाची पुनरुक्ति करणें हेंही पुष्कळ प्रकारें श्रेयस्करच आहे, असें जाणून मीं व्याख्यान दिलें. रा. राजवाडे. ठाण्याचे रा. भावे, व पांगारकर इत्यादि विद्वान लेखक व शोधक नवीन शोध करीतच आहेत व त्यांच्या शोधामुळें पुष्कळ नवे ग्रंथ व ग्रंथकार आजपर्यंत माहीत नव्हते तेही माहीत होत आहेत हें मोठें सुचिन्ह आहे. भावे यांनीं महाराष्ट्र कवि नांवाचें मासिकपुस्तक प्रसिद्ध करण्यास आरंभ केला आहे. राजवाडे व पांगारकर यांचे शोध सतत चालू असून, त्यांचे तत्संबंधीं लेखही नेहमीं प्रसिद्ध होत आहेत.

हरि नारायण आपटे.

भारती संग्रहालय, बडोदे.
क्र. 9824 दि: 9/6/1930



मराठी वाङ्मयाचा अभ्यास.

आज दहा वर्षेपर्यंत या मराठी ग्रंथसंग्रहालयाची पुरस्कर्ती मंडळी दरसाल आजच्या सारखा समारंभ करून, कोणा तरी मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या गृहस्थास आमंत्रण करून त्यास पौरोहित्य देऊन एक प्रकारचा वाग्यज्ञ करविते, ही गोष्ट फार अभिनंदनीय होय. अशा तऱ्हेचा वाग्यज्ञ दरसालास एकवार झाल्यानें अनेक प्रकारचे लाभ होतात यांत शंका नाहीं. एक तर आपल्या वाङ्मयाच्या पुनरुज्जीवनाकरितां व अभिवृद्धीकरितां कोण कोण काय काय व कशा कशा प्रकारचे प्रयत्न करीत असतात याचें सिंहावलोकन होऊन, विविध विषयांची चर्चा करण्यास हे प्रसंग चांगले उपयोगीं पडतात. दुसरें असें कीं, यदाकदाचित् नवीन माहिती कांहीं लाभली नाहीं, तरी पूर्वीच्या ज्ञानाचा सालांतून एकदां सारख्यानें पुनरुच्चार झाला तरीही तो श्रेयस्करच होतो. माझ्यापूर्वी नऊ वर्षेपर्यंत जे हे वार्षिक वाग्यज्ञ झाले, त्यांत कित्येक फार थोर असे पुरोहित झाले. तेव्हां त्यांची योग्यता आपल्या अंगीं नसून आपण त्याच पीठावर आरूढ होणें हें प्रथमतः मला योग्य वाटलें नाहीं. परंतु कोणी मनोभावानें आपला आदर करीत असतां, तो आदर न स्वीकारणें

ह्मणजे आमंत्रण करणाराचा विनाकारण अनादरच करणें होय असें मनांत आणून रा. भावे यांनीं मला दिलेलें आमंत्रण मीं स्वीकारलें. तेव्हां माझा आदरपूर्वक अंगीकार आपण केला त्याप्रमाणेंच प्रस्तुत कार्यांत माझ्या अयोग्यपणामुळें जें कांहीं उणें पडेल तें ध्यानीं न आणता शेवटपर्यंत माझे हातून कार्य शेवटास न्यावें असें ज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रासादिक वाणीनें आपणांस विनवून आपल्या कार्यास लागूं.

जैसा स्वभाव मायबापांचा ॥
अपत्य बोले जरी बोबडी वाचा ॥
तरी अधिक तयाचा ॥
संतोष आथी ॥ ५ ॥
तैसा तुम्ही मी अंगिकारिला ॥
सज्जनीं आपुला ह्मणितला ॥
तरी उणें सहजें उपसाहलां ॥
प्रार्थूं काईं ॥ ६ ॥

मीं संग्रहालय पाहिलें. संग्रहालयाचा हेतु फार स्तुत्य आहे व जितका हेतु स्तुत्य आहे तितकाच त्याच्या पुरस्कर्त्यांचा प्रयत्नही पण स्तुत्य व मनःपूर्वक चालला आहे. अशा प्रयत्नास यश हें आलेंच पाहिजे. आणि तें हळूं हळूं येत आहे अशाचबद्दल सुचिन्हेंच दिसत आहेत. दरसाल पुस्तकांचा संग्रह तर वाढत चाललाच आहे आणि वर्गणीदारांची संख्याही वाढत आहे. तथापि ही अभिवृद्धि ज्या वेगानें व्हावयास पाहिजे, त्या वेगानें होत नाहीं ही खरोखरीच मोठी शोचनीय गोष्ट आहे. असें होण्याचें कारण अर्थातच द्रव्यसाहाय्याचा अभाव हें होय. या संग्रहालयाच्या चालकांच्या मनांतून संग्रहालयांत अद्यापि अप्रसिद्ध अशा मराठी ग्रंथांच्या हस्तलिखित ग्रंथांचाही संग्रह करावयाचा आहे व तसा त्यांनीं प्रयत्न करून बऱ्याच नवीन ग्रंथांचा संग्रह

केलाही आहे. परंतु जोंपर्यंत संग्रहालयाला स्वतःचें मंदिर—अ-र्थोपार्जन निर्भय असें मंदिर—नाहीं, तोंपर्यंत संस्थेला चिरस्था-यित्व आलें असें म्हणतां येणार नाहीं. असें मंदिर उठविण्यास द्रव्यसहाय्य पाहिजे. तें प्रयास करूनही मिळत नाहीं या-बद्दल खेद वाटतो, परंतु आश्चर्य मात्र वाटण्याचें कारण नाहीं; कांकीं श्री आणि सरस्वती यांचा सलोखा होऊन श्रीनें सरस्वतीच्या अभिवृद्ध्यर्थ आपल्यास झिज सोसली आहे असें फारच क्वचित् होतें. तथापि निराश होऊन आपण प्रयत्न मात्र सोडतां कामा नये. आज नाहीं उद्यां कोणी धर्मात्मा **कार्नेजी** उभा राहील आणि या 'संग्रहालयाला' सरस्वतीचें विशाल मंदिर बनवील.

पुस्तकसंग्रहालयें.

हीं संग्रहालयें करण्याची बुद्धि आपणांस कां होते ! थोडासा विचार केला असतां आपल्यास असें दिसून येईल कीं, आपलें स्वतःचें, आपल्या कुटुंबाचें, आपल्या ग्रामाचें, आपल्या प्रांताचें, आपल्या देशाचें, किंबहुना समग्र मनुष्य जातीचें संरक्षण व्हावें ही प्रत्येक मनुष्याची उत्कट इच्छा असते. स्वसंरक्षण करून वंशवृद्धि करावी याबद्दल जशी मनुष्याला उपजतबुद्धि असते, त्याप्रमाणेंच आपल्या पूर्वजांनीं संचित केलेलें ज्ञान जतन करून ठेवून त्यांत भर घालावी हीही पण मनुष्याच्या उपजतबुद्धीपैकींच एक बुद्धि होय. एकदां अनुभवानें किंवा अंतःस्फूर्तीनें प्राप्त झालेलें ज्ञान आपल्यालाच पुनः उपयोगीं पडावें म्हणून किंवा आपल्या जवळ चिरकाल राहून आपल्या पुढच्या पिढ्यानुपिढीच्या लोकांस त्याचा उपयोग व्हावा, म्हणून त्याचा संचय करण्याची इच्छा होणें मनुष्यास अगदीं नैसर्गिक आहे. कोणत्याही देशांत पाहिलें तरी पित्यापासून पुत्राला व गुरूपासून शिष्याला याच इच्छेनें ज्ञानो-पदेश केला जातो. प्राचीनकाळीं लेखनकला नसल्याकारणानें वाग्परंपरेनेंच अशा ज्ञानास चिरस्थायी केलें जात असे. हा जो ज्ञानसंचय तो अबाधित रहावा व त्याचा उपयोग सर्वांस सहज

करतां यावा या अत्युत्कट इच्छेचें फल लेखनकला होय. लेखन अस्तित्वांत आल्यावरोवर अर्थातच केवळ वाग्परंपरेनेंच गुरूपासून शिष्यास ज्ञान मिळण्याच्या ऐवजीं, कोठें कोठें पुस्तकांचा उपयोग होऊं लागला. ज्या ठिकाणीं लेखनोपयोगी द्रव्यें मिळणें कठिण नव्हतें, त्या ठिकाणीं त्या द्रव्यांवर म्हणजे भूर्जपत्र, तालपत्र वगैरेंवर ग्रंथ तयार झाले. परंतु ज्या ठिकाणीं हीं साधनें नव्हतीं, त्या ठिकाणच्या लोकांनीं मातीच्या विटा करून त्यांवर आपले ग्रंथ लिहून, त्या विटा पुढें भाजून त्यांचा संग्रह करून ठेविला ! असीरिआ, ईजिप्त वगैरे देशांत अशा तऱ्हेचे इष्टकालिखित ग्रंथ थोड्या वर्षांपूर्वी सांपडले ! आपलेकडे शिलालेख, ताम्रपट वगैरेही सांपडतात. भूर्जपत्र व ताडपत्र यांवर लिहिलेले लेख फार; आणि पुढें कागद निघाल्यानंतर त्यांवर ग्रंथ लिहिले जाऊं लागले. एवंच कोणीकडून तरी मनुष्याची बुद्धि ही कीं, आपल्या पूर्वजांचा व आपल्या काळचा ज्ञानसंचय आपण जतन करून पुढील पिढीस मिळेल असें करावें. हे ग्रंथ प्रारंभीं जगन्नियंत्या परमेश्वराच्या स्तुतिपर किंवा प्रार्थनापर असेच असत आणि त्यामुळें त्यांचा संग्रह, देवालयें, धर्मपीठें व मठ यांतच केला जात असे. अत्यंत प्राचीन काळापासून आमच्या देशांत काश्मीरापासून रामेश्वरापर्यंत व द्वारावतीपासून पुरीपर्यंत चारही धामांत, आठही पुऱ्यांत आणि सर्व क्षेत्रांत जीं विद्यापीठें व मठ आहेत, तेथें जुन्या ग्रंथांचे फार उत्तम व अवाढव्य ग्रंथसंग्रह असत. परंतु इतर अनेक दिशांनीं देशाचा ऱ्हास सुरू झाला त्याप्रमाणें विद्येचाही ऱ्हास होऊन या ग्रंथसंग्रहाचा बहुतेक नाश झाला.

दैवाच्या अनुकूलतेनें आज मुद्रणकला इकडे आल्याकारणानें जुन्या ग्रंथांचा उद्धार करणें आम्हांस किती तरी सुसंभाव्य झालें आहे. मुद्रणकला, ही ज्याप्रमाणें अन्य देशांत, त्याचप्रमाणें आमच्याही देशांत प्राचीन विद्येच्या जीर्णोद्धारास कारण झाली. जुने लेख व पुस्तकें शोधण्याची आणि ते सांपडले असतां छाप-

विण्याची उत्कट इच्छा आपणांस होऊं लागली आहे. थोड्या वर्षांपूर्वी काव्येतिहाससंग्रह सुरू झाला तेव्हांपासून पुष्कळांची प्रवृत्ति जुन्या ग्रंथांच्या शोधाकडे झाली व तिचें फळ आज असें झालें आहे, कीं जवळ जवळ चार पांच हजार नवीन ग्रंथ–अजून न छापलेला असा सांपडला आहे. ग्रंथसंख्या पाहिली, तर ती एक लाखाच्यावरही जाईल कीं काय कोण जाणे. इतका सगळा ग्रंथसमूह छापून निघणें आपल्या हयातींत जरी झालें नाहीं तरी पुढेंमागें होणें जरूर आहे.

परंतु हल्लीं विद्येच्या पुनरुज्जीवनाचा काल आला आहे. छापण्याची कला निघाल्यामुळें एखाद्या प्राचीन ग्रंथाची एक प्रत मिळाली, तरी तिच्या हजारों प्रती अल्पायासांनीं करून ठेवतां येतात, यामुळें आणि प्राचीन ग्रंथांचें अध्ययन करण्याची अभिरुचि व अभिमान हीं पुनः जागृत झालीं असल्याकारणानें लोकांत आपल्या ग्रंथांचे संग्रह–सर्व लोकांस उपयोग करतां येईल अशा रीतीचे संग्रह–करण्याची इच्छा होऊं लागली आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथांचा उद्धार करण्याचे हेतूनें कांहीं संग्रह स्थापिले आहेत व अशाप्रमाणें ग्रंथसंग्रह उत्पन्न झाल्यामुळें जुने ग्रंथ छापून प्रसिद्धही होण्यास सुरुवात झाली आहे. ज्याप्रमाणें संस्कृतासंबंधानें त्याचप्रमाणें मराठी संबंधानेंही प्रयत्न सुरू झाले आहेत. प्रस्तुत ज्या संस्थेच्या छत्राखालीं आपण आज येथें जमलों आहोंत ती संस्था या मराठी ग्रंथांच्या उद्धाराविषयीं व प्रसाराविषयीं जी आजमहाराष्ट्रीयांत अत्यंत उत्कट इच्छा जागृत होत आहे तिचें च फळ होय. आज दहा वर्षें या मंडळींनीं जी ही संस्था आपापल्या सामर्थ्याच्या बाहेर श्रम करून जतन केली व तिची अभिवृद्धि व्हावी म्हणून अजूनही त्यांचे प्रयत्न चालले आहेत, त्याचें कारणही स्वभाषेच्या उद्धाराची व प्रसाराची प्रबळ इच्छाच होय.

मराठी वाङ्मय.

मराठी भाषेंतील वाङ्मयासंबंधानें कोणीही अभिमानानें बोलूं लागला, त्या वाङ्मयाचा उद्धार, प्रसार व अभिवृद्धि व्हावी असें

प्रतिपाद्दूं लागला, कीं कित्येकांचा असा आक्षेप निघतो: "मरा-ठींत उद्धाराला व अभ्यासाला योग्य असें वाङ्मयच नाहीं." आज माझ्या मनांत याच आक्षेपाचें विवेचन करून त्यावर उत्तर द्यावयाचें आहे. त्याचप्रमाणें त्या उत्तरावरून जर असें ठरलें कीं मराठी वाङ्मय म्हणून कांहीं अभिमान करण्याजोगी वस्तु आहे, तर त्या वस्तूचें संरक्षण करून तिच्यासंबंधीं ज्ञान आम्ही कसें मिळवावें—म्हणजे मराठी वाङ्मयाचा उद्धार करून त्याचा अभ्यास आम्ही कसा करावा—हेंही सांगावयाचें आहे.

कोणच्याही आक्षेपांस उत्तर द्यावयाचें तर आक्षेपकांचें व आपलें जुळतें कोठपर्यंत, आणि भेद कोठून सुरू होतो याचा विचार प्रथम केला पाहिजे. सध्यांचा आक्षेपाविषय 'मराठी वाङ्मय' हा आहे. आक्षेपक म्हणतात 'मराठींत नांव घेण्याजोगें वाङ्मय नाहीं.' तेव्हां प्रथम आधीं वाङ्मय या शब्दाचा अर्थ काय हेंच ठरवून घेतलें पाहिजे. वाङ्मय या शब्दाची व्याख्या जर त्यांची व आमची एक जुळली, तर त्या व्याख्येच्या कसोटीस मराठी वाङ्मयाला लावून त्याची तेजी किती रहाते तें पाहिलें म्हणजे वाद अगदीं आटोक्यांत येऊन, काय तो निकाल लावतां येईल. वाङ्मय शब्दाच्या व्याख्येवद्दलच जर वाद पडला तर मग पुढच्या आक्षेपाचें निरसन तरी कसें होणार आणि वादाचा निकाल कसा लागणार? तेव्हां प्रथमतः आतां आपण 'वाङ्मय' या शब्दांत काय काय अर्थ येतो तें पाहूं. आपण इंग्रजींतील 'Literature' या शब्दाच्या ऐवजीं नेहमीं 'वाङ्मय' किंवा 'सारस्वत' या दोन शब्दांची योजना करतों तेव्हां 'Literature' या शब्दांत जितका अर्थ समाविष्ट होतो, तितका आपल्या 'वाङ्मय' या शब्दांत होतो असें धरून त्या अर्थानें ज्यास 'वाङ्मय' असें नांव देतां येईल, असा ग्रंथसंग्रह मराठी भाषेंत आहे कीं नाहीं हें आपणास पहावयाचें आहे.

वाङ्मय म्हणजे काय ?

इंग्रजींतील Literature या शब्दांत काय अर्थ येतो, कोण कोणचा अर्थ समाविष्ट होतो हें पाहण्यापूर्वी आपले प्राचीन ऋषी 'वाङ्मय' शब्दांत कशा कशाचा अंतर्भाव करीत असत हें पाहूं. व तें पाहिल्यानंतर युरोपांतील पंडित Literature या शब्दाची काय व्याख्या करितात तेंही पाहूं. आणि दोन्ही शब्दांत अंतर्भूत होणारा अर्थ एकाच योग्यतेचा किंवहुना एकच आहे असें दिसून आलें तर मग त्या अर्थानें ज्याचा निर्देश निश्चितपणें करतां येईल असें वाङ्मय मराठींत आहे कीं नाहीं हें पाहूं.

'वाङ्मय' या शब्दाच्या अर्थाचा निर्देश करून त्याचें महत्व ज्यांत दाखविलें आहे असे उल्लेख उपनिषदांतून कित्येक ठिकाणीं आहेत. परंतु जेथें 'वाक्' शब्दाचा अर्थ स्पष्टपणें सांगून त्याचें महत्व वर्णन केलें आहे असा एक फारच चांगला प्रसंग बृहदारण्योपनिषदांत आहे.

सीतेचा पिता जनकराजा हा फार मोठा पंडित व वैराग्यवान् असे. आपल्याकडे ऋषींना बोलावून किंवा आपण ऋषींकडे जाऊन त्यांच्या समागमांत व निरनिराळ्या गहन विषयांवर वाद-विवाद करण्यांत त्याला फार आनंद होत असे. एक वेळां तो आपल्या परिपाठाप्रमाणें महर्षि याज्ञवल्क्य यांजकडे गेला होता. तेव्हां याज्ञवल्क्यांनीं त्यास कुशल विचारून पुढें प्रश्न केला: "राजा, तुझेकडे पुष्कळ विद्वान् लोक येतात, त्यांच्यापैकीं कोणापासून तुला कांहीं नवीन ज्ञान झालें आहे काय ?" तेव्हां राजानें महर्षीस म्हटलें: "महाराज, मजकडे जित्वा शैलिनि नांवाचे एक ऋषि आले होते व वाणीसंबंधानें भाषण सुरू झालें असतां ते म्हणाले: "वाक् म्हणजे ब्रम्हच होय." तें त्यांचें म्हणणें बरोबर आहे कीं नाहीं याविषयीं आपल्या तोंडून काय तें ऐकावें अशी इच्छा आहे." त्यावर वाणीच्या महत्वावर त्या दोघां वाग्वीरांचें संभाषण झालें तें सर्वच येथें भाषांतरासह आप-

णास वाचून दाखवतों म्हणजे " वाङ्मयाची " प्रार्थना कल्पना किती उदात्त होतीं हें आपणास समजून येईल.

बृहदारण्यांतील उतारा.

यत्ते कश्चिदब्रवीत्तच्छृणवामेत्यब्रवान्मे जित्वा शैलिनिर्वाग्वै ब्रह्मेति । यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तच्छैलिनि-र्यद्वाग्वै ब्रह्मेत्यवदतो हि किं स्यादित्यब्रवीत्तु तेनस्यायतन प्रतिष्ठां । न मेऽब्रवीदित्येकपाद्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य । वागेवायतनमाकाशः प्रतिष्ठा प्रज्ञेत्येनदुपासीत । का प्रज्ञता याज्ञवल्क्य । वागेव सम्राडिति होवाच । वाचा वै सम्राड्ब्र-ह्मुः प्रज्ञायत ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदो ऽथर्वाङ्गिरस इतिहासः पुराणं विद्या उपनिषदः श्लोकाः सूत्राण्यनुव्याख्यानानि व्याख्या-नान्यष्टं हुतमाशितं पायितमयं च लोकः परश्च लोकः सर्वाणि च भूतानि वाचैव सम्राट् प्रज्ञायन्ते वाग्वै सम्राट् परमं ब्रह्म नैवं वाग्जहाति सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वादेवानप्येति य एवं विद्वानेनदुपासते ।

भाषांतर.

याज्ञवल्क्य–राजा, दुसऱ्या कोणी आचार्यांनीं जें काय तुला सांगितलें असेल तें ऐकूं या.

जनकवैदेह—जित्वा शैलिनि नांवाचा आचार्य मला म्हणाला **वाग् म्हणजे ब्रह्मच होय.**

याज्ञवल्क्य:—राजा, ज्याला माता, पिता आणि आचार्य यांपासून ज्ञान प्राप्त झालें आहे, अशानें सांगावें असेंच शैलिनीनें वाग म्हणजे ब्रह्मच होय हें तुला सांगितलें. कारण, वाचारे ज्याला ' वाणी ' नाहीं त्याचा काय उपयोग ? परंतु वाणीचें आयतन [उगम] कोणचें ? व तिची प्रतिष्ठा [राहण्याचें स्थान] कोणची हें सांगितलें काय ?

जनक–नाहीं, तें सांगितलें नाहीं.

याज्ञवल्क्य–तर मग तें त्यानें तुला पाव हिस्साच सांगितलें.

जनक–मग **याज्ञवल्क्य**, आपण पूर्णपणें सांगा.

याज्ञवल्क्य–राजा, मनुष्याची वंग्शक्ति हें तिचें आयतन आकाश हें तिची प्रतिष्ठा आणि तीच प्रज्ञा असें जाणून तिची उपासना करावी.

जनक–ती प्रज्ञा कशी काय असते?

याज्ञवल्क्य–राजा, वाग् म्हणजेच प्रज्ञा, कारण वाणीच्याद्वारें शत्रुमित्रभाव [किंवा सदसद्भाव] समजतो; ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वाङ्गिरस, इतिहासपुराणें, विविध विद्या, उपनिषदें, श्लोक [स्मृति] सूत्रें, त्यांचीं व्याख्यानें व अनुव्याख्यानें हीं समजतात; कशाचा यज्ञ केला, कशाची आहुति दिली, काय खाल्लें, काय प्यालों, हा लोक, परलोक, सर्वभूतें इत्यादिकांचें ज्ञान होतें. या वाणीच्याच योगें ब्रह्मज्ञान–वाग् म्हणजेच ब्रह्म अशा बुद्धीनें जो विद्वान् या वाग्ब्रह्माची उपासना करील त्याला वाग्प्राप्ति होते. सर्व भूतें त्याच्या स्वाधीन होतात. तो स्वतः देवच होतो व देवांत जाऊन मिसळतो.

वाङ्मय म्हणजे काय याची अशी सुंदर व्याख्या दुसऱ्या कोठें-सुद्धां अमेळ असें मला वाटत नाहीं. हें एक अत्यंत उदार-रमणीय असें एका प्राचीन ऋषीनें केलेलें वाग्देवीचें स्तोत्रच आहे. ज्या ज्या ग्रंथसमूहाच्या, ग्रंथाच्या किंवा वाक्यसमुच्चयाच्या श्रवणानें मनुष्यास सत् कोणचें आणि असत् कोणचें हें समजतें, ज्याच्या पठनानें त्यास शुद्ध अशा आनंदाची प्राप्ति होते, ज्याच्या परिशीलनानें त्याच्या मनांतील किल्बिष जाऊन तो श्रेष्ठ अशा पदवीला–प्रत्यक्ष देवांच्या पदवीला–जाऊन पोंचतो तो ग्रंथसमूह, ग्रंथ किंवा वाक्यसमुच्चय वाङ्मय या शब्दानें निर्दिशित करण्यास मुळींच हरकत नाहीं. वाङ्मय या शब्दांत अशाच ग्रंथांचा अंतर्भाव होतो. ज्याप्रमाणें बृहदारण्यकांतली ही वाङ्मयाची (literature) व्याख्या दिली आहे त्याचप्रमाणें एका नामांकित फ्रेंच ग्रंथकारानें या शब्दाची सुंदर व्याख्या दिली आहे तीही येथें देतों. आणि हल्लीं इंग्लंडांत वाङ्मयासंबंधानें जे केवळ अत्यंत श्रेष्ठ असे आचार्य मि. **जान् मोर्ले**साहेब, त्यांनींही

दिलेली या शब्दांचीं व्याख्या आपल्यास वाचून दाखवितों. ह्मणजे 'वाङ्मया' च्या अर्थासंबंधानें व व्यापकतेसंबंधानें प्राचीन ऋषी आणि अर्वाचीन पाश्चात्य ग्रंथकार यांच्या लिहिण्यांत पूर्ण-पणें अनुवाद आहे असेंच दिसून येईल. जॉन मोर्ले या नामांकित इंग्रज ग्रंथकारानें म्हटलें आहे:

'Literature consists of all the books— and they are not so many—where moral truth and human passion are touched with a certain largeness, sanity, and attraction of form. My notion of the literary student is one who through books explores the strange voyages of man's moral reason, the impulses of the human heart, the chances and changes that have overtaken human ideas of virtue and human happiness, of conduct and manners, and the shiftiness of fortunes, of great conceptions, of truth and virtue. Poets, dramatists, humorists, satirists, masters of fiction, the great preachers, the character writers, the maxim-writers, the great political orators—they are all literature in so far as they teach us to know man and to know human nature. This is what makes literature, rightly sifted and selected and rightly studied, not the mere elegant trifling that is so often and so erroneously supposed to be, but a proper instrument for a systematic training of the imagination and sympathies, and of a genial and varied moral sensibility.'

त्याचप्रमाणें सेंट बव्ह नांवाच्या सुप्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकाराची व्याख्या पहा:—

'Literature consists of a whole body of classics in the true sense of the word and a classic is an

author who has enriched the human mind, who has really added to its treasure, who has got it to take a step further; who has discovered some unequivocal moral truth, or penetrated to some eternal passion, in that heart of man where it seemed as though all were known and explored, who has produced his thought, or his observation, or his invention under some form, no matter what, so it be great, large, and acute and reasonable, sane and beautiful in itself; who has spoken to all in a style of his own, yet a style which finds itself the style of every body —in a style that is at once new and antique and is the contemporary of all the ages.'

पाश्चिमात्य ग्रंथकारांच्या मतें 'वाङ्मय' या शब्दांत कोणकोणचा अर्थ अंतर्भूत होतो, आणि कोणकोणच्या गोष्टी त्या शब्दानें निदर्शित केल्या जातात हें आतां मीं वाचून दाखविलेल्या दोनही उताऱ्यांवरून स्पष्ट होतें. तेव्हां हा अर्थ आणि मद्यापीं बृहदारण्यांतून वाचून दाखविलेल्या उताऱ्यांतील अर्थ सारतः अगदीं एक आहे असें कोणासही दिसून येणार आहे.

मनुष्याची सद्सद्विवेकबुद्धि जागृत करून त्यास नेहमीं सन्मार्गांत देवण्यास कारण होणारे, त्याच्या विविध मनोवृत्तींचा विकास करून शुद्ध अशा आनंदाचा आस्वाद त्यास देऊन जें काय अशुद्ध, अपवित्र व क्षणिक त्यापासून दूर रहाण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बोध करणारे, नेहमीं उदाररमणीय अशा विचारांचा त्याच्या मनांत संचार करवून, सत्याचे ठिकाणीं तो सदा लीन होईल असें करणारे, त्यास मनुष्यत्वांतून काढून देवत्वास पोंचविणारे, असे जे कोणाचेही अंतःस्फूर्तीनें शब्दरूपानें बाहेर पडलेले, लिहून ठेविलेले किंवा उच्चारलेले विचार त्या सर्वांना समुच्चयानें वाङ्मय ही संज्ञा आहे.

वाङ्मय या शब्दांत इतक्या अर्थाचा समावेश होतो अशी माझी समजूत आहे. आणि या दृष्टीनें पाहतां मराठी भाषेंत अभिमान बाळगण्याजोगें वाङ्मय आहे असें म्हणण्यास मला यत्किंचित्हो दिक्कत वाटत नाहीं.

इंग्रजी राज्याचा प्रसार होण्यापूर्वी मराठी भाषेंत जो ग्रंथसंग्रह निर्माण झाला त्या ग्रंथसंग्रहांत ललित ग्रंथसंग्रह म्हणजे इंग्रजी भाषेंत Belles Lettres या शब्दांत समाविष्ट होणारा ग्रंथसंग्रह नाहीं ही गोष्ट कबूल केली पाहिजे. परंतु मनाला उन्नत करून शुद्धानंद प्राप्त करून देणारा ग्रंथसंग्रह मराठींत खरोखरच आहे हें सहज कोणीही कबूल करील.

आजच्या या व्याख्यानांत एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभींच पेशवाई गेल्यानंतर नवीन उत्पन्न झालेल्या ग्रंथसंग्रहाबद्दल व त्याच्या अभ्यासाबद्दल विवेचन करण्याचा माझा विचार नाहीं. एक तर त्याच्या योगानें विषयाचा विस्तार फार होतो शिवाय दुसरींही कांहीं कारणें मनांत येऊन मी अकराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत अस्तित्वांत आलेल्या मराठी वाङ्मयाच्या संबंधानें मात्र बोलण्याचा विचार केला आहे.

वाङ्मयाचा अभ्यास करण्याचे प्रकार.

मराठी वाङ्मयाचा अभ्यास करावयाचा असें मनांत योजिलें म्हणजे प्रारंभ कसा करावा हा पहिला प्रश्न होय. कोणत्याहि वाङ्मयाचा अभ्यास करणें झाल्यास दोन प्रकार दिसून येतात. ज्यांस वेळ पुष्कळ असेल व इतिहास-दृष्टीनें आणि भाषाशास्त्राच्या दृष्टीनें वाङ्मयाचा अभ्यास करण्याची इच्छा ज्यांस असेल त्यांनीं स्वीकारावयाचा एक प्रकार, आणि ज्यांस अनेक कार्यें असल्यामुळें सूक्ष्म दृष्टीनें अभ्यास करण्यास वेळ नाहीं, परंतु आपल्या मातृभाषेंतील सौंदर्यस्थलें पाहून त्यांच्या पासून होणारा शुद्धानंद अनुभवावा अशी मात्र प्रकट इच्छा आहे, अशा लोकांनीं स्वीकारावयाचा तो दुसरा प्रकार होय. पहिल्या लोकांनीं म्हणजे

ज्यांस ऐतिहासिक दृष्टीनें व भाषाशास्त्रदृष्टीनें अभ्यास करावयाचा असेल त्यांना अगदीं आद्यग्रंथापासून प्रारंभ करून दर दर शतकांत भाषेचें व ग्रंथकारांच्या विचारांचें उत्क्रमण कसकसें होत गेलें हें पहात व तत्संबंधीं विचार करीत वाङ्मयाचा अभ्यास केला पाहिजे. दुसऱ्या प्रकारच्या लोकांची दृष्टि केवळ अर्थसौंदर्यावर किंवा शब्दचमत्कृतीवर असल्याकारणानें, त्यांस तुमच्या भाषाशास्त्राच्या नियमांशीं किंवा भाषापद्धतीच्या उत्क्रमणाशीं कांहीं करावयाचें नसतें. फावल्या वेळेंत मनाची करमणूक करण्यासाठीं किंवा थोडक्यांत परमार्थज्ञान करून घेण्यासाठीं दिवसांतून तास अर्धा तास ज्यांस वाचन करावयाचें, त्यांचे हातून सूक्ष्मदृष्टीनें अभ्यास कोठून होणार ? याशिवाय ग्रंथांतील विषयांच्या दृष्टीनेंही अभ्यास करणारांचा तिसराच एक वर्ग निघेल. कोणांस केवळ वेदांतपर ग्रंथच आवडतील, कोणांस भक्तिपर ग्रंथांची मात्र गोडी असेल व कोणांस केवळ काव्यात्मक ग्रंथांचीच अभिरुचि असूं शकेल. कसेंही जरी असलें तरी ऐतिहासिक दृष्टीने मराठींतील सर्व वाङ्मयाचा अभ्यास कसा करावा या विषयींचें विवेचन केलें म्हणजे बाकीच्या दोन प्रकारांचें विवेचन आपोआपच त्यांत येऊन जाणार आहे !

महानुभाव पंथाचे ग्रंथ.

ऐतिहासिक दृष्टीनें विवेचन करावयाचें म्हटल्यास मुकुंदराज, ज्ञानेश्वर इत्यादि वेदांतकेसरी व नामदेवादि भक्तमुकुटमणी यांच्या ग्रंथांपासून प्रारंभ करून अठराव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या जोशीबुवा व अनंतफंदी इत्यादि शृंगारलोलुप व वैराग्यपूर्ण शाहिरांपर्यंत चट साऱ्या कवींच्या ग्रंथांचें व त्यांच्या त्यांच्या भाषापद्धतींचें सूक्ष्मदृष्टीनें परिशीलन केलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर दुराभिमान एकीकडे ठेवून मुकुंदराजाच्या व ज्ञानदेवाच्या आधीं कित्येक वर्षें झालेल्या महानुभाव पंथाच्या महंतांनीं लिहिलेल्या मराठी ग्रंथांचेंही सूक्ष्म अवलोकन करणें जरूर आहे. जर चांगला शोध केला तर असें दिसून येणार आहे कीं, मराठी भाषेंत

प्रथमतः ग्रंथ लिहिल्याचें श्रेय मुकुंदराज, ज्ञानेश्वर किंवा नामदेव यांजकडे नसून महानुभाव पंथाच्या लोकांचा जो आद्य ग्रन्थ लीलाचरित्र त्या ग्रंथाच्या कर्त्याकडेच आहे. त्याचप्रमाणें कदाचित् असेंही आढळून येईल कीं, भगवद्गीता व भागवत यांवर महानुभाव पंथाच्या महंतांनीं ज्ञानेश्वर, एकनाथ वगैरे कवींच्या पूर्वीच टीका केलेल्या आहेत. हा महानुभाव पन्थ अकराव्या शतकाच्या सुमारास किंवहुना त्याच्याही किंचित् पूर्वी अस्तित्वांत आला असावा असें दिसतें. या पंथाचा अत्यंत जुना ग्रंथ लीलाचरित्र नांवाचा गद्यांत आहे, असें मला कळलें आहे व त्यांतील भाषा ज्ञानेश्वरीपेक्षांही जुनी असावी असें दिसतें. निदान या ग्रंथाचा 'श्रुति' म्हणून जो भाग आहे व ज्यांत या पंथाचे दोन महंत किंवा अवतारी पुरुष प्रशांत व चक्रधर यांचें चरित्र लिहिलें आहे, त्या भागाची भाषा तरी ज्ञानेश्वरीपेक्षां खचित अधिक जुनी असावी. याच ग्रंथांत स्मृति म्हणून एक भाग आहे त्या भागांत देवगिरीच्या कांहीं राजांच्या म्हणजे सिंघणापासून रामचंद्र यादवापर्यंतच्या राजांच्या चरित्रकथा आहेत. याच ग्रंथाला एक परिशिष्ट आहे. त्या परिशिष्टांत लीलाचरित्रांतील शब्दांचा सव्युत्पत्तिक कोश आहे, त्यास ते निरुक्त म्हणतात. प्राचीन मराठी भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्तीचा केलेला विचार मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणारांस फार उपयोगीं पडेल यांत शंका नाहीं. सिंघण राजाची कारकीर्द शके ११३२ पासून शके ११६९ पर्यंत होती. या कारकीर्दीच्या आधीं किंवा या कारकीर्दींत लीलाचरित्राचा श्रुतिभाग लिहिला गेला असला पाहिजे असें मला भगवद्भक्त भास्करभाऊ नांवाच्या एका महानुभाव पंथी गृहस्थाकडून मिळालेल्या माहितीवरून वाटतें. आणि हें वाटणें जर बरोबर असलें तर लीलाचरित्र हाच मराठींतिल आद्य ग्रंथ होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. या महानुभावी पंथाचे अवतारी पुरुष सोडून आचार्य कोण हें पाहूं लागलें, तर असें दिसून येतें कीं, यांचे आद्य आचार्य नागदेवभट्ट होत. या नाग-

देवांचा जन्म शके ११५८ त झाला. यांचे अनेक शिष्य होते त्यांत त्यांचेच पुतणे कवीश्वर म्हणून होऊन गेले. या कवीश्वरांनीं भागवताच्या एकादश स्कंदावर ओंव्या रचिल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं आपल्यास आतां वाचून दाखवितों:—

भगवत्स्तुतिपर.

सह्याचळाचे चुळके, जयाचे प्रभामंडळ फांके ।
तो श्रीदत्त लल्लाटे फळके, नमस्कारितो असे ॥ १ ॥

नमीन यादव कुळातिलकु, जो कैवल्यलता पुष्पस्तबकु ।
उदेला आनंद मृगांकु, मोहांधकारीं ॥ २ ॥

चैतन्याचा आळा, कैवल्य द्रुमु कोंभैला ।
तो चापगौर अभिवंदिला, चक्रधरू ॥ ३ ॥

पडलिया संसाराचिये अडणी, जो पूर्वी ब्रह्मविद्येची तवनी।
तो आचार्य शिरोमणी, नमीन नागार्जुन ॥ ४ ॥

चैतन्याचीये खोल वाटे, पांता वेदाची धांव कुंटे ॥
ते श्रीकृष्णरूपें नेटे बोटे, कवण वर्णूं जाणे ॥ ५ ॥

वर्णितां यादव नरेंद्रू, त्यंचा शिधे* सारस्वत मंत्रू ।
म्हणूनि उचकान फणेंद्रू, रचीं शब्दसागरातें ॥ ६ ॥

आतां श्रीकृष्णाचिये कीर्तिचांद्रिका, विकासली
‡उन्मेषकालिका ॥
तरी जनाचिया मनोनासिका, सुपरिमळ करी ॥ ७ ॥

(कवित्व)

पुराणींचे दळवाडे, रसाळ अळंकार सावडे ॥
म्हणोन भावना निवडे, कळा विलासी ॥ १ ॥

तया प्रमेयाची वोडवणें, वरी साहित्याचें वोल्हावणें ॥
तरी कविता वश करणें, कवणासि नव्हे ॥ २ ॥

---

*होय. ‡अंतःकरण.

तैसा सुवर्म जोडे श्रोता, तरी रसभावीं फुले कविता ।
+तवर येती सारस्वता, नऊ रसाचे ॥ ३ ॥
सामतयाची आणी, रोवोनि ओविजे मुक्तामणी ॥
तरी चक्रवर्तीचा कंठ भूषणीं, योग्य होय ॥ ४ ॥
तैसा जनाचिया सभा, शोधिजे शब्दरत्नाचा गाभा ॥
तयीं मिरवे अलंकार शोभा, कविता वधूसी ॥ ५ ॥
तिये कवितेची गोडी, कोकिळाची तराय मोडी ॥
गीतसाळ करी कुडी, किन्नरासी ॥ ६ ॥
आपुला कळरवी, कविता कलहंसातें पढवी ॥
ते रंगमाधुर्यें शिरवी, मधुकरातें ॥ ७ ॥
अंगींच्या सौरभ्यकला, उणें आणी परिमळा ॥
गांभीर्य करी अवकळा, गगन गंगेसी ॥ ८ ॥
रतीचिये भ्रूलतेसी, तेथ चातुर्य कायसी ॥
पडप दे संध्या वधूसी, अंगरागाचे ॥ ९ ॥
पद प्रमेयाचें गुंफणें, श्यामाभूज बंधातें जिणें ॥
कोवळीक घाली शिरणें, शिरीष पुष्पासी ॥ १० ॥
×नीचनीच तारांगणां, दीजेल संध्यारागाचे रावण,
तरी अक्षराचे सुरंगपण, अधिक दिसे ॥ ११ ॥
पदाचा मेळावा, रत्नकरा करवां चढावा ॥
प्रमेय करी हेवा, अमृत लहरीसी ॥ १२ ॥

कांहीं श्लोक.

जाला ॥कूजाति कांगे सकळ जन उगे पीडले ज्या विसर्गें॥
त्याचे भोडोनि टार्गे** अणि अरिवेंगे मारिला वत्सुरागें ॥
ध्यानीं जीवा कुदृष्टी वक धरुनि मुखीं फाळिला चंचुपूटीं॥
रामातें नेतपाठीं गत गगनतटीं दिल्हि मीठी प्रलंबा ॥ १ ॥
वेणू श्रीचक्रपाणी अमृत धवधनी पूरली विश्ववाणी ॥

+चहर. ×नित्यनित्य. ॥ सगळ्या पक्षा लोकांत. ** मान.

कामाख्या कामवाणी व्रजयुवति गणी सांधणीं मन्मथाची
गौरा श्याम प्रहृष्टा उभय कुचतटा माजि मारा वसैठा ॥
लाटा शुद्धा सुभटा मदनकटितटा वंकटा भूविशिष्टा ॥२॥
चक्रेशा त्राहि मातें शुभ सुकृतपथें लागलें राखसीं तूं ॥
तें नाहीं नीज नाथा सुरु सकळ पथा नातळे सर्वथा मी ॥
कामक्रोधांधकारीं रजतमकुहरीं सप्त पाताळ वेन्हीं ॥
गेला पैशून्य भारी म्हणवुनि शिकरी काढि सर्वज्ञ नाथा।३।

वरील ओव्या व श्लोकही वाचल्याबरोबर आपणांस असें वाटतें, कीं ही भाषा ज्ञानेश्वराच्या काळची खरी, व ज्ञानेश्वर जेथें अवतीर्ण झाले त्या प्रांतींचीही खरी. ज्ञानदेवाचे अभंग, नामदेवाचे अभंग वगैरेंतील भाषा आणि ज्ञानेश्वर व कवीश्वर आणि हयग्रीव हें महानुभाव कवी यांची ही भाषा यांत किती तरी महदंतर आहे! भिंगारकरबोआ आणि भारद्वाज यांच्या दरम्यान झालेल्या वादांत बोआंनीं असें सिद्ध करण्याचा यत्न केला आहे कीं, एक तर या दोन भाषांत विशेषशी विषमता नाहीं, आणि असली, तरी ती ध्यानांत घेण्याजोगी नाहीं. परंतु या दोन्हीही गोष्टी सिद्ध झाल्या असून भारद्वाजांनीं उपस्थित केलेला वाद समाप्त झाला असें अजून म्हणतां येत नाहीं. अजून त्याचेवर पुष्कळ प्रकाश पडावयास पाहिजे आहे. तो कदाचित् कालांतराच्या शोधानें पडण्याचा संभव आहे. माझ्या एकंदर सांगण्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं महानुभावांच्या ग्रंथांचा शोध केल्यास आपणांस ज्ञानेश्वरीच्या कालाच्या मराठी भाषेचें स्वरूप चांगल्या तऱ्हेनें समजण्यास पुष्कळच मदत होणार आहे; कांकीं त्यांच्या या ज्ञानेश्वराच्या समकालीन ग्रंथांत त्यांनीं शब्दकोश वगैरेही दिलेले आहेत.

मुकुंदराज.

महानुभाव ग्रंथकार सोडले तर पुढें मराठी भाषेचा आद्य कवि कोण हा एक लहानसा वाद उपस्थित होतोच. साधारणतः समजूत अशी आहे कीं मुकुंदराज हा मराठी भाषेंतील आद्य कवि

होय. व त्याचा विवेकसिंधु हा मराठींतिल आद्य ग्रंथ होय. परंतु पुनः भाषेच्या दृष्टीनें पाहतां ज्ञानेश्वरीची भाषा जुनी असें निदर्शनास येऊन मुकुंदराजाचा विवेकसिंधु भाषेच्या दृष्टीनें तरी ज्ञानेश्वरीपेक्षां शेंसवाशें वर्षांनीं अर्वाचीन असावा असें अनुमान करण्याचा मोह होतो. विवेकसिंधूंत पूर्वार्धाचे शेवटीं

" नृसिंहाचा वल्लाळ । तयाचा कुमर जैत्रपाळ ।
तयें करविला हा गद्यारोळ । वेदांताचा "

असा आपल्या कवित्वास आश्रय देणाऱ्या राजाचा व त्याच्या त्रयीचा उल्लेख आढळतो. इतिहासांत पाहतां अद्यापिही नृसिंह, वल्लाळ, जयंतपाळ अशी त्रयी कोठेंही सांपडत नाहीं. म्हैसूरच्या होयसळ राजांची वंशावळी पाहतां नृसिंह त्याचा वल्लाळ पुनः त्याचा नृसिंह व पुनः त्याचा वल्लाळ अशी परंपरा सांपडते. या शेवटल्या वल्लाळाचा पराभव होऊन त्यास स्वस्थ बसावें लागलें होतें व या वल्लाळाच्या पुढचा जयंतपाळ राजा असून तो कसा तरी आपलें लहानसें राज्य राखून राहिला असावा व त्याचे पदरीं मुकुंदराज होता असें अनुमान करण्याजोगें आहे. या अनुमानावरून पाहतां ज्ञानेश्वराच्या नंतर मुकुंदमुनी झाले असावे व त्यांचे ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या नंतरचे असावे असें वाटतें. मुकुंदमुनीचा संस्कृत विवेकसिंधु आहे त्यांत दिलेली मुकुंदमुनींची गुरुपरंपरा व मराठी विवेकसिंधूंतील गुरुपरंपरा ह्या एक आहेत. परंतु मराठी ग्रंथ हा संस्कृत ग्रंथाचा बरोबर तर्जुमा नाहीं. ते ग्रंथ एकाच ग्रंथकाराचे असावे असें मात्र वाटल्यावांचून रहात नाहीं. वर सांगितलेल्या शेवटल्या वल्लाळानंतर कोणी जयंतपाळ झाला किंवा काय व तो झाला असला तर केव्हां झाला, याचा निश्चय होईपर्यंत मुकुंदमुनीच्या काळाबद्दल कांहींच निर्णय करतां येत नाहीं. परंतु संस्कृत विवेकसिंधूच्या शेवटीं

" शिष्ये धन्येषु सत्स्वप्यहमधिककृपापात्रमस्यास्मि जातो
ग्रंथं मद्बोधसिद्ध्यै कुरु शिशुसुगमं ज्ञानसर्वस्वसारं

एवं विज्ञापितः सप्रणतशिरसा ज्ञानदेवेन धीमान्
लघः कृत्वा विनास्मै (?) सकरुणहृदयः श्रीमुनींद्रो मुकुंदः

असा श्लोक आहे. या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें अवनताशिर होऊन मुकुंदराजांकडे शिशुसुगम असा ग्रंथ करण्याविषयीं विज्ञापना करावयास जाणारा हा **ज्ञानदेव** कोण ? याचाही तपास लागला पाहिजे. त्याचप्रमाणें **मुकुंद**मुनींच्या संस्कृत ग्रंथाचें खरें नांव काय याचाही उलगडा करून घेतला पाहिजे. डेक्कन कालेजांतून या ग्रंथाची मीं एक प्रत आणली तिच्या रूपुस्तावर विवेकसिंधु हें नांव आहे, परंतु उत्तरार्धाचे शेवटीं " इतिश्री **मुकुंद**राजविरचिते **परमार्थ प्रबोधे सच्चिदानंदपदविवेको** नाम उत्तरार्धं प्रकरणं समाप्तिमगमत् " असा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें याचे प्रारंभीं व शेवटींही हा ग्रंथ " अनंत मुनेः सुखाय " म्हणजे अनंत मुनीच्या सुखासाठीं रचिला आहे असें म्हटलें आहे. हा अनंत मुनी तरी कोण ? हेंही समजत नाहीं.

या सर्व घोटाळ्यावरून मीं एक अनुमान इतकेंच बांधलें आहे कीं, **मुकुंद**राजांनीं संस्कृत ग्रंथ लिहिला व पुढें शेंपन्नास वर्षांनीं त्या ग्रंथाच्या आधारानें कोणी तरी मराठी **विवेकसिंधु** करून आपलें नांव न घालतां **मुकुंद**राजांच्याच नांवानें प्रसिद्ध केला असावा. परंतु हें माझें निवळ अनुमानच आहे. आणखी पुष्कळ व पक्का शोध लागेपर्यंत मी तसा पूर्वपक्ष करण्यास तयार नाहीं.

आद्य कवि कोण, या वादांत कांहीं विशेष महत्वाचा तथ्यांश असतो, अशांतला भाग मुळींच नाहीं. तथापि असल्या प्रश्नांचा निकाल लागण्यासाठीं निरनिराळ्या लोकांनीं प्रयत्न करून काढिलेली जी माहिती जगापुढें येते, ती बरीच महत्वाची व उपयोगी असते. **मुकुंद**राजाचें वसतिस्थान **जोगाई**चें **आंबें** म्हणून मोंगलाईंत गांव आहे, तें असावें असें दिसतें. कारण विवेकसिंधूच्या उत्तरार्धाचे शेवटीं या गांवाचें नांव आलें आहे. तेथें आपला परम गुरु हरिनाथ हा महा सिद्ध पुरुष होता व त्यानें मोठा थोरला यज्ञ वगैरे केला असें **मुकुंद**राजांनीं लिहिलें आहे.

आदि श्रीगुरु आदिनाथ ।
तेथुनि श्रीगुरु हरिनाथ ।
तयाचा श्रीगुरु रघुनाथ । जो गुणसिंधु ॥

अशी गुरुपरंपरा देऊन नंतर आपला गुरु जो रघुनाथ किंवा रामनाथ त्याचा गुरु म्हणजे आपला परमगुरु हरिनाथ याचें वर्णन केलें आहे. त्या ओंव्या अशा:—

वैन गंगेचे तीरीं । मनोहर ‡अंबानगरी ॥
तेथें प्रगटला श्रीहरि । जगदीश्वर जो ॥ १ ॥
माध्यंदिन शाखे । अवतार केला परमपुरुषें ।
चापेगोरटें निवेशें । अति मनोहर ॥ २ ॥
श्रीवत्सपद लपविलें । तें दाक्षिणजंघेसि दाखविलें ।
कलियुगीं अवतरण केलें । ह्मणोनियां ॥ ३ ॥

---

‡ हाणें येथील व्याख्यान झाल्यानंतर बरेच दिवसांनीं या ‘ अंबें ’ गांवच्या एका गृहस्थांनीं मला ‘ योगेश्वरीमाहात्म्य ’ नांवाचा एक संस्कृत ग्रंथ आणून दाखविला. ही ‘ योगेश्वरी ’ म्हणजे या ‘ अंबानगरी ’ ची अधिष्ठात्री देवता होय. हिच्या-वरूनच या स्थानाला ‘ जोगाईचें अंबें ’ असें म्हणतात. हें माहात्म्य म्हणजे सुमारें ३२०० श्लोकांचा ३० अध्यायांचा ग्रंथआहे. यांत २२ व्या अध्यायांत या गांवचे सिद्ध म्हणून मुकुंदराजाची व आणखी पांच सिद्ध पुरुषांच्या कथा आल्या आहेत. हा ग्रंथ पुराणाच्या धर्तीवर लिहिलेला आहे. प्रत्यक्ष शंकरानें रेणुकनाथाला हें योगेश्वरीमाहात्म्य सांगितलें व तें पुढें सूतांनीं शौनकादिकांना सांगितलें असा यांत उपोद्घात आहे. रेणुकनाथ हा मुकुंद-मुनीचा शिष्य असें म्हटलें आहे. इतिहास या दृष्टीनें या ग्रंथाची अर्थातच कांहींसुद्धां योग्यता नाहीं. इतकेंच नव्हे तर हें भविष्यो-त्तरपुराणांतर्गत “योगेश्वरीमाहात्म्य” रचणारास “अमृतानुभव” हा ग्रंथ कोणाचा आहे हें माहित नाहीं. त्यानें विवेकासिंधु आणि अमृतानुभव हे दोन ग्रंथ मुकुंदमुनीचे असें म्हटलें आहे ! या बाविसाव्या अध्यायांत जैत्रपाळाचाही उल्लेख केला आहे.

या हरिनाथाच्या उजव्या मांडीवर श्रीवत्सासारखी कांहीं तरी खूण असावी, असें दिसतें:—

मुकुंदराजाचे दोन ग्रंथ. एक ' विवेकसिंधु ' आणि दुसरा ' परमामृत ' हे फार सुप्रसिद्ध आहेत. परंतु आउफ्रेख्टसाहेबांनीं ग्रंथांची जी जंगी यादी प्रसिद्ध केली आहे, तींत आणखी पांच ग्रंथ त्यांचे नांवावर आढळतात. ते ग्रंथ मला पाहण्यास मिळाले नाहींत. परंतु सातही ग्रंथांचीं नांवें देतों.

१ अद्वैतज्ञानसर्वस्व.
२ अष्टावक्रगीताभाष्य.
३ आत्मबोध.
४ पंचिकरण.
५ विवेकसारासिंधु.

परंतु तो कोणी जिनधर्मी राजा असून तो ब्राह्मणधर्मीयांचा—विशेषतः ब्राह्मणांचा—छळ करी. सिद्धि दाखवा असें म्हणून त्यांचे पाठीस लागे, असें लिहिलें आहे. मुकुंदमुनी त्याच गांवचे, परंतु ते काशीस गेले होते. तेव्हां जयपाळ ब्राह्मणांस सिद्धि दाखविण्याविषयीं फार त्रास देतो आहे हें त्यांस कळलें. सिद्धि दाखविल्यां चेत नाहीं, तर माझ्या पायेस लागणारे हरबरे तुम्हांस भरडण्यास लावीन असें म्हणून त्याप्रमाणें ब्राह्मणांस त्यानें हरबरे भरडण्यास लाविलेंही होतें. मुकुंदमुनी परत येतांच जैनपाळानें त्यांसही सिद्धि दाखवा नाहीं तर हरबरे भरडण्यास बसवीन असें म्हटलें. तेव्हां बरें बाबा असें म्हणून त्यांनीं आपल्या हातांत धरण्याच्या काठीस ' राजा सांगतो आहे, तर हरबरे भरडून ये ' म्हणून आज्ञा केली. त्याबरोबर काठी जात्यांत जाऊन बसून तिनें हरबरे भरडण्यास सुरुवात केली ! नुसती काठी हरबरे भरडते आहे हें पाहतांच सिद्धि पाहूं इच्छिणाऱ्या राजाचे डोळे उघडले व त्यानें सर्व ब्राह्मणांस मुक्त करून मुकुंदमुनीपुढें लोटांगण घालून त्यांचें शिष्यत्व पत्करलें ! मुकुंदराजांनीं आपल्या ग्रंथांत सांगितलेल्या गुरूंचें या ग्रंथांत नांवही नाहीं.

६ विवेकसिंधु अथवा वेदांतार्थविवेचनमहाभाष्य.

७ परमामृत.

मुकुंदराजांविषयीं आज आपल्याला जी माहिती मिळते आहे ती इतकीच आहे.

नामदेव.

मुकुंदमुनींच्या नंतर **नामदेव** व **ज्ञानेश्वर** हे—आजपर्यंत मानीत आलेल्या जन्मतिथी खऱ्याच आहेत असें धरून चालल्यास—समकालीन कवि झाले. **नामदेव** इ. स. १२७० ते १३५० पर्यंत होते व **ज्ञानेश्वर** १२७१ ते १२९३पर्यंत होते, अशी साधारणतः समजूत आहे. **ज्ञानेश्वर** हे इ.सनाच्या तेराव्या शतकाच्या शेवटीं होते,ह्याला आधार खुद्द **ज्ञानेश्वरी**तच आहे. ज्ञानेश्वरी ही भगवद्गीतेवरील टीका शके १२१२ त म्हणजे इ. स. १२९०।९१ चे सुमारास केली असा उल्लेख **ज्ञानेश्वरी**चे शेवटीं केला आहे. तेव्हां तें वर्ष बरोबर आहे असें धरण्यास मुळींच हरकत नाहीं. परंतु **नामदेव** हा ज्ञानेश्वरांच्या समकालीन होता हें अद्यापि नीटपणें मनावर बिंबत नाहीं. याला कारण पुनः **ज्ञानेश्वरा**च्या ओंव्या आणि नामदेवाचे अभंग यांतील भाषावैषम्यच होय. मुकुंदराजाचा विवेकसिंधु व **ज्ञानेश्वरी** यांतील भाषेच्या विसदृशतेपेक्षां **नामदे**वाच्या अभंगांतील व **ज्ञानेश्वरी**तील भाषांची विसदृशता फारच विलक्षण आहे. **नामदे**वाचा गाथा म्हणून जो अभंगसंग्रह आज उपलब्ध आहे, हाच जर खरा असेल, तर या गाथ्याचा कर्ता **नामदेव** **ज्ञानेश्वरा**शीं खचित समकालीन नाहीं असें म्हटल्यावांचून राहवतच नाहीं. **नामदे**वाच्या गाथ्याची भाषा तुकारामबोआंच्या अभंगासारखी वाटते. यामुळें असें वाटतें कीं, सध्यां उपलब्ध असलेल्या गाथेचा कर्ता सुमारें सोळाव्या शतकांत झालेला असावा.

असलें विधान करणें मोठें धाष्टर्याचें वाटेल, परंतु जें वाटतें तें सांगण्याला कांहीं हरकत दिसत नाहीं. असो; परंतु आपण असें धरून चालूं कीं, **नामदे**व हे कुटुंबकवि **ज्ञानेश्वरी**कारांचे समका-

लीन होते. ते ज्ञानेश्वरांचे आधीं जन्मले, तेव्हां ते आधींचे असें धरून आपण त्यांचे ग्रंथांसंबंधानें चार शब्द बोलूं.

अशी कथा आहे, कीं नामदेव प्रथम फार द्रुड होते, व पुढें त्यांचा तो द्रुडपणा इतक्या थराला गेला, कीं वाटमाऱ्या करण्याचें धाडस करण्याची प्रवृत्ति त्यांस झाली. परंतु कांहीं कारणानें लवकरच त्यांस पश्चात्ताप होऊन त्यांनीं तो मार्ग सोडून भगवद्-जनाचा मार्ग धरला. त्यांस अभंग करण्याचा नाद लागला व त्यांचे नादानें त्यांचे सर्व कुटुंबास तो नाद लागला. म्हणून यांस कुटुंबकवि म्हटलें आहे. यांचें सगळें कुटुंब अभंग करी याबद्दल एक अभंग आहे तो असा:—

गोणाई राजाई द्रोघी सासूसुना ॥
द्रामा नामा जाणा बापलेक ॥ १ ॥
नारा म्हाद्रा गोंद्रा विठा चौघे पुत्र ॥
जन्मले पवित्र त्याचे वंशीं ॥ २ ॥
लाडाई गोडाई येसाई साकराई ॥
चौघी सुना पाही नामयाच्या ॥ ३ ॥
निंबाई ते लेकी नाऊबाई बहिणी ॥
वेडीपिशी जनी द्रासी त्याची ॥ ४ ॥
इतुक्याही जणीं अभंग आरंभिले ॥
देवें पूर्ण केले नामा म्हणे ॥ ५ ॥

ज्ञानेश्वराचे समकालीन मुख्य नामदेव असून त्यांचे पुढें दुसरा कोणी नामदेव झाला, त्याचे अभंग पहिल्या नामदेवांच्या अभंगांत मिसळून जाऊन जर सध्यांचा प्रचारांत असलेला गाथा झाला असला, तर सध्यांच्या अभंगाच्या गाथ्याचा फार कसोशीनें निवड झाली पाहिजे. ती होईपर्यंत हा नामदेवाबद्दलचा प्रश्न आपणांस सुचकव्यांतच ठेवणार यांत शंका नाहीं. नामदेवांनीं महाभारतावर ओव्या रचिल्या आहेत, असें नामदेवांच्या चरित्रांत कोठेंहीं नाहीं. परंतु आज मितीस " विष्णुद्रास नामा " यानें रचिलेल्या

ओंवीबद्ध महाभारताचीं पर्वें बऱ्याच ठिकाणीं सांपडतात ! तेव्हां पुनः हा प्रश्न आलाच, कीं ओंवीबद्ध भारत करणारा **नामदेव** आणि गाथाकार **नामदेव** हे एक होते कीं भिन्न होते ? मीं स्वतः या ' **विष्णुदास नामा** ' च्या महाभारतांतलीं दोन पर्वें पाहिलीं आहेत. पैकीं **कर्णपर्व** मजजवळ आहेही. त्यांतून **कर्ण** व **अर्जुन** यांच्या युद्धाच्या वर्णनाचा एक लहानसा उतारा आपल्यास सादर करतों त्यावरून त्या ग्रंथाची योग्यता काय आहे तें आपलें आपल्यासच अजमावतां येईल.

ते दोघे धनुर्धर । श्रेष्ठ भारतींचे वीर ॥
संग्राम करित रणरंगधीर । आलोट नुखळाति (?) ये-
कमेका ॥ १ ॥

वीर दोघेही साधक । येकाहून एक अधिक ॥
एकमेकां हांकीति येक । युद्धें करिति दारुण ॥ २ ॥

येकाचा परशुराम गुरु । येकाचा द्रोण धनुर्धरू ॥
ते दोघे नावार्धिले (?) वीरू । रणीं भिडती कर्ण पार्थ ३

दोघे मांडूनि ठाण । येकमेकांवरी घालिती बाण ॥
तंव देव म्हणाति निर्वाण । आजि दोघीं मांडिलें ॥ ४ ॥

बाणीं दाटलें आकाश । अंधःकारू पडला दिशांस ॥
रीघु नाहीं पवनास । तेथें रवी रश्में कैचीं ॥ ५ ॥

बाणां बाण आदळत । कल्लोळ अग्नीचा उठत ॥
विमानें आहाळती म्हणून हांक देत । देव नावेक परतें
करिती ॥ ६ ॥

घोर तेजांचा उठला कल्लोळ । तेणें तापलें भूमंडळ ॥
दशदिशा हलकल्लोळ । दोन्ही सैन्यें आदळती ॥ ७ ॥

तरि तें बाणजाळ जाण कैसें । महा प्रळयींचें का-
ळकूट जैसें ॥
कीं ब्रह्मप्रळयींचें दिसे । जैसें उचंबळलें उदक ॥ ८ ॥

तो नारायणाचा असे खेळ।तेजें कोंदलें गगनमंडळ ॥
तरि तेणें पाताळ । दुमदुमिलें असे ॥ ९ ॥
घोर दोघां वीरांत पेटलें । बाणाचें कोचळें पडिलें ॥
जेंवि मेघुडें पर्वतीं वैसलें । न दिसे कांहीं ॥ १० ॥
अथवा महा प्रळयींचा अंधकार । थोर उठला घो-
रांदर ॥
तैसें दाट शेर । घातलें असति येकमेकां ॥ ११ ॥
ते दोघे संधान करिती । बाणासि बाण आडळती ॥
तरि लया गजरें खचतीं । शिखरें पर्वतांचीं ॥ १२ ॥
तरि ते दोघे वीर परियेसी । अभंग न भीति येकमे-
कांसी ॥
आदट लोठलोठासी (?)। नवजाति येकमेकां ॥१३ ॥
प्रळयींच्या अंतीं । काळ महाकाळ भिडती ॥
तैसे दोघे युद्धें करिती । सांडोनि भय मरणाचें॥१४॥
वीर पेटले महामारा । आणी वार होती येरयेरां ॥
तयांचा संग्राम सांगतां पुरा । कवणा माति येवढी।१५।

\+ + + + + + + + +

आतां येथून पुढती कथा । काय ऋषी सांगे नृ-
पनाथा ॥
तरि तेंचि श्रोतां । नामा सांगे विष्णुदास ॥

हा विष्णुदासनामा कोण याचा पत्ता लागेल, तर फार चांगलें होईल. आपणांस असें दिसेलच, कीं या ओव्यांतली भाषा नामदेवाच्या अभंगांच्या भाषेपेक्षां बरीच जुनी आहे. हें महाभारत एकवार प्रसिद्ध झालें, तर बरें होईल. या भारताचें आदिपर्व किंवा स्वर्गपर्व जर सांपडेल, तर फार चांगलें होईल. आदिपर्वाच्या प्रारंभीं किंवा स्वर्गपर्वाच्या शेवटीं कर्वाची हकीकत दिली असण्याचा संभव आहे. मीं पाहिलेल्या दोनही पर्वांचे शेवटीं "नामा विष्णुदास" या नांवाखेरीज दुसरें कांहीं नाहीं. नामदेवाचे

अभंग अत्यंत भक्तिरसानें ओथंबलेले आहेत हें कांहीं कोणी सांगावयास पाहिजे असें नाहीं. तुकारामाच्या अत्यंत विशुद्ध अशा भक्तिरसाचें स्फूर्तिस्थान नामदेवाचे अभंग होत. पण शोधाअंतीं कदाचित् असें आढळेल कीं गाथाकार नामदेव नवा व भारतकार नामदेव जुना. गाथाकार नामदेव तुकारामाच्या आधीं पन्नास पाउणशें वर्षेंच झाला असावासें वाटतें.

ज्ञानेश्वर.

नामदेवाच्या काळींच–मराठींत सांगितलेला १२७० ते १७५० हा काल बरोबर असला, तर–मराठी वाङ्मयाच्या संबंधानें जीस अगदीं श्रेष्ठतम पदवी दिली पाहिजे, अशी एक महाविभूति झाली. या विभूतीचें नांव 'ज्ञानेश्वर' होय. या विभूतीनें केलेला भगवद्गीताटीकात्मक ज्ञानेश्वरी ग्रंथ कालाच्या दृष्टीनें मराठी वाङ्मयांतला 'आद्य' ग्रंथ असो किंवा नसो, परंतु अंतःस्थ गुणांच्या योगानें–भाषासौंदर्यानें, शब्दलालित्यानें, दृष्टांतरमणीयतेनें, अलंकारशोभेनें, व सगळ्यांत विशेष, स्फूर्तिप्रेरितकवितापरिपाकानें–हा ग्रंथ मराठी वाणीचें शिरोभूषण झाला आहे यांत शंका नाहीं. मराठी भाषेंत आपण गीतेसारख्या ग्रंथावर टीका लिहिली, या गोष्टीचा ज्ञानेश्वरास मोठा अभिमान वाटत असे, तो अगदीं यथार्थ असे. त्या काळीं मराठी भाषेंत ग्रंथ लिहिणें म्हणजे एक अगदीं हलकेपणाचेंच नव्हे तर शास्त्रनिषिद्ध काम समजलें जात असलें पाहिजे. परंतु स्वराज्य असलें, म्हणजे असले दुराग्रह नष्ट होऊन साधारण लोकांकरितां प्रचलित भाषेंत ग्रंथ करणें हें एक अवश्यक कर्तव्यच होऊन बसतें. पहिले महानुभाव मोठे विद्वान् पंडित झाले, त्यांनीं साधारण लोकांत ज्याचा प्रचार व्हावा असला धर्म उपस्थित केला. तेव्हां त्या धर्मप्रचारासाठीं उपयोगीं पडणारीं अशीं धर्मपुस्तकेंही अर्थातच प्रचलित भाषेंत लिहिण्याचा त्यांना प्रचार पाडावा लागला. शिवाय त्या वेळचे राजेही मराठी भाषेचे पुरस्कर्ते, कारण स्वतः मराठे. ज्ञानेश्वरींकारांचे वेळीं रामचंद्र किंवा राम-

देवराव यादव हा राजा राज्य करीत होता, असा उल्लेख ज्ञानेश्वरींत आहेच. या ज्ञानेश्वरांचें चरित्र आतां येथें मी देत बसत नाहीं. तें चरित्र बहुतेक सर्वविश्रुत आहे. संन्याशानें पुनः गृहस्थाश्रम घेऊन झालेल्या पुत्रांपैकीं ज्ञानेश्वर होत. यांस दोन भाऊ होते आणि एक बहीण होती. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे वडील बंधु आणि गुरुही होते व बहिणीचें नांव मुक्ताबाई होतें. या ज्ञानेश्वरांचे नांवावर बरेच ग्रंथ मोडतात, पैकीं खरोखर फारच महत्वाचे असे दोनच ग्रंथ होत. १ ज्ञानेश्वरी व २ अमृतानुभव. आणखी त्यांचे नावें मोडतात किंवा त्यांनीं केले आहेत असे ग्रंथ ३ स्वात्मानुभव, ४ पंचीकरण, ५ चांगदेव पासष्टी, ६ रूपक, ७ योगवासिष्ठ, ८ हरिपाठ, व ९ अभंग. शिवाय ' ज्ञानेश्वराचें आत्मपत्र व लेखणी ' आणि ' ज्ञानेश्वरनमन ' असे दोन छोटेखानी ग्रंथ माझे पहाण्यांत आले आहेत. आत्मपत्राची भाषा ज्ञानेश्वरांचीशी वाटते, परंतु त्यांत शेवटीं प्रतिष्ठानच्या एकनाथाचा उल्लेख आहे त्यामुळें ज्ञानेश्वरानेंच तें लिहिलें असें म्हणण्यास फार मोठी अडचण आहे. ज्ञानेश्वरांच्या संबंधाची त्या पत्रापासून थोडी माहिती मिळण्याचा संभव आहे म्हणून तें पत्र वाचतों.

॥ श्री ज्ञानेश्वराचें पत्र ॥ लेखणी ।

नयनाचे अंजनीं । माजि लेखणी भरूनि ।
देखण्याची मिरवणी । त्या निवृत्ति हातें ॥ १ ॥
ऐसें हें पत्र । स्वानन्दमय स्वतंत्र ॥
शुद्धश्वेत विचित्र । हें ऐसें गे माय ॥ २ ॥
नवलानवल । या डोळ्यांचि बोल ॥
अबोलणें बोल । उठताति ॥ ३ ॥
अवो माय अवो माय । या माजि मिं न समाय ॥
अगम्यागम्य सोय । निवृत्ति लेहवि ॥ ४ ॥
नयनाचें अंजन पाहिलें । हें या पत्रिं खलिलें ॥
अखलु खला आलें । हें देखणियां ॥ ५ ॥

श्वेतातीतश्वेत लिहिलें । देखणियांच्या काळें ॥
डोळ्यालें खलिलें । अखलुवो माय ॥ ६ ॥
अव्यक्त रेखणें । यया परि देखणें ॥
रेखाटिलि येणें । निवृत्तिराजें ॥ ७ ॥
रेखणिया पाठिं । अलक्षरेखा उटि ॥
ऐसि हे गोमटि । निजयात्रिका ॥ ८ ॥
अो माय अवो माय । ज बोलतें बोलु काय ॥
एसिया निवृत्तिरायें । बोलविलें माये ॥ ९ ॥
चहुंरकानियावर । माथा अलक्षदकार ॥
या निवृत्तिचा कर । चपल मिरवे ॥ १० ॥
मिरवे चपलपणीं । चहुंरकानिया माजि देखणि ॥
माजि डोलयांचे पाणि । खेळतसे ॥ ११ ॥
नवला नवल करणिं । नवला नवल कोणिं ॥
माजि वहुकालिं देखणी । कैसें डोलियानें लिहिलें
पत्र ॥ १२ ॥

अक्षर डोळा अगुणि । अविनाश लेखणि ॥
माजि वहुकालिं देखणि । लिहितसें ॥ १३ ॥
पाहातें पाहाण्या परी । पाहण्यांतील सरी ॥
या अक्षरें मोहरि । धरियालि गे माय ॥ १४ ॥
चहुंरकानियांवरिल साना । सहज औट ऊर्ध्वकाना ॥
हे देखणियांच्या मना । निवृत्ति लिही ॥ १५ ॥
चपलपणें डोळां । अव्यक्ताक्षर सोहळा ॥
चपलपणें लिहिला । जाणवीगे माय ॥ १७ ॥
हा निजिं निवृत्तिनाथ । अक्षर उमटवित ॥
चपलपणें हात । मिरवे गे माय ॥ १७ ॥
होतें ते हें नाना । सप्तरसि येकत्र माना ॥
डोलियांचिये लेखणी । निवृत्ति लिहि ॥ १८ ॥

सहजाचा हा तुला । धेलांचि माथुला ॥
अव्यक्त बुद्धि बोलला । ये पत्रिकेवरि ॥ १९ ॥
तैं ते लेखन केलें । आतांतैं बोललें ॥
हें पाहाणें वाले कुल्हें । या निवृत्तिचें ॥ २० ॥
आतां अक्षरें पत्रिकेवरि । किं पत्रिका या अक्षरीं ॥
अङ्गांगिं अक्षरें सारिं । हे पत्रिकाचिं ॥ २१ ॥
तेविं निजिं निजबोलिं । उमटलें या स्वमेली ॥
हे देखणि आलि । लेखना गे माय ॥ २२ ॥
देखणिं देखे देखणिं या । होउनि लेखाणे लिहीतया ।
चपलपजें भिरवे तया । निवृत्ति राजया कारिं ॥ २३ ॥
अक्षरें लिहिति करासि । कर भिरवे अक्षरासि ।
हा निवृत्तिरासि । अंगांगेंसि ॥ २४ ॥
अनंगाच्या वदनिं । अनिर्वाच्य बोलणि ॥
हे मौन विसर्जनि । लेखन गे माय ॥ २५ ॥
मौनाचें निजमौन । अलक्षा लक्ष गहन ॥
शून्याचें निज शून्य । आंजुनि देखणिया ॥ २६ ॥
प्रणवपट्टीविया वोळि । अव्यक्त मांडणि आलि ॥
ते चारि शून्यें पुसिलिं । या बोलि गे माय ॥ २७ ॥
आतां न बोलोनि बोलें । हे धवलें पत्र आलें ॥
धवल्या धामिं उगवलें । धवलेंसिं गे माय ॥ २८ ॥
धवलिया बोलि । धवलिया बोलि ॥
धवलि धवलाचपलि । हे गुरु देखणि ॥ २९ ॥
आतां शब्द निशब्द वोभाट । या टाकिलें परतट ॥
निवृत्तिकर सुभट । खेळतसे ॥ ३० ॥
जेथें तेथें नवा नवरस । हा दाहावां देह सुरस ॥
निवृत्ति राजहंस । येकादश गे माय ॥ ३१ ॥
हंसाचा हंस । करुनि निरास ॥
परापर सुरस । त्या आंतु वेगें ॥ ३२ ॥

श्वेतातीतश्वेत लिहिलें । देखणियांच्या काळें ॥
डोळ्यानें खलिलें । अखलुवो माय ॥ ६ ॥
अव्यक्त रेखणें । यया परि देखणें ॥
रेखाटिलि येणें । निवृत्तिराजें ॥ ७ ॥
रेखणिया पाठिं । अलक्षरेखा उठि ॥
ऐसि हे गोसटि । निजमात्रिका ॥ ८ ॥
अो माय अवो माय । न बोलतें बोलु काय ॥
एसिया निवृत्तिरायें । बोलविलें माये ॥ ९ ॥
चहुंरकानियावर । माथा अलक्षदकार ॥
या निवृत्तिचा कर । चपल मिरवे ॥ १० ॥
मिरवे चपलपणीं । चहुंरकानिया माजि देखणि ॥
माजि डोलयांचे पाणि । खेळतसे ॥ ११ ॥
नवला नवल करणिं । नवला नवल कोणिं ॥
माजि वहुकालिं देखणी । कैसें डोलियानें लिहिलें
पत्र ॥ १२ ॥

अक्षर डोळा अगुणि । अविनाश लेखणि ॥
माजि वहुकालिं देखणि । लिहितसें ॥ १३ ॥
पाहातें पाहाण्या परी । पाहण्यांतील सरी ॥
या अक्षरें मोहरि । धरियालि गे माय ॥ १४ ॥
चहुंरकानियांवरिल साना । सहज औट ऊर्ध्वकाना ॥
हे देखणियांच्या मना । निवृत्ति लिही ॥ १५ ॥
चपलपणें डोळां । अव्यक्ताक्षर सोहळा ॥
चपलपणें लिहिला । जाणवीगे माय ॥ १६ ॥
हा निजिं निवृत्तिनाथ । अक्षर उमटवित ॥
चपलपणें हात । मिरवे गे माय ॥ १७ ॥
होतें ते हें नाना । समरसि येकत्र माना ॥
डोलियांचिये लेखणी । निवृत्ति लिहि ॥ १८ ॥

सहजाचा हा तुला । धेलांचि मायुला ॥
अव्यक्त बुद्धि बोलला । ये पत्रिकेवरि ॥ १९ ॥
तैं ते लेखन केलें । आतींतें बोललें ॥
हें पाहाणें बोलें कुलहें । या निवृत्तिचें ॥ २० ॥
आतां अक्षरें पत्रिकेवरि । किं पत्रिका या अक्षरीं ॥
अङ्गांगिं अक्षरें सारिं । हे पत्रिकाचिं ॥ २१ ॥
तेविं निजिं निजबोलिं । उमटलें या स्वप्नेली ॥
हे देखणि आलि । लेखना गे माय ॥ २२ ॥
देखणिं देखे देखणिं या । होउनि लेखणि लिहीतया ।
चपलपणें भिरवे तया । निवृत्ति राजया करिं ॥ २३ ॥
अक्षरें लिहिति करासिं । कर भिरवे अक्षरासि ।
हा निवृत्तिरासि । अंगांगेंसि ॥ २४ ॥
अनंगाक्षया वदनिं । अनिर्वाच्य बोलणि ॥
हे मौन विसर्जूनि । लेखन गे माय ॥ २५ ॥
मौनाचें निजमौन । अलक्षा लक्ष गहन ॥
शून्याचें निज शून्य । आंजुनि देखणिया ॥ २६ ॥
प्रणवपट्टीचिया वोलि । अव्यक्त मांडणि आलि ॥
ते चारि शून्यें पुसिलिं । या बोलि गे माय ॥ २७ ॥
आतां न बोलोनि बोलें । हे धवलें पत्र आलें ॥
धवल्या धामिं उगवलें । धवलेंसिं गे माय ॥ २८ ॥
धवलिया बोलि । धवलिया बोलि ॥
धवलि धवलाचपलि । हे गुरु देखणि ॥ २९ ॥
आतां शब्द निशब्द बोभाट । या टाकिलें परतट ॥
निवृत्तिकर सुभट । खेळतसे ॥ ३० ॥
जेथें तेथें नवा नवरस । हा दाहावां देह सुरस ॥
निवृत्ति राजहंस । येकादश गे माय ॥ ३१ ॥
हंसाचा हंस । करुनि निरास ॥
परापर सुरस । त्या आंतु वेगें ॥ ३२ ॥

अनाक्षारिं वोवाळिला । हेतु निरहेतु केला ॥
लेख उल्लेख सारिला । अलक्षा परि ॥ ३३ ॥

अलक्षा लक्ष । ऐसें हें परोक्ष ॥
दिक्षाटलेंसे दक्ष । रक्षणालागि ॥ ३४ ॥

या गैनिनाथें वाल्हि । मंगल धामें वोलालि ॥
निवृत्ति राजे आणिलि । देखणि लेखनि ॥ ३५ ॥

उमानाथें पत्रिका । शुद्धबुद्ध श्वेतका ॥
पाठें पोटिं घोटिका । देखनि यानें ॥ ३६ ॥

आदिनाथें पाहिली । सिकेवलिलाविली ॥
अव्यक्त मुद्रिका केलि । गोजरि गे माय ॥ ३७ ॥

निज मुद्रिका केलि । परिसि जो नाहिं दिधालि ॥
मुद्रे सत्ता आली । आदिनाथिं ॥ ३८ ॥

अनग निजमुद्रिका । या पत्रिं उमटलि देखा ॥
हा आदिनाथें सिका । केला गे माये ॥ ३९ ॥

गैनिचा हात । धरित मत्स्येंद्रनाथ ॥
हे पत्रिका सुरू होत । तिये ठाईं ॥ ४० ॥

ऐसि सुरू जालि । सुरु करूनि पाहिली ।
तंव पाहणें पाहूं आलें । पाहातिया माजि ॥ ४१ ॥

सहज मत्स्येंद्रनाथें । पाविलि गोरक्षितें ॥
हें निशाण निजाचें तें । करूनि वाचवी ॥ ४२ ॥

मग या गोरक्षीकरें । हा गयनि पंथें उत्तरे ॥
सहज मोहरि मोहरे । निवृत्तिवरि ॥ ४३ ॥

निवृत्ति उफराटी । पत्रिका करूनि उलटीं ॥
ज्ञानया समसाटि । अंवणें माये ॥ ४४ ॥

सहज ज्ञाननाथ । मुक्ताईस दाविंत ॥
सोपानास ह्मणत । वांचु ये वा ॥ ४५ ॥
अनिवार्च्य वाची । हे पुरवणि विनतीचि ॥
ऐसिया पत्रिकेचि । मातरया ॥ ४६ ॥

हे विनती किं विनता । ना अनिर्वाच विनविता ॥
अगम्यागम्य डोळा घालितां । हे विनति नव्हे ॥ ४७ ॥
अव्यक्ताचिये चौकिवरी । हे पत्रिका ठेविली ऐसि-
या परी ॥
मुक्ताई म्हणे वाचुं सारी । न करुं स्वारि जनासि ४८
जनवन निरंजन । समासिं केलें ऐसें ज्ञान ॥
हें गुरू देखणीचे लेखण । जालें गे माये ॥ ४९ ॥
गजोंनि निवृत्ति ज्ञाननाथ । मुक्ताईसि बोलणें वाचित ॥
हें पत्र प्रतिष्ठानीं एकनाथ । वाचिल वो माये ॥ ५० ॥
ये देखणिचे लेखणिं । मनास एकनाथ आणि ॥
तया वाचुनि कोणी । न वाचि वो माय ॥ ५१ ॥
सर्वांगें जो देखणा । तो पावेल या खुणा ॥
त्यासुखें श्रवणा । करणें वो माये ॥ ५२ ॥
स्वस्तिश्री विजयश्री । या टाकिल्या निवृत्तितीरीं ।
ते हे पत्रिका सारि । लिहे डोलां ॥ ५३ ॥
हें अगम्य कल्याणपत्र । ऐसि निरखणी अनंगाचे नेत्र ।
वाचितया मंगलधाम स्वतंत्र । अर्पिले वो माय ॥ ५४ ॥

इति ज्ञानेश्वर विरचित पत्रिका ॥ संपूर्ण ॥

या पत्राची एकच प्रत मला मिळाल्याकारणानें मीं ती जशी-च्या तशीच वाचली. हींत अर्थातच अशुद्धें फार आहेत. परंतु एकनाथाच्या संबंधाचा जो शेवटीं उल्लेख आहे, त्या उल्लेखामुळें कोणीही विवेचक बुद्धीचा गृहस्थ हें पत्र ज्ञानेश्वरमहाराजांचें नाहीं असेंच म्हणणार. या आत्म पत्राची भाषा अगदीं ज्ञानेश्वरी-सारखी आहे. यामुळें माझ्या बुद्धीला असें वाटतें कीं, हें मूळ पत्र ज्ञानेश्वरांचें असावें, परंतु कोण्या भाविकास तें लाभलें तेव्हां त्याचे मनांत कांहीं तरी येऊन त्यानें शेवटल्या कांहीं ओंव्या आंत दडपून देऊन एकनाथ महाराज हें पत्र वाचतील वगैरे मजकूर त्यांत ग्रथित केला. अशी गोष्ट होणें केवळ नवीन आहे असें

नाहीं. भारद्वाज व भिंगारकरबोआ या दोघांच्या वादाचे वेळीं भिंगारकर बोआंनीं या ज्ञानेश्वरमहाराजांची गुरुपरंपरा टरावि-ण्याला जे अनेक आधार दिले आहेत, त्यांत ज्ञानेश्वरांचा दस्तुर-खुद्द आधार म्हणून या पत्रांतिल ओंव्या दिल्या आहेत. परंतु ज्या पत्रांत ज्ञानेश्वराचे पश्चात् ३०० वर्षांनीं झालेल्या एकनाथ महाराजांचे नांवाचा स्पष्ट उल्लेख आहे, तें पत्र ज्ञानेश्वर महारा-जांचें दस्तुरखुद्द म्हणून कसें समजतां येणार ? भिंगारकरबो-आंजवळच्या या स्वात्मपत्राच्या प्रतींत या एकनाथाच्या उल्ले-खाच्या ओंव्या नसल्या, तर सांगवत नाहीं. परंतु तसें संभवत नाहीं. कारण माझ्या प्रतींत फक्त ५४ ओंव्या असून त्यांत तो उल्लेख आहे. आणि त्यांच्या प्रतींत १०८ ओंव्या आहेत, असे त्यांनीं लिहिलें आहे. तेव्हां त्यांत असण्याचा विशेष संभव आहे परंतु तसा उल्लेख असल्याबद्दल त्यांनीं लिहिलेलें आठवत नाहीं. एकनाथाच्या उल्लेखामुळें त्यांच्या मुख्य मुद्द्यांपैकीं मोठाच मुद्दा गळाला असें म्हणण्यास काय हरकत आहे? या स्वात्मपत्रांतही श्रीविठ्ठलाचें नांव नाहीं. " उमानाथ " आहे. हेंहि ध्यानांत घेण्याजोगें आहे.

ज्ञानेश्वराचें नमन हा ग्रंथ १०८ ओंव्यांचा आहे. यांत देव, ब्रह्म इत्यादिकांना नमन आहे. यांत कोठेंच गुरुपरंपरा दिलेली नाहीं. इतकेंच नव्हे तर.

श्री गुरुकृपा जैं होय । तैं नमनाचि ऐसि सोय ॥
पावोनियां सुगम उपाय । नमोनमः ते ॥

असा प्रस्ताव केला असून गुरूचें नांव नाहीं. एक वार " श्री निवृत्ति " हें नांव आलें आहे. ती ओंवी अशीः—

नमन लटिकें नव्हे नव्हे । नमन भलतिया न साहे ।
जैं साहे सरवा होये । श्रीनिवृत्ति ॥

परंतु निवृत्ति हा शब्द येथें नुसता ' मोक्ष ' या अर्थीच यो-जिला नाहीं असें म्हणण्याला कारण नाहीं. आणखीही एक गोष्ट या नमनांत विशेष आहे, ती ही कीं " वप रखुमादेवी वरू "

व " उभा राहोनि स्वयंभू भिमातटीं पंढरिचे " असा जो " पुंडरिक निधान पांडुरंग " " श्री विट्ठल " त्याचें नांव स्पष्टपणें आहे. मुक्ताबाई, सोपान वगैरे कोणाचेंही नांव त्यांत नाहीं. तेव्हां जर पुढेंमागें ज्ञानदेव ठरले, तर हें नमन संत ज्ञानदेवाचें आहे असें ठरणार, यांत संशय नाहीं. हें नमन मोठें असल्यामुळें मी समग्र वाचीत नाहीं. आणि आतां सांगितलें त्यापेक्षां त्यांत विशेष कांहीं नाहींही.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, अभंग. स्वात्मपत्र, नमन या पांच लहानमोठ्या ग्रंथांखेरीज मला ज्ञानेश्वरांचे दुसरे कोणतेही ग्रंथ अजून पहावयाला सांपडले नाहींत. तेव्हां त्यासंबंधानें विशेष कांहीं सांगत नाहीं. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथांसंबंधानें वाङ्मय दृष्टीनें जें काय मला वाटतें, तें हा ऐतिहासिक विचार झाल्यानंतर सर्व कवींच्या गुणांचें तारतम्य सांगतांना बोलेन. सध्यां पुनः एकदां एवढेंच सांगतों कीं, मराठी भाषेंतल्या सर्व ग्रंथांत या ज्ञानेश्वरी ग्रंथास अगदीं आद्य पदवी आजपर्यंत दिली आहे ती सर्वथा यथार्थ आहे.

ज्ञानेश्वराच्याच काळीं—कांहीं वर्षें अलीकडे पलीकडे आणखीही कांहीं दुसऱ्या मनीचे, परंतु भक्तिरसानें अगदीं ओथंबलेले असे ग्रंथकार व भगवद्भक्त होऊन गेले, त्यांनीं भक्तिरसपरिपूर्ण असे अभंग किंवा ओंवी या वृत्तांत लिहिलेले लहानमोठे ग्रंथ आहेत.

याच काळीं विसोबा खेचर, बंका, सावत्या माळी, चोखामेळा, वगैरे मंडळी होती. या सर्वांचे अभंग, पदें ओंव्या वगैरे सर्व खरोखर वाचण्यालायक आहेत. त्यांचे जर गाथे नित्यतील तर फार चांगलें होईल. याच काळाचा फार मोठा विशेष हा कीं, त्यांत तीन फार मोठाल्या

स्त्री कवयित्री

झाल्या. नामदेवाच्या घरच्या राजाई गोणाईनीं कांहीं अभंग केले आहेत इतकेंच नव्हे, तर त्यांचे घरीं जनी म्हणून एक दासी होती, तिनें फार सुरस, भक्तिसुधेनें तुडुंब भरलेले व वेदांतानें

रसरसलेले असे अभंग किती तरी लिहिले आहेत. ते नामदेवाच्या गाथ्यांत कांहीं आढळतात, परंतु जर खूप शोध केला तर आणखी किती तरी सांपडले पाहिजेत.

ज्ञानेश्वराची बहीण मुक्ताबाई हिचीही कांहीं कविता उपलब्ध आहे, तीवरून पाहतां तिच्या समग्र कविता एकत्र करणें खचित श्रेयस्कर होईल असेंच वाटतें. त्याच काळीं तिसरी कवयित्री झाली. ती अत्यंत हीन जातींतली होती. परंतु अंतःस्फूर्ति ज्यास होते त्याचें लिंग, वय किंवा जाति कांहीं जरी असलें, तरी। तें मनांत येत नाहीं. अंतःस्फूर्तीच्या बोलाचें कौतुक आपोआपच आपल्या तोंडून होतें. चोखामेळा व त्याची भक्तिमती पत्नी या दोघांनींही अभंग रचिले. त्यांत त्या 'चोखाच्या म्हारी'च्या अभंगवाणीचा एकच मासला आपल्याकडे देवतों.

देहासि विटाळ । म्हणती सकळ ।
आत्मा तो निर्मळ । शुद्धबुद्ध ॥ १ ॥
विटाळावांचून । उत्पत्तीचें स्थान ।
कोण देह निर्माण । नाहीं जगीं ॥ २ ॥
देहाचा विटाळ । देहींच निर्धारीं ।
म्हणतसे महारी । चोखयाची ॥ ३ ॥

जातीची महारीण असून अशा तऱ्हेचें सहजोद्बुद्ध ज्ञान जिच्या ठायीं जागृत झालें, व तसें ज्ञान न झाल्याकारणानें जे कर्मठ 'विटाळ होईल दूर हो' 'विटाळ होईल दूर हो' 'तुझी छायासुद्धां पडतां कामा नये.' असें तुसडून म्हणून तिला दूर सारीत असतील, त्यांची कींव येऊन किंवा त्यांच्याबद्दल मनाला विषाद वाटून वरील तऱ्हेचे उद्गार तिच्या तोंडून निघाले असले तर त्यांत नवल काय? हा अभंग वाचून मला असेंच वाटलें, कीं ज्या जातींत अशा तऱ्हेचें रत्न उत्पन्न झालें, त्या जातीला आमच्या वेडगळ समजुतीनें व दुराग्रहानें आम्हीं नेहमीं दडपून ठेवूं पहाणें हें अगदीं गैरशिस्त होय.

एकनाथ.

शके १२०० पासून तों १५०० पर्यंतचा हा काळ केवळ भक्तिपर, किंवा वेदांतपर ग्रंथ रचण्यांत गेला. या कालांत पुराणाचें भाषांतर किंवा त्यांतील कथांचें अनुसंधान धरून रचिलेलें काव्य झालेलें आढळत नाहीं. एक **नामदे**वाच्या नांवावर असलेलें महाभारत आहे. परंतु तें गाथाकार **नामदे**वाचेंच होय, असें अद्यापि ठरलें नाहीं. तेव्हां तें या काळांत धरूं नये असें वाटतें. १५४८ न **एकनाथ** अवतीर्ण झाले. हे **जनार्दन**स्वामींचे शिष्य. **जनार्दन**स्वामींचेही बरेच अभंग वगैरे आहेत. परंतु त्यांच्या या सच्छिष्यानें त्यांस मागें सारलें. **एकनाथ**महाराजांचा काळ सरासरीनें १५४८ ते १६०९ पर्यंत होता. यांनीं आपल्या आयुःक्रमांत दोन फारच मोठीं कार्यें केलीं. त्यांत अव्वल मतीचें कार्य म्हणजे **ज्ञानेश्व**रीचा जीर्णोद्धार व प्रचार केला हें होय. आणि त्यांनीं स्वतः रामायण व भागवत यांवर ग्रंथ लिहिले हें त्यांचें दुसरें कार्य होय. **ज्ञानेश्व**री ग्रंथ अत्यंत उत्तम असून त्याचा प्रचार जितका व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं हें पाहून त्यांस अत्यंत वाईट वाटलें. आणि त्यांनीं त्या ग्रंथाच्या पोथ्या जमवून पाहिल्या तों त्या अत्यंत अशुद्ध. तेव्हां त्या शुद्ध करून ज्ञानेश्वरीची एक शुद्ध प्रत तयार केली. हा त्यांनीं महाराष्ट्रावर केवढा थोरला तरी उपकार करून ठेवला. माझ्या मतीला तर असें वाटतें कीं, एवढें एकच काम **एकनाथां**नीं केलें असतें, आणखी दुसरें कांहींही केलें नसतें, तरी **एकनाथां**ची कीर्ति महाराष्ट्रांत अजरामर झाली असती. परंतु त्यांनीं तेवढेंच केलें नाहीं. त्यांनीं स्वतःही फार सुंदर अशी ग्रंथरचना केली आहे.

१ भागवत.
२ भावार्थरामायण.
३ आनंदलहरी.
४ हस्तामलक.
५ रुक्मिणीस्वयंवर.

६ स्वात्मसुख.
७ पदें व अभंग. (गाथा)

हे ग्रंथ त्यांनीं केले आहेत. संस्कृत पुराणें घेऊन त्यांतील कथांवरून मराठींत ग्रंथ लिहिण्याला सुरुवात नाथांनींच केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. महानुभाव ग्रंथकार कवीश्वर व हयग्रीव यांनीं मात्र भागवताच्या दशम व एकादशस्कंदावर नाथांच्या फार पूर्वी ग्रंथ लिहिलेले दिसतात. परंतु ज्ञानेश्वरापासून नाथांपर्यंत सर्व स्त्रीपुरुष ग्रंथकारांचा भर वेदांत व भक्ति यांवरच होता. त्याला नाथांनीं थोडेसें भिन्न वळण दिलें. त्यांनीं रामायण व भागवत या ग्रंथांच्या आधारानें मराठींत ग्रंथ लिहिले. अर्थात् मूळ वळण वेदांत व भक्तिपर ग्रंथांचेंच राहून हे ग्रंथ लिहिले गेले हें उघड आहे. परंतु नुसतीं प्रमेयें घेऊन त्यावर अनेकविध दृष्टांतांनीं खल करण्यापेक्षां हें निराळें स्वरूप होतें. त्याचप्रमाणें नानाप्रकारांनीं परमेश्वराच्या भक्तीचें महत्व मनुष्याच्या मनावर ठसविण्याचाही हा एक निराळा प्रकार होता. एकनाथी भागवत हणजे एक खरोखर अजब ग्रंथ आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. त्याचा अभ्यास वाङ्मय या दृष्टीनें करणें अत्यंत अवश्य आहे.

नाथांच्या समकालीनांत प्रमुख प्रमुख म्हटले हणजे पहिल्यानें दासोपंत. यांनीं एक गीतेवर टीका केलेली आहे. त्याचप्रमाणें मृत्युंजयस्वामी व शिवरामस्वामी हे होत. या दोन्ही कवींच्या स्फुट कवितांखेरीज मोठें कांहीं काव्य कोठें पहाण्यांत किंवा ऐकिवांत नाहीं.

मुक्तेश्वर.

जें काम एकनाथांनीं आरंभलें तें त्यांचा नातू (मुलीचा मुलगा) मुक्तेश्वर यानें पूर्णतेस नेण्याचा फार सुंदर यत्न केला. परंतु याची प्रवृत्ति निवळ विचारसौंदर्य, कल्पनाविशालत्व व भाषाप्रागल्भ्य या तीन गुणांकडेच होती. वेदांत किंवा भक्ति हीं त्याच्या ग्रंथांत तितक्या हणजे याच्या पूर्वीच्या ग्रंथकारांच्या ग्रंथांत जितक्या प्रमाणानें भरलेली होती तितक्या प्रमाणानें भर-

लेली नाहीं. परंतु ज्यास आपण साधारणतः कवित्व ह्मणतों, तें मात्र यांच्या महाभारतांत नुसतें तुडुंब भरलेलें आहे. यांच्या भारतांतील सृष्टिवर्णनें तर कित्येक वेळां ते ते देखावे आपल्या दृष्टीसमोर स्पष्टपणें आणून उभेच करितात. यांची कथाकथनशैली फार अप्रतिम. यांचें स्वभाववर्णन अत्यंत सुंदर. दुर्दैवाची गोष्ट हीच आहे कीं, यांचें समग्र महाभारत अद्यापि कोठें सांपडत नाहीं. फक्त चारच पर्वें सांपडलीं आहेत. आणि अमुक गृहस्थास समग्र महाभारत सांपडलें आहे, तमुक गृहस्थाजवळ तें आहे अशा गप्पा मात्र पुष्कळच ऐकूं येतात. जीं पर्वें सांपडलीं आहेत तेवढ्यांवरून असें वाटतें, कीं या ग्रंथकाराचा हा समग्र ग्रंथ सांपडल्यास आपणास कवित्वाचा एक खाणच सांपडणार आहे. मुक्तेश्वरांनीं ग्रंथ लिहिले ते.

१. महाभारत.

२. रामायण.

३. शतमुख रावणवध.

४. वत्सळाहरण.

५. हरिश्चंद्राख्यान.

यांपैकीं हरिश्चंद्राख्यान इतकें सुंदर आहे व करुणरसानें इतकें ओथंबलेलें आहे कीं तें वाचतांना कोणाही वाचकाच्या नेत्रांतून अश्रुपूर वाहिल्याखेरीज राहत नाहीं. मुक्तेश्वर १६०८ त जन्मले असें ह्मणतात. त्यांची कविता हृदयकमलाला केवळ सूर्यवत् होय यांत शंका नाहीं.

या मुक्तेश्वरांचा समकालीन असा 'देवीदास' नांवाचा एक कवि झाला. यां कवीचें व्यंकटेशस्तोत्र मात्र फार सुप्रसिद्ध आहे, परंतु यानें आणखीही कांहीं ग्रंथ लिहिले आहेत, असें ऐकितों. ते प्रसिद्ध होतील तर बरें होईल. व्यंकटेशस्तोत्र वाचलें नाहीं असा माणूस महाराष्ट्रांत विरळा. ज्याप्रमाणें शनिमाहात्म्य वगैरे पोथ्या नियमानें वाचण्याचा कित्येकांचा परिपाठ असतो, त्याचप्रमाणें व्यंकटेशस्तोत्राचा पाठ करण्याचीही वहिवाट फार आहे. हें स्तोत्र



लहानें परंतु मोठें भक्तिरसपूर्ण असल्यामुळें व त्याच्या पाठानें इष्टफलप्राप्ति होते अशी श्रद्धा लोकांत-विशेषतः स्त्रियांत-उत्पन्न झाल्या कारणानें या छोटेखानी स्तोत्राचें माहात्म्य इतर महत्वाच्या ग्रंथांपेक्षां किती तरी अधिकपट लोकांत वाढलेलें दिसतें !

मुक्तेश्वरानंतर महाराष्ट्रांत एक अद्वितीय जोडी झाली. तिनें महाराष्ट्राच्या धार्मिक विचारांवर व महाराष्ट्राच्या संसारावर जो विलक्षण परिणाम केला, त्याचें यथातथ्य वर्णन करून सांगणें आजच्यासारख्या तासाभराच्या व्याख्यानांत दहा पंधरा मिनिटें घेऊन होणें अशक्य; इतकेंच नव्हे, तर त्या जोडीपैकीं एकएकाच्या ग्रंथांवर अशीं पांच पांच व्याख्यानें दिलीं, तरीसुद्धां त्याच्यासंबंधानें सांगावयाचें तितकें सांगून होईल कीं नाहीं याची मला शंकाच वाटते. ही जोडी संतमणि तुकाराम आणि साधुवर्य रामदास यांची होय. या दोघांचेंही जन्मवर्ष जें मुक्तेश्वरांचें तेंच, म्हणजे १६०८ च होतें अशी समजूत आहे. हें साल जणूं काय महाराष्ट्रांत पुरुषरत्नांनीं उपजण्याचेंच होतें.

तुकाराम.

तुकाराममहाराज देहू मुक्कामीं १६०८ त जन्मले व १६४९ त निजधामास गेले. तुकाराम जातीचे वाणी परंतु त्यांची वाणी म्हणजे साक्षात् परब्रह्मापासून वेद स्फुटित झाले तेव्हांचीच ती वाणी असें लोकांस वाटूं लागलें होतें. त्यावेळच्या लोकांस असें वाटूं लागून हा अवतारी पुरुष असा तुकाराममहाराजांचा लौकिक झाला. असें झालें, याबद्दल केव्हांही कोणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. तुकाराममहाराजांचा गाथा घेऊन कोणत्याही पानावरील पांच दहा अभंग वाचले, कीं स्वयमुद्भूत कविता कशी असते हें वाचकांच्या प्रत्यक्ष अनुभवाला येणार आहे. एखादें अत्यंत पक्व झालेलें फल जसें आपोआप फुटून त्यांतील अमृतोपम माधुरी रसरूपानें आपोआप बाहेर पडूं लागते, तद्वत् या महापुरुषाच्या स्फूर्तियुक्त चित्तांत विचारामृताचा अतिरेक होऊन तें अमृतफल भंग पावून अभंगरूपानें आंतील अमृताचा लोट

बाहेर पडूं लागला. स्फूर्तिस्फुटित अशा अंतःकरणांतून अत्यंत श्रेष्ठ अशी विचारपंक्ति बाहेर पडली तर त्यांत नवल काय ! या वाण्याच्या अभंगरूप बोलांत श्रुतीचे बोल उमटूं लागले. जो अद्वैतवेदांत केवळ महापंडितांच्या मात्र स्वाधीन, तो लहानसान हीन दीन पोर सोर व्यक्तींच्या मनावर सुद्धां ठसूं लागण्यास यांची कविता कारण झाली. तेव्हां अर्थातच प्रथम प्रथम कर्मठांचें चित्त चावरलें व त्यांनीं तुकारामहाराजांचा द्वेष मांडला; परंतु ज्याला द्वेष म्हणजे काय पदार्थ होता याचें ज्ञान सुद्धां नाहीं; त्याचा द्वेष लोक किती वेळ करीत राहणार? त्याच्या त्या उपदेशसुधेच्या अलोट प्रवाहांत सगळा महाराष्ट्र बुडून जाऊन कित्येक कर्मठांनीं त्याचें अनुयायित्व पतकरिलें. तुकारामहाराजांचे ग्रंथ म्हणजे त्यांचे चार पांच हजार अभंग व थोडींशीं पदें इतकेच होत. परंतु या अभंगांत प्रवृत्ति व निवृत्तिमार्गाचें अगदीं सारसर्वस्व भरून राहिलें आहे.

रामदास.

तुकारामहाराज ज्या सालीं जन्मले त्याच सालीं महाराष्ट्रांत गोदावरीच्या उत्तर तीरावर जांब नांवाच्या गांवीं हा दुसरा पुरुष रामदास—जन्मला. रामदास हे बालब्रह्मचारी व अगदीं बाल्यापासून ईश्वरभक्तिपरायण होते. यांच्या ग्रंथांनीं महाराष्ट्रावर फारच मोठे उपकार करून ठेविले आहेत. त्यांत केवळ धर्मोपदेश नसून, संसारव्यवहारांत असणाऱ्या पुरुषांनींही कसें वागलें असतां इहपरलोकीं आपलें व आपल्या देशबांधवांचें हित सिद्ध होईल हें उत्तम प्रकारें बोधिलें आहे. इतर साधुसंत कवि, आणि रामदासस्वामी यांच्या ग्रंथांत जो मोठा फरक आहे, तो हाच होय, कीं इतर कवींनीं ज्याप्रमाणें व्यवहार सोडून केवळ ईश्वरभक्तिपरायण व्हावें असें लोकांस मोठ्या कंठरवानें सांगितलें आहे त्याप्रमाणें रामदासांनीं आपल्या ग्रंथाच्याद्वारें सांगितलें नाहीं. तर संसारव्यवहारांत राहून तो सर्व व्यवहार उत्तम प्रकारें चालवून त्यांतच परमार्थ साधावा व परमेश्वरभक्ति करावी असा बोध

त्यांनीं केला आहे. रामदासस्वामींचा दासबोध म्हणजे केवळ परमार्थाचाच ग्रंथ नव्हे, तर व्यवहारबोधाचाही अत्यंत श्रेष्ठ, सुपूर्व अक्षय्य असा सांठा आहे. समर्थांनीं लहानमोठे असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. परंतु त्या सर्वांत दासबोध हाच ग्रंथ फार विस्तृत आणि अत्यंत महत्वाचा आहे. मोठें थोरलें ज्ञानभांडारच तें होय. त्याचप्रमाणें त्यांचे मनाचे श्लोक व अभंग हेही फार चांगले आहेत. दासबोधापेक्षांही समर्थांचे मनाचे श्लोक सर्वतोमुखीं झालेले आहेत. ऐतिहासिक परंपरेनें मुख्यमुख्य कवींची व ग्रंथकारांची थोडीथोडी माहिती देऊन झाली, म्हणजे या व्याख्यानाच्या उत्तरार्धांत तुकाराम व रामदास यांची परस्पर तुलना करून प्रत्येकाचा विशेष काय आहे हें मी सांगणार आहें. तेव्हां सध्यां आतां समर्थांच्या ग्रंथांपैकीं मुख्यमुख्य ग्रंथांचीं नुसतीं नांवें देऊन तुकाराम व समर्थ यांच्या समकालीन ग्रंथकारांच्या व भगवद्भक्तांच्या नांवांचा उल्लेख करून पुढें वामनपंडिताकडे वळूं. रामदासांच्या ग्रंथांत

१ दासबोध.
२ पंचसमासी.
३ जुनाटपुरुष.
४ पूर्वारंभ.
५ मनाचे श्लोक.
६ मानसपूजा.
७ निर्गुणध्यान व सगुणध्यान.

हे ग्रंथ विशेष महत्वाचे आहेत. मराठी वाङ्मयाचा अभ्यास करूं इच्छिणारानें यांतून १, ३, ५ व ७ एवढीं प्रकरणें तरी अवश्य वाचावीं.

तुकारामम्हाराज व समर्थ यांचे समकालीन कवींत रामेश्वरभट्ट, सेना न्हावी, नारायणबोवा, कान्होबा, शेख अहमद, शेखसुलतान, उद्धवचिद्घन व रंगनाथ स्वामी, इतके विशेष नांव घेण्यासारखे ग्रंथकार झाले. त्यांतही सेना न्हावी, उद्धवचिद्घन व रंगनाथस्वामी हे फार महत्वाचे आहेत. सेना न्हाव्याचे अभंग

कोटें कोटें आहळतात. उद्धवचिद्घनांनीं साधुचरित्रपर ग्रंथ लिहिले आहेत. त्यांस महाराष्ट्रांतील आद्य चरित्रकार म्हटलें तरी हरकत नाहीं. यांचे आधीं मराठी भाषेंत कोणी साधूंचीं किंवा दुसऱ्या कोणाचीं चरित्रें लिहिलेलीं अद्यापि ऐकिवांत सुद्धां नाहींत. रंगनाथस्वामींचेही ग्रंथ मोठे बोधपर व भक्तिरसपूर्ण आहेत. हे सर्वच पुरुष महाभगवद्भक्तांपैकीं होत.

आतांपर्यंत महाराष्ट्र मंडळांतले जे कवि सांगितले, हे सर्व केवळ वेदांत, ब्रह्मज्ञान व भक्तिमाहात्म्य यांचें वर्णन करून जगाचा उद्धार करूं इच्छिणारेच झाले. केवळ कथामृताचें पान साधारण लोकांस व्हावें, एवढीच इच्छा धरून व तद्द्वारें उपदेश करणारा एकटा काय ते मुक्तेश्वरच होत. त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंत जे कविसाधु झाले, त्यांत विद्वत्तेच्या जोरावर आपलें ग्रंथमंदिर बांधून आपली कीर्ति अजरामर करून सोडणारा असा कोणी झाला नाहीं. मुकुंदराज, ज्ञानेश्वर व एकनाथ या तिघांसच संस्कृत भाषेचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे, बाकीच्यांना त्या गीर्वाण वाणीचें तितकें ज्ञान नव्हतें यांत शंका नाहीं. त्यांची कवित्वस्फूर्ति अगदीं सहज असल्यामुळें त्यांस त्या संस्कृत भाषाज्ञानाची कांहींच उणीव कधीं भासली नाहीं. तुकारामम-हाराजांना संस्कृत येत असेल असें वाटत नाहीं. परंतु त्यांच्या नांवानें मोडणारे असे भगवद्गीतेवर अभंग आहेत, ते जर खरोखर त्यांचेच असले तर त्यांसही थोडें संस्कृताचें ज्ञान असण्याचा संभव आहे. परंतु वामन पंडित हा मूळचा महापंडित. श्रुतिस्मृति, पुराणेतिहास, तर्कालंकार, व द्वैताद्वैत वेदांत त्याचप्रमाणें व्याकरणशास्त्र, आणि न्यायादिशास्त्रें त्यांस पूर्णपणें अवगत असलीं पाहिजेत असें दिसतें. या कवीनें एकंदर पंचवीस तीस ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतील मुख्य ग्रंथांचीं यादी आपणास वाचून दाखवितों.

१. यथार्थदीपिका.

२. राजयोग.

३. श्रुतिकल्पलता.
४. ब्रह्मस्तुति.
५. अपरोक्षानुभूति.
६. निगमसार.
७. अनुभूतिलेश.
८. गीतार्णवसुधा.

हे आठ ग्रंथ केवळ वेदांतपर आहेत व फार गहन आहेत. कित्येक तर संस्कृतच आहेत. आणि या ग्रंथांवरून वामन पंडित किती विद्वान् होते हें अगदीं स्पष्टपणें समजून येतें. परंतु पंडितांची लोकांत जी कीर्ति आहे, ती त्यांच्या या वेदांतपर ग्रंथांमुळें नव्हे तर

१. राधाभुजंग.
२. भामाविलास.
३. रासक्रीडा.
४. कात्यायनीव्रत.

इत्यादि शृंगारपूर्ण काव्यांमुळें व

१. भीष्मप्रतिज्ञा.
२. सीतास्वयंवर.
३. कालियामर्दन.

इत्यादि कथानकांवरील काव्यांमुळें झालेली आहे. यांचा यथार्थदीपिका, ज्ञानेश्वरमहाराजांच्या भावार्थदीपिकेच्या तोडीची गीतेवर टीका करावी, किंबहुना तिला आपल्या टीकेनें मागें सारावें या बुद्धीनें वामनपंडितांनीं ही लिहिली असावी असें वाटण्यास जागा आहे. पंडितांच्या पूर्वी भगवद्गीतेवर काय त्या दोनच टीका. १ ज्ञानेश्वरमहाराजांची भावार्थदीपिका आणि २ पैठणकर रंगनाथांची चित्सदानंदलहरी; पैकीं दुसरी कोणाच्या विशेष पाहण्यांत किंवा भाषणांतसुद्धां येत नाहीं. मीही अद्यापि पाहिली नाहीं. परंतु ज्ञानेश्वरीची कीर्ति फार. तिचा अभिमान बाळगणारेही फार. तेव्हां आपली यथार्थदीपिका झाल्यानंतर ज्ञानेश्वरी मागें पडेल

अशा पंडितांच्या समजुतीला धक्का बसेल अशाच तऱ्हेचें त्या यथार्थदीपिकेला लोकांनीं स्वागत दिलें असावें असें दिसतें. कारण, पंडितांनीं आपल्या यथार्थदीपिकेंत पुढील उद्गार काढले आहेत:—

ज्यांस इतर टीकाकारांचे अभिमान।
ते न देतील या टीकेस मान॥

ज्ञानेश्वरांच्या टीकेचा अभिमान बाळगणारांनाच अनुलक्षून पंडितांनीं अशा तऱ्हेचे उद्गार काढले आहेत यांत शंका नाहीं. परंतु या व्याख्यानाच्या शेवटच्या भागांत कित्येक कवींच्या तारतम्य भावाबद्दल मी बोलणार आहें, तेव्हां मी ज्ञानेश्वर व वामन यांची—गीतेचे टीकाकार या नात्यानें तुलना करीन.

याच सुमारास जयरामस्वामि झाले. यांचा समाधिकाल १६७२ आहे. यांनीं

सीतास्वयंवर,
रुक्मिणीस्वयंवर,

अशीं दोन काव्यें लिहिलीं आहेत.

रघुनाथ पंडितांचा राजव्यवहार कोश.

या सुमारास झालेल्या एका लहानशा, परंतु अत्यंत महत्वाच्या पुस्तकासंबंधानें चार शब्द बोलल्याखेरीज हें व्याख्यान खरोखर ओंकं दिसेल. हें पुस्तक म्हणजे राजव्यवहार कोश होय. हा कोश फार लहान आहे. अमरकोशाच्या एखाद्या मोठ्याशा वर्गाएवढा सुद्धां असेल नसेल. परंतु तो झाला त्या काळच्या लोकांच्या अंतःकरणस्थितीची साक्ष त्या कोशापासून फारच उत्कृष्ट तऱ्हेनें पटते. शिवाजीमहाराजांनीं स्वराज्य स्थापन केलें, तें केवळ देशापुरतेंच असावें अशी त्यांची मनीषा नव्हती. तर आपल्या भाषेच्याही बाबतींत स्वराज्य स्थापन करावें अशी महत्वाकांक्षा त्यांच्या चित्तांत जागृत होती. राज्यकारभारासंबंधानें प्रचारात्मकव्यवहारांत असणारे बहुतेक पारिभाषिक शब्द व अधिकाऱ्यांच्या पदव्याही फारसी भाषेंत होत्या. किल्ले, परगणे, वगैरे सर्व संबंधांतले व्यावहारिक शब्द फारशी [illegible] व्यवहारांत फारसी शब्दांची योजना

बहुत, हा प्रकार महाराजांस मुळीं खपेना. ज्याप्रमाणें देशावर त्याचप्रमाणें भाषेवरही आपलें स्वराज्य स्थापन करून सर्व फारसी शब्दांस हांकून देऊन त्यांच्या ऐवजीं संस्कृत शब्दांची योजना करण्याची अत्यंत प्रशंसनीय बुद्धि त्यांस सुचली. आणि ती बुद्धि होतांक्षणींच, त्यांनीं आपल्या पदरच्या एका सुप्रसिद्ध पंडितास हा राजव्यवहार कोश तयार करण्यास सांगितलें. राजद्वारीं किंवा राजकीय संबंधांत जे कांहीं फारसी शब्द रूढ झालेले असतील, ते सर्व काढून टाकून त्यांच्याऐवजीं संस्कृत शब्द घालावयाचे आणि कोश तयार करावयाचा व तो तयार झाला ह्मणजे स्वराज्यांत जिकडे तिकडे–राजद्वारीं व पत्रव्यवहारांत आणि भाषणादिकांतही–त्या कोशांत सांगितलेले सर्व संस्कृत शब्द योजिले जावे, अशी महाराजांची आज्ञाही झाली. परंतु ती सर्वथा सिद्ध झाली नाहीं, आणि महाराजही पुढें थोड्याच अवधींत वैकुंठवासी झाले, हें महाराष्ट्राचें मोठें दुर्दैव. या कोशाची उत्पत्तिही अशी मोठ्या ऐतिहासिक महत्वाची आहे. तेव्हां महाराष्ट्र वाङ्मयाच्या मंदिरांत त्याला कोठें तरी प्रमुख असें स्थान दिल्यास वावगें नाहीं.

श्रीधर.

यानंतर नांव घेण्याजोगा कवि म्हणजे शिवलीलामृताचा कर्ता श्रीधर होय. याचा काळ १६७८ ते १७२८. जें मुक्तेश्वरांनीं आरंभिलें, तेंच यांनीं पुढें चालविलें, परंतु मुक्तेश्वरांचें कवित्व यांच्या ग्रंथांत नाहीं. तथापि यांचे ग्रंथ मराठी वाङ्मय या दृष्टीनें चांगले महत्वाचे व मूल्यवान् आहेत, याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. यांचे ग्रंथ मुख्यत:

१ शिवलीलामृत.
२ हरिविजय.
३ रामविजय.
४ पांडवप्रताप.
५ बलोत्तरखंड.
६ जैमिनी अश्वमेध.

यांत पहिले चार फार प्रसिद्ध आहेत आणि त्यासंबंधी पहिले

ग्रंथ तर अगदीं फारच लोकप्रिय आहे. त्यांतील शिवरात्रि कथा व सीमंतिनीची कथा या दोन कथा तरी प्रत्येकानें वाचाव्या. श्रीधराची भाषा सोपी, सरळ व शुद्ध असते. त्यांत विलक्षण सृष्टिवर्णन किंवा दृष्टांत, उपमा, रूपक वगैरे अलंकारांची रेलचेल, किंवा कल्पनाशक्तीच्या विलक्षण भराऱ्या हें कांहीं विशेष सांपडावयाचें नाहीं; परंतु त्याचीं वर्णनें सुंदर आणि डोळ्यांपुढें चित्रें उभीं करणारीं आहेत यांत शंका नाहीं. शिवरात्रि कथेच्या अध्यायांत तो व्याध बिल्ववृक्षावर चढून बसल्यापासून तों मृग, मृगी पुनः त्याच्यापुढें येईपर्यंत सर्व प्रकार इतका चित्तवेधक केला आहे कीं लहान पोरांपासून थोरांपर्यंत सर्वांस मोठें कौतुक वाटल्यावेरीज राहणारच नाहीं श्रीधराचे हरिविजय, रामविजय व पांडवप्रताप हे तीन ग्रंथहीं लौकिकांत चांगले प्रसिद्ध आहेत, आणि त्यांतहीं कित्येक प्रसंग फार सुंदर आहेत, ते मुलांकडून अवश्य वाचवावे. श्रीधराच्या सर्व ग्रंथांतून सुंदर उतारे घेऊन जर कोणीं पुस्तक केलें, तर तें वाचनीय होईल.

रघुनाथ पंडित.

रघुनाथ पंडित हा कवि याच सुमारास झाला. याचें काय तें एकच काव्य उपलब्ध व सुप्रसिद्ध आहे. तें नलदमयंती आख्यान होय. याची कथाकथनशैली फार सुंदर व संस्कृतांतील काव्यांच्या धर्तीवर आहे. रघुनाथ पंडिताच्यापूर्वीचे नामांकित कवि महाभारतादिकांना धरून धरून आपल्या प्रतिभेला उड्डान करण्यास लावीत, परंतु या कवीनें संस्कृत काव्यांप्रमाणें कथेचा मात्र आधार धरून आपली कल्पना बरीच उपयोजून काव्यरचना करण्याचा प्रयत्न केला व तो फार उत्तम वठला यांत शंका नाहीं. नलदमयंती आख्यान लहानसेंच परंतु फार प्रशंसनीय व हृदयंगम आहे. कवीनें श्रीहर्षाचें नैषध पठित केलें होतें अशाबद्दल या काव्यांत जरी साक्ष सांपडली तरी त्याचें स्वत्वहीं त्यांत अनेकविध प्रसंगीं दृग्गोचर होतें. या काव्याची भाषा सुंदर, भारदस्त व

प्रकार आहे. वृत्तें अनेकविध योजिलीं आहेत. आणि एकंदरींत विविध रसांचा परिपोष करून मराठी भाषेंतही संस्कृताच्या तोडीचीं काव्यें लिहितां येतील, हें या कवीनें महाराष्ट्रजनांच्या फार चांगलें निदर्शनास आणिलें.

महिपति.

रघुनाथ पंडितापर्यंतच्या कवींनीं वेदांतपर किंवा महाभारतांतील कथांच्या आधारानें भगवंतावर किंवा प्राक्कालीन भगवद्भक्तांच्या कथांवर किंवा वीरांच्या कथांवर काव्यें लिहिलीं, परंतु १७१५ च्या सुमारास एक कवि जन्मला त्यानें आपल्या काव्यकर्तृत्वाला एक नवाच प्रदेश शोधून काढला. अर्वाचीन काळीं जे थोर थोर भगवद्भक्त झाले, त्यांच्या नामसंकीर्तनाचा व चरित्रलेखनाचा महिमा पांडवांसारख्या प्राचीन भगवद्भक्तांच्या चरित्रलेखनाच्या महिम्यापेक्षां मुळींच कमी नाहीं. त्यांचीं चरित्रें तितकींच पुण्यप्रद, बोधप्रद व रमणिय आहेत असें महिपतिबावांनीं जगास दाखवून दिलें. यांचे ग्रंथ

१ संतविजय.
२ संतलीलामृत.
३ भक्तविजय.
४ भक्तिलीलामृत.
५ तुकारामचरित्र.
६ कथासारामृत.

हे-निदान यांतले पहिले पांच फार सुप्रसिद्ध आहेत. महिपतिबावांच्या ग्रंथांचा अभ्यास, ते मराठींतले कालानुराधानें दुसरे, परंतु योग्यतेनें व शोधकपणानें पहिले संतचरित्रकार या दृष्टीनेंही, केल्यास त्यापासून फार हित आहे. महिपतिबावांच्यापूर्वी फक्त उद्धवचिद्घनांनींच अशा प्रकारचा प्रयत्न केलेला होता. महिपतिबावांचीं चरित्रें फार प्रेमळ, भक्तिरसपूर्ण व सुंदर आहेत. यांचे तुकारामाचे चरित्रासारखीं पुस्तकें शाळांतील मुलांस कां शिकविलीं जाऊं नयेत हें समजत नाहीं. यांची भाषाही शुद्ध

असते. नीट संशोधन करून जर हीं पुस्तकें छापविलीं, तर इंग्रजींत पोपचें ईलिअड किंवा चॉसरच्या गोष्टी वाचल्या जातात, त्याप्रमाणें मराठींत यांचें वाचन वाङ्मय दृष्टीनें उपयुक्त होऊन शिवाय नीत्युपदेशदृष्टीनेंही हितावह होणार आहेत, यांत संशय नाहीं.

मोरोपंत.

महिपतीच्यानंतर ज्या कविवराच्या ग्रंथांचा उल्लेख करावयाचा तो कवि **मो**रोपंत होय. **मो**रोपंताचा ग्रंथ अपरिमित आहे म्हटलें तरी चालेल. त्याच्या अखंड लेखनींतून ग्रंथाचा जणूं काय अखंड प्रवाह एकसारखा वाहतच होता. तो अजस्र प्रवाह पाहिल्याबरोबरच प्रेक्षकाची दृष्टि अगदीं चकित होऊन जाते. ज्याप्रमाणें पर्वताच्या पायथ्याजवळच्या सपाट व विस्तृत प्रदेशावर उभें राहिलें असतां त्या पर्वतावरून वाहत येणाऱ्या महानदीच्या धोताकडे व तो धोत खालीं येऊन पडल्यावर त्या सर्व प्रदेशावर पसरल्यानंतर, त्या जलमय विस्ताराकडे पाहिलें असतां प्रेक्षकाच्या मनाची स्थिति होते तशीच स्थिति वारामतीकर **मो**रोपंताचे कवितायग्रंथ पाहून वाचकांच्या मनाची होते. महानदीच्या जलप्रवाहाप्रमाणेंच **मो**रोपंताच्या ग्रंथाचा प्रवाह होय यांत शंका नाहीं. त्यांनीं संबंध महाभारत आर्यांबद्ध केलें. नानाप्रकारांनीं—शेंकडों प्रकारांनीं—रामायण गाइलें, अनेक स्तोत्रें रचिलीं, साधुसंतांच्या गुणांचें कथन केलें, परमेश्वरस्तुतिपर काव्यें लिहिलीं, भगवद्भक्तांच्या महिम्याचीं वर्णनें केलीं, अनेक देवतांचें नामसंकीर्तन केलें, विष्णुसहस्र, दुर्वासहस्र वगैरे आर्यासहस्रकेंही बांधिलीं; सन्माणिमाला ग्रथिल्या—सारांश जो विषय म्हणून पद्यबद्ध करणें त्यांस शक्य वाटलें, तो विषय मोठ्या चातुर्यानें व सहजतेनें त्यांनीं पद्यबद्ध केला. या त्यांच्या ग्रंथांत किती चित्रकाव्यें, किती अलंकार, किती शब्दचमत्कृति हीं आलीं आहेत, याची मोजदाद करणें म्हणजे एखाद्या महानदींत किती वालुकाकण आहेत हें मोजूं जाण्यासारखेंच होणार आहे. पंतांची मराठी भाषा फार प्रौढ, निर्मल, प्रायः सरल व अनेकविध अलंकारांनीं केवळ नटलेली

अशी आहे. या अलंकारांच्यामुळें तिचें स्वरूप विशेष खुलून दिसतें यांत शंका नाहीं. तिची मनोहरता—अव्याज मनोहरता नाहीं एवढें मात्र म्हटल्याखेरीज राहवत नाहीं. पंतांची रचना शक्ति फार दांडगी हें सांगावयासच नको. संस्कृत भाषेचें ज्ञान फार चांगलें असल्यामुळें शब्दचमत्कृति करण्यास शब्दांचा भरणा फार मोठा. पंत मूळचे केवळ कारकून, परंतु एकवार यजमानांच्या हितपर परंतु मर्मच्छेदक भाषणामुळें उपरति होऊन काव्यरचनेकडे लागलेली प्रतिभा सगळ्या शब्दसृष्टींत स्वेच्छ संचार करूं लागून तिनें असंख्य व विविध चमत्कार उपजाविले. पंत कवि होते कीं नुसते पद्यग्रंथ लिहिणारे होते हा एक वाद फार वर्षांपूर्वी उत्पन्न होऊन त्याचें कै. गुरु. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं अगदीं यथास्थितपणें खंडन केलें असें पुष्कळांचें मत आहे. पंतांच्या इतक्या जगद्विस्तृत ग्रंथसंग्रहांत काव्यत्व मुळींच नाहीं असें प्रतिपादन करण्याचें धाष्टर्य कधींच कोणी करणार नाहीं. त्यांच्या ग्रंथाच्या विस्ताराच्या मानानें त्यांच्या ग्रंथांतून काव्यपरिपोष झाला आहे कीं काय हें पाहूं गेलें असतां काय निदर्शनास येतें याचा विचार केला म्हणजे मात्र त्या वादाला अगदीं निराधारच म्हणतां येईल कीं नाहीं याची शंका आहे. मला स्वतःला काय वाटतें यावद्दल आतां थोड्याच वेळानें सर्व वाङ्मयाचें सिंहावलोकन करून मुख्य मुख्य कवींच्या गुणांचा तारतम्यभाव पाहतांना सांगेन. पंतांच्या काव्यांची यादी देणें दुरापास्त आहे. तेव्हां त्या खटपटींत मी आतां पडत नाहीं.

रामजोशीतात्या व अनंत फंदी.

पंतानंतर नामांकित असे कवि रामजोशीतात्या व अनंतफंदी हे दोघे झाले. हे दोघेही प्रथमतः मेठे रंगेल व फंदी होते. तमाशे वगैरेंत चूर असत आणि यांच्या कृतींत शृंगारिक लावण्या बऱ्याच आहेत. परंतु पुढें यांस विरक्ती होऊन यांनीं लावणी, फटके वगैरे रंगेल वृत्तांतच वैराग्य, नीति यांचा रसपरिपोष करून आपली काव्यकर्तृत्वशक्ति त्या मार्गास लाविली. तात्या तर पुढें

कीर्तन करावयास लागले, आणि अशी आख्यायिका आहे कीं मोरोपंतांची आर्या कीर्तनांत म्हणून दाखवून तिला जगांत प्रसिद्ध करण्याचें श्रेय प्रथमतः यांनींच घेतलें. यावरून पंतांनीं आपली सर्वच आर्या तात्यांस अर्पण केली. अशाबद्दल एक आर्या ऐकिवांत आहे. ती अशी,

जैशी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला ।
तैशी मयुरें दिधली स्वार्या ती रामजोसितात्याला ॥

हीं आख्यायिका खरी असल्यास रामजोशीतात्यांच्या कवित्वाबद्दल पंतांचे मनांत किती प्रेम व आदर असेल हें सहज दिसून येणार आहे. अनंतफंदीची कविताही फार प्रासादिक आहे. शृंगार काय, वैराग्य काय, भक्ति काय जो रसपरिपोष करावयाचा असें या कविद्वयानें मनांत आणावें, तो त्यांस पूर्णपणें साधे.

येथपर्यंत इसवी सनाच्या बाराव्या शतकास प्रारंभ करून तें तहत इ. स. १८१९ पर्यंत म्हणजे पेशवाईचा अस्त होईपर्यंत जे मुख्य मुख्य कवि होऊन गेले, त्यांची कालक्रमानें नांवनिशी देऊन थोडक्यांत त्यांच्या मुख्य मुख्य ग्रंथांविषयीं मला काय सांगावयाचें होतें, तें सांगितलें. फक्त याच काळांत व विशेषतः सतराव्या व अठराव्या शतकांत झालेल्या शाहिरांच्या व गोंधळ्यांच्या पोंवाड्याविषयीं कांहीं सांगण्यांत आलें नाहीं. त्यांच्याविषयीं सामग्र्येकरून मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं होनाजी बाळ वगैरे सारख्यांचे पोंवाडे आहेत ते कमी दर्ज्याचे आहेत असें समजूं नये. या कवींच्या पोंवाड्यांची भाषा कितीही अशुद्ध अशी आपणास वाटली, तरी तींत एक प्रकारचा जो जोम आहे, तो मोठा विलक्षण आहे. सिंहगडावरच्या किंवा अफजुलखानावरच्या पोंवाड्यासारखा जोमदार पोंवाडा तसाच जोमानें म्हणणारा मिळाल्यास ऐकणाऱ्याच्या अंगांत वीरश्री उपजवून त्याचें सर्वांग रोमांचित करील याबद्दल तिळमात्र शंका नाहीं. कित्येक पोंवाडे रचणाऱ्यांना केवळ अंतःस्फूर्ति होऊनच त्यांचे मुखांतून शब्दप्रवाह बाहेर पडलेले आहेत. शाळिग्रामांनीं छापलेले पोंवाडे एकवार सर्वांनीं वाचावे अशी माझी प्रार्थना आहे.

ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करूं इच्छिणाऱ्यांना उपयोगीं पडेल अशा तऱ्हेनें मराठी वाङ्मयाचा विचार झाला. आतां अन्य दृष्टीनें ज्यांस थोडक्यांत या विषयाचें ज्ञान करून घेणें असेल त्यांचेसाठीं वाङ्मयाचें अवलोकन करून शेवटीं ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, वामन व मोरोपंत या कविवरांच्या ग्रंथांत प्रत्येकीं विशेष काय आहे, तें कथन करून हा वाग्यज्ञ समाप्त करूं.

मराठी वाङ्मयाची परंपरा इतिहासदृष्टीनें—कालानुक्रमानें—आतांपर्यंत पाहिली. ज्यास या आमच्या अगदीं साध्या परंतु अतिमनोहर व आपल्या सर्व विकारां—विचारांच्या छाया उपछाया अभिव्यक्त करण्याला सर्वथा क्षम, अशा मातृभाषेच्या उत्क्रमणाचा अभ्यास करावयाचा असेल त्यानें या दृष्टीनें अभ्यास केल्यास त्यास साधारणतः उपयोगीं पडेल असा मार्ग काढून दिला; परंतु सर्वांनाच अशा तऱ्हेनें अभ्यास करण्याची सवड असते असें नाहीं. पुष्कळांना 'सगऱ्यांतलें थोडें थोडें' मिळावें अशी इच्छा असते. त्यांचेसाठीं आपण आतां अन्य दृष्टीनें विचार करूं.

मीं पूर्वी सांगितलेंच आहे कीं, आमची कविता कथा उपकथांचें कथन करण्याच्या इच्छेपासून उपस्थित झाली नाहीं. मनुष्याच्या जिवास या संसारसमुद्रांत फार गोते बसतात व नेहमीं त्या समुद्राच्या तळीं आपण जाऊं असें भय वाटतें. त्याच्या पार तरून जाण्याचें सामर्थ्य आपले अंगीं नाहीं, असें ज्यास त्यास वाटतें; तेव्हां त्यांतून तारून नेण्यास एकच समर्थ जें परब्रह्म, जें

एक सत् विप्रा बहुधा वदन्ति ।

अशा प्रकारें श्रुतींनीं वर्णिलें, त्याचें ज्ञान करून घ्यावें किंवा त्याची भक्ति करावी आणि त्या भक्तीनें त्यास आकळून हा भवसागर तरून जावा, ही ज्याच्या त्याच्या मनांत उद्भवणारी परमार्थाची इच्छा आमच्या मराठी वाङ्मयाचें मूळ. मुकुंदराजांना किंवा ज्ञानेश्वरमहाराजांना कोणी कोणी आमच्या भाषेचे Chaucer

म्हणतात. इंग्रजी भाषेंतील आद्य कवि जसा चॉसर तसेच आमच्या भाषेंतील आद्य कवि मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर असें विधान करण्यांत केवळ 'आद्य' या शब्दाचा अर्थच घ्यावयाचा असल्यास ठीक आहे. त्या त्या कवींच्या काव्यांतर्गत विचारांचें साम्य मुळींच नाहीं; इतकेंच नव्हे तर विषय परस्परांहून इतके भिन्न आहेत कीं, दोन ध्रुवसुद्धां एकमेकांहून इतके भिन्न नसतील! आमच्या कविद्वयाचीं काव्यें मनुष्याला संसारांत वैराग्य उत्पन्न करून ब्रह्मज्ञान देण्याकरितां उत्पन्न झालीं. चॉसरादिकांचीं काव्यें त्या संसारांत रममाण होण्यास प्रवृत्त करणारीं काव्यें होत. तेव्हां तसें साम्य पाहण्याच्या हेतूनें दोघांची तुलना करण्याचें कोणी मनांतच आणूं नये. आमच्या काव्यांचे साधारणतः स्थूल विभाग पाडले, तर १ वेदांतपर अथवा ब्रह्मपर, २ भक्तिपर अथवा सगुणोपासनापर, ३ महत्कथावर्णनपर व ४ विविधविषयपर.

वेदांतपर.

ज्ञानेश्वरमहाराज, मुकुंदराज, एकनाथ, वामनपंडित व बरीच पदें करणारी कविमंडळी यांचे बहुतेक ग्रंथ, वेदांतपर अर्थात् या संसारसागरांत गटंगळ्या खाणाऱ्या मानवांस ब्रह्मज्ञान करून देऊन तरणोपाय दाखविण्याकरितां केलेले होत. वामन पंडितांनीं कांहीं कृष्णचरित्रपर व इतर विषयांवर कविता केल्या आहेत. त्यांच्या कित्येक कवितांत उत्तान शृंगारही आहे. परंतु सामग्र्येंकरून त्यांच्या ग्रंथांचें पर्यालोचन केल्यास त्यांत वेदांतपर व भक्तिपर कविता बरीच आहे असें दिसून येईल. राधाभुजंगासारख्या शृंगारप्रचुर काव्यांत सुद्धां वेदांताच्या छटा टाकून दिल्या असून असें काव्य लिहिण्यांतला आपला हेतु उदात्तच आहे असें म्हटलें आहे. यथार्थदीपिका, अपरोक्षानुभूति वगैरे काव्यें तर केवळ वेदांतपरच आहेत.

भक्तिपर.

नामदेव, तुकाराम, रामदास, महिपती, व बहुतेक संत कवि हे भक्तिपर काव्यें रचणारे. परमेश्वर आपल्या भक्तीनें आकळावा या

हेतूनें यांनीं काव्यें लिहिलीं. एखादें संकटांत सांपडलेलें बालक आपल्या संरक्षणाकरितां आपल्या मातेला मोठ्यानें बाहूं लागतें, त्याप्रमाणेंच हे कवि आपल्या रसाळ व करुणार्द्र वाणीनें जगाच्या परमेश्वराला हांका मारितात व त्याचे गुण वर्णितात. तुकाराम व रामदास यांनीं मानवजातीच्या अनेकविध व्यंगांवरही कविता लिहून बोध केला आहे. व्यावहारिक विषयावर तुकाराम-महाराजांचे किर्ता तरी अभंग आहेत. समर्थांनीं आपला दासबोध तर मुख्यतः त्याच प्रकारच्या बोधासाठीं लिहिला. तथापि या कवींचा व पुष्कळ स्फुट पदें करणाऱ्या कवींचाही मुख्य कल भक्तीकडेच होय. महिपतीबोआंनीं तर सर्व भक्तमंडळींच्या लीला वर्णन करण्याकरितांच काव्यें लिहिलीं; तेव्हां अर्थातच साहजिकपणें त्यांच्या त्या काव्यांतून भक्तिरसाचा मुख्यतः आविर्भाव झाला. तथापि त्यांच्या काव्यांस

महत्कथापर

या सदराखालींही घालतां येईल. मुक्तेश्वर, मोरोपंत व रघुनाथपंडित हे मुख्यतः आणि अंशतः एकनाथ व वामन हे या सदराखालीं येतात. वस्तुतः पाहतां आमच्या सर्वच कवींच्या बहुतेक ग्रंथांत—जोशीबोआ फंदी वगैरेंच्या शृंगारिक लावण्यांतही—मधून मधून वेदांतज्ञान व भक्तिरस यांचा परिपोष असतो. परंतु महाभारतादि ग्रंथांतील आख्यानें घेऊन या कवींनीं काव्यें लिहिलीं म्हणून यांस 'महत्कथापर' या सदराखालीं घातलें आहे. इंग्रजी राज्याची प्रतिष्ठा महाराष्ट्रांत होण्यापूर्वी केवळ व्यावहारिक विषयावर काव्य लिहिणारे कवि पांच चार सुद्धां होऊन गेले नाहींत. ज्यांत भगवंताचें किंवा त्याच्या परम भक्तांचें नांव नाहीं, असें काव्य अठराशें अठरा इसवीच्यापूर्वी झालेंच नाहीं. काय पांच पन्नास किंवहुना फार तर शें पांचशें लावण्या पोवाडे असतील तेवढेच. तेव्हां ४ था वर्ग जो

विविध विषयपर

काव्यांचा, त्यांत फार थोडे कवि येतात. अशी एकंदर आमच्या

कवितेची वर्गवारीची कथा आहे. आमचीं सर्व 'लिरिक्स' वेदांत, भक्ति, किंवा व्यावहारिक नीति यांवर आहेत. कवीची दृष्टि जिकडे जाईल त्यावर अर्थपूर्ण असें काव्य तो करीलच करील. लिरिक या शब्दांत जो अर्थ भरला आहे, त्या अर्थानें 'लिरिक' म्हणण्याजोगी कविता आमच्यांत पुष्कळ आहे. परंतु त्यांतील विषय बहुतेक वर सांगितलेल्या विषयत्रयापैकींच आहे. 'लिरिक' या इंग्रजी शब्दांत स्थूल मानानें दोन अर्थांचा समावेश होतो (१) जी कविता तंत्री किंवा वीणा घेऊन तिच्यावर गाण्यास योग्य ती व (२) जींत कवीचें स्वतःचें हृदय सुंदर शब्दांनीं उद्गारलें गेलें आहे ती, या दोनही लक्षणांनीं युक्त अशी कविता असली तर तिला इंग्रजींत 'लिरिक' असें म्हणतात. या लक्षणांनीं युक्त अशी कविता मराठी वाङ्मयांत किती तरी आहे असें मला वाटतें. इंग्रजींत ज्याला एपिक म्हणतात अशा प्रकारची स्वतंत्र कविता १९व्या शतकाच्यापूर्वीच्या मराठींत नाहीं. आणि नाट्यकविताही नाहीं हें उघडच आहे. आणि तेवढ्यानें तें वाङ्मय बेरंच ओकें दिसतें हें खरें, तथापि त्या उणीवीमुळें तें अगदींच अग्राह्य असें मात्र मला वाटत नाहीं. त्याच्यावांचूनहि तें ऐश्वर्ययुक्त आहे. या माझ्या म्हणण्यावरून असें कोणीं समजूं नये, कीं 'एपिक' कवितांचें किंवा नाटकांचें महत्व मला वाटत नाहीं. तें महत्व मला फार वाटतें. परंतु तीं नसल्यामुळें आमच्या वाङ्मयास विलक्षण हीनता आली आहे, असें मात्र मला वाटत नाहीं. वाङ्मय किंवा कविता या दोन शब्दांत जो अर्थ भरला आहे; त्या अर्थाच्या दृष्टीनें मराठी भाषेंत वाङ्मय व कविता हीं पुष्कळ आहेत, एवढेंच माझें म्हणणें आहे. त्यांचा अभ्यास करण्याची उत्कट इच्छा मात्र आपणास पाहिजे व तो अभ्यास आस्थेनें केला पाहिजे.

तया प्रमेयाची वोढवण
वरी दीजे साहित्याचे वोल्हवण
तरी कविता वशीकरण
कवणासि नव्हे ? ॥

यात्रमाणें साहित्यानें मनोवेधक केलेली प्रमेयांची मांडणी जींत आहे अशी कविना कोणाचें चित्त वश करून घेणार नाहीं ? ज्यांस नुसतीं प्रमेयेंच पहावयाचीं असतील, त्यांचेसाठीं **ज्ञानेश्वर**महाराजांची **ज्ञानेश्वरी** व **एकनाथां**चें एकादशस्कंध व्याख्यान—ज्यांस एकनाथी भागवत असें म्हणतात तें—तयार आहे. ज्यांस भक्तिमत्ता पाहिजे असेल, त्यांचेकरितां **नामदेव**, **तुकाराम** व **रामदास** यांनीं ग्रंथ निर्माण केले आहेत. ज्यांस विद्वत्त्व व कवित्त्व यांचें मिश्रण पहावयाचें असेल, त्यांनीं **वामनपंडित** व **मोरोपंत** यांचे ग्रंथ पहावे. रसपरिपाक, वर्णनसौंदर्य व भाषेची अव्याजमनोहरता ज्यांस हवी असेल त्यांचें मन रंजविण्यास **मुक्तेश्वर** तयार आहेत. केवळ शृंगार किंवा शृंगार आणि वैराग्य यांचे मिश्रणाची ज्यांना आवड, त्यांचेकरितां **रामजोशी** नात्या व **अनंतफंदी** केव्हां मृदंगावर व केव्हां डफावर थाप मारून तयार आहेत. सारांश, कविनावधूचें ज्या ज्या वेशांत निरीक्षण करण्याची इच्छा असेल त्या त्या वेशांत ती सजलेली पाहण्यास मराठी भाषेंत सिद्धता आहे.

येथपर्यंत मराठी राज्याच्या (पेशवाईसुद्धां) अस्तापर्यंत, मराठी भाषेंत जें वाङ्मय अस्तित्वांत आलें त्याचें ऐतिहासिक दृष्ट्या व विषयदृष्ट्या विवेचन झालें. या दोन दृष्टींपैकीं कोणत्याही दृष्टीनें अभ्यास करणारास शुद्धानंदाचाच लाभ होईल. आतांपर्यंत एकंदर कवी सांगितले, त्यांत मुख्यतः सहा कवी फार मोठे. **ज्ञानेश्वर**, **तुकाराम**, **रामदास**, **मुक्तेश्वर**, **वामनपंडित** व **मोरोपंत**. या प्रत्येक कवींत कांहींना कांहीं तरी विशेष आहे. या विशेषामुळें त्या प्रत्येकाची कविता वाचनीय झाली आहे. वेदांतासारखीं गहन प्रमेयें घेऊन तीं मराठी भाषेंत स्पष्ट समजावून देण्यास **ज्ञानेश्वर**मांनीं जी दृष्टांतचमत्कृति दाखविली आहे तिच्या तोडीची चमत्कृति आमच्या भाषेंत तर नाहींच, परंतु इतर कोणत्या भाषेंत असल्याचेंही वाचनांत नाहीं. या दृष्टांतांमुळें **ज्ञानेश्वरी** हा ग्रंथ जरी केवळ टीकात्मक आहे, त्यांत दुसऱ्या एका परम पूज्य संस्कृत ग्रंथावरलें व्याख्यान आहे, तरी त्यास स्वतंत्र काव्याची योग्यता आली

आहे. एक एक प्रमेय वाचकाच्या मनावर ठसविण्यासाठीं जें दृष्टांतभांडार कवीनें ओतलें आहे, नें पाहिलें म्हणजे या कवीच्या प्रतिभेचद्दल अत्यंत आश्चर्य वाटतें. कित्येक वेळां तर असें वाटतें, कीं चंद्रकिरणांच्या प्रेरणेनें सागरांत ज्याप्रमाणें लाटांवर लाटा उचंबळत असतात त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या मनांत अंतःस्फूर्तीच्या योगानें दृष्टांतावर दृष्टांत वर उसळून येऊन शब्दांच्या रूपानें बाहेर पडत आहेत, आणि पुनः ते दृष्टांत असे सहज व साधे दिसतात, कीं त्याकरितां ज्ञानेश्वरांस कांहीं श्रम पडले असतील असें वाटतच नाहीं. त्यांनींच म्हटलें आहे:

पाहें पां पूर्ण चंद्राचिये भेटी ।
समुद्रीं अपार भरतें दाटी ।
तेथ चंद्रासि काय किरीटी ।
उपखा पडे ॥

जसे त्या चंद्रास त्या कामीं कोणतेही श्रम पडत नाहींत, त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या बुद्धीस या दृष्टांतांमुळें कांहीं श्रम पडलेले दिसत नाहींत. ज्ञानेश्वरमहाराजांचें सर्व काव्यैश्वर्य या दृष्टांतांतून भरलें आहे. त्यांचीं प्रमेयें कदाचित् भिन्न मतवाद्यांस आवडणार नाहींत, परंतु दृष्टांत वाचून त्यांच्या कवित्वाचद्दल प्रत्येक सहृदय वाचक मान डोलविल्याखेरीज राहणारच नाहीं.

तुकारामचेाआंच्या कवितेंत प्रेमळपणा फार. त्यांची भाषा अत्यंत साधा. स्वतःच्या अंतःकरणाला जें वाटेल तें व जो अनुभव येईल तो तत्काल कवितेच्या रूपानें त्यांचे मुखांतून पडला असला पाहिजे. तुकारामचेाआंच्यावेळीं त्यांच्या अनुयायांत पहिल्यापासून त्यांचे संनिध राहिलेल्या कोणी गृहस्थानें जर मनांत आणलें असतें कीं महाराजांच्या तोंडून निघालेल्या अभंगाची उपज होण्याला तात्कालिक कारण काय झालें तें शोध करून टिपावयाचें, तर मात्रा खात्री आहे कीं महाराजांच्या चार पांच हजार अभंगांपैकीं दोन अडीच हजार अभंग तरी कांहीं तरी प्रसंगानें त्यांस एकदम स्फूर्ति होऊन त्यांचे तोंडून बाहेर पडले होते, अशी माहिती

त्यांच्या लिपणांत सांपडली असती. पार्टी पेन्सिल घेऊन खोलींत कोंडून घेऊन डोकें चोळचोळून बनविलेली त्यांची कविता नव्हे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत नानाप्रकारचे प्रसंग दृष्टीस पडले, कीं लागलीच यांची वाणी सुरू होऊन अभंगावर अभंग बाहेर पडत असावेत. कीर्तनसमयीं जो उपदेश निघावयाचा, जो विषय विवेचनास घ्यावयाचा, त्याला समर्थन करणारे अभंग तत्काल मुखांतून निघावयाचे असें वाटण्याइतकी सहजता, अत्याजमनोहरता व विपुलता त्यांच्या कवित्वांत आहे. ज्ञानेश्वरांनीं आपणास गीतेस बांधून तरी घेतलें होतें, परंतु तुकारामबोआंस तसाही कांहीं निर्बंध नव्हता. त्यांची कविता स्वयमुद्भूत–तिच्यांतील मधुरिमा झाडावर पिकून आपोआप स्फुटित झालेल्या आम्रफलाप्रमाणें होय. अर्धकच्चा झाल्याबरोबर तोडून आणून गवतांत घालून उबवून पिकविलेल्या आंब्याची गोडी त्यांच्या कवितेंत नव्हे. नामदेवांनीं पांडुरंगासमेत स्वप्नांत येऊन तुकारामबोआंस जागें करून

सांगितलें काम, करावें कवित्व ।
वाउगें निमित्य बोलों नको ॥

यावर कोणाचा भरंवसा बसो वा न बसो, पण तुकाराममहाराजांस कवित्वाची सहजस्फूर्ति खास. त्यांनींच एका अभंगांत म्हटल्याप्रमाणें त्यांची वाणी " **आधारें वहली प्रसादाची वाणी** " च खचित. त्यांचे बोलण्यांत, उपदेशांत, दृष्टांतांत कोठेंही भिन्नेपणा नाहीं. जें ज्या प्रसंगीं बोलावयाचें तें अगदीं निस्पृहपणें बोलावयाचें. त्यांत अलंकारिकपणानें सौम्यपणा आणण्याचा प्रयत्नच नाहीं. त्यांच्या कवितेस उसनें सौंदर्य नाहीं. ती वनश्रीप्रमाणें सुंदर, प्रतिभारूप मेघोदकानें वाढलेली; ती कृत्रिम यंत्रानें सिंचित केलेल्या कूपोदकानें परिपोषित अशी उपवनश्री नव्हे. ज्ञानेश्वरांनीं जीवशिवांचें ऐक्य आहे हें ज्ञान वाचकांस करून देऊन परमानंदप्राप्ति करून द्यावी या हेतूनें कवित्व केलें. परंतु तुकाराममहाराजांनीं मुख्यतः परमेश्वरभक्तींत सगळा कांहीं आनंद आहे हें शिकविलें.

मोक्षाचें आम्हासी नाहीं अवघड ।
तो असे उघड गांठोळीसी ।
भक्तीचे सोहाळे होतील जीवासी ।
नवल तेविशीं पुरवितां ॥ ,

हें त्यांचें मागणें. दुसरें एका अभंगांत तर स्पष्ट म्हटलें आहे:

सरलिया भोग येईन शेवटीं ।
पायांपें या भेटीं अनुसंधानें ॥
आतां मजसाठीं याल आकारास ।
रोकडी हे आस नाहीं देवा ॥
तुका ह्मणे मुखीं असो तुझें नाम ।
देईल तो श्रम देवो काळ ॥

रामदासस्वामींनीं मात्र आपल्या कवितेंत स्वार्थ आणि परमार्थ यांची सांगड घालून दिली आहे. जो संसारांत असेल, त्यानें त्यांतच राहून स्वार्थ व परमार्थ कसे साधावे हें सामान्य जनांस समजावून देण्यास त्यांच्या कवित्वाचा अवतार झाला असें म्हणण्यास दासबोधांत अनेक कारणें आहेत. प्रोफेसर शेर्प यांनीं कवितेवरील आपल्या एका व्याख्यानांत ह्मटलें आहे, What man is, what he does, what he should do, what he may become, what he may enjoy, admire, venerate, love, what he may hope, what is his ultimate destiny,—these things are never absent from the thoughts of great poets, and that not by accident, but from their very essence as poets. या म्हणण्याची सत्यता महाराष्ट्रांतील बहुतेक कवीश्वरांच्या कवितांवरून चांगली दृष्टीस पडते, परंतु रामदासस्वामींच्या ग्रंथांत ती विशेष तऱ्हेनेंच निदर्शनास येते. ज्ञानेश्वरमहाराजांनीं अज्ञ जनांस परमार्थाच्यासंबंधानें ज्ञान करून देण्यासाठीं कविता लिहिली. तुकारामम्हाराजांनीं परमेश्वरभक्ति हाच एक केवळ पुरुषार्थ, दुसरा कोणताही पुरुषार्थ

नव्हे, असें शिकविलें. परंतु रामदासांनीं आपल्या काळची परिस्थिति पाहून त्या वेळच्या जनांस उपदेश केला. " मनुष्य कोण आहे, काय करतो, त्यानें काय करावें, काय व्हावें, कशाचा उपभोग घ्यावा, कशाविषयीं प्रेमादर बाळगावा, कशावर भक्ति ठेवावी, कशावर प्रेम करावें, कशाची आशा धरावी, व त्याची अंतिम स्थिति काय होणार "—या सर्व गोष्टी समर्थांच्या चित्तांत सदैव वागत होत्या आणि त्यामुळें त्यांच्या अमोल बोधग्रंथांतून कोणत्याही गोष्टी वगळल्या गेल्या नाहींत. त्यांची भाषा निसर्गसुंदर, बोध फार सुगम व व्यवहाराला धरून आणि रसपूर्ण. दासबोध केव्हांही वाचला असतां त्यांतून तत्काळ उपयोगी असा बोध मनुष्याच्या मनांत उतरतो. समर्थ ज्या वेळीं झाले, त्या-वेळीं झाले नसते, तर मराठ्यांचा इतिहास इतका वर्णनीय होण्याला एक मोठेंच कारण कमी झालें असतें.

ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास ही त्रयी म्हणजे स्वयंस्फुरित कविताशक्तीची अवतारत्रयीच होय. या त्रयीनें मराठी वाङ्मयास जगाच्या वाङ्मयाच्या इतिहासांत चेरेंच वरचें स्थान मिळेल अशी योग्यता आणून दिली. मुक्तेश्वर, वामन पंडित व मोरोपंत हे यांच्या मानानें दुसऱ्या प्रतीत येतात. परंतु त्यांची कविताही फार सुंदर व आल्हाद देणारी होय. मुक्तेश्वरांचें महाभारत वाचतांना त्यांच्या वर्णनशैलीमुळें ते ते देखावे व त्या त्या व्यक्ति आपल्या डोळ्यापुढें दिसत आहेत असेंच वाटतें. त्यांच्या भाषेंत कृत्रिमता बिलकुल नाहीं. त्यांच्या उपमा अगदीं सहज. निसर्गमनोहर अशा युवतीच्या दर्शनानें जो आनंद होतो, तो आनंद मुक्तेश्वराच्या काव्यापासून होतो. तसा शुद्धानंद पंडितांच्या किंवा पंतांच्या काव्यापासून होत नाहीं. पंडित व पंत हे कवि नव्हते, किंवा त्यांच्या काव्यांतून कवितेचा परिपोष नाहीं, असें माझें म्हणणें नाहीं. आपला गैरसमज होऊं देऊं नका. माझें म्हणणें एवढेंच कीं, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास व अंशतः मुक्तेश्वरही यांच्या अंतःकरणांत कविप्रतिभेचे कल्लोळ आपोआप उठून, जणूं काय त्यांनीं

नको नको म्हणून दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला तरी न दबतां, तें शब्दरूपानें भराभर बाहेर पडत, असें त्यांची कविता वाचूं लागल्याबरोबर वाटतें. आणि पंडित व पंत यांची कविता वाचतांना तसें वाटत नाहीं.पहिल्या चतुष्टयाच्या काव्यांचें वाचन करीत असतां जो आनंद होतो,तो आकाशांतून पडणाऱ्या पर्जन्योदकाच्या वर्षावानें होणाऱ्या आनंदाप्रमाणें असतो. मेघोदरांतून वृष्टिरूपानें आलेल्या जलाची आणि तेंच पर्जन्योदक तळ्यांत धरून ठेवलें असल्यास त्याची गोडी व तेजी हीं सारखीं कशीं असणार ? दोन्ही पर्जन्योदकें खरीं, परंतु एक मेघोदरांत मात नाहींसें होऊन तेथून बाहेर पडून पृथ्वी भिजविण्याकरितां खालीं येऊन आपल्या तेजानें व माधुर्यानें सर्वांस आल्हाद देतें. आणि दुसरें सांचून सांचून लोकांच्या उपयोगास पडल्यामुळें आनंददायक वाटतें. एकाच्या वर्षावाबरोबरच आल्हाद; दुसऱ्याची परीक्षा वगैरे होऊन तें चांगलें ठरलें तर आल्हाद ! हीच स्थिति स्वयमुद्भूत काव्यें व कृत्रिम काव्यें यांमधील विरोधदर्शक तुलना केली असतां दिसून येते. वामन पंडित हे मुख्यत: पंडित. त्यांचा विशेष प्रतिभा नव्हे, तर पांडित्य होय. पांडित्याबरोबर पुष्कळ वेळां येणारा अहंपणा त्यांचे अंगीं एकवार पुष्कळ असून तो कारणपरत्वें नष्ट झाला. परंतु यथार्थदीपिकादि ग्रंथ पाहिले म्हणजे तो अगदीं नि:शेष नष्ट झाला होता असें वाटत नाहीं. आपल्या टीकेस यथार्थदीपिका हें नांव दिलें यांतच भावार्थदीपिकेला एक प्रकारें तोड देण्याचा हेतु दिसतो. त्यांची टीका त्यांच्या पांडित्यप्रकर्षामुळें वाचनीय-निर्व्याजमनोहर म्हणून वाचनीय नव्हे.

मी म्हणतों याला प्रत्यय पहावयाचा असल्यास ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेंतील व पंडितांच्या यथार्थदीपिकेंतील ९ वा किंवा १३ वा हे अध्याय बरोबर वाचून तुलना करून पहावी.

पंतांच्या काव्याबद्दल माझा किती आदर आहे, हें मीं वर सांगितलें आहे. त्यांचीं काव्यें आनंदकर आहेत, विविध रसांचीं पोषक आहेत. परंतु चित्रकाव्य जेथें साधेल, तेथें तें साधण्या-

करितां रसहानि होते कीं काय, इकडे लक्ष्य न दिल्याचीं उदाहरणें त्यांच्या काव्यांतून किती तरी सांपडतील. पुनः मी आपणांस सांगतों, कीं आपला गैरसमज होऊं देऊं नका मोरोपंत कवि नव्हते किंवा त्यांच्या ग्रंथांत काव्य नाहीं असें माझें म्हणणें नाहीं. माझें म्हणणें एवढेंच कीं त्यांच्या काव्यांत व वामन पंडितांच्या काव्यांत कृत्रिमता विशेष पंतांनीं आपल्या वसण्याच्या खोलीभर यमकें लिहून ठेविलीं होतीं व त्यांचा ते लागेल तसा उपयोग करीत ही आख्यायिका आपण ऐकलीच असेल. यमकांचा त्यांनीं अभ्यास केल्याकारणानें तीं त्यांस पुढें अगदीं सहज होऊन गेलीं; परंतु त्यांचा भर यमकांवर व शब्दचमत्कारावरच फार. मुक्तेश्वरांचा भर शब्दचमत्कृतीवर मुळींच नाहीं, अर्थावर फार. यामुळें त्यांचीं महाभारतांतील आख्यानें पंतांच्या आख्यानांपेक्षां सहृदय वाचकास अधिक आल्हादकारक होतात.

असो. आतां या कविवर्यास मी मोठ्या आदरानें प्रणाम करून व आपणांस

तम्ही पुरोहितपणें । मी बोलिलों पुरें उणें
तें तुम्ही माउलीपणें । उपासाहिजो जी ॥

अशी विनंति करून, आपल्या आज्ञेवरून स्वीकारलेल्या पौरोहित्यास अनुसरून हा आपल्या वाग्यज्ञाची परिसमाप्ति करतों. कोणत्याही यज्ञाची सांगता आशीर्वादग्रहणाखेरीज होत नाहीं एवढ्याकरितां ज्ञानेश्वरमहाराजांच्याच शब्दांनीं आशीर्वचनही करतों.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ॥
तोषोनियां मज द्यावें । पसायदान हें ॥
दुरितांचें तिमिर जावो । विश्वस्वधर्मसूर्ये पाहो ॥
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणि जात ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थापना
वर्ष: ...
क्रमांक ...9८२५... वर्ग: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

अकोला येथील

महाराष्ट्रीय साहित्य संमेलन

वाग्वा ऋग्वेदं विज्ञापयति यजुर्वेद ५ सामवेदमाथर्वणं चतुर्थमितिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदं पित्र्य ५ राशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्या ५ सर्पदेवजनविद्यां दिवं च पृथिवीं च वायुं चाऽऽकाशं चापश्च तेजश्च देवा ५ श्च मनुष्या ५ श्च पशू ५ श्च वया ५ सि च तृणवनस्पतीञ्श्वापदान्याकीटपतङ्गपिपीलिकं धर्मं चाधर्मं च सत्यं चानृतं च साधु चासाधु च हृदयज्ञं चाहृदयज्ञं च यद्वै वाङ्नाभविष्यन्न धर्मो नाधर्मो व्यज्ञापयिष्यन्न सत्यं नानृतं न साधु नासाधु न हृदयज्ञो नाहृदयज्ञो वागेतत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति।

छान्दोग्योपनिषत्, अ० ७, खंड २.

वाणी हीच ऋग्वेदाचा अर्थ समजाविते. यजुर्वेदाचा, सामवेदाचा, आथर्वण जो चवथा वेद व इतिहांसंपुराणसमुच्चय जो पांचवा वेद, त्यांचें ज्ञान तीच करून देते. वेद· व्याकरणादि विषय, पितृसंबंधीं क्रियाकर्मादि, गणितविद्या, उत्पातादिकांचें ज्ञान, निधिविद्या, तर्कविद्या, नीतिविद्या, देव· विद्या, ब्रह्मविद्या, भूतविद्या, क्षत्रियविद्या, नक्षत्रविद्या (ज्योतिष); सर्पविद्या, गंधर्वविद्या, आयुर्वेद, यांचें ज्ञान वाणीच्याच योगें होतें; स्वर्ग, पृथ्वी, वायु, आकाश, आप, तेज, देव, मनुष्य, पशु, पक्षी, तृण, वनस्पती, श्वापदें, कीटक, पतंग, मुंगी यांच्यासंबंधाचें ज्ञान, धर्म आणि अधर्म, सत्य आणि मिथ्या, चांगलें आणि वाईट, आनंदकर आणि दुःखकर यांचें ज्ञान, हीं वाणीच्याच द्वारें लाभतात. वाणी जर नसती तर धर्म कोणता, अधर्म कोणता ? हें समजलें नसतें. सत्य कोणतें, मिथ्या कोणतें ? चांगलें कोणतें, वाईट कोणतें ! आनंदकर कोणतें, दुःखकर कोणतें ? हें कांहींच समजलें नसतें. ह्या सर्वांचें ज्ञान वाणीच करून देते; तेव्हां वाणीची उपासना कर.

वाङ्मयाचें अत्यंत उत्कृष्ट असें एखादें स्तोत्र तयार करून वा अशी जर कोणीं एखाद्या कवीला आज विनंति केली किंवा एखाद्या तर्कशास्त्रज्ञाला वाङ्मयाची व्याख्या वनविण्यास सांगितलें, तर आतां मीं आपणास वाचून दाखविलेल्या स्तोत्रांतल्यापेक्षां अधिक स्तुति किंवा त्यापेक्षां अधिक व्यापक व्याख्या त्यांच्या हातून निर्माण होतील असें मला वाटत नाहीं. प्राचीन काळचे ऋषि वाणीला ब्रह्मच समजत, आणि ते वाणीला इतकें महत्व देत कीं त्यापेक्षां एका ब्रह्मास्वरीज कशालाच त्यांनीं तितकें महत्व दिलेलें नाहीं. ज्या छान्दोग्यांतून मीं वरील उतारा वाचला त्या उताऱ्याच्या अगदीं पुढेंच नारदानें सनत्कुमारास असें विचारलें आहे कीं " भगवन्, वाणीपेक्षांही श्रेष्ठ असें कांहीं आहे काय ? " आणि सनत्कुमारांनीं "होय, आहे. वाणीपेक्षां मन हें श्रेष्ठ आहे, मनाहूनही संकल्प श्रेष्ठ आहे; " अशी उत्तरोत्तर श्रेष्ठतायुक्त वस्तुपरंपरा सांगितली आहे. तरी मी प्राचीन काळचे ऋषि वाणीला ब्रह्माच्या खालोखाल श्रेष्ठ मानीत असें स्पष्ट म्हणतों आहें, यामुळें माझ्या श्रोत्यांपैकीं कित्येक आश्चर्य पावतील, परंतु त्यांनीं एवढें ध्यानांत ठेवावें कीं " नादब्रह्म, " " शब्दब्रह्म, "" "वाग्ब्रह्म," असे शब्द जसे उपनिषदादि ग्रंथांतून वारंवार सांपडतात, तसे " मनोब्रह्म, " " संकल्पब्रह्म, " असे कोठेंही आढळत नाहींत. कारण "ब्रह्मानें" आपण प्रकट व्हावें म्हणून आपल्या "मनांत" कितीही "संकल्प" केला, तरी तो " शब्दानें " " Logos " रूपानें व्यक्त व स्फुट होईपर्यंत कोणासही समजणें शक्य नव्हतें. तो ' प्रणव 'च्या रूपानें बाहेर पडेपर्यंत–त्याचा वाणीच्या द्वारें उच्चार होईपर्यंत–त्या वाणीनें ' अक्षर ' रूप घेईपर्यंत त्याचें ज्ञान कोणासही झालें नव्हतें. तें ज्ञान जगांत आलें, तें प्रणवाच्या–अक्षराच्या– द्वारेंच आलें. या दृष्टीनें पहातां वाणीच्या सामर्थ्याचें–वाङ्मयाच्या प्रभावाचें–मोठें स्तोत्र गाण्याची आवश्यकता नाहीं.

आणि दुसऱ्याही एका दृष्टीनें पहातां तसें स्तोत्र गाण्याची आज आपणास आवश्यकता नाहीं. कांकीं, आम्ही सर्वच आजकाल वाङ्मयाचे कट्टे उपासक बनत चाललों आहों. पुस्तकें हीं आमचे जिवलग स्नेही बनले आहेत. ज्याला कोणाला अक्षरओळख झाली आहे तो कांहींना

कांहीं तरी वाचीत असतो; पुस्तकेंच पुष्कळांस गुरुस्थानीं आहेत. पुस्तकांपासून आम्ही शिक्षण मिळवितों, पुस्तकांवरूनच दुसऱ्यांस शिक्षण देतों, पुस्तकांपासूनच विचारांचा उद्भव होतो, विकारांची जागृति होते, मनाचें मनोरंजन होतें. ज्यांस वाचतां येत नाहीं, त्यांस जग शून्यवत् झालें आहे अशी आमच्या मनाची पक्की श्रद्धा बनली आहे. त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं आम्ही प्रयत्न करूं लागलों आहों.जपानच्या माजी राजानें जसा आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभींच फर्मान काढून ग्वाही फिरविली कीं "आजपासून माझ्या राज्यांत निरक्षरता म्हणून राहतां कामा नये," तसा फर्मान आपल्या बादशाहांनींही काढून निरक्षरतेला हिंदुस्थानांतून हद्दपार करावें असें आपणा सर्वांचें हरदम हरघटकेला त्यांचे जवळ मागणें आहे. साक्षरतेची अवश्यकता आपणास इतकी वाटूं लागली आहे. आज आपण येथें जमलों आहों, बंगाली, हिंदी व ऊर्दू वगैरे भाषा बोलणारे लोक आपआपल्या प्रांतांतून असेच दरसाल जमत असतात, हें सर्व या वाङ्मय-प्रेमाचेंच लक्षण होय. आपआपल्या बांधवांची निरक्षरता जावी आणि आपल्या भाषेच्या द्वारें वाङ्मयाची अभिवृद्धि व्हावी. या एका हेतूनें आपणा सर्वांचे प्रयत्न चालले आहेत, हे प्रयत्न चालले आहेत तेही वाणीच्या-वाङ्मयाच्या-साहाय्यानें चालले आहेत हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

वाङ्मय हें राष्ट्राच्या उन्नतीचें कारणही आहे, आणि कार्यही आहे. राष्ट्राचा जसजसा उत्कर्ष होतो, तसतसा वाङ्मयाचा उत्कर्ष होतो, आणि वाङ्मयाला जितकें जितकें उज्ज्वल व उन्नत स्वरूप येत जाईल, तितकें तितकें राष्ट्राच्या उन्नतीला व उज्ज्वलतेला तें कारण होतें. वाङ्मयाच्या योगानें आमची विचारशक्ति उद्दीप्त होते, आमचे मनोविकार जागृत होतात, आमचें अंतःकरण उल्हसित होतें. आमच्या पूर्वजांनीं संगृहीत केलेल्या ज्ञानाच्या, त्याचप्रमाणें ज्यांच्या ज्याच्याशीं आमचा संबंध येतो, त्यांनीं त्यांनीं संगृहीत केलेल्या ज्ञानाचा उपयोग करून आह्मांस आपल्या ज्ञानांत व भावि पिढ्यांच्या ज्ञानांत भर घालितां येते. ही भर घालण्याची अवश्यकता जों जों अधिक अधिक स्पष्टपणें आपल्या नजरेस येत चालली आहे, तों तों वाङ्मयाच्या उत्कर्षासाठीं झटणारे

सेवकही तयार होऊं लागले आहेत. आज आमच्यांत जी काय सार्व-विषयक जागृति दिसूं लागली आहे, तीं वर्तमानपत्रें, मासिकें, त्रैमासिकें व स्वतंत्र पुस्तकें इत्यादि रूपानें होणाऱ्या आमच्या वाङ्मयसेवेचेंच फल होय असें स्पष्टपणें विधान करण्यास मला अणुमात्र संकोच वाटत नाहीं. इतर भाषांतील (हिंदुस्थानांतल्या ज्या चार दोन भाषांची मला माहिती आहे त्या भाषांच्यासंबंधानें मी हें बोलत आहें) वाङ्मयाचा जसा उत्कर्ष होत आहे, तसाच किंवहुना कांकणभर जास्तच आमच्या मराठी भाषेंतील वाङ्मयाचाहीं उत्कर्ष होत आहे असें माझ्या मनास पूर्णपणें वाटत आहे. या माझ्या विधानानें, यंदांच्या या आपल्या वाग्यज्ञाच्या तीन दिवसांच्या सत्रांत विवेचनाकरितां नेमलेल्या विषयांपैकीं एका महत्वाच्या विषयाचा मी पूर्वपक्षच करीत आहें हें मी जाणून आहें. ज्या स्थानावर आपण मला वसविलें आहे त्या स्थानावरून पूर्वोत्तर पक्ष करीत वसूं नये हेंही माझ्या लक्षांत आहे, परंतु जिना चढत असणाऱ्या माणसाला आपण वर चाललों आहों कीं खालीं उतरतों आहों, याचीच भ्रांति झाली, तर ती भ्रांति दूर करणें हें पहिलें काम होय, हें कोणीही कबूल करील; मराठी साहित्यसेवकांनीं आजपर्यंत वाग्यज्ञाचीं सहा सत्रें केलीं, आजचें हें सातवें सत्र होय. कित्येक आक्षेपक असें म्हणतात कीं या "सहा सत्रांत झालेल्या ऊहापोहांचा उपयोग कांहीं झाला नाहीं, इतकेंच नव्हे, तर आमच्या वाङ्मयाचा—आमच्या भाषेचा—आर्धांच ऱ्हास होत चालला आहे, त्या ऱ्हासाला या सत्रांतील ऊहापोहांनीं अधिक वेग दिला गेला." असें जर खरोखर कोणास वाटूं लागलें असेल, तर तो त्याचा भ्रम दूर करावा किंवा आपली समजूत भ्रमाची आहे ही खात्री करून घेऊन आपला भ्रम तरी दूर करून घ्यावा हें अशा प्रसंगीं अत्यंत युक्त होय. हा सर्व विचार करून मी आपल्या या भाषणांत याच विषयाचा यथामति विचार करणार आहें. यावद्दल आपण सर्वांनीं क्षमा करावी अशी माझी विनंति आहे.

"एकंदरींत वाङ्मयाचा ऱ्हास होत चालला आहे, चांगलीं पुस्तकें निघत नाहींत, गचाळ पुस्तकें भराभर निघालीं म्हणून काय झालें ? त्यानें कांहीं वाङ्मयाचा उत्कर्ष होतो आहे असें म्हणतां येणार

नाहीं, उत्कर्ष होतो आहे असें म्हणणारे भ्रांतींत गटंगळ्या खात आहेत," वगैरे विधानें आजच आणि आमच्याच भाषेंतील वाङ्मयासंबंधानें केलीं जात आहेत असें नाहीं. वाङ्मयाच्या उत्पत्तीपासून प्रत्येक भाषेंतील वाङ्मयासंबंधानें त्या त्या कालीं कांहीं असंतोषी विवेचक निघतातच. " मागल्या काळीं जसें वाङ्मय झालें तसें आज उत्पन्न होत नाहीं, " असें विधान करून ते समकालीन लोकांस न जाणतां उत्तेजन देत असतात असें मी समजतों. " गेला तो काळ अति उतम, सभ्यांचा वाईट, आणि पुढें येणारा तर किती भयंकर होणार आहे याचा नेमच नाहीं, " हा कित्येक गृहस्थांचा नेहमींचाच जप. गतकाळच्या समाजाची, महर्षींची, साधु पुरुषांची, कर्तृत्ववान् पुरुषांची, ग्रंथकारांची, कारागिरांची वगैरे स्तुति करूनच हे राहत नाहींत; तर त्यांना सद्यःकालीन समाजाची व त्या समाजाच्या हितासाठीं व उन्नतीसाठीं आपआपल्या परीनें मनःपूर्वक झटणाऱ्या पुरुषांची निंदा करून आपला समाज अधोगतीस चालला आहे असें अट्टाहासानें सांगत वसल्याखेरीज संतोषच होत नाहीं. सद्यःकालीन कर्तृत्ववान् पुरुषांच्या मनांत पूर्वकालीन पुरुषांबद्दल अभिमान नसतो असें या लोकांस वाटत असतें. आपल्या पूर्वजांबद्दलचा अभिमान खऱ्या दृष्टीनें पहातां सद्यःकालीन कार्यकर्त्यांना कांहीं कमी असतो असें नाहीं, किंबहुना त्या अभिमानाच्या सामर्थ्यानेंच त्यांचे प्रयत्न चाललेले असतात. परंतु त्यांना आपल्या परिस्थितीप्रमाणें कार्य करावयाचें असल्यामुळें अर्थातच नवीन नवीन उपाय योजावे लागतात. या नवीन उपायांचा नवीनपणा हाच कित्येकांस आपल्या ऱ्हासास कारण होईल असें वाटूं लागतें, आणि ते " ऱ्हास ! ऱ्हास ! " " अवनति ! " "अवनति !" अशी ओरड करूं लागतात.

परंतु या सामान्य ऱ्हासासंबंधीं ओरडीशीं आपल्याला कांहीं करावयाचें नाहीं, वाङ्मयापुरतेंच—मराठी वाङ्मयापुरतेंच—आपणास पहावयाचें आहे. मराठी भाषेचा उत्कर्ष होत आहे कीं अपकर्ष होत आहे ? तिची उन्नति होत आहे कीं अवनति चालली आहे ? हें आपणास विवेचावयाचें आहे.

परंतु कोणतेंही विवेचन करून कांहीं सिद्धांत ठरवावयाचा अशी उमेद धरण्यापूर्वी मुख्य शब्दांच्या व्याख्या ठरविणें हें अत्यंत आवश्यक

आहे. 'उन्नति,' 'उत्कर्ष,' या शब्दांचे अर्थ आपण समजतों तरी काय ? हें ठाम ठरलें पाहिजे. त्याखेरीज सिद्धांत तरी काय ठरविणार तेव्हां उन्नति म्हणजे काय हें आधीं आपण थोडक्यांत पाहूं.

उन्नति progress म्हणावयाचें कोणत्या स्थितीला ? आणि ती होते तरी कशी ? यासंबंधानें जेम्स मार्टिनो यांचा एक सुंदर उतारा मी आपणापुढें ठेवतों.

The first party of painted savages who raised a few huts upon the Thames did not dream of the London they were creating, or know that in lighting the fire on the hearth they were kindling one of the great foci of Time. All the grand agencies which the progress of mankind evolves are formed in the same unconscious way. They are the aggregate result of countless single wills, each of which, thinking of its own end, and, perhaps fully gaining it, is at the same time enlisted by Providence in the secret service of the world.

—*James Martineau.*

उन्नतीचें खरें स्वरूप, उन्नतीचा खरा वेग, उन्नतीचीं खरीं द्वारें हीं अशीं आहेत. परंतु हें उन्नतीचें स्थूल स्वरूप झालें. सर्व विश्व उन्नत होत चाललें आहे कीं अवनत होत चाललें आहे, याच्या विचारास लागलेल्या माणसानें जें उन्नतीचें स्वरूप ध्यानांत घ्यावें तें हें स्वरूप झालें. आपल्याला आपल्यापुरतें पहावयाचें आहे—आपल्यापुरतेंही नाहीं—आपल्या वाङ्मयापुरतेंच पहावयाचेंच आहे. वर सांगितलेलें उन्नतीचें स्वरूप आपल्या वाङ्मयाच्या उन्नतीस येत चाललें आहे काय ? या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें ह्मणजे आणखी एक प्रश्न विचारावयाचा तो हा. "आपल्या वाङ्मयाची उन्नति व्हावी म्हणून आज अनेक व्यक्ति आपापल्या परीनें—आपल्या परिस्थितीच्या मानानें—प्रयत्न करीत आहेत कीं नाहींत ? आज आपण जमलों आहोंत हे आणि जे येथें आज येऊं शकले नाहींत असे शंभर-

पट दुसरे या प्रश्नाचें उत्तर देतील. मीच द्यावयास नको. आज त्यांच्या समुदायास " असंख्य " " Countless " असें म्हणतां येत नाहीं हें कोणीही कबूल करील. परंतु आमच्या परिस्थितीच्या मानानें महाराष्ट्रवाङ्मयक्षेत्रांत कायावाचामनानें झटून काम करणारे कृषीवल दिवसानुदिवस संख्येनें एकसारखे वाढतच आहेत असें म्हणण्यास अणुमात्र प्रत्यवाय नाहीं. उन्नतीला मुख्य कारण जो " संकल्प "will—जो उपनिषद्द्रष्ट्या ऋषींनीं वाणीपेक्षां व मनापेक्षांही श्रेष्ठ असें सांगितलें आहे तो संकल्प आमच्यामध्यें जागृत होऊन कांहीं करूं लागला आहे कीं नाहीं ? याचें उत्तर ' होय ' या व्यक्षरी शब्दाखेरीज दुसरें नाहींच. हा संकल्प उदित झाला आहे, आणि त्याचीं फलेंही दृश्य होत चालली आहेत. आपल्या वाङ्मयक्षेत्राची सुधारणा करून त्याची चांगली मशागत करून त्यांत उत्तम बीं पेरलें पाहिजे, त्या बीजाला जलसेक करून त्याचे वृक्ष बनविले पाहिजेत व त्यांचीं फळें आपल्या बांधवांना दिलीं पाहिजेत, असा निर्धाराचा संकल्प अनेक सुशिक्षितांच्या मनांत प्रबुद्ध झाला आहे हें आमच्या वाङ्मयाच्या उन्नतीचें पहिलें लक्षण. आपलें हें वाग्यज्ञाचें आजचें सत्र आणि मागलीं सहा सत्रें त्या संकल्पाच्या दृश्य फलांपैकींच फार महत्वाचें फल होय.

परतु या एका लक्षणावरूनच उन्नति होत चालली आहे असें म्हणतां येणार नाहीं. उन्नति होण्याचें एक लक्षण दिसलें म्हणून काय झालें ! असा प्रश्न कित्येकांकडून येणारच. तेव्हां याच्याही पुढें उन्नतीचीं दुसरीं कांहीं लक्षणें दिसताहेत काय हें पाहूं.

सामान्य ' उन्नतीचे ' जे नियम तेच वाङ्मयाच्याही उन्नतीला लागू असणारच; तेव्हां सामान्य उन्नतीचे मुख्य नियम आधीं थोडक्यांत सांगून ते आपल्या वाङ्मयाच्या सद्यःस्थितीला लावून पाहूं.

उन्नतीच्या अनेक प्रकारांत मुख्य दोन प्रकार आहेत. एक बाह्योन्नति व दुसरी अंतरुन्नति. बाह्योन्नति म्हणजे डोंगरासारखी आणि अंतरुन्नति

म्हणजे झाडांच्यासारखी उन्नति. डोंगर हळूहळू उन्नत होतं असतात. "डोंगर वनणें" असें आपण म्हणतों. याचा अर्थ दिवसेंदिवस [illegible] वाहेरील मृत्तिकादिक येऊन सांचत सांचत तो उंच होतो. परंतु झाडें त्यांच्यावर वाहेरल्या कांहीं द्रव्यांचीं पुटें वसून वाढत नाहींत. डोंगर वाढण्यास-उन्नत होण्यास-काय किंवा वृक्षादिक वाढण्यास काय, वाहेरील द्रव्यांची अपेक्षा असतेच. परंतु एकावर वाह्यद्रव्यांचीं पुटेंचीं पुटें चढत जाऊन तो वाढत जातो आणि दुसरा म्हणजे वृक्ष अवश्य त्या द्रव्यांतून स्वपोषणासाठीं लागणाऱ्या रसांचें अंतर्ग्रहण करून आंतून वाढत जातो. वृक्ष किंवा इतर सेंद्रिय प्राणी आंतून कांहीं एका सामर्थ्यानें वाढत जातात. विश्वाच्या व्यवस्थेंत या दोनही प्रकारच्या उन्नति त्या त्या दृष्टीनें इष्टच आहेत. मोठमोठाले डोंगर पृथ्वीवर उत्पन्न झाले ते एक प्रकारच्या उन्नतिनियमांनीं, व सेंद्रिय व सजीव पदार्थांची उन्नति झाली-व होते आहे-ती दुसऱ्या प्रकारच्या नियमांनीं. सेंद्रियांस लागू असणारेच नियम समाजाच्या व संस्थांच्या उन्नतीला लागू आहेत, आणि समाजाच्या अंतर्भूत भाषा, वाङ्मय, शास्त्रज्ञान वगैरेंची उन्नति अर्थातच त्याच नियमानुसार होत असते. राशीभवन accumulation हा एक उन्नतिमार्ग, व विकसन development हा दुसरा मार्ग. राशीभवनांत थरावर थर मात्र वसतात, पण मूळचे थर नाहींसे होत नाहींत; ते खालीं तसेच कायम असतात. विकसनांत क्षणोक्षणीं नवीनता येते, पूर्वीचें जुनें असें कांहीं रहात नाहीं; याचें उत्कृष्ट उदाहरण उत्तररामचरितांत श्रीरामचंद्रांच्या एका उद्गारांत फार उत्तमपणें आलें आहे. श्रीरामचंद्र आपल्या पत्नीसह वनवास भोगींत असतां ज्या वनप्रदेशांत राहिले होते, त्याच वनप्रदेशांत पुढें राज्य प्राप्त झाल्यानंतर एकदां आले, तों त्यांस आपण आतां संचार करीत असलेलें वन पूर्वीचेंच होय अशी मनाची खात्री पटण्याला एक पर्वत मात्र कारण झाला. वाकी सर्व वदलून गेलें होतें.

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहां ।

महोद्वेगं कालादपरमिव मन्ये वनमिदं
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

विकसन होत असतें तें अंतरंगीं होणाऱ्या क्रियांचें फल होय. बाह्य द्रव्यांचें शोषण करून घेऊन त्यांतील पोषणोपयोगी रस उपयोगांत आणावयाचा व निरुपयोगी द्रव्यें फेंकून द्यावयाचीं ही क्रिया प्रत्येक सेंद्रिय व सजीव पदार्थांत चाललेली असते. या पोषणोपयोगी क्रिया ज्यांच्याकडून अगदीं उत्तम प्रकारें होतात, त्यांचें पोषण फार उत्कृष्ट होऊन त्यांना पुष्टि येते. ज्यांच्याकडून या क्रिया बरोबर होत नाहींत त्यांना पुष्टि येणें शक्यच नाहीं. कित्येक उपासमारीनें मरतात, तर कित्येक अजीर्णाच्या रोगानें मरतात. परंतु नवीन द्रव्यांच्या शोषणावांचून व त्या शोषणानें आंत घेतलेल्या रसाच्या पचनावांचून अंगीं पुष्टि येणें शक्यच नाहीं. जें केवळ जुनेंपुराणें आहे, तेवढेंच द्रव्य घेऊन त्याच्यावर निर्वाह करूं म्हणून चालत नाहीं. सांचवणीच्या पाण्यानें कधीं निभत नाहीं. त्या पाण्याच्या संचयांत नवीन झरे आणून सोडले पाहिजेत, नवीन ओढे आणून त्यास मिळविले पाहिजेत. जुनें पाणी थोडेंबहुत तरी वाहून जाऊं दिलें पाहिजे. जुन्यांत कांहीं तरी खळबळ केल्याखेरीज कधीं चालावयाचें नाहीं. पाये जुने, गांवठाणें जुनीं, असलीं तरी हरकत नाहीं; किंबहुना जुनीं असलीं तर चांगलीं. पण इमारती नव्या पाहिजेत. शहरें नवीं वसलीं पाहिजेत. नव्या परिस्थितीला आवश्यक अशा सोयी पाहिजेत. तीच स्थिति वाङ्मयाचीही आहे. पुराणप्रियता ही आमच्या हाडींमासीं आज पिढ्यान्‌पिढ्या खिळलेली आहे. ती कधींही जावयाची नाहीं. जुन्याविषयीं राहावयाचा तितका अभिमान अवश्य राहील, परंतु परिस्थितीला आवश्यक तितका बदल आमच्या सामाजिक, सांसारिक स्थितींत तसाच वाङ्मयांतही झालाच पाहिजे, आणि तसाच तो होतही आहे. किंबहुना प्रारंभींच सांगितल्याप्रमाणें आमच्या सभ्यांच्या सामाजिक स्थितींत आवश्यक व्हावयास पाहिजे असा बदल, आमच्या वाङ्मयाच्या द्वारेंच होत आहे व त्या होणाऱ्या बदलाचा परिणाम पण वाङ्मयावरही होत आहे. हा अन्योन्याश्रय अन्योन्यांच्या उन्नतीस कारण होत आहे.

राशांभवन आणि विकसन हे जे दोन उन्नतीचे मार्ग सांगितले त्या दोन मार्गांपैकीं विकसनाचा मार्ग अत्यंत श्रेयस्कर हें तर उघडच आहे. मुलगा कपड्यांनीं लढ करून दाखवून कधींही चालावयाचें नाहीं. त्याला आंतूनच वाळसें येत गेलें पाहिजे. परंतु त्याला वाळसें येण्याला आरोग्य पाहिजे. आणि आरोग्य राखण्याला कपड्यालत्त्यांचीही आवश्यकता असते, निदान या सभ्यांच्या काळांत सभ्यांच्या समाजस्थितींत तरी खास असते. तेव्हां कपड्यालत्त्यांनीं दिसणारें वाळसेंही अगदीं निंद्य व त्याज्य असें नाहीं, त्याचाही उपयोग आहेच, खरें वाळसें चिरस्थायी होण्याला त्याचीही अवश्यकता असते.

आमच्या वाङ्मयाची उन्नति कोणत्या प्रकारानें होत आहे? ती डोंगरासारखी होत आहे कीं झाडासारखी होत आहे? माझ्या मतें झाडासारखी होत आहे. लेखकांच्या मनांत ज्ञानप्रसाराची इच्छा उद्दीप्त होऊन ग्रंथ निर्माण होत आहेत. त्यांच्यापैकीं कांहींचे प्रयत्न निरपेक्ष बुद्धीनें चालले आहेत. त्यांना वाह्य साहाय्य जवळ जवळ नाहींच; सरकारचा आश्रय नाहीं, युनिव्हर्सिटीचें पाठबळ किंवा उत्तेजन नाहीं, असें असतां ग्रंथ निर्माण होणें म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे. वंगाली वाङ्मयाची वाढ त्यांच्यांतील धनिकांच्या साहाय्यानें झाली व लोकसंख्या सात कोटि असल्यामुळें लोकाश्रयही बराच लाभला, परंतु आम्हांस तसल्या साहाय्यांचाही लाभ घेताचाच.

आतां या सर्व विवेचनाचा प्रस्तुतार्शी काय संबंध आहे हें पाहूं आमचें सभ्यां वाळसेंदार म्हणून नांवाजलेलें वाङ्मय हें खरोखर वाळसेंदार नव्हे. ही त्याच्या अंगाला सूज आली आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. ते म्हणतातः—"दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या वाढत चालली आहे यावर जाऊं नका. त्यांतली बहुतेक गचाळ व हानिकारक असतात, तेव्हां तीं न झालेलीं बरीं. रक्तदोषापासून गालांवर दिसणारी लाली आरोग्याची गुलाबी छटा असें समजूं नका. पंडुरोगानें आलेला पांढरेपणा हा गोरेपणा, किंवा कामिर्णानें आलेला पिंवळेपणा ही निंवकांति, असा भ्रम धरून बसूं नका." असें अट्टाहासानें आपणास आज कित्येक हितैषी बजावीत आहेत. परंतु

इतकें वजाविण्याची अवश्यकता उत्पन्न होण्याइतकी भ्रांति कोणास झाली आहे असें मला वाटत नाहीं. आह्मी वाल्यावस्थेंत असून थोरांशीं कुस्ती करण्याच्या वढाया मारूं लागलों आहों असें मुळींच नाहीं. आमचें ह्मणगें एवढेंच कीं, आह्मी आमच्या परिस्थितीच्या मानानें जितकें व जसें वाढणें शक्य व इष्ट तितके व तसें वाढत आहोंत. आमची वाढ खुंटली नाहीं, आह्मी खुरटत नाहीं, आमचें पाऊल मागें नाहीं, आमचें पाऊल चुकल्या मार्गावर पडलेलें नाहीं. आमच्या परिस्थितीच्या, आमच्या साधनांच्या, वैगेरे मानानें आह्मी योग्य मार्गानें व योग्य वेगानें पुढें चाललों आहों.आमच्या वाङ्मयसाम्राज्याचा विस्तार आह्मी दिवसानुदिवस वाढवीत चाललों आहों. जे जे प्रांत विस्तीर्ण व सुंदर करण्याची आवश्यकता दिसून येते तें ते प्रांत वाढवून सुंदर वनविण्यासाठीं आमचे प्रयत्न सुरू आहेत. यांचें प्रत्यंतर पहाण्यास लांव जावयास नको.

वाङ्मयाचे मुख्य हेतु सभ्यांच्या आपल्या वाङ्मयाच्या द्वारें आपल्या परिस्थितीला योग्य तसे सिद्ध होतात कीं नाहीं पहा. वाङ्मयाचे हेतु किंवा ह्यांचीं तत्वें तीनः १ शिक्षण देणें, २ मनोविकार किंवा विचार जागृत करणें, आणि ३ मनोरंजन करणें. या तीनही हेतूंच्या सफलतेसाठीं पुस्तकें निर्माण होताहेत कीं नाहींत ? रावसाहेव गणेश जनार्दन आगाशे यांनीं गतवर्षी वडोदें येथें भरलेल्या संमेलनाच्या वेळीं महाराष्ट्रवाङ्मयाची वाढ दाखविण्यासाठीं एक निवंध लिहून पाठविला. या निवंधांत त्यांनीं १९०८ सालापर्यंत निरनिराळ्या विषयांत पुस्तकसंख्या कसकशी वाढत गेली आहे हें दाखविलें आहे. मी त्यांतील आंकडे घेऊन आपणांस कंटाळा आणीत नाहीं. परंतु येथें एवढेंच म्हणतों कीं, वर सांगितलेल्या तीनही प्रकारच्या वाङ्मयांत सद्यःस्थितीला शक्य तेतकी भर पडत चालली आहे असें तो निवंध वाचला म्हणजे सहज समजेल. अमुक एका विषयासंवंधानें ग्रंथसंख्या अमुक व्हायला पाहिजे असें नक्की प्रमाण थोडेंच आहे. लोकांची वाचनाची अभिरुचि जसजशी वाढत जाते, तसतशी ग्रंथसमृद्धि होते. ज्या ग्रंथास मागणीच नाहीं केंवा असली तरी इतकी तुटपुंजी आहे कीं, सामान्य जनांना असले

ग्रंथ निर्माण करणें व प्रसिद्ध करणें शक्य नाहीं–ते ग्रंथ एकंदर वाङ्मय-दृष्ट्या जरी अवश्य असले, तरी ते निर्माण होण्यास श्रीमंत लोकांचेंच साहाय्य पाहिजे, त्याखेरीज वुडीत खर्च सोसून कोणी ते निर्माण करणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें व्यापार-व्यवहारांत, त्याचप्रमाणें या वाङ्मयाचे वावतींतही अर्थशास्त्राची मागणी व पुरवठा यावद्दलचा नियम लागू पडतो. आज आमच्या वाङ्मयांत नौकाशास्त्रावर ग्रंथ नाहीं, ही वाङ्मयाच्या महत्वाच्या दृष्टीनें मोठी उणीव आहे. परंतु ही उणीव भरून निघणें–आणि ती केवळ ग्राहकांच्या साहाय्यावर भरून निघणें–केवळ अशक्यच आहे. एक तर लिहिणारास साधनांची व स्वानुभवाची प्रतिकूलता; आणि दुसरें एखाद्यास अनुकूलता प्राप्त झाली, व त्यानें सर्व साधनें मिळवून ग्रंथ लिहिला तरी त्याचा उपयोग काय होणार? त्याला तो आंतवट्याचाच व्यापार होणार. राजाश्रयावांचून किंवा धनिकाश्रयावांचून असा ग्रंथ छापून प्रसिद्ध होणें जवळजवळ दुरापास्तच होय. परंतु असाही ग्रंथ एका गृहस्थानें लिहून छापवून तयार केला आहे हें केवढें आश्चर्य! शिक्षणप्रसाराची इच्छा हेंच या ग्रंथाच्या जन्मास कारण नव्हे काय? विशिष्ट धंद्यासंबंधाच्या वहुतेक पुस्तकांची हीच स्थिति होय. परंतु असे उपयुक्त ग्रंथ थोडे निघतात ह्मणून आमच्या वाङ्मयाची वृद्धि होत नाहीं, त्यांत कांहीं तात्पर्य नाहीं, असें ह्मणणें रास्त होणार नाहीं. लोकांस वाचनाची अभिरुचि लागली आहे. आपला पोटाचा धंदा करून उरलेल्या वेळांत ज्ञान संपादन करावयाचें तें मुख्यतः मनुष्य धर्मसंवंधीं ग्रंथ वाचून मिळवितो, तसेंच इतिहाससंबंधीं अगर चरित्रसंबंधीं ग्रंथ वाचून मिळवितो व कंटाळल्यास मनोरंजक ग्रंथ वाचून आपली करमणूक करून घेतो. यामुळें अर्थातच तसल्याप्रकारचे ग्रंथ इतर ग्रंथांच्या संख्येपेक्षां अधिक निर्माण होतात. एकंदर ग्रंथसंख्येच्या निदान एकतृतीयांश मनोरंजक ग्रंथ असतात हें आमच्याच वाङ्मयाचें "दुर्दैव" आहे असें नाहीं. जगांतील कोणच्याही देशांत हाच प्रकार दिसून यावयाचा. कोणत्याही सार्वजनिक पुस्तकालयाची नोंदणीवुकें पहा, त्यांत मनोरंजक पुस्तकें जितकीं वाचलीं जातात, त्यांच्या तिसरा हिस्साही इतर

पुस्तकें वाचलीं जात नाहींत असेंच आढळेल. यांत नवल कसलें? मनुष्य उत्सवप्रिय असतो, तसाच मनोरंजनप्रिय असतो. दिवसभर श्रम करून किंवा आपला व्यवसाय करून रिकामा वेळ आनंदांत घालवावयाचीं जीं साधनें असतात त्यांत वाचन–मनोरंजक पुस्तकांचें वाचन–हें एक साधन पुष्कळांच्या उपयोगी पडतें. तेव्हां इ० स० १८८४ सालापासून १९०८ सालापर्यंतच्या पावशतकांत झालेल्या ३४१६ पुस्तकांत नुसतीं काव्यें, नाटकें व कादंबऱ्या या तीन सदरांखालील पुस्तकें जर १२०० भरलीं तर त्यांत नवल नाहीं. इतर पुस्तकांपैकीं शालोपयोगी पुस्तकें वजा केलीं असतां बाकीचीं केवळ विविध विषयांचें ज्ञान आपल्या देशांत प्रसृत व्हावें या हेतूनेंच तयार झालीं असलीं पाहिजेत, हें अगदीं उघड आहे. मागणीकरितां म्हणूनच केवळ तीं अस्तित्वांत आलीं असें म्हणतां येत नाहीं. इतर पुस्तकांशीं तुलना करतां तादृश अशा पुस्तकांस मागणी नसावयाचीच. तरी पण लोकांत अशा विषयांची जिज्ञासा वाढत चालली आहे ही एक गोष्ट लक्ष्यांत घेण्याजोगी आहे. महाराष्ट्रवाङ्मयांत विशेषतः धर्मविषयक ग्रंथांची भर हल्लीं किती वेगानें पडत आहे हें पाहिलें म्हणजे तद्विषयक जिज्ञासा फारच वाढत चालली आहे असें दिसून येतें. भगवद्गीतेचीं भाषांतरें कितीतरी झालीं आहेत. उपनिषदांचीं भाषांतरें होत आहेत, वेदांचीं भाषांतरें निघूं लागलीं आहेत, शिवाय वेदांतसंबंधीं पुस्तकें किती तरी निघत आहेत, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांच्या पुस्तकांचीं भाषांतरें होत आहेत. नाहीं नाहीं ह्मणतां मराठ्यांच्या इतिहासाची सामग्री किती तरी प्रसिद्ध होऊं लागली आहे. शिवाय शास्त्रीय विषयावरही एखादा दुसरा ग्रंथ तयार होऊन बाहेर पडतच असतो. असले ग्रंथ शाळांतून चालत नाहींत, आणि त्याला गिऱ्हाईकही बेताचेंच; परंतु ग्रंथ बाहेर पडतात हें एक खरोखर सुचिन्ह आहे. ग्रंथकाराची ज्ञानप्रसाराविषयींची उत्सुकताच त्या ग्रंथाच्या जन्मास कारण होय. युनिव्हर्सिटींतून शिक्षण संपादून बाहेर पडलेल्या तरुणांस आतां मराठींत पुस्तकें लिहिण्याची इच्छा होऊं लागली आहे हेंही एक फार चांगलें सुचिन्ह आहे.

आक्षेपकांचा सारा मारा काव्यें, नाटकें व कादंबऱ्या यांवर असतो. त्यांचें ह्मणणें कीं पूर्वीच्या कालीं जशीं उपयुक्त पुस्तकें झालीं तशीं उपयुक्त पुस्तकें आतां होत नाहींत. आतां लिहिणारांचा मनोरंजक पुस्तकांवर भर फार, आणि तीं अगदीं गचाळ असतात. काव्यें गचाळ, नाटकें गचाळ, कादंबऱ्या गचाळ. या विषयावर मीं बोलणें हें फार कठिण काम आहे, परंतु मला एवढें बोलल्यावांचून राहवत नाहीं कीं आक्षेपक या त्रयींतील पुस्तकांचे डोक्यांवर जितका गचाळपणा लादतात तितका गचाळपणा त्यांच्या माथीं मारण्यास कांहीं कारण नाहीं. माझी तर अशी समजूत आहे कीं, वाङ्मयाच्या या भागांतही आमची प्रगति पुष्कळ झाली आहे. आमची काव्यरचना आतां पुष्कळच उन्नतावस्थेला आली आहे. महाकाव्यें अजून होऊं लागलीं नाहींत, परंतु जीं लहान लहान काव्यें आज मितीला प्रसिद्ध होत आहेत, तीं खरोखर कवींच्या ठिकाणीं प्रतिभेचें अस्तित्व दर्शविणारीं आहेत. भगवद्भक्तिप्रेरक जें काव्य तेंच तेवढें काव्य अशीच जर काव्याची व्याख्या धरून बसलें, तर गोष्ट निराळी. व्याख्याच संकुचित-अस्थानीं व अकारण संकुचित-केली, तर पुष्कळ जुनीं काव्येंसुद्धां काव्य या संज्ञेंतून गळतील. परंतु ज्याप्रमाणें 'राज्य' या शब्दाची आपली व्याख्या आतां फार विस्तीर्ण झाली आहे, 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्या ही विस्तीर्ण झाली आहे, त्याचप्रमाणें काव्य या शब्दाचीही व्याख्या विस्तीर्ण झाली आहे. कवीला अगम्य किंवा त्याज्य असा कोणताच विषय नाहीं ही समजूत आतां फैलावत चालली आहे, आणि ती यथार्थच आहे. कोमेजलेल्या फुलांपासून तों तालतमालादि वृक्षांपर्यंत, पिपीलिकादि कीटांपासून तों सिंहव्याघ्रांपर्यंत, अणुरेणूंपासून तों हिमालयापर्यंत, जलधीच्या अत्यंत खोल अशा प्रदेशापासून तों सर्वव्यापी नभोमंडलापर्यंत, सारांश अंतर्बाह्य चक्षूंस दृश्य अशा सर्व विषयांवर कवीच्या कल्पनांचें प्रावल्य चालून तो त्यांस वर्णनविषय बनवूं शकतो व त्यांपासून जगास बोध करूं शकतो ही समजूत अगदीं सार्वत्रिक होत चालली आहे, त्याला स्फूर्ति मात्र झाली पाहिजे.

हीच स्थिति नाटकांची आहे. नाटकें म्हणजे देवादिकांसंबंधींच असाव्याचीं असा जो एक ग्रह होऊन बसला होता, तो बदलत बदलत

राजादिकांवर आला आणि राजादिकांवरून आतां सामान्य व्यक्ति व सामान्य विषय यांवरही येऊन वसला. अद्भुत रसावरच भिस्त ठेवून तदनुषंगानें इतर रसांचा परिपोष करावयाचा अशी जी समजूत होती, ती जाऊन आतां अगदीं सामान्य जनांपैकींही नायक-नायिका घेऊन त्यांच्या चरित्रांवर नाटकें लिहिण्यांत कोणत्याही प्रकारची रसहानि होत नाहीं, सर्व रसांचा सुंदर परिपोष होतो, आणि त्यांपासून नीतिही शिकविता येते अशी प्रतीति आली आहे. नाटकांच्या वावर्तांत आणि नाट्याच्या वावर्तांत पुष्कळच सुधारणा झाली आहे आणि त्या विषयाच्या चर्चेचीं पुस्तकेंही गेल्या पांच चार वर्षांत पुष्कळ निघालीं आहेत. कला या दृष्टीनें तज्ज्ञांचें व रसिकांचें नाट्यरचनेकडे अधिक लक्ष्य लागत चाललें आहे. काव्य, नाटक व कथांत कोठें कोठें अनिष्ट प्रकार आढळतात, नाहीं असें नाहीं; परंतु तेवढ्यावरून त्यांस गचाळ म्हणून झिडकारून टाकण्याचें कारण मला दिसत नाहीं. काव्य-नाटकांविषयीं जें वर लिहिलें आहे तें कादंवऱ्या व गोष्टींसही एकंदरीनें लागू आहे.

निबंधात्मक लेख पूर्वापेक्षां संख्येनें कितीतरी अधिक व आंतील ज्ञानानें व माहितीनेंही फार प्रशंसनीय असतात. इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ होऊन त्या शिक्षणानें संस्कृत झालेल्या मंडळींनीं जीं कामें केलीं, जे ग्रंथ लिहिले, जे शोध लाविले, ते पहातां आजची मंडळी कांहींच करीत नाहींत, आजच्या मंडळींत शोधकबुद्धि नाहीं, वगैरे विधानें कित्येक आक्षेपक अगदीं अट्टाहासानें करितात. परंतु पूर्वीच्या शोधकांस आपले शोध करण्यास व ते जगापुढें मांडण्यास जे श्रम पडले, त्याच्या दसपट श्रम आजचे शोधक करीत आहेत. पूर्वीचे ग्रंथ लिहिण्यास एखाद्या दुसऱ्या पुस्तकाचें साहाय्य पुरें होतें. आयरिश् रीडरांसारख्या क्रमिक पुस्तकांतून किंवा तशाच दुसऱ्या पुस्तकांतून असलेले शास्त्रीय धडे भाषांतर करून दिल्यावरोवर लोक चकित होत, कां कीं त्यावेळीं सर्वच नवें. परंतु आज एक वातावरणासंबंधीं पुस्तक त्याहावयाचें, किंवा विद्युत्संबंधीं पुस्तक लिहावयाचें तर पन्नास पुस्तकांतून माहिती काढून ती संकलित करून द्यावी लागते. तशी ती दिली असली तर वरें, नाहीं तर एखादा तज्ज्ञ परीक्षक त्या लेखकाचे ताबडतोब वाभाडे काढतो !

जॉन् स्टुअर्ट मिल् यानें आपल्या काळच्या ग्रंथकारासंबंधानें आपल्या लेखनांत एकदां सहज कांहीं उद्गार काढले आहेत ते यासंबंधांत खरोखर ध्यानांत घेण्याजोगे आहेत. ते आपल्यापुढें मांडतों म्हणजे मागल्या पिढीच्या ग्रंथकारांपेक्षां आजच्या ग्रंथकारांना किती कठिण दिवस आले आहेत हें समजून येईल. सध्यांच्या काळीं एखाद्या विषयावद्दल ठाम मत बनविणें हें फारच कठिण आहे. हीच स्थिति मिल्ला आपल्या समकालीन ग्रंथकारांचे ठिकाणीं दिसली.

The inferiority of the present age is perhaps the consequence of its superiority. Scarcely any one, in the more educated classes, seems to have any opinions or to place any real faith in those which he professes to have. At the same time if we compare the writings of any former period with those of the present, the superiority of these is unspeakable. We are astonished at the superficiality of the older writers; the little depths to which they sounded any questions; the small portions of the considerations requiring to be worked at which those writers appear to have seen. It requires in these times much more intellect to marshal so much greater a stock of ideas and observations.

हा उतारा मीं आपल्यापुढें एवज्याचकरितां वाचून दाखविला कीं "सर्व काळीं मागल्यापेक्षां पुढच्यांत–समकालीनांत–कांहीं अर्थ नाहीं," असें म्हणण्याचा प्रघात असतो. परंतु तसा प्रघात पडण्यास अंशतः कारणें असतात तीं अशा प्रकारचीं असतात. परंतु पुढचे लोक दिवसानुदिवस अधिक शहाणे होतात हें मिल्चें विधान त्याच्या स्थितीसंबंधानें किती खरें आहे हें ध्यानांत घेण्याजोगें आहे. जॉन् स्टुअर्ट मिल व त्याचे वडील जेम्स मिल् या दोघांनीं इंग्रजी विचारार्चीं सूत्रें जवळजवळ एक शतकपर्यंत चालविलीं. परंतु आज मितीस जॉन् स्टुअर्टच्या तर्कशास्त्रांचे व अर्थशास्त्रांचे किती तरी धुडके उडत आहेत. मेकॉलेच्या एका निबंधांत बापा-

च्या खांद्यावर बसून दूर पहाणाऱ्या मुलाचें उदाहरण दिलें आहे. बापाच्या खांद्यावर बसून दूर पहाणाऱ्या मुलानें आपणास दूर दिसतें म्हणून बढाई मारूं नये व आपल्याच उंचीमुळें आपणास तें दिसतें असें समजूं नये, परंतु दूर दिसत असलें तर तें सांगूंही नये असें कोण म्हणेल? प्रत्येक पिढी मागल्या पिढीच्या खांद्यावर बसूनच दूरचें पहात असते. मागलें ज्ञान घेऊन त्यावरून पुढचे शोध करावयाचे हें अगदीं उघड आहे. आणि त्याबद्दल आपण मागल्यांविषयीं अत्यंत कृतज्ञताही दाखविली पाहिजे. मात्र त्या कृतज्ञतेच्या भरांत पुढच्यांस अगदींच तुच्छ म्हणून धुत्कारून देऊं नये. सध्यांच्या काळीं जीवनार्थ धडपड करण्यांत प्रत्येकाचा किती काळ जातो; जीवयात्रेला लागणारी सामग्री मिळविण्याला किती अट्टाहास करावा लागतो, हें सर्व ध्यानांत आणलें म्हणजे महाराष्ट्रवाङ्मयाच्या साम्राज्याचा विस्तार वाढविण्याकरितां धडपड करणाऱ्यांची खरोखर स्तुति केली पाहिजे. स्तुति न केली तरी त्यांच्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणून त्यांस हताश करणें तरी अगदीं गैर असें मला वाटतें.

आक्षेपकांचा मोठा आक्षेप हा कीं, सध्यां चांगलीं पुस्तकें फारच थोडीं किंवहुना मुळींच निघत नाहींत. एकतर हा आक्षेप पुष्कळसा निराधार आहे. परंतु त्यास अणुरेणुमात्र आधार असला, तरी त्याला इतकें महत्व देण्याजोगा तो नाहीं. चांगलें-अत्यंत चांगलें-हें केव्हांही थोडेंच असावयाचें. जर्मन कवि गअठे याचें एक फार सुंदर वाक्य आहे, तें आक्षेपकांनीं सदा लक्षांत धरावें. In this world there are so few voices and so many echoes; या जगांत ध्वनि फार थोडे, प्रतिध्वनिच फार ! प्राचीनकाळचें धर्मसंबंधीं वाङ्मय सोडून द्या. त्याबद्दल कांहीं बोलावयाचें नाहीं. परंतु इतर वाङ्मयांत " ध्वनि " किती आणि प्रतिध्वनि किती याचा विचार करा. कालिदास, भवभूति, जगन्नाथ पंडित, इत्यादि ध्वनि किती मोजतां येतील ? आणि त्यांचे प्रतिध्वनि किती झाले आहेत ? त्याचप्रमाणें आतां ऐकूं सुद्धां येत नाहींत असे किती नष्ट झाले असावे याचाही विचार करा. हींच स्थिति इतर सर्व विषयांच्या वाङ्मयासंबंधानें आहे. महाराष्ट्रवाङ्मयांत तरी काय ? ज्ञानेश्वरमहाराजांपासून तों

वाक्यवृत्तिटीकाकार हंसराजापर्यंत ध्वनि किती व प्रतिध्वनि किती ? सर्वांनीं वेदांत व भक्ति याच विषयावर ग्रंथ लिहिले किंवा देव व साधु यांचीं चरित्रें गाइलीं. भक्तिरसाची प्रेरक तेवढीच काय ती खरी कविता असें प्रतिपादन करणारांचें ह्मणणें गृहीत धरलें तरी ध्वनींची संख्या किती निघेल आणि प्रतिध्वनींची किती ? एकंदर सहाशें वर्षांत आठ ध्वनींपेक्षां अस्त ध्वनि नाहींत ! बाकी सर्व प्रतिध्वनि–त्या प्रतिध्वनींत कोणता किती वेळ टिकणारा एवढेंच तारतम्य पहावयाचें ! तसेंच सध्यांच्या काळचें, किंवा पुढच्या काळचें व्हावयाचें. सध्यांच्या काळींच तेवढे प्रतिध्वनि फार असें नाहीं.

हें हंसराजाच्या नंतरच्या वाङ्मयसमृद्धीसंबंधानें म्हणजे इंग्रजी शिक्षणाच्या योगानें ज्याला नवीन स्वरूप आलें अशा ग्रंथसंग्रहासंबंधानें झालें. हंसराज हे मागल्या कवींमधील शेवटले असें मी समजतों. त्यांची सर्व प्रवृत्ति वेदांताकडेच होती. त्यानंतर जे कवि झाले त्यांनीं संस्कृत काव्य-नाटकादिकांच्या भाषांतरापासून सुरुवात केली. अन्योक्ति व सुभाषितांचीं भाषांतरें केलीं. नंतर इंग्रजी कवींचे चुटके भाषांतर होऊं लागले. अद्यापि महाकाव्यें किंवा खंडकाव्यें करण्याकडे कवींची प्रवृत्ति झालेली दिसत नाहीं. तरी पण कवींच्या स्वानुभूतीचें प्रतिबिंब ज्यांत उतरलें आहे अशीं लघुकाव्यें पुष्कळ आणि सरस अशीं होऊं लागलीं आहेत. हें काव्याविषयीं झालें.

गद्यलेखनाचा प्रारंभ इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतर-रूपांतरांपासून झाला व आज मितीला तें कार्य चालू असून त्यांत विविध विषयांवर रचलेल्या अशा स्वतंत्र पुस्तकांचीही पुष्कळ भर पडत चालली आहे. गद्यवाङ्मयाचा जन्म इंग्रजी भाषेच्या प्रवेशानंतरच झाला असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यापूर्वी गद्यांत लिहिलेल्या बखरी, कैफियती वगैरे काय राहिल्या आहेत तेवढ्याच व मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें म्हणून जो पूर्वीचा पत्रव्यवहार अलीकडे प्रसिद्ध होतो आहे तो. या पत्रव्यवहारांतहि कांहीं पत्रें वाङ्मयांत येण्याजोगीं आहेत. परंतु तीं वाङ्मय म्हणून लिहिणारानें लिहिलीं नाहींत, आणि वाचणाराही वाचीत नाहींत. तेव्हां त्यांचा त्या दृष्टीनें येथें विचार करण्याची आवश्यकता नाहीं.

आमच्या अर्वाचीन वाङ्मयावर कित्येकांचा मोठा आक्षेप–फार मोठा आक्षेप–हा आहे कीं, तें आंग्लभाषेच्या छायेनें ग्रस्त आहे. इंग्रजी विचार व इंग्रजी प्रचार, यांची खांत रेलचेल असतें. हा आक्षेप अल्पांशानें खरा आहे. परंतु त्याला कित्येकांनीं जें नसतें महत्व दिलें आहे तें मात्र मी देऊं इच्छित नाहीं. कारण एकतर इंग्रजांचा, त्यांच्या सुधारणेचा व आपला इतका अभेद्य संबंध जडला आहे कीं, त्यांच्या आचारविचारांचा, शब्दांचा आणि भाषाप्रचारांचा प्रवेश आमच्या घरांत झाल्याखेरीज राहणें शक्यच नव्हतें आणि आज आपण आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या पुढच्या पिढीच्या पोषाखाकडे, आचरणाकडे, भाषणाकडे किंवा व्यापारव्यवहाराकडे पाहिलें तर हा प्रवेश किती झाला आहे हें आपणास सहज दिसून येईल. सध्यां आपल्याला इतर बाबींचा विचार कर्तव्य नाहीं, वाङ्मयापुरतें पहावयाचें आहे. त्या दृष्टीनें पहातां आमच्या भाषेवर इंग्रजी भाषेनें फार परिणाम केला आहे इतकेंच नव्हे, पण तो एकंदरीनें पहातां फार इष्ट असाच परिणाम आहे असें म्हणण्यास मला अणुमात्र दिक्कत वाटत नाहीं.

दोन राष्ट्रांचा नुसता शेजारसंबंध असला, तरी सुद्धां एकमेकांच्या भाषा–कोशांत, भाषाप्रचारांत व विचारांत किती तरी भेसळ होते. मग जेथें एक जेते म्हणून व शास्ते म्हणून आज जवळजवळ एक शतक दुसऱ्यांवर आपला अम्मल चालवीत आहेत, ज्यांनीं आपल्या प्रवेशाबरोबर अनेक हरहुन्नरांचा व विद्याकलांचा देशांत प्रवेश करून दिला, त्यांच्या भाषेंतले शब्द, त्यांच्या भाषेंतले प्रचार, आणि त्यांचे विचार हे जर दुसऱ्या भाषेंत शिरले, तर त्यांत नवल काय ? त्यांत आणखी विशेष गोष्ट ही कीं, आमचा बहुतेक काल त्यांच्या भाषेचा अभ्यास करण्यांत जातो ! स्वभाषेच्या शास्त्रोक्त अभ्यासास बाल्यांतलीं चार किंवा पांच वर्षें आणि बाकी सर्व आयुष्य इंग्रजीच्या अध्ययनास वाहिलेलें. अशा स्थितींत आह्मीं स्वभाषा कायम ठेविली. इतकेंच नव्हे, तर ज्यांनीं आम्हांस जिंकलें, जे आमच्यावर राज्य करतात, त्यांचें शब्दभांडार व विचारभांडार आह्मीं लुटून आपल्या भाषाकोशाची व विचारभांडाराची भर करीत आहों. आपलें वाङ्मय–ज्याला राजाश्रय

नाहीं व लोकाश्रयही तितकाच असें वाङ्मय–दिवसानुदिवस श्रेष्ठ वनविण्यासाठीं आह्मी मनःपूर्वक धडपड करीत आहों हेंच एक खरोखर आश्चर्यांतलें आश्चर्य आहे! ज्या भाषांना राजाश्रय नाहीं, विश्वविद्यालयाचा आश्रय नाहीं, त्यांना उन्नत दशेला न्यावयाचें, त्यांचें ग्रंथभांडार वाढवावयाचें, ही कांहीं लहान सामान्य गोष्ट नव्हे. आणि ती गोष्ट आज तशा अडचणीच्या स्थितींत आपण युरोपीय व इंग्रजी वाङ्मयभांडारें लुटून आणून साधीत आहों. इंग्रजी शब्द येतात, इंग्रजी भाषाप्रचार येतात, इंग्रजी विचारांचें मिश्रण फार होत चाललें ही ओरड कसली ? आपला कोश–आपला खजिना–वाढला पाहिजे, जेथें सांपडेल तेथून सोनें आणून भरलें पाहिजे. त्या वेळेस हें कोणाच्या घरचें सोनें, या सोन्यानें आपले घरचें मूळचें सोनें विघडेल असा विचार कोणी करतें काय ? सांपडलेला निधि कोठला व कसला असा विचार करून हातचा गमाविणारास कोणीही वेडयांतच गणील. भाषाकोशांत भर ही पडलींच पाहिजे. एके वेळीं–मराठीच्या अर्वाचीन वाङ्मयाच्या प्रारंभीं किंवा प्रारंभानंतर थोडेच दिवसांनीं ह्मणा–मराठी लेखकांवर संस्कृत शब्दांची भर करून जुनी शुद्ध मराठी विघडवून टाकल्याचा आरोप केला जात असे. हा आरोप करणारांत मुख्य स्थान मिशनरी व साहेब लोक यांनीं पटकाविलें होतें. शब्दाची जरूरी लागली कीं संस्कृत भाषाभांडारागारांतून शब्द घेऊन मराठींत योजिला कीं तो यांना कठिण वाटे व अर्थातच "Sanskritized Marathi" च्या नांवानें त्यांची ओरड सुरू होई. त्यांत दुर्दैवाची (त्यांच्या दृष्टीनें दुर्दैवाची परंतु आमच्या दृष्टीनें सुदैवाचीच) गोष्ट ही कीं, प्रथम प्रथम त्यांचा संबंध शास्त्रीमंडळींशींच आला यामुळें त्या काळीं आमची मराठी भाषा नको नको म्हणतां संस्कृत शब्दांनीं व भाषाप्रचारांनीं वरीच उठावून दिसूं लागली. जर का केवळ असंस्कृतज्ञ लोकांच्या व साहेब अधिकारी आणि मिशनरी लोकांच्याच तावडींत राहिली असती तर तिला केव्हांच निवळ वायवली स्वरूप आलें असतें. आज तें गाडें फिरलें आहे. वायबलाचें भाषांतर अगदीं विघडलें आहे असें त्यांचें त्यांस वाटून आतां त्यांचा मराठी

बायबल हळू हळू संस्कृत शब्दाच्या योजनेनें सुधारण्याचा खटाटोप सुरू झाला आहे !

संस्कृत शब्दांच्या मिश्रणानें मराठी भाषा विघडते ही हांकाटी जाऊन पुढें तिच्यांत इंग्रजी शब्दांचा व इंग्रजी भाषाप्रचारांचा वाजवी-पेक्षां फाजील प्रवेश होऊं लागला आहे अशी ओरड होऊं लागली. परंतु तीही ओरड लवकरच वंद होईल. कां कीं तसें होणें अगदीं अपरिहार्य इतकेंच नव्हे तर अत्यंत आवश्यक आहे असें दिवसानुदिवस अधिक अधिक प्रत्ययास येईल. शब्दकोशांत शब्द पाहिजे असले म्हणजे लेखकांची आणि राजभांडारांत नाणीं पाहिजे असलीं कीं राजाची स्थिति सारखीच होते. सोनें असेल त्याचें नाणें पाड, रुपें असेल त्याचें नाणें पाड, तांवें असेल त्याचें नाणें पाड. शेवटीं चामड्याचें नाणें पाड पण व्यवहार चालूं दे असें राजा म्हणतो. लेखक म्हणतो, मला माझें–माझ्या भाषेचें वाङ्मय वाढवून माझ्या देशवांधवांस ज्ञान द्यावयाचें आहे, त्यांना जागृति आणावयाची आहे, त्यांची करमणूक करून त्यांचा थकवा घालवावयाचा आहे. तेव्हां हें साधेल तो मार्ग मला स्वीकारला पाहिजे. नवीन विद्या हरण करून त्या भाषेंत आणून सोडावयाची पण शब्द नाहींत. शब्द वाढविले पाहिजेत, घे दुसऱ्याचे शब्द, मार त्याच्यावर आपला ठसा आणि कर त्यांना आपलेसे. एकदां रुळले कीं झाले ते आपले. तीच स्थिति विचारांची आणि भाषाप्रचारांची. जुने शब्द टाका. जुने भाषाप्रचार टाका, जुन्या विचारांचें नांव काढूं नका असें म्हणतें कोण ? जुने शब्द ठेवा, नवेही आणा पण शब्दकोश वाढवा. जुने भाषा-प्रचार ठेवा, नवेही आणा–ते आपोआप येत आहेत, त्यांना प्रतिवंध करूं नका. अर्थभेदाला त्यांचा उपयोग फार होतो. एकाच अर्थाचे भिन्न भिन्न शब्द झाले, तर त्यांचा उपयोग अर्थभेद व्यक्त करण्याकडे करा. आमचा खजिना फारच मोठा झाला वोवा, आतां हा कोणी नाहींसा करील तर वरें होईल अशी कोणी कधीं तक्रार करील काय ? तसेंच शब्दभांडाराचें आहे. तें वाढेल तेवढें चांगलें. पुष्कळ धंदे इंग्रजी राज्यावरोवर आपल्याकडे आले–आपणां ग्रंथकारांचा ज्याच्याशीं अहर्निश संवंध तो छापखान्याचाच धंदा घ्या. छापखान्यांत पाऊल टाकले

कीं आपल्याला शब्द कोणते ऐकूं येतात ते पहा. टाइप, मॅटर, प्रूफ, करेक्शन, मार्क, फिस्किट, टंपीन, फार्म, स्वॅचकट,-अशी किती सांगूं ? तेव्हां शब्दभांडारांत नवे शब्द आल्याने किंवा भाषाप्रचारांत नवे प्रचार आले, म्हणून भाषा बुडाली, भाषेचा नाश झाला, अशी ओरड करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. भाषाशुद्धि भाषाशुद्धि म्हणजे काय? भाषा हें साध्य नव्हे, साधन आहे हें विसरून जातां कामा नये. मराठी भाषेंतले जुने शब्द, जुने भाषाप्रचार अगदीं नष्ट होतील, पार जातील आणि सगळेच इंग्रजी शब्द आणि इंग्रजी वाक्प्रचार त्याची जागा घेतील हें मनांतसुद्धां आणूं नका. जुने राहून नवे येतील. भाषाकोविदांनीं व्याकरणें व कोश करून त्यांचा अर्थभेदाकडे उपयोग करण्याकडे लेखकांची वृत्ति वळवावी. माझें तर म्हणणें असें आहे कीं, आतां मराठी भाषेच्या कोशाची सुधारलेली आवृत्ति काढणारानें त्यांत निरनिराळ्या धंद्यांमुळें, रोगांमुळें, शास्त्रांमुळें मराठी भाषा बोलणारांच्या तोंडीं आलेल्या शब्दांचा समावेश केला पाहिजे. नवीन व्याकरणकारांनीं नवीन भाषाप्रचारांची व्यवस्था आपल्या व्याकरणांतून गेली पाहिजे. त्यांनीं ती केली नाहीं आणि व्याकरण विघडलें, भाषाशुद्धि गेली, अशी नुसती ओरड करीतच ते वसले तर त्यांची ओरड अरण्यरुदिताप्रमाणेंच होणार. ग्रंथसंग्रह वाढविण्याच्या प्रवृत्तीला जी भरती आली आहे ती भरती यांच्या आक्रोशानें कधींही थांबावयाची नाहीं. त्या भरतींत नवे भाषाप्रचार येणार व नवे शब्द येणार. ते आमच्या भाषेंत शिरून वसणार. हें अगदीं निःसंशय आहे. ज्या भाषेंतील शब्द व प्रचार आमच्या भाषेंत नकोत त्या भाषेकडे पहा. ' शुद्ध अँग्लोसॅक्सन पाहिजे ', 'शुद्ध अँग्लोसॅक्सन पाहिजे ' करतां करतां नॉर्मन लोकांच्या वेळेपासून तों पुढें किती कालपर्यंत फ्रेंच भाषेनें तिच्यावर आपला छाप मारला आणि लॅटिन भाषेंतील शब्द तर बहुतेक फ्रेंचच्या द्वारेंच इंग्रजींत प्रविष्ट झाले आहेत. फ्रेंच आचारांविचारांची छाप तर कित्येक शतकेंपर्यंत इंग्लंडवर होती आणि अद्यापपर्यंत आहे. त्याचप्रमाणें जर्मनानें आपल्या विचारांचीही छाप इंग्रजांवरच काय, परंतु युरोपांतील पुष्कळच भाषांवर व राष्ट्रांवर वसविली आहे. नुकती सुमारें पन्नास वर्षांच्या सुमाराची गोष्ट.

कार्लाइल व इतर कांहीं प्रासादिक लेखकांनीं जर्मन विचारभांडार इंग्रजींत आणलें, त्यासंबंधानें टेनच्या " इंग्रजी वाङ्मयाच्या इतिहासां "तून एक उतारा आपल्याला वाचून दाखवितों.

From 1780 to 1830 Germany has produced all the ideas of our historic age; and for half a century still, perhaps for a whole century, our great work will be to think them out again. The thoughts which have been born and have blossomed in a country, never fail to propagate themselves in the neighbouring countries and to be engrafted there for a season. That which is happening to us has happened twenty times already in the world.

तेव्हां इंग्रजी शब्द, इंग्रजी वाक्प्रचार येत चालले आहेत, त्यानें आपली भाषा व आपलें वाङ्मय दुष्ट होत चाललें आहे असें समजूं नका. पुष्ट व सुष्ट होत चाललें आहे असें समजून त्याला अधिक पुष्ट होण्यास उत्तेजन द्या. या भरण्यानें भाषेची शुद्धि नाहींशी होते ही समजूत चुकीची आहे. भाषेच्या व्याकरणकारांनीं, कोशकारांनीं व व्युत्पत्तिकारांनीं या नवीन भरण्यांतील शब्दांचा व वाक्प्रचारांचा इतिहास कायम ठेवावा हें त्यांचें काम आहे.

परकी भाषेंतले शब्द घेऊं नयेत, आपल्या भाषेंतलेच शब्द घेऊन त्यांच्यापासून नवे नवे शब्द तयार करावेत, परकी शब्द घेतल्यानें भाषाशुद्धि नाहींशी होते, वगैरे वाद आपणच इकडे घालतों आहों असें नाहीं. युरोपांतील तीन राष्ट्रें हाच वाद घालून आपल्या भाषेंत आलेले परकी शब्द हांकून देऊन आपल्या जुन्या भाषेपासून तयार केलेले नवे शब्द आणूं पहाणारी मंडळी त्यांच्यांत निघत आहेत, परंतु त्यांस यश येत नाहीं. खुद्द इंग्रजींतही अँग्लोसॅक्सन शब्दांचा व त्यांपासून नवे शब्द करून त्यांचा उपयोग करून परकी शब्द घालवावे असा प्रयत्न करणारे कांहीं लोक आहेत, परंतु त्या प्रयत्नास यश येत नाहीं. आपले जुने शब्द व प्रचार कायम ठेवून नवे शब्द व प्रचार आणल्यानें भाषेचा

फायदा कसा होतो हें इंग्रजीवरून पाहूं. इंग्रजी भाषेचा एक नवा छोटासा इतिहास नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यांतून घेतलेला हा उतारा आहे.

An independent nation, conscious of its strength, and not afraid of being overwhelmed by foreign influences, does well, therefore to welcome the foreign names of foreign porducts. It does not thus corrupt, but really enriches its language; and even when, as in English, it possesses a multitude of synonyms, partly native and partly foreign, for more or less, the same conceptions, this variety of terms is a great advantage; for the Genius of the language, which works more by making use of existing terms than by creating them, is enabled to give to each a different shade of meaning. Thus as Bradley points out, the subtle shades of difference of meaning, of emotional significance, between such pairs as *paternal* and *fatherly*, *fortune* and *luck*, *celestial* and *heavenly*, *royal* and *kingly* could not easily be rendered in any other language.

The English Language—Logan P. Smith, page 59.

सुदैवानें आम्हांला आमची संस्कृत भाषा आहे, तींतून आम्हांला वाटेल तसे शब्द तयार करून घेतां येतात, आमची मराठी-मातृभाषा आहे. तींतले शब्द आहेतच. पुढें मुसलमानी भाषा आली, परंतु तींतून घेण्याजोगें वाङ्मय किंवा दुसरें कांहींच नसल्यामुळें तिच्यापासून आम्ही आपल्या शब्दसंपत्तींत किंवा वाक्प्रचारसंपत्तींत फारच थोडी भर घातली. आतां इंग्रजी आली आहे हिच्याजवळून आम्हांस धंद्यांसंबंधानें पुष्कळच वाङ्मय व शब्द घेणें आवश्यक आहे. दोनही घेतलींच पाहिजेत. आम्हांला आमची संपत्ति वाढवावयाची आहे तर गत्यंतर नाहीं. तीं घेतलीं गेलीं पाहिजेत.

या इंग्रजी वाङ्मयानें आमच्या गद्यवाङ्मयास जन्म दिला. आमच्या जुन्या भांडारांत काय काय भरलें आहे तेंही पहाण्याची आम्हांला बुद्धि दिली. एखाद्या निधीवर जसा एखादा नाग वसतो, किंवा आपल्या कोठीच्या दाराशीं कृपण वसतो तद्वत् आमची स्थिति झाली होती, ती स्थिति गेली, इंग्रजी वाङ्मयानें आमचे डोळे उघडले. आमचा संस्कृत निधि आम्हांला दिसला व त्यांतील सुवर्णरत्नें आम्ही बाहेर काढून त्याचे दागिने घडवून गळ्यांत घालूं लागलों आहों. आमच्या मराठी कवींनीं भगवद्गीता, भारत, रामायण, भागवत यांवाहेर पाहिलें नाहीं. आतां एका बाजूस आम्ही ऋग्वेदापासून तों राजतरंगिणीपर्यंत सर्व ग्रंथसमुद्राचें पर्यटन करून त्यांतील रत्नांची. दुसरीकडे इंग्रजी किंवहुना सर्व युरोपीय भाषांच्या वाङ्मयांत अवगाहन करून त्यांतूनही जीं रत्नें सांपडतील त्यांचीं देशीकार लेणीं बनवून तीं आम्ही आपल्या असंस्कृतज्ञ व अनांग्लज्ञ बांधवांस अर्पण करूं लागलों आहों. हीं दोन्हीं प्रकारचीं लेणीं आमच्या महाराष्ट्रबांधवांच्या दरीच्या अलंकारभांडारांत अवश्य पाहिजेत. त्यांतलें कोणतें त्याज्य व कोणतें संग्रहणीय हें सर्वपरीक्षक काळ ठरवील. सध्यां आपलें काम भांडार वाढविण्याचें आहे. तसें भांडार वाढविल्याखेरीज आमची उन्नति होणें शक्य नाहीं. जो काय आपण आज विचार केला पाहिजे तो हाच कीं, हें भांडार वाढविण्यासाठीं अवश्यक तितके वीर पुढें येत नाहींत ते कसे आणावे ? आज जे यासंबंधांत काम करीत आहेत त्यांची संख्या अगदीं अपुरी आहे. ज्यांनीं खरोखर पुढें आलें पाहिजे ते अद्यापि पुढें सरसावत नाहींत. ते पुढें सरसावतील असें करण्यास चार साधनें आहेत.

१ युनिव्हर्सिटींत मराठी (अर्थात् ज्यांची ती मातृभाषा असेल त्यांना) आवश्यक विषयांत घातली गेली पाहिजे.

२ म्याट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंतचें सर्व शिक्षण मराठीच्याद्वारें झालें पाहिजे.

३ मराठीसाहित्यसभेसारख्या संस्थांनीं आमच्या मराठी कोशाची नवीनावृत्ति तयार करविली पाहिजे.

४ हिंदुस्थानांतील सर्व भाषांच्या प्रतिनिधींनीं सहकार्य म्हणून विविध शास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचा कोश कायम केला पाहिजे.

आजच्यासारख्या समिती व सभा यांनीं करावयाचीं हीं कार्यें आहेत. युनिव्हर्सिटीच्या व अधिकाऱ्यांच्या दाराशीं एकसारखें ठोठावीत राहिलें तरच पहिलीं दोन साधनें लाभतील. संस्थानिक, धनिक व राजे, महाराजे यांच्या दाराशीं द्रव्यासाठीं नेटानें ठोठावूं लागलें तर तिसरें साधन हातीं येणें शक्य आहे व मराठी, गुजराथी, बंगाली, हिंदी, तामील, तेलगू वगैरे भाषांच्या साहित्यसभांनीं सहवीर्य केल्यास चवथें साधन लाभेल.

जो ठोठावील त्यालाच दार उघडलें जाईल हा महामंत्र जसा इतर सगळ्या संबंधांत खरा आहे तसा तो याहीसंबंधांत खरा आहे.

मातृभाषेचा अभिमान आपण धरिला पाहिजे. तो ज्यांनीं धरला, त्यांच्या अभिमानामुळेंच मराठी भाषेला अर्थसमर्थता आली आहे. इतकी कीं, वाटेल तें शिक्षण तिच्याद्वारें देतां येईल, वाटेल तो विचार तिच्याद्वारें उच्चारतां येईल, वाटेल तो विकार तिच्याद्वारें जागृत करतां येईल व वाटेल तसें लोकमनोरंजनही तिच्याद्वारें करतां येईल. सारांश वाङ्मयाचे सर्व हेतु सिद्ध करण्याइतकें तिच्या अंगीं सामर्थ्य आलें आहे. त्या सामर्थ्याचा उपयोग आपण करून तिला अधिक समर्थ करणें हें आपल्या हातचें आहे; एवढ्याकरितां जे या कार्यक्षेत्रांत आज काम करताहेत त्यांना आणि जे अद्यापि मर्यादारेषेवर उभे राहून त्या काम करणाऱ्यांची नुसती मौज पहात आहेत त्यांना मी पुनः एकदां त्या उपनिषद्द्रष्ट्या ऋषिवरांच्या शब्दांनीं प्रार्थना करतोंः—

वाग्वैतत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति । स यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते । यावद्वाचोगतं तत्रास्य यथा कामचारो भवति यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते ॥

" वाणीच सर्व ज्ञान करून देते. तेव्हां वाणीची उपासना करा, जो वाणीला ब्रह्म समजून तिची उपासना करतो तो वाणीच्या साम्राज्यांत स्वतंत्र होतो. वाणीला ब्रह्म समजून उपासना करतो तोच असा होतो.



हें पुस्तक

पुणें येथें ' आर्यभूषण ' छापखान्यांत रा० नटेश अप्पाजी द्राविड यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

समरोक्त नीतिविषयक चार निबंध.

विविधज्ञानविस्तार मासिकपुस्तकांत

प्रसिद्ध झालेले एकत्र करून

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर करून सर्व प्रकारचे हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

मुंबई.

गणपत कृष्णाजी यांच्या छा० छा०

(१८८९)

किंमत ४ आणे.

(विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत मिळेल.)

सिसरोकृत नीतिविषयक चार निबंध.

अमलदारांचीं कर्तव्यकर्मे.

एशिया खंडाचा पश्चिम भाग रोमन लोकांच्या स्वाधीन होता, त्या वेळीं तेथला कारभार एक रोमन अमलदार पहात असे. दरवर्षीं नवीन अमलदारांची नेमणूक होत असे. या जागेवर सिसरोचा धाकटा भाऊ असतांना त्यानें इतक्या उत्तम रीतीनें काम केलें कीं, दुसऱ्या वर्षीं त्या जागेवर पुन्हा त्याचीच नेमणूक झाली. तिसऱ्या वर्षींही त्याचीच नेमणूक झाली. याप्रमाणें एकसारखीं तीन वर्षें एशियेचा कारभार त्यानें केला. या वेळीं रोममध्यें सिसरोचें वजन मोठें असल्यामुळें त्याच्या भावाची एशियेंत पुन्हा नेमणूक झाली हें खरें; तथापि तो भाऊही मोठा विद्वान्, धूर्त, व राज्यकारभारांत निपुण होता, यांत संशय नाहीं. त्याची तिसऱ्या वर्षीं नेमणूक झाली, त्या वेळीं सिसरोनें त्याला एक पत्र लिहिलें, त्याचें मराठी भाषांतर आह्मी आमच्या वाचकांस सादर करितों. त्यांतील कित्येक भाग हल्लींच्या कालमानास लागू नसल्यामुळें ते गाळले आहेत, व त्यांच्या ठिकाणीं * * * अशा फुल्या घातल्या आहेत. हें पत्र फार चमत्कारिक आहे. याचें एकंदर स्वरूप, तें वाचून पाहिल्यावर सहज ध्यानांत येण्याजोगें आहे; यास्तव या ठिकाणीं त्या विषयीं फार सांगण्याची गरज नाहीं.

"हें पत्र पोहोंचण्याच्या अगोदरच तुला समजलें असेल कीं, तुझ्या कारभाराला आणखी एक वर्षाची मुदत मिळाली आहे. ही बातमी तुला अनेक जासुदांकडून कळली असेलच;

तथापि मला वाटलें, आपणही तुला लिहावें. कारण एशियेंतून तुझी सुटका लवकर होईल असें दुसऱ्या कोणालाही जरी वाटलें नव्हतें, तरी मी तुला पत्रद्वारें तशाप्रकारची आशा दाखवीतच गेलों. यांत माझा हेतु केवळ तुला आशेवर ठेवावें असा नव्हता. तर मला खरोखर वाटत होतें कीं, मी माझ्या व दुसऱ्या अमलदारांच्या वशिल्यानें तुझी सुटका तिकडून लवकर करवीन. परंतु तसें झालें नाहीं यामुळें वाईट वाटावें हें स्वाभाविक आहे. तथापि राज्यकारभारासारख्या दुर्घट कामांत गुंतलेलीं आमचीं मनें दुर्दैवानें खचूं देतां किंवा उद्विग्न होऊं देतां कामास नये. आणखी दुसरें असें; ज्याच्या कसुरीनें अपाय झाला असेल त्याला त्यावद्दल दुःख व्हावें या न्यायानें पाहिलें असतां तुला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. कारण सर्व कसूर माझी आहे. तूं जातेवेळेस मला सांगितलें होतेंस व मागाहूनही पत्रद्वारें कळविलेंस, तरी गुदस्तां तुझ्या जागीं दुसऱ्या कोणाची नेमणूक मीं करविली नाहीं, ही माझी चूक आहे. माझ्या मनांतील उद्देश असा कीं, तूं आणखी एक वर्ष तेथें राहिलास तर आमच्याशीं मित्रभावानें असणाऱ्या राष्ट्रांचें कल्याण होईल, कित्येक व्यापाऱ्यांचा उद्धटपणा नाहींसा होईल, व तुझ्या सद्गुणांमुळें माझी कीर्ति वाढेल, यासाठीं आणखी एक वर्षपर्यंत तुझी नेमणूक मीं करविली. परंतु हें मीं बरोबर केलें नाहीं, असें मला वाटतें.

"याप्रमाणें उघड रीतीनें मी आपली चूक कबूल करितों. परंतु तिच्यावर हुशारीचें झांकण घालून तूं आपलें शहाणपण व सौजन्य हीं दाखीव. जर तूं राज्यकारभारांत मेहनत घेतलीस, व आपली सर्व अक्कल कीर्ति संपादन करण्याकडे खर्च केलीस, तर मी खरोखर सांगतों, कीं तुला आणखी एक वर्ष अम पडल्यानें आह्मांला अनेक वर्षें सुख होईल, व आमच्या मू

लांबाळांचाही नांवलौकीक होईल. यासाठीं तुला माझी अशी विनंती आहे कीं, तूं आपलें मन उदास होऊं देऊं नको, धीर सोडूं नको, व स्वतः कामाच्या रगाड्याखालीं चूर होऊन जाऊं नको. तर, हुशार रहा, व शेवटपर्यंत निश्चय सोडूं नको. तुझ्या हातीं जो कारभार आहे, त्यांत नशिबावर हवाला ठेवून चालणार नाहीं; त्यांत सदसद्विचार व हुशारी ह्यांचीच योजना झाली पाहिजे. एकाद्या महान् व घोर लढाईच्या प्रसंगीं जर तुझी मुदत वाढली असती, तर मी काळजींत पडलों असतों. कारण लढाई ह्मणजे नशिबाचा खेळ होय. त्यांत काय होईल हें सांगवत नाहीं. परंतु तुझ्या स्वाधीन असलेल्या अधिकारांत नशिबाचें फारसें चालत नाहीं; सर्व तुझ्या गुणांवर व शहाणपणावर अवलंबून आहे. शत्रु विश्वासघात करतील किंवा मित्र बंडावा करतील ही भीति नाहीं; पैशाची तंगी नाहीं; सामुग्रीची कमताई नाहीं; व सैन्यांत गडबड नाहीं. तथापि मोठमोठ्या शहाण्या लोकांनाही असे प्रसंग आले आहेत. असें झालें ह्मणजे, जसें एकाद्या उत्कृष्ट नाखव्याला कधीं कधीं तुफानाच्या झपाट्याला नमावें लागतें, तसें त्यांना दैवाच्या माराला नमावें लागतें.

"हल्लीं लढाईबिढाई कुठें कांहीं नाहीं. जिकडे तिकडे अत्यंत स्वस्थता आहे. या गोष्टीमुळें जरी सावध असणाऱ्या सुकाण्याला आनंद होतो, तरी गाफिल सुकाण्याला त्यापासून हानि झाल्यावांचून रहाणार नाहीं. तुझ्या अमलांत दोन प्रकारचे लोक आहेत. एक, तिकडचे मूळचे रहिवासी; हे पृथ्वींतील सर्व लोकांमध्यें सुधारलेले व सुशिक्षित आहेत. व दुसरे, इकडून गेलेले रोमन लोक; हे वसुलाचे मक्ते घेऊन किंवा व्यापा-

र करून श्रीमंत झालेले आहेत; व माझ्या कारकीर्दींत आपल्याला नफा झाला असें ते समजतात, ह्मणून मजवर लोभ ठेवतात. या लोकांमध्यें बऱ्याच भानगडीचे वाद असतात; त्यांपासून मोठे अन्याय व जुलूम होतात, व कधीं कधीं मारामाऱ्याही होतात. यामुळें तुला कामाची रगड असेल, हें मी जाणून आहें. हें काम मोठ्या महत्त्वाचें आहे व यांत शहाणपण फार लागतें, हें मला माहीत आहे. ह्मणूनच मी तुला पुन्हा एकवार सांगतों कीं, हें काम दैवानें होणारें नव्हे; याला शहाणपणच पाहिजे. तूं आपल्या मनाचें नियमन केलेंस तर तुझ्या अमलांतील लोकांच्या मनावर दाब ठेवण्याला तुला किती सुलभ जाईल! मनाचा निग्रह करून तें लगामीं ठेवण्याचें काम फार दुर्घट आहे; व दुसऱ्यांना तें होणार नाहीं. परंतु तुला संवयी आहे; तुझा स्वभाव तसाच आहे; दुसऱ्याचें मन न दुखवितां त्यांना मर्यादेंत ठेवण्याचे तुझ्या अंगीं चातुर्य आहे; व तुला शिक्षणही अशा प्रकारचें मिळालें आहे कीं, तेणेंकरून कोणी कितीही दुराचारी असला तरी त्याला मार्गावर आणण्याचें सामर्थ्य तुला प्राप्त झालें आहे. द्रव्यलोभ, ख्याली-खुशाली इत्यादिकांविषयीं स्वतःतुझ्या मनाचा जर निग्रह असला-आणि तो आहे—तर एकाद्या दगलबाज व्यापाऱ्याला किंवा लुटारू मक्तेदाराला दाबांत ठेवायाला कसली भीति आहे! तुझें असें आचरण पाहून ग्रीक लोकांना सुद्धां वाटेल कीं, हा कोणी तरी पुराणपुरुष किंवा ईश्वरी अवतार आह्मांवर राज्य करण्यासाठीं आला आहे.

" मी तुला या संबंधानें लिहितों याचा उद्देश तूं वर लिहिल्याप्रमाणें वागावेंस ह्मणून नव्हे, तर त्याप्रमाणें तूं आजपर्यंत वागत आला आहेस, व ह्मणोंही तुझें वर्तन तसेंच

आहे, याबद्दल त्वां आनंद मानावा हा आहे. कारण ज्यानें तीन वर्षें एशियेंत पूर्ण अमल बजावून तेथील पुतळे, चित्रें, सोन्यारूप्यांचे संच, उंच उंच वस्त्रें, दासदासी, सुंदर सुंदर स्त्रिया, द्रव्य, इत्यादि तिकडे विपूल असणाऱ्या कोणत्याही वस्तूंच्या नादीं न लागून, आणि संयमन व परिमिताचार करून आपल्या मनाचें चलन होऊन दिलें नाहीं, त्याची किती वहावा करावी! आणि पुनः हें सदाचरण, ही नियत-वृत्ति, व ही विमलता, हीं अंधारांत झांकलीं न राहतां, सर्व एशिया खंडाच्या नजरेस पडावीं व सर्व लोकांच्या व राष्ट्रांच्या कानांत गर्जावीं, यापेक्षां दुसरें काय पाहिजे? तुझ्या स्वाऱ्या पाहून तेथील लोकांना धास्ती वाटूं नये; तुझ्या खर्चामुळं त्यांना ददात लागूं नये; तुझ्या आगमनानें त्यांना भीति वाटूं नये; तूं जाशील तिकडे सर्वांना आनंद च आनंद व्हावा; हा प्रजापीडक नव्हे, तर आपला संरक्षक आहे, असें मानून प्रत्येक शहरानें तुझें आगतस्वागत करावें; हा दगेबाज चोर नव्हे, तर आपला पाहुणा आहे असें मानून प्रत्येक कुटुंबानें तुझी मान्यता व बोळवण करावी; या पलीकडे प्रतिष्ठा व कीर्ति ती कसली राहिली?

"तुला अनुभव आलाच असेल कीं, वर सांगितलेले सद्गुण केवळ तुझ्याच अंगी असले पाहिजेत इतकेंच नाहीं, तर तुझ्या हाताखालच्या सर्व कामदारांनींही त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे. आमच्या मित्रांच्या, आमच्या लोकांच्या, व आमच्या देशाच्या हितासाठीं त्यांहीं झटलें पाहिजे.

"ज्या लोकांना तूं आपल्या खासगी तैनातींत ठेविलें आहेस, किंवा जे नेहमीं तुझ्या स्वारींत फिरणार, त्यांच्या सर्व कृत्यांबद्दलच नव्हे, तर त्यांच्या सर्व ह्मणण्यांबद्दलही तूं जबाब-

दार आहेस. परंतु याविषयीं फार लिहायाला नको. तुझ्या बरोबर लोक आहेत ते सुमार्गानें चालतील तोंपर्यंत तुझ्या कुपेस पात्र होण्यासारखे आहेत. त्यांतून कोणी तुझ्या अब्रूची चाड बाळगीत नसला, तर त्याला सहज ताळ्यावर आणतां येईल. इतकें झालें तरी, तुझ्या गैरमाहितीमुळें कोणी आपमतलबी मनुष्यांनीं तुला फसवून तुझ्या औदार्याचा आश्रय केला असेल, असें अनुमान करणें साहजिक आहे. त्यांचा तुला संशय आला नसेल. कारण मनुष्य जितका जितका स्वतः सद्गुणी असतो, तितका त्याला दुसऱ्याच्या दुर्गुणांचा संशय कमी येतो.

" मागील दोनवर्षांप्रमाणें या वर्षीही निष्कलंकपणानें वागून वाहवा करून घे. व्यासंग व सावधगिरी पूर्वीपेक्षां अधिक ठेव. सर्वांचें ऐकून घे; परंतु मतलब साधण्याच्या हेतूनें कोणी दुसऱ्याची चुगली किंवा खोटसाळ कागाळी करील तर मात्र कर्णद्वार बंद कर. तुझे मोर्तब ज्याच्या त्याच्या हातीं देऊं नको. ते जिवापलीकडे ठेव. शिपाई प्यादे ठेवणें ते पाहून ठेव. त्यांना निरुद्योगी ठेवूं नको त्यांच्या हत्यारांवरून तुझी सत्ता दिसून यावी, त्यांचा जुलूम दिसूं नये, असें कर. सारांश, तुझ्या मुलखांतील सर्व प्रजेच्या कल्याणाची, त्यांच्या मुलाबाळांची, त्यांच्या अब्रूची व त्यांच्या सौख्याची तुला किती चाड आहे, हें सर्व प्रदेशाला समजून येऊं दे, सर्वांना महशूर होऊंदे, कीं तुला समजलें तर, लाच व फरमास देणारा व घेणारा या दोघांनाहीं सारखें शासन होईल.

"परंतु यावरून तुझ्या हाताखालच्या नोकरांना तूं फार सक्तीनें किंवा विषम भावानें वागवावें, असें माझें ह्मणणें नाहीं. गेल्या दोन वर्षांत ज्यांच्या धनलोभाचा तुला संशय आला

नसेल, त्यांजवर किंवा त्यांच्यासारख्या मनुष्यांवर कसलेंही काम सोंपविण्याला हरकत नाहीं. परंतु ज्यांवर तुझी इतराजी झाली असेल, किंवा ज्यांविषयीं तूं कांहीं वाईट ऐकिलें असशील, त्यांला कसलेंच काम सांगूं नको, व तुझ्या अब्रूला धक्का लावण्याचें साधन त्याला करून देऊं नको. मला माहीत नाहीं असा तिकडचा कोणी मनुष्य तुझ्या फार घसणीचा झाला असला, तर त्याजवर कितपत विश्वास ठेवावा याचा नीट विचार कर. त्यांच्यांत भले व योग्यतेचे लोक नाहींत असें मी ह्मणत नाहीं ; तसे पुष्कळ अहेत. परंतु आपण सावध रहावें तें बरें. कारण प्रत्येक मनुष्याचा स्वभाव कपटवेषाच्या अनेक घडयांमध्यें गोपित असतो ; व त्यावर, ह्मणतात तसें, परोपरीच्या पडद्यांचें आच्छादन असतें. त्याची वृत्ति, त्याच्या भिवया, त्याचे नेत्र, व बहुशा त्याची चर्या हीं सर्व मायावी असतात, व त्याच्या बोलण्यांत खरेपणा मुळींच नसतो. तूं तिकडच्या लोकांना अगदीं परकी आहेस, ह्मणून आपला कार्यभाग साधण्याकरितां ते तुझ्यावर लोभ ठेवतों असें दाखवितील. परंतु तुझा खरा हितचिंतक त्यांत क्वचितच सांपडेल. कारण, तूंच पहा, ते लोक एकाद्या खासगी मनुष्याची फारशी परवा बाळगीत नाहींत, परंतु अमलदारांच्या मात्र मागून नाचतात, हें आश्चर्य नव्हे काय ? असो. पण असल्या लोकांमध्यें जर स्वहितापेक्षां तुझ्यावर अधिक निष्ठा ठेवणारा कोणी आढळला, तर त्याला तूं मोठ्या उत्सुकतेनें आपल्या मित्रमालिकेंत गोंव. पण तसा कोणी नसला तर मात्र असल्या लोकांपासून राहवेल तेवढें दूर रहा. कारण ते काय करतील याचा नेम नाहीं. पैसा मिळविण्याच्या सर्व युक्ति त्यांना माहीत अहेत. ते जें कांहीं करितात तें सर्व पैशासाठीं ; व ज्याच्याशीं निरं-

तर संबंध ठेवायाचा नाहीं, त्याच्या मताविषयीं ते बेफिकीर असतात.

"तसेंच थोडे लोक खेरीज करून बाकीच्या ग्रीक लोकांशीं संबंध ठेवायाचा तो मोठ्या सावधगिरीनें ठेविला पाहिजे. कारण ते बहुधा ठक व विश्वासघातकी असतात; व सदा पराधीन असल्यामुळें हांजी हांजी करण्याच्या कलेंत ते फार कुशल झाले आहेत. त्यांना उदार मनानें वागव. त्यांच्यांतील उत्तम असतील त्यांच्यांशीं स्नेह कर, व त्यांना तुझ्या घरीं बोलाव. परंतु त्यांच्याशीं अतिसख्य मात्र करूं नकोस; तें बिनधोक न व्हे. कारण उघडपणें आमच्या इच्छेविरुद्ध जाण्याची जरी त्यांची छाती नाहीं, तरी ते आमचाचसा काय, पण स्वकीयांचा देखील मत्सर करितात. रोमन अमलदारापुढें हूं कीं चूं करण्याला जरी त्यांची माय व्याली नाहीं, तरी मनांतून ते आमचाच नव्हे, तर आपल्या लोकांचा देखील द्वेष करितात. * * * *

"पण, काय असेल तें असो, लिहितां लिहितां माझा झोंक, मी हुकूम करीत आहें, असा दिसूं लागला. पत्र लिहायाला बसलों, त्या वेळीं तुला हुकूम करण्याचा माझा उद्देश मुळींच नव्हता. कारण, जो मजपेक्षां विद्येनें कमी नाहीं, व ज्याचा अनुभव विशेषेंकरून अशा प्रकारच्या सर्व कामांत माझ्यापेक्षां अधिक आहे, त्याला "असें कर व असें करूं नको" असें मीं काय म्हणून सांगावें? परंतु मला वाटलें, तूं करीत आहेस त्याला माझी पूर्ण मंजुरी आहे असें तुला समजलें तर तुला बरें वाटेल; म्हणून लिहिलें आहे. आतां तुझा बोज राहण्यासाठीं तूं काय केलें पाहिजे तें सांगतों.

"प्रथम, स्वतः तुझें आचरण शुद्ध व परिमित ठेव; पदरच्या लोकांना निरभिमानानें व मर्यादेनें वागव, स्नेह्यांची निवड

करतांना सावध व पगदस्ती रहा; गृहकार्यांत व्यवस्थितपणा व तालामाला राख. या नियमांस अनुसरून तुझें वर्तन असलें ह्मणजे तूं कितीही सख्तीनें कारभार केलास, व तुझे हुकूम कितीही जरब असले, तरी तुला कसलीही धास्ती बाळगायाला नको.

"तुझें न्यायदर्शन सख्त करडेपणाचें असलें पाहिजे; तें निर्विकार व अचल टेविलें पाहिजे; व त्याला शिफारशीचें वारें लागतां कामास नये. परंतु फक्त तूंच हुशारीनें व निःपक्षपातानें न्याय करून फारसा उपयोग होणार नाहीं. तुझ्या हातास्वालच्या कामगारांनींही तसेंच केलें पाहिजे. मला वाटतें, एशियेच्या राज्यकारभारांत न्याय प्रकरणासारखें दुसरें बहुविध काम नाहीं. ह्मणून त्यांत स्थैर्य व गांभीर्य हीं अवश्य असलीं पाहिजेत; व तीं पक्षपातापासून दूर असलीं पाहिजेत. इतकेंच नाहीं, तर पक्षपाताच्या संशयाच्याही पलीकडे असलीं पाहिजेत. तसेंच सुनावणीच्या वेळीं सौजन्य, चौकशीच्या वेळीं शांतता आणि विचार, व न्याय करतांना समदृष्टि हींही असलीं पाहिजेत.

"याच सद्गुणांनीं आक्टेव्हियस नुक्ताच लोकप्रिय झाला. पहिल्यानें त्याच्या कारकीर्दींत न्यायसभेंत असणाऱ्या शिपायांस काम नाहींसें झालें. कारण, प्रत्येक फिर्यादीला किंवा प्रतिवादीला पाहिजे तें व पाहिजे तितकें बोलण्याची मोकळीक मिळाली. हा विनयीपणा कदाचित् अतिशय झाला; परंतु आक्टेव्हियसाची बुद्धि स्थिर असल्यामुळें, त्याची एकदां खात्री झाली ह्मणजे कोणाच्यानें ती ढळवत नसे, ह्मणून फारशी भीति नव्हती. ज्या लोकांनीं दुसऱ्यांची मालमत्ता जुलमानें बळकाविली होती, त्यांना ती मालकांस परत द्यावी लागली; व ज्या अमलदारांनीं अन्यायाचे निवाडे दिले होते, त्यांना जशास तसें मिळालें.

"जेथें इतका उन्माद, इतकें अमर्याद स्वातंत्र्य, आणि इतका

अनावर स्वेच्छाचार हीं वास करतात, जेथें असंख्यात अमलदार आहेत, जेथें एवढें मोठें सैन्य आहे, इतकी मोठी कुमक आहे, सेनेंत सभेचा अधिकार इतका मोठा आहे, अशा रोम सारख्या राजधानींत जर अशा प्रकारची सौम्यवृत्ति लोकमान्य झाली, तर एशियेंत, जेथें आमचे इतके लोक, इतकीं शहरें व इतकीं संस्थानें एका मनुष्याच्या कह्यांत असतात, जेथें न्यायसभा नाहीं, सेनेट सभा नाही, जनसभा नाहीं, व दुसरा इलाज नाहीं, तेथें मुख्य अमलदाराची सुजनता कितो गोड वाटेल? यासाठीं जो खरा थोर आहे, जो अंगस्वभावानें दयाशील आहे, ज्याचा दयाशीलपणा विद्येनें व अत्युत्तम कलांच्या अभ्यासानें वृद्धिंगत झाला आहे, त्यानें आपला अधिकार अशा रीतीनें चालवावा कीं, त्याच्या शिवाय दुसऱ्याचा अमल आपल्यावर नसावा असें त्याच्या हाताखालच्या लोकांना वाटावें.

"दुसऱ्यांवर जे अमल करितात त्यांचें सर्व लक्ष एका गोष्टीकडे असलें पाहिजे; म्हणजे आपल्या प्रजेला होईल तितकें सुखी राखण्याकडे त्यांचे सर्व प्रयत्न असावे. हा नियम राज्यकर्त्यांनाच लागू आहे असें नाहीं. आपल्या स्वाधीन असलेल्या प्राण्यांचें हित करून त्यांना होईल तेवढें सुख द्यावें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे; मग ते प्राणी स्वतंत्र जन असोत, गुलाम असोत किंवा मुकीं जनावरें असोत. या संबंधानें तूं फार हुशारी ठेविली आहेस असे सर्वमान्य आहे, याचा मला मोठा आनंद आहे. तुझ्या अमलांतील संस्थानांनीं नवें कर्ज केलेलें नाहीं; कित्येक शहरें कर्जाखालीं चुरडून गेलीं होतीं, त्यांचें कर्ज तूं वारलेंस: मोडकळीस आलेल्या व उद्ध्वस्त झालेल्या अनेक शहरांचा तूं जीर्णोद्धार केलास; तुझ्या प्रांतांत कोठें बैदाबखेडा नाहीं;

राज्यकारभारांत सुज्ञ लोकांचा सल्ला घेण्याचो तं तंजवीज ठेविली आहेस; तुझ्या प्रांतांतील कित्येक भागांतं रक्तपात व लुटालूट चालत होती, ती बंद केलीस; संपूर्ण प्रदेशांत स्वस्थता केलीस; चोर व दरवडेखोर यांना पिटाळून लावलेंस; श्रीमंत लोकांची विनाकारण नालस्ती व कुचाळी करणारांचीं तोंडें बंद केलींस; करांचें ओझें सर्व लोकांवर सारखें पडावें असें केलेंस; लहान थोरांस तुझी भेट सहज होते; सर्वांच्या फिर्यादी ऐकण्याला तूं तयार असतोस; गरीब व निराश्रित लोकांना तुझ्या दरवारांतच नव्हे, तर, तुझ्या घरांत व निजण्याच्या खोलींत देखील मुक्तद्वार असतें; सारांश, तुझ्या राज्यांत डंश व दयाहीनता हीं मुळींच नाहींत; पहावें तिकडे सदयता, कोमलता, व भूतदया ह्या भरलेल्या आहेत.

"आमच्या माजी अमलदारांनीं वसविलेल्या अन्याय्य, दुःसह, व आह्मांला लांच्छन आणणाऱ्या करापासून तूं एशियेला मुक्त केलेंस, त्या वेळीं किती मोठें काम केलेंस! एक बडा गृहस्थ उघडपणें फुरकुर करतों कीं, सार्वजनिक प्रदर्शनासाठीं पैसा जमा करूं नये असा तूं हुकूम फर्मावलास, तेणेंकरून आपलें दहालक्ष रुपयांचें नुकसान झालें. तूं कांहीं गैर केलेंं नाहींस. कारण रोममध्यें प्रदर्शन करण्याकरितां वर्गणी जमविण्याची चाल जर तशीच राहिली असती, तर किती अमर्याद रकमा उभ्या झाल्या असत्या!* याबद्दल आमच्या लो-

* रोमन अमलदारामध्यें अशी चाल पडून गेली होती कीं, त्यांनीं जेथें कारभार करण्याकरतां जावें, तेथल्या अपूर्व चिजा, सोन्यारुप्याचे संच, पुतळे, तरत-हेचीं भांडीं वगैरे मिळेल तें धुवाडून आपल्या बरोबर रोम येथें घेऊन जावे, व तेथें त्यांचें

कांची कुरकुर मीं जेथल्या तेथेंच खुंटून टांकली. मीं काय केलें, कीं ज्या वेळीं माझ्या प्रांतांतील संस्थानांनीं माझ्या स्मरणार्थ एक देवालय व पुतळा उभारण्यासाठीं पैसा खर्च करण्याचा ठराव केला, त्यावेळीं—जरी माझ्या गुणांमुळें त्यांनीं आपण होऊन स्वसंतोषानें तसें केलें होतें, जरी "देवालय किंवा पुतळा उभारण्याकरितां अमलदारांना पैसाघेतां येतो" असा स्पष्ट कायदा होता, जरी त्या स्मारक कृत्यापासून माझा स्वतांचा कांहीं नफा नसतां उलटी रोम शहराला शोभा यावयाजोगी होती, जरी त्या देणगीचा स्वीकार केल्यानें मेठिपणाला बट्टा येत नव्हता, किंवा कायद्याची हरकत नव्हती,—तरी मीं तिचा स्वीकार केला नाहीं. कां तर, जे अमलदार असल्या देणग्यांस लायक नाहींत, किंवा ज्यांना त्या घेण्याला कायद्याचा प्रतिबंध आहे, त्यांना त्या न मिळाल्यास वाईट वाटूं नये.

"याकरितां तूं वागतो आहेस त्याप्रमाणेंच वाग; आणि तन मन एक करून आपल्या अमलांतील लोकांवर प्रीति करीत जा; हरएक प्रकारानें त्यांचें संरक्षण कर; व त्यांना देववेल तितकें सुख देण्याची इच्छा धर.

"दैवगत्या तुझी नेमणूक आफ्रिकन्, स्पानियर्ड, किंवा गॉल सारख्या रानटी व क्रूर लोकांवर जरी झाली असती, तरी त्यांच्या हितासाठीं झटून त्यांचें कल्याण तुला वृद्धिगत

प्रदर्शन करावें; आणि अशा रीतीनें लोकांची मर्जी संपादन करावी. जेव्हां सिसरोच्या भावानें असा हुकूम केला कीं, असल्या प्रदर्शनासाठीं कोणीं कांहीं देऊं नये, तेव्हां सहजच अमलदार नाखूश झाले, व रोमच्या लोकांना मौज पहाण्याला मिळण्यास बंद झाल्यामुळें तेही कुरकुर करूं लागले- याला सिसरोनें काय उपाय केला, हें त्यानें आपल्या पत्रांत पुढें सांगितलें आहे.

करावें लागलें असतें. परंतु ज्यांच्या मध्यें सुधारणा आहे, इतकेंच नाहीं, तर ज्यांच्या पासून दुसऱ्या लोकांना सुधारणा प्राप्त झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं, अशा लोकांवर जेव्हां आपण राज्य करितों, तेहां त्यांचें उसनें अगत्य फेडावें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे. जरी मी इतकीं कामें केलीं आहेत, कीं आळस व उतावीळपणा हे माझ्या अंगीं कोणीं लावूं शकणार नाहीं, तरी ती सर्व कामें मीं ग्रीक लोकांच्या ज्या कांहीं विद्या शिलक राहून परंपरेनें चालत आल्या आहेत, त्यांचा अभ्यास करूनच केलीं आहेत, असें कबूल करायाला मला ह्मातारपणीं कांहीं लाज वाटत नाहीं. मनुष्यमात्रा-बरोबर न्यायानें वागलें पाहिजे हें तर असूं द्या, पण या लोकांचें उपकार आमच्यावर झाले आहेत ; यासाठीं ज्यांनीं आह्मांला ज्ञान दिलें त्यांच्याच कल्याणाकडे त्या ज्ञानाची योजना करण्याची उत्सुकता धरून आपण उतराई व्हावें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे. महाविख्यात ज्ञाता प्लेटो असें ह्मणत असे कीं, जेव्हां विद्वान व ज्ञाते पुरुष राज्य करूं लागतील, किंवा जेव्हां राज्य करणारे विद्या व ज्ञान यांच्या अभ्यासाकडे आपलें लक्ष लावतील, तेव्हांच प्रजेला सुख होईल. याचा अर्थ इतकाच कीं, राज्य सुरक्षित राहण्याला राज्य करणाऱ्या पुरुषाच्या अंगीं विद्या व ज्ञान यांचें मेलन झालें पाहिजे. पुढें कदाचित् आमच्या अखंड राज्यामध्यें असें सर्वत्र होईल; पण हल्लीं निदान एका प्रांतांत तरी तसें आहे. ह्मणजे ज्यानें बालपणापासून आपला बहुतेक काळ विद्या व ज्ञान संपादन करण्याकडे खर्च केला आहे, अशा पुरुषाच्या हातीं त्या प्रांतातील मुख्य अधिकार आहे. *

* सिसरोनें आपल्या भावाची ही स्तुति केली आहे हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

"एका गोष्टीविषयीं तुला दोन शब्द सांगितले पाहिजेत. त्या प्रांतांतून येणारे सर्व लोक तुझ्या सद्गुणांची, तुझ्या प्रामाणिकपणाची, व तुझ्या सदयतेची वाखाणणी करितात; परंतु तुझ्या अंगीं एक वाईट गुण आहे असें ते सांगतात; तो रागीटपणा होय. क्रोध येणें हें साधारण संसारामध्येंही क्षणिक बुद्धिच्या व हलक्या मनाच्या पुरुषाचें लक्षण आहे. परंतु राज्यकारभार चालविणाऱ्या पुरुषाची प्रकृति तापट असली ह्मणजे त्यासारखें दुसरें अनिष्ट नाहीं. आतां, क्रोधाचें स्वरूप कसें आहे, व त्याजविषयीं विद्वानांचीं मतें काय आहेत, हें सांगण्याच्या भरीला मी पडत नाहीं. कारण, पत्रविस्तार होईल हें एक; आणि दुसरें, ग्रंथ वाचून तुला तें ज्ञान होण्यासारखें आहे. तथापि आपण ज्याला पत्र लिहितों त्याला ज्या गोष्टीचो माहिती नाहीं, त्या गोष्टीची माहिती करून द्यावी, हें आपलें कर्तव्यकर्म आहे. मीं असें ऐकिलें आहे कीं, तुला राग आलेला नसतो तेव्हां तुझ्यासारखा मनमिळाऊ कोणी नसतो; परंतु जेव्हां दुसऱ्याच्या औद्धत्यामुळें किंवा हेंकटपणामुळें तुझें मस्तक तापतें, तेव्हां तूं इतका अनर्थ करतोस कीं, तुझी सुशीलता अगदीं नष्ट होते.

"आतां ज्या अर्थीं तूं आणि मी स्वपराक्रमानें व नशीबाच्या साहाय्यानें अशा दर्जाला येऊन पोहोंचलों आहों कीं, सर्व जग आपल्याविषयीं बोलणार आहे, त्या अर्थीं आमच्यामध्यें ढळढळीत दुर्गुण न राहूं देण्याविषयीं आह्मीं झटलें पाहिजे. हें खरें कीं, मनुष्यजातीला आणि विशेषेंकरून आमच्या वयाच्या मनुष्यांना अंगस्वभाव बदलणें कींवा एखादी जडलेली खोड एकदम काढून टाकणें फार मुष्कील आहे. परंतु तुला माझें सांगणें मिळून इतकेंच कीं, विवेक जागृत होण्यापूर्वीच जर क्रोध तुला

अनावर होऊन तुझ्या मनाला ग्रासूं लागला, तर त्याला प्रतिबंध करण्याची तयारी करण्याचा दररोज परिपाठ ठेवीत जा; आणि जितका जितका तो तुझ्या मनाला ग्रस्त करूं पाहील, तितका तितका तूं आपल्या जिभेवर दाब ठेवण्यास सावध रहात जा. मला वाटतें, राग आला आसतां तोंड बंद करणें हा कधीं कधीं राग न येऊं देण्यापेक्षां मोठा सद्गुण आहे. कारण, राग मुळींच न येणें हें आत्ममानाचें लक्षण आहे खरें; तथापि कधीं कधीं तें स्थूल प्रकृतीचेंही सूचक होतें. परंतु राग आला असतां आपलें मन व आपलें भाषण हीं आपले लगामीं ठेवणें अथवा मुळींच न बोलणें, आणि मनाचा आवेश व संताप ह्यांना आपल्या हुकुमांत ठेवणें, ह्या गुणांवरून अन्यंग शहाणपण जरी दिसलें नाहीं, तरी विलक्षण बुद्धि दिसून येते.

"यासंबंधानें, तुझ्या स्वभावांत मार्दव व सौम्यता हीं हळू हळू येत आहेत असें मी ऐकितों. तुला क्षोभ कसा होतो, तूं कसल्या अपशब्दांची योजना करतोस, किंवा तूं कोणती निंद्य वर्तणूक करतोस, हें कांहीं मला समजलें नाहीं. पण असला स्वभाव जितका विद्येला व सुशिक्षितपणाला कलंक लावणारा आहे, तितकाच अधिकाराला व मोठेपणाला लाजिरवाणा आहे, हें सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. कारण, एकाद्याचा क्रोध जर अशाम्यच असला, तर तो क्रूर असला पाहिजे; व शाम्य असून त्याला तो दाबांत ठेवितां येत नाहीं तर तो बुद्धिबलशून्य असला पाहिजे.

"सर्वांकडून चांगलें ह्मणून घेण्याकडे तुझ्या बुद्धीचा व्यय होऊं दे. आह्मी साधारण प्रतीचे लोक असतों, तर सर्वांचे डोळे आमच्याकडे लागले नसते व साधरण लोकांच्या आचरणाहून श्रेष्ठप्रतीचें आचरण ठेवण्याची तुला गरज पडली नस

सतो. परंतु ज्या कामांत आह्मी पडलों आहों, त्याच्या महत्त्वाकडे व प्रभावाकडे पाहिलें ह्मणजे, त्यांत जर आह्मीं कीर्तिं संपादन केली नाहीं, तर लोक आह्मांला नांव ठेवायाला चुकणार नाहींत.

"ह्मणों हयात असलेल्या लोकांकडूनच वरें ह्मणून घेण्याकडे तुझी दृष्टि नसावी; तर, पुढें होणारे लोकही आपल्याविषयीं काय ह्मणतील, इकडे तुझें लक्ष असूं दे. या लोकांचें तुझ्याबद्दलचें मत यथान्याय होईल; कारण तें असूया व द्वेषभाव यांविरहित असेल. दुसरें हें लक्षांत ठेव कीं, तूं नांवलौकीक मिळवीत आहेस हा फक्त तुझ्यासाठींच नव्हे; तर आमच्या कुटुंबा साठीं व आमच्या मुलांबाळां साठीं आहे. याकरितां, वंशजांच्या हिताकडे दुर्लक्ष केल्याचा बोल तुला न लागावा, ह्मणून खबरदारी ठेव.

"शेवटीं तुला इतकेंच सांगणें आहे कीं, आपल्या प्रकृतीला फार जपत जा, आणि मला व तुझ्या सर्व मित्रांना तुजविषयीं काळजी न लागे असें कर."

पुत्रास उपदेश.

[लॉर्ड बर्लें ह्या नांवाचा एक मोठा नामांकित मुत्सद्दी इंग्लंडांत एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत होऊन गेला. तो शहाणा, स्वभावानें शांत, आणि जगांतल्या व्यवहारांत अत्यंत कुशल असा होता. त्यानें आपल्या पुत्रास जें एक बोधपर पत्र लिहिलें आहे, तें उत्तम सूचनांनीं भरलें आहे; किंबहुना, व्यवहारबोधरत्नांचें तें सर्वोत्कृष्ट अलंकारभूषण

भाहे, भस समणावें लागतें. त्याचें प्रतिबिंब आलीं येथें आपल्या प्रिय वाचणाऱ्यांस सादर करितों.]

जिनें कोमल अंत:करणानें व भक्तिभावानें बालपणांत तुझें संगोपन केलें, त्या तुझ्या अनुपम मातेच्या सद्गुणांवरून, व तुझ्या विद्याभ्यासावरून माझी खातरी आहे कीं, ईश्वराचें खरें ज्ञान व खरी भक्ति यांविषयीं तूं अज्ञान नाहींस. कारण परब्रह्म काय तें हेंच. आयुष्यक्रमणामध्यें आणि मरणानंतर सुख देण्यास समर्थ असें हें एकच साधन आहे. याशिवाय अन्य गोष्टी मिथ्या आहेत. त्यांपासून सुख कधीं प्राप्त व्हावयाचें नाहीं.

सदाचार आणि सद्भक्ति यांविषयीं तुझे गुरूजी तुला उपदेश करतोलच. तथापि पितापुत्राच्या नात्याकडे मीं दुर्लक्ष केलें असें होऊं नये, व तुझा जनक असतांना सुखाचे मार्ग समजून घेण्याला तुला दुसऱ्याकडे पाहावें लागूं नये, ह्मणून आयुष्यामध्यें कसें वागावें याविषयीं तुला दोन शब्द सांगावे ह्में मला योग्य वाटतें. मी जें तुला सांगणार, तें तूं कितीही पुस्तकें वाचलींस तरी पूर्णपणें समजणार नाहीं. त्याला अनुभवच पाहिजे. याकरितां, ह्या अफाट संसारामध्यें प्रवेश केल्यावर, अनभव नसल्यामुळें जगाला मोहित होऊन तूं निंद्य मार्गांत पडूं नयेस, ह्मणून तुला कांहीं नियम सांगून ठेवितों. तुझ्या स्मरणशक्तीला भार होऊं नये ह्मणून मी तुला दहाच नियम सांतों. ते तूं मनामध्यें उत्तम रीतीनें ठेविलेस, तर त्यांपासून तुझें हित होईल, व मला आनंद होईल. ते नियम येणेंप्रमाणें.-

१. ईश्वराच्या कृपेनें जेव्हां तूं वयांत येशील, तेव्हां लग्न करशील तें नीट विचार करून दूरवर दृष्टि देऊन कर. कारण, ह्मणें जें काय सुख दु:ख होणार तें त्यापासून. लग्नाचा प्रसंग यु-

द्वाच्या प्रसंगासारखा आहे. ह्मणजे दोहोंमध्येंही चुकी झाली तर ती होते एकदांच, पण तिचे परिणाम यावज्जन्म भोगावे लागतात. तुझी संपत्ति वरी असली, तर गांवांतलीच मुलगी कर, व फुरसतीनें लग्न कर; संपत्ति बरी नसली, तर दूरची बायको कर, व लौकर लग्न कर. तिचा स्वभाव कसा आहे व तिची आईबापें लहानपणीं कोणत्या चालींचीं होतीं, याचा बारीक शोध कर. तीं कितीही सुशिक्षित असलीं, तरी निर्धन नसावीं. कारण नुसत्या सुशिक्षितपणाला कोणी किंमत देणार नाहीं. तथापि द्रव्यासाठीं नीच व कुरूप स्त्री करूं नको; केलीस तर लोक तुझी छीथू करतील, व तुलाही चिळस येईल. तसेंच एकादी खुरट किंवा वेडगळ बायको करूं नको; कारण खुरट्या बायकोपासून तुला संतती बुटुकणी होईल, व वेडगळ बायको तुला पदोपदीं खालीं पहावयाला लावील.

आतां प्रपंचनियमांविषयीं ह्मणशील तर–तूं लोकांचा पाहूणचार बेताबाताचा कर. आपल्या ऐपतीप्रमाणें खर्च कर, त्यांत चेंगटपणा करूं नको; पण उगीच मौल्यवान जिन्नस घेऊं नको. खाण्यापिण्यांत व्यवस्थितपणानें खर्च करून कोणी भिकारी झाला असें मीं आजपर्यंत ऐकिलें नाहीं. परंतु कित्येक लोक गुप्त दुर्गुणांत पैसा उधळतात, व मग आपल्या पाहूणचाराला बोल लावितात, ह्मणजे कोणाला वाटावें यांची सर्व दौलत दुसऱ्याचें अगतस्वागत करण्यांतच गेली. तुझ्या पंक्तीस बसणारांमध्यें जर कोणी मद्यप्राशन करणारा असला, तर त्याला घराबाहेर घालवून दे. मद्यप्राशनाच्या व्यसनानें शरीराची खराबी होते, पैसा फुकट जातो, व अब्रूचें मातेरें होतें. आपल्या उत्पन्नाच्या तीन हिश्शांपेक्षां जास्ती खर्च कधींही करूं नको; व घरांत असेल त्याच्या तिसऱ्या हिश्शाहून

अधीक खर्चूं नको; नाहीं तर तुला सधन होण्याच्या कामीं राहावें लागेल. ह्मणजे तूं दिसण्यांत श्रीमंत असलास, तरी पैशासाठीं तुला दुसऱ्याकडे तोंड पसरावें लागेल. आणि जो सदां गरजू असतो, त्याच्या जिवाला सुख किंवा समाधान कधींच नसतें. कारण कांहीं गरज पडली, कीं त्याला कांहीं तरी गहाण ठेवावें लागतें किंवा विकावें लागतें. आणि जो मनुष्य आपली एक एकर जमीन विकतो, त्याची एक शेर पत कमी झाली असें समजावें.

२. मुलांकडून विद्याभ्यास करीव, व तीं तुझ्या आज्ञेंत राहातील असें कर. परंतु त्यांना कडक रीतीनें वागवूं नको. त्यांची वहावा करायाची ती चार चौघांत कर, पण त्यांना बोलायाचें तें एकांतीं बोल. शक्तयनुसार त्यांना लागेल तें खाणेंपिणें व वस्त्रप्रावरण देत जा. नाहीं तर तूं जीवंत आहेस तोंपर्यंत त्यांना वाटेल कीं, आपण बंदींत आहों; आणि मरणानंतर जें कांहीं तूं त्यांना ठेवशील त्याबद्दल ते मृत्यूचे आभारी होतील; तुझे होणार नाहींत. मला वाटतें, कित्येक आईबाप अविचारानें आपल्या मुलांचे फार लाड करितात, व कित्येक त्यांना तरवारीच्या धारेवर धरितात; म्हणून तीं मुलें वाईट मार्गास लागतात. त्यांच्या मनाचा कल जरी वाईटाकडे असला, तरी तीं इतकीं दुर्व्यसनी होणार नाहींत. मुली लग्नाच्या झाल्या ह्मणजे त्यांचीं लग्नें करून दे; नाहीं तर त्या आपणच नवरे पाहूं लागतील. मुलांना लढाईचा धंदा शिकवूं नको; कारण जो त्या धंद्यावरच आपली उपजीविका करतो, तो प्रामाणिक किंवा धर्मभक्त राहील असें वाटत नाहीं. शिवाय त्या विद्येची हल्लीं गरजही नाहीं.

३. खेड्यापाड्यांनीं राहायाचें असलें तर धान्याची सामुग्री

किंवा दुभत्याची सोय केल्यावांचून राहूं नको. कारण गृहकृत्याला लागणाऱ्या हरएक खर्चासाठीं पेटीची किल्ली काढणें ह्मणजे चाळणींत पाणी भरून ठेण्यासारखें आहे. तुला जो पुरवठा लागेल, तो सोईवार मिळेल त्या वेळीं घेऊन ठेव; कारण हंगामाच्या वेळीं व बाजारभाव चांगला असला ह्मणजे ज्या जिनसाला तुला एक पैसा पडणार, त्याच जिनसाला पुढें गरजेच्या वेळीं तुला चार पैसे द्यावे लागतील. नातलग, मित्र, किंवा आग्रहानें ठेवून घेतले असतील ते, यांच्याकडून सेवा घेऊं नको; कारण त्यांची करणी थोडी, पण हांव मोठी असते. जे मोहासक्त झालेले असतील, त्यांना चाकरीस ठेवूं नको; कारण त्यांचें मन त्यांच्या स्वाधीन नसतें. चाकर एक दुसरा कमी ठेव, पण अधिक ठेवूं नको; त्यांना पोटाला यथेच्छ घाल, व पगारही चांगला दे; आणि मग त्यांजकडून टोकून काम घेतलेंस तरी चालेल.

४. तुझ्या नात्यागोत्याचीं माणसें तुझ्या घरीं आलीं तर त्यांची खबर घे. त्यांना उत्तेजन दे व भलाइकीच्या सर्व कामात त्यांना मदत कर. असें केल्यानें नात्याचा बंध दृढ होईल व तुझ्या पाठीमागें ते तुझा कैवार घेतील. पण हांजीहांजी करणाऱ्या व पुढेंपुढें नाचणाऱ्या लोकांना जोडयाजवळ देखील उभें करूं नको. कारण तुझा चालता काळ असेल तोंपर्यंत ते तुझ्या भोंवती घिरट्या घालतील व तुझे हातपाय दाबतील; परंतु तुझा काळ फिरला, ह्मणजे तुला ते ओळख देखील देणार नाहींत.

५. तुझ्या कितीही जिवाचा मित्र झाला, तरी त्यासाठी जामीन राहूं नको. जो दुसऱ्याचें कर्ज वारतो, तो आपल्या नाशाला बोलावणें करितो. कांहीं दुसरा उपायच नसला तर, मर्जी असल्यास, कर्ज काढून झालें तरी त्याला रुपये उसनवट

दे व त्याचें लिहून घे. येणेंकरून तुझ्या पैशाला भीतिं नाहीं-शी होईल, व तुझ्या मित्राचेंही काम होईल. कर्ज काढायाचें असलें, तर शेजाऱ्याकडून किंवा स्नेह्याकडून काढूं नको, परक्याकडून काढ ; ह्मणजे कर्ज वारलें कीं निकाल झाला; पुढें त्या गोष्टीचें नांव नाहीं. नाहीं तर शेजाऱ्याचें किंवा स्नेह्याचें कर्ज काढिलेंस, तर परक्याला द्यायाचें तितकेंच त्यांना द्यावें लागून आणखी जन्मभर त्यांच्या उपकारांत राहाणें भाग पडतें, व स्वतंत्र्याला मुकावें लागतें. पण कर्ज घेतलेंस तर, तें वेळेवर परत दे ; कारण पैसा परत देण्याच्या कामीं जो मनुष्य वायदा पाळितो, त्याला कोणी कितीही रक्कम देईल.

६. तुझें फारच नुकसान केल्यावांचून गरीब मनुष्यावर तूं फिर्याद करूं नको. कारण, एक तर, त्याजवर फिर्याद केल्यानें तूं त्याच्याशीं आपली बरोबरी करून घेशील. आणि दुसरें, ज्याच्यांत दम नाहीं त्याजवर जय मिळवून मोठेंसें भूषणही वाटणार नाहीं. तसेंच आपला पक्ष न्यायाचा आहे अशी खात्री करून घेतल्यावांचून कोणाहीबरोबर वाद करूं नको. परंतु एकदा कंबर बांधलीस, ह्मणजे पैशाकडे व श्रमाकडे पाहूं नको ; कारण याप्रकारें एक दोन फिर्यादी करून जिंकल्यास, ह्मणजे जन्मभर तुला फिर्यादीस जाण्याची गरज पडणार नाहीं.

७. कोणी तरी मोठ्या मनुष्याचा स्नेह ठेव, पण क्षुल्लक गोष्टींसाठीं त्याला तसदी देऊं नको. लहान लहान, व अल्प मोलाचे नजराणे वारंवार देऊन त्याला खुष ठेव ; आणि त्याला मोठीच नजर द्यावयाची असली, तर ती अशा तऱ्हेची असावी कीं, दररोज तिजवर त्याची दृष्टी पडेल. नाहीं तर

त्याला त्या देणगीचा विसर पडून तुझाही विसर पडेल, आणि तुझे बरोबरचे लोक तुझी वचंरी मात्र करतील.

८. वरिष्ठांशीं नम्रतेनें पण आपला मान राखून वागावें; सरोबरीच्यांशीं सलगीनें पण मुरवतीनें राहावें; आणि कनिष्ठांशीं फार सभ्यतेनें वागावें आणि कांहींशी सलगी दाखवावी;-ह्मणजे लवून प्रणाम करणें, हात पुढे करणें, टोपी काढणें वगैरे लोकरिवाजाप्रमाणें करावें. पहिल्याप्रकारच्या वागणुकीनें तुझ्या बढतीस मार्ग होईल; दुसऱ्या प्रकारच्या वागणुकीनें, हा फार शिष्ट मनुष्य आहे, अशी तुझी ख्याति होईल; आणि तिसऱ्या प्रकारच्या वागणुकीनें तुझें नांव होईल. (एकदा नांव झालें ह्मणजे तें कायम राहण्यास मुष्किल पडत नाहीं.) कारण साधारण लोक सभ्यतेला त्वरित भुलतात. तुसडेपणानें कांहीं दिल्यानें ते जितके वश होतील त्यापेक्षां त्यांच्याशीं फुकाची शिष्ट वर्तणूक ठेविली तर ते अधिक वश होतात. तथापि मी तुला सांगतों कीं, लोकप्रीतीच्या पाठीस तूं फारसा लागूं नको; तरी तिच्याकडे दुर्लक्षही करूं नको.

९. जीव, अब्रू, व वतन हीं दुसऱ्याच्या हातीं देऊं नको. कारण तो तुझा शत्रु नाहीं होणार ह्मणून कशावरून?

१०. कोणाची निंदा करूं नको, व थट्टेनें मर्मशब्द बोलूं नकोस. कारण, निंदेनें तुला मंडळींत थारा मिळणार नाहीं, मर्मभेदक भाषणानें तुझे परममित्रही तुझे शत्रु होतील; कां कीं, आपण विनोदानें जरी कांहीं बोललों, तरी तें (खरें दिसण्यासारखें असलें तर) ज्याच्या मनाला लागतें, तो तें कधीं विसरत नाहीं.

ह्मातारपण.

केटोचें भाषण.

[सिसरोनें निरनिराळ्या विषयांवर जे लहान लहान लेख लिहिले आहेत, त्यांमध्यें ह्मातारपणावर एक निबंध आहे. मूळग्रंथांत हा निबंध संभाषणरूपानें लिहिलेला आहे. परंतु त्याचें मराठींत रूपान्तर करतांना बाकीच्या दोन पात्रांचें बोलणें गाळून, फक्त मुख्य पात्राचें ह्मणजे केटोचें मात्र भाषण घेतलें आहे.

हें किंवा या प्रकारचें दुसरें भाषण केटोनें कधीं खरोखर केलें, असें समजूं नये. यांत सिसरोनें आपलीं मतें दर्शविलीं आहेत. परंतु त्या मतांना भारदस्तपणा देण्याकरितां केटोसारख्या वृद्ध, विद्वान, व अत्यंत स्वदेशाभिमानी गृहस्थाच्या मुखांतून तीं वदविलीं आहेत, इतकेंच.]

कित्येक लोक आश्चर्यानें मला वारंवार विचारतात— "कायहो केटो, तुह्मी इतके वृद्ध झालां आहां, तरी वृद्धपणाला तुह्मी कंटाळलां नाहीं, व वृद्धपणाचें ओझें तुह्मांला बिलकूल वाटत नाहीं, ह्मणें कसें ?" या प्रश्नाचें उत्तर आज मी तुह्मांस देतों, तें ऐका. मित्रहो, ज्या गोष्टीचें तुह्मांला एवढें आश्चर्य वाटतें, तींत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण, सुखानें व सन्मार्गानें राहाण्याचीं साधनें ज्या पुरुषांच्या ठायीं नाहींत, त्यांना कोणताही काळ कंटाळवाणा व असह्य वाटतो; परंतु जे लोक आपले आयुष्याचा सद्व्यय करण्यास झटतात, त्यांना ह्मातारपणासारख्या अनिवार स्थितीपासून तिळमात्रही दुःख होत नाहीं. आश्चर्य पहा कीं, आपण ह्मातारे होईपर्यंत

वांचावें अशी सर्वांची इच्छा असते, पण ह्मातारपण प्राप्त झाल्याबरोबर ते ह्मतारपणाला त्रासतात ! हा केवढा असंबद्धपणा ! केवढा मूर्खपणा ! ते असें ह्मणतातकीं, " ह्मातारपण केव्हां आलें तें समजलें देखील नाहीं ! तें इतकें लवकर येईल असें आह्मांला वाटलें नव्हतें. " या लोकांना मी असें विचारितों, बाबांनो, वृद्धापकाळाच्या गतीविषयीं तुह्मांला भलतीच कल्पना करायाला कोणी सांगितलें होतें ? बरें तें असो. ह्मातारपण केव्हां आलें तें समजलें देखील नाहीं, असें तुह्मीं ह्मणतां, याचा अर्थ काय ? बालपण जाऊन तुह्मांस तरूणपण केव्हां प्राप्त झालें, तें तुह्मांला समजलें काय ! मग ह्मातारपणालाच तुह्मीं कां दोष द्यावा ? मित्रहो, जी वस्तु उत्पन्न झाली तिचा शेवट होणारच. झाडावर फळ येतें तें पक्क झालें ह्मणजे पडणारच. हा सृष्टिनियम आहे, व ह्याच नियम मनुष्यालाही लागू आहे. नियमित काळानंतर मनुष्यालाही अंतिम दशा प्राप्त होते, व जसें झाडाचें पिकलेलें पान गळून पडतें, तसें त्याच्याही देहाचें विसर्जन होतें. हा नियम आह्मांस निमूटपणें पाळला पाहिजे. कारण, सृष्टिनियमांत फेरफार व्हावा अशी इच्छा करणें हें आकाशास गवसणी घालण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे.

" समानशीले व्यसनेषु सख्यं " या ह्मणी प्रमाणें जेव्हां आह्मी ह्मातारे ह्मातारे एकत्र जमतों, तेव्हां ज्या गोष्टी ऐकूं येतात, त्या फार चमत्कारिक असतात. त्यांपासून तरूण लोकांना बोध होण्यासारखा आहे. याकरतां त्यांतील दोनच तुह्मांस सांगतों. कित्येक वृद्ध गृहस्थ असें ह्मणतात कीं, " ज्याअर्थीं आह्मांला ऐहिक विषयसुखें भोगतां येत नाहींत, त्याअर्थीं आह्मी जगून तरी काय उपयोग ? " दुसरे कित्येक

असें रडगाणें गातात कीं, " आह्मांला आतां कोण विचारतो ? आह्मी ज्वानींत होतों त्यावेळीं आमच्या मागून गुणगायकांची गर्दी असे. परंतु आमचे हातपाय राहिल्यावरोबर आमची आठवण देखील कोणाला पडेनाशी झाली ! " आणखीही अशाच प्रकारच्या कागाळ्या दुसऱ्या कित्येकांकडून ऐकूं येतात. त्या सर्व लोकांना माझें असें उत्तर आहे कीं, ह्या तुमच्या कागाळ्या जर खऱ्या असत्या, व तुह्मी ह्मणतां ते अनिष्ट परिणाम ह्मातारपणामुळेंच झाले असते तर माझी व माझ्या सारखे जे दुसरे वयातीत गृहस्थ आहेत त्यांचीही अवस्था तशीच झाली असती. परंतु वास्तविक प्रकार निराळाच आहे. आह्मी कधीं ह्मातारपणाविषयीं कुरकुर करीत नाहीं, विषयवासनांच्या बंधांतून मुक्त झाल्याचें आह्मांला दुःख होत नाहीं ; व मित्रांकडून आमचा कधीं अपमान होत नाहीं. नुक्त्याच मीं ज्या कागाळ्या सांगितल्या, त्यांचा दोष माझ्या मतें कागाळ्या करणारांकडे आहे, त्यांच्या वयाकडे नाहीं. जे लोक मनाला आपल्या स्वाधीन ठेवितात, जे स्वभावानें तुसडे किंवा खिसखिशे नसतात, त्यांना ह्मातारपणापासून मोठेंसें दुःख होत नाहीं. परंतु जे असंतोषी व दुःशील असतात, त्यांचें वय कितीही असलें, तरी त्यांना कंटाळा आल्यावांचून राहणार नाहीं.

कोणी असें ह्मणतील कीं—" तुह्मांपाशीं द्रव्यादि साधनें विपुल आहेत, व जाल तेथें तुह्मांला मान मिळतो, ह्मणून ह्मातारपण तुह्मांला जड वाटत नाहीं. परंतु सर्वांच्याच नशीबीं असें कोठें आहे ? " होय. या ह्मणण्यांत कांहीं अर्थ आहे खरा. परंतु तें सर्वथैव खरें नाहीं. ह्मातारा मनुष्य कितीही सुज्ञ असो, पण जर त्याला विपत्तीनें ग्रासलें असलें, तर त्याच्या जीवाला

समाधान वाटत नाहीं, हें खरें. परंतु तो जर अशिक्षित व मूर्ख असला, तर प्रत्यक्ष लक्ष्मी त्याच्या घरीं पाणी वाहत असतांही त्याला ह्मातारपण असह्य वाटल्यावांचून राहत नाहीं, असें मला वाटतें. "कृतान्तकटकामलध्वजजरा" जी आहे, तिच्या संगें जर झगडा करायाचा अहि, तर सद्गुणशस्त्रांचीच योजना केली पाहिजे. या शस्त्रांचा अभ्यास लहानपणापासून करीत आलें पाहिजे. ह्मणजे वृद्धावस्थेंत त्यांचा चमत्कार दृष्टीस पडतो. अत्यावस्थेंमध्यें देखील सद्गुण आपला पराक्रम दाखविल्यावांचून रहात नाहींत, हें कांहीं थोडेंथोडकें नव्हे. सदाचरणाचा स्वीकार करण्यास एवढें कारण पुरें आहे. परंतु एवढ्यानेंच झालें नाहीं; सदाचारानें व सन्मार्गानें आपण वागत आलों आहों अशी मनाची खातरी असली ह्मणजे जो परम आनंद होतो, त्याची प्राप्ति व्हावी ह्मणूनही सत्कर्मीं वय घालविलें पाहिजे.

ह्मातारपण लोकांना दुःखप्रद कां वाटतें, याचा विचार केला असतां, चार कारणें दिसून येतात. १, ह्मातारपणीं कामधंदा चालविण्याचें सामर्थ्य राहत नाहीं; २, शक्ति नाहींशी होते; ३, सुखोपभोग बंद होतो; आणि ४, मृत्यु समीप येतो. यांपैकीं दरएक कारणाचें महत्त्व किती आहे तें पाहूं.

१. ह्मातारणीं कामधंदा चालविण्याचें सामर्थ्य राहत नाहीं असें ह्मणतात. परंतु कसला कामधंदा? ज्यांत अंगमेहनतीचें कारण पडतें तो. पण ज्यांत अंगमेहनतीची गरज नाहीं, व जीं फक्त बुद्धीच्या जोरावर चालवितां येतात, अशीं कामें अहित कीं नाहींत? व तीं ह्मातारपणीं, अंगीं सामर्थ्य नसतें तरी, करतां येतील कीं नाहींत? खचित येतील. मग कामकाज करण्याचें सामर्थ्य राहत नाहीं तें कसें? वयातीत मनुष्य शारीरिक श्रम

करीत नाहींत, किंवा, शारीरिक श्रम करण्यास ते लायक नाहींत, म्हणून ते निरुद्योगी व निरुपयोगी आहेत, असें जर म्हटलें, तर जहाजावरचा सुक्काण्याहो निरुद्योगी निरुपयोगी आहे, असें म्हटलें पाहिजे. कारण जहाज चालत असतां तो कांहीं मेहेनत करीत नाहीं. इतर खलाशांपैकीं कोणी शिडावर चढतात, कोणी वाले ओढतात, कोणी गमताड उपसतात; तो मात्र एक सुकाणूं हातीं धरून स्वस्थ बसलेला असतो. खरोखर पाहिलें असतां, तरुण ज्वानाचें काम तो करीत नाहीं हें खरें. पण तो त्यांच्याहून मोठें व चांगलें काम करतो. सारांश, मोठमोठीं कामें बाहुबलानें अथवा अंग-चापल्यानें होत नाहींत; त्यांना बुद्धि, गंभीरपणा, व विचार हेंच गुण पाहिजेत, व हे गुण म्हातारपणीं नष्ट होत नाहींत इतकेंच नव्हे, तर, ते विशेष तीव्र होतात.

पण स्मरणशक्ति कमी होते कीं नाहीं ? होय, तिचा उपयोगच जर केला नाहीं, किंवा ती जन्मापासूनच कोती असली, तर ती म्हातारपणीं कमी होते, एरव्हीं होत नाहीं. ज्याला ज्या गोष्टीची काळजी आहे, तो ती कधीं विसरत नाहीं. मनुष्य कितीही वयोवृद्ध झाला, तरी आपण कोणत्या ठिकाणीं ठेव पुरून ठेविली आहे, किंवा आपलें देणें घेणें कोणाजवळ किती आहे, हें तो विसरला आहे असें मीं आजपर्यंत ऐकलें नाहीं. वकील, उपाध्ये, ज्योतिषी, वैद्यवैत्ते यांची गोष्ट पहा. ते म्हातारे झाले तरी त्यांना किती गोष्टींची आठवण असते ? सारांश, अभ्यास ठेविला म्हणजे मानसिक शक्ति म्हातारपणींही जशाच्या तशाच राहतात. याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतील. **प्लेटो** आपल्या ८१ व्या वर्षीं लिहितां लिहितां मेला. **इसोक्राटीस** यानें ९४ व्या व-

षीं एक ग्रंथ लिहिला; व त्यानंतर तो पांच वर्षांनीं मेला. त्याचा गुरु **गार्गियास** हा १०१ वर्षांचा झाला तरी काम केल्यावांचून कधीं राहिला नाहीं. **सोफोक्लिसा**नें अति वृद्धावस्थेंत देखील काव्यें लिहिण्याचा क्रम सोडला नाहीं. एका प्रसंगीं त्याच्या मुलांनीं न्यायाधिशांपाशीं अशी फिर्याद केली कीं " आमचा बाप वेडगळ झाला आहे, त्याला जिनगीचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य नाहीं. याकरतां जिनगीची वहिवाट आह्मांकडे द्यावी. " न्यायाधिशांनीं सोफोक्लिसाला बोलावून आणून मुलांचें ह्मणणें काय होतें तें सांगितलें. तेव्हां सोफोक्लिसानें, नुक्तेंच रचलेलें नाटक मोठ्यानें न्यायाधिशांना वाचून दाखविलें, व हें वेडयाचें काम आहे काय, असें त्यांना विचारलें. तें काव्य ऐकल्यावरोबर न्यायाधिशांनीं त्याला दोषमुक्त केलें.

सारांश, वृद्ध पुरुष निरुद्योगी असतात हें ह्मणणें खरें नाहीं. उलट ते उद्योगी असतात, हें वरील उदाहरणांवरून स्पष्ट दिसून येईल. कित्येक लोक मरण येईतोंपर्यंत नवीन नवीन गोष्टी शिकत असतात. याला प्रत्यंतर **सोलन**चें घ्या. सोलननें एके ठिकाणीं स्वतःविषयीं असें लिहिलें आहे कीं, " मी ह्मातारा झालों आहें, तथापि दररोज कांहींतरी नवीन गोष्टीचें ज्ञान करून घेत असतों. "

२. वृद्धापकाळावर दुसरा दोष हा आहे कीं, त्या काळीं शक्ति क्षीण होते. या ह्मणण्यांत खरेपणा किती आहे तें पाहूं. उतार वयांत मनुष्याचें शरीर अशक्त होतें हें कबूल केलें पाहिजे. परंतु त्या वेळीं शक्तीची उणीव वाटत नाहीं. माझीच गोष्ट पहा. ज्याप्रमाणें हत्तीचें अथवा रेड्याचें बळ असावें असें तारुण्यावस्थेंत मला वाटलें नाहीं, त्याप्रमाणें पेहेलवानाचा जोर मला या वयांत असावा असेंही वाटत

नाहीं. आपल्या अंगीं जेवढी ताकत आहे, तेवढींतच आपण संतुष्ट असलें पाहिजे. इतकेंच कीं, आपण कोणतेंही काम हातीं धरलें तरी आपल्या अंगांत असेल तेवढी शक्ति त्या कामीं लावून तें शेवटास न्यावें. ह्मणजे त्यांतच प्रतिष्ठा आहे. आतां, जो वक्ता आहे त्याला नि:शक्ततेपासून कांहीं तोटे अहित खरें; कारण उत्तम वक्तृत्वाला मानसिक गुणविशिष्टता पाहिजे इतकेंच नाहीं, तर मोठ्यानें बोलतां यावें याकरतां शरीरही सदृढ पाहिजे. परंतु या संबंधानें देखील ह्मातारपणाला एका प्रकारचें श्रेष्ठत्व येतें; कारण वृद्ध मनुष्यांच्या वाणींत एका प्रकारचें माधुर्य असतें; त्यांची बोलण्याची शैली शांत व गंभीर असते, व त्यांचें भाषण बोधकारक असल्यामुळें ऐकणारांचीं मनें ते आकर्षण करून घेतात.

इतर सर्व सृष्ट पदार्थांना जो नियम लागू आहे, तोच मनुष्याच्या शरीरालाही लागू आहे. त्या नियमाप्रमाणें, उतार वयामध्यें तरूणपणाची शक्तिराहत नाहीं हें स्वभाविक आहे; याकरतां त्या गोष्टीची खंत करीत बसणें हा केवळ वेडेपणा होय. जोंपर्यंत आपल्या अंगांत शक्ति आहे, तोपर्यंत तिचा उपभोग घ्यावा. परंतु ती नाहींशी झाल्यावर मात्र शोक करू नये; कारण गेल्या गोष्टीचा शोक कितीही केला तरी तो व्यर्थ. सृष्टिकर्माचा मार्ग ऐक आहे, व तो सर्वांना सारख्या रीतीनें लागू होतो. त्या नियमाप्रमाणें आयुष्याच्या वेगवेगळ्या वयांत वेगवेगळी स्थिति ईश्वरानेंच ठरवून दिली आहे. त्यामुळें बालपणीं दुर्बलता असते; तरूणपणीं तरतरी असते; उतार वयांत स्थिरता असते; व ह्मातारपणीं पोक्तपणा असतो. तथापि मीं कित्येक ह्मातारे पुरुष असे पाहिले आहेत कीं, ते नव्वद वर्षांचे झाले तरी लांबलांबच्या मजला पायांनीं करितात, सगळा

दिवस घोड्यावर असतात, व पाऊस किंवा थंडी ह्यांची कांहींच परवा धरीत नाहींत. नियमित व्यायाम व परिमिताचार हे ठेविले तर ह्मातारपणीं देखील ज्वानींतली शक्ति कांहीं अंशीं राखून ठेविता येइल. परंतु जर पूर्ववयांत दुर्गुण व अत्याचार यांत काल गेला असला तर, ह्मातार पणीं शक्ति राहणार नाहीं यांत काय आश्चर्य ?

बरें, ह्मातारपणीं शक्ति नसते असें घटकाभर कबूल करूं; पण ह्मातारपणीं शक्तीची एवढीमोठी गरज कोठें असते? ह्मातारपणीं शक्ति नसते, ह्मणूनच ज्या गोष्टी तरुणांना कराव्या लागतात, त्या ह्माताऱ्यांना कराव्या लागत नाहींत. आतां कित्येक ह्मातारे मनुष्य इतके निःशक्त असतात कीं, त्यांच्या हातून महत्वाचें कसलेंच काम होत नाहीं. परंतु हा दोष ह्मातारपणाचा नव्हे, त्याच्या प्रकृतीचा आहे. प्रकृतीच वाईट असली तर मनुष्य कोणत्याही वयांत अशक्तच राहील. कित्येक तरुण अगदीं अशक्त असतात हें आपण पाहतों कीं नाहीं? असें आहे तर ह्मातारे अशक्त असले तर त्यांत काय मोठेंसें नवल!

मनुष्यानें शरीरप्रकृतीला जपलें पाहिजे; तोलेल तेवढा व्यायाम केला पाहिजे; व शक्ति राखण्यासाठीं व ती जमविण्यासाठीं वेताबातानें खोराक खाल्ले पाहिजे. असें केल्यानें शरीराला अरोग्य होईल. परंतु फक्त शरीराचें संगोपन केलें ह्मणजे झालें असें नाहीं. मनाची व आत्म्याचीही उन्नति केली पाहिजे. व त्याकरितां, आपण शरीराची काळजी वाहतों त्यापेक्षांही अधिक मनाची व आत्म्याची वाहिली पाहिजे. नाहीं तर, ज्याप्रमाणें दिव्यांत तेल घालीत राहिलें नाहीं तर तो लवकरच विझेल, त्याप्रमाणें मानसिक शक्ति ह्मातारपणीं विझून जाईल. शारीरिक मेहनत केल्यानें शरीराला थकवा वाटतो, परंतु मानसिक मेहनत केल्यानें मनाला उल्हास वाटतो.

कित्येक म्हातारे मुर्ख, भोळे, विसरे, व दुर्व्यसनी असतात. परंतु हे दोष म्हातारपणामुळें त्यांचे अंगीं येतात असें नाहीं. हे दोष त्यांचे स्वतःचे असतात. तारुण्यावस्थेंत विद्या संपादन न केल्यानें, व सद्धर्मानें न चालल्यामुळें हे दोष अंगीं जडतात, व जसजसा मनुष्य वयातीत होतो, तसतसे ते वृद्धिंगत होतात. उतार वयांत सर्वांनाच म्हातारचळ लागतो असें नाहीं. जे आपल्या मानसिक शक्तीच्या पोषणार्थ तरुणपणांत श्रम करीत नाहींत त्यांनाच तो लागतो. माझा एक मित्र आहे, तो वयानें इतका मोठा आहे कीं, त्याला आतां दिसेनासें झालें आहे. तथापि त्यानें आपलें मन धनुष्याच्या दोरीप्रमाणें ठेविलें आहे. त्यामुळें घरांत त्याचा मोठा वचक आहे. अझून त्याला चाकरमाणसें भितात. त्याचीं मुलें—चार मुलगे व पांच मुली—मोठीं आहेत, तरी त्याची मुरवत ठेवितात. असें असूनही तो सर्वांना प्रिय आहे, व यामुळें त्यांचा संसार कसा सोन्यासारखा चालला आहे. सारांश, वृद्ध मनुष्य जर आपलें मन स्वाधीन ठेवितील व मरेतोपर्यंत आपला मान राखून सदाचरण करतील, तर लोकही त्यांना मान दिल्यावांचून राहणार नाहींत.

२. म्हातारपणावर तिसरा आरोप असा आहे कीं, त्या वेळीं विषयसुखांचा उपभोग घेण्याला सामर्थ्य राहत नाहीं. हें जर खरें आहे, तर म्हातारपणासारखा भाग्यशाली दुसरा कालच नाहीं, असें म्हटलें पाहिजे. कारण ज्याच्या योगानें तारुण्यावस्थेला मोठेंच लांछन प्राप्त होतें, तें म्हातारपणीं जर अजिबात नाहींसें होतें, तर म्हातारपणाची थोरवी किती वर्णावी ! विषयसुखवासनेसारखी भयंकर दुसरी उपाधि मनुष्याच्या मागें नाहीं. त्या वासनेच्या योगानें मनुष्याचे षड्रिपु प्रबल होऊन आपली मनकामना पूर्ण करण्याकरतां अगदीं

अनावर होतात. षड्रिपु अनावर झाले ह्मणजे काय अनर्थ होतात हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. रंडीबाजी, व्यभिचार, घ त्यांसारखे दुसरे अनाचार उत्पन्न होतात; राजद्रोहाला थारा मिळतो; घ गुप्तपणें शत्रूला मिळून देशाचा घात करण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. सारांश, कसलाही अपराध असो, कसलेंही दुष्कर्म असो, त्याचें बीज विषयसुखवासनांत असतें. मन ही एक उत्तम देणगी ईश्वरानें मनुष्याला दिली आहे. परंतु विषयवासनांमुळें या ईश्वरी देणगीस विजेण पडल्यासारखें होतें. ज्याच्याठायीं कामवासना प्रबल असते, त्याला मनाचें आकलन करण्यास जागा नसते. कारण, ज्या ठिकाणीं विषयवासनांची व्याप्ति असते, त्या ठिकाणीं सद्गुणबीजाला अंकुर देखील फुटत नाहीं. ज्याचें मन ऐहिक सुखोपभोगांत निमग्न होऊन गेलें असतें, त्याला कोणत्याही गोष्टीचा शांतपणें व सुरळीतपणें विचार करण्याचें सामर्थ्य नसतें, व हीच निमग्नता सदोदीत असली, ह्मणजे ती अंतरींच्या ज्ञानज्योतीला विझवून टाकते. यावरून विषयवासना किती अनिष्ट आहेत हें उघड होतें.

परंतु ह्मातारपणीं ऐहिक सुखांचें साधन नसतें काय ? पक्कान्नें रगडण्याचें व पेयांचे प्याले झोंकण्याचें सामर्थ्य नसतें हें खरें. परंतु त्यामुळें होतें काय ह्मणाल तर एवढेंच कीं, अजीर्ण व निद्राहीनता यांचा पीडा टळते. दुसरें कांहीं होत नाहीं. संभाषणाचें सुख नाहींसें होत नाहीं. समान वयाचे गृहस्थ जमून ते जेवतांना किंवा अन्य प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर भाषण करितात त्या वेळीं त्यांना सुख होत नाहीं काय ? ज्यांनीं तरुणपणांत विद्या संपादन केली आहे, त्यांना ह्मातारपणीं त्या विद्येचें फळ भोगीत असतांना सुख हो-

त नाहीं काय ? ज्योतिषशास्त्राचा ज्यांनीं अभ्यास केला आहे त्यांना आकाशांतील ताऱ्यांची गति पाहून व तिजवरून गणित बांधून, अमुक दिवशीं अमक्या वेळीं सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण होईल, असें भविष्य करण्यांत सुख वाटत नाहीं काय ? जे निरनिराळ्या व्यासंगांत गढून गेले आहेत, त्यांना त्या त्या व्यासंगापासून सुख होत नाहीं काय ? विषयवासनांची तृप्ति होणें हेंच कायतें ऐहिक सुख असें समजूं नये. एका प्रसंगीं वृद्ध सोफोक्लिसाला कोणीएकानें विचारलें कीं–" काय हो, तुम्हीं रतिसुखाचा उपभोग अझून घेतां काय ? " सोफोक्लिसानें उत्तर केलें–" ईश्वर करो आणि मला त्या गोष्टीची आठवण सुद्धां न होवो ; ज्याप्रमाणें क्रूर व जुलमी राजाच्या तावडींतून मनुष्य पळून जातो, त्याप्रमाणें मी त्या रिपूपासून मुक्त झालों आहें. आतां मला त्याचें नांव देखील नको. " यावरून उघड होतें कीं, विषयवासनांच्या ठायीं आसक्ति धरिल्यानें खरें सुख होत नाहीं; षड्रिपुंपासून दूर राहिल्यानेंच तें होतें.

४. ह्यातारपणाचा एवढा तिरस्कार व कंटाळा येतो याचें चवथें व शेवटलें कारण, त्या वेळीं मृत्यु समीप आल्यासारखा वाटतो, हें होय. परंतु इतके दिवस या जगांत राहून, मृत्यूला भिण्याचें कारण नाहीं, हें तत्व ह्यातारपणीं देखील जर समजूं नये, तर समजावें तरी केव्हां ? या मानवी देहाचें विसर्जन झाल्यावर मनुष्याचें काय होतें, याजविषयीं दोन मतें आहेत. एका मताप्रमाणें देहाबरोबरच आत्म्याचाही नाश होतो, तर दुसऱ्या मताप्रमाणें मरणानंतर आत्मा ज्या ठिकाणीं जातो, त्या ठिकाणीं तो अविनाशी होतो. या दोन मतांतून कोणतेंही मत खरें असलें, तरी मरणाला भिण्याची गरज नाहीं. मरणानंतर आत्म्याचा जर नाश होणार आहे, तर मृत्यूचें भय कां असावें?

किंवा जर त्याला अविनाशी अशी स्थिति प्राप्त होणार आहे, तर मला वाटतें मरणाला भिण्यापेक्षां त्याची अपेक्षा करणें, हेंच जास्त युक्त होय. बरें तें असो. ह्मातारपणींच मृत्यु जवळ दिसतो काय ? तो तरुणपणींही दिसत नाहीं काय ? उलटा तरूणपणीं मरणाचा संभव जास्त असतो. त्या वेळीं एकादा रोग सहज होतो ; त्यापासून क्वचितच मनस्वी होतात, व तो बरा करायाला फारच प्रयास लागतात. यामुळें थोडकेच लोक ह्मातारपण पाहतात. असें आहे तर, ह्मातारपणालाच आपण कां दूषण द्यावें ? इतकें खरें कीं, आपण दीर्घ कालपर्यंत जगूं अशी तरुण लोकांना आशा असते. परंतु ही आशा व्यर्थ आहे. कारण, जी गोष्ट क्षणभंगुर आहे, ती चिरायू आहे असें मानणें, किंवा जी मिथ्या आहे, ती सत्य आहें असें मानणें, हा शुद्ध वेडेपणा नाहीं काय ? आपण संध्याकाळपर्यंत वांचूं असें खातरीनें कोणीतरी सांगेल काय ? परंतु दीर्घकाल ह्मणजे तरी काय ? आयुष्यामध्यें दीर्घ काय आहे ? मनुष्याला शंभर सोडून दोनशें वर्षें जरी आयुष्य असतें, तरी तें दीर्घ ह्मणतां आलें नसतें. कारण, ज्या कालाचा शेवट होतो, तो कितीही मोटा असला तरी त्याला दीर्घ काल असें ह्मणतां येत नाहीं. तासांवर तास, दिवसांवर दिवस, महिन्यांवर महिने हां हां ह्मणतां निघून जातात. एकदां वेळ गेला तो गेला, तो पुन्हा परत येत नाहीं. व पुढें काय होणार हेंही कळत नाहीं. याकरतां मनुष्याला जी आयुष्यमर्यादा नेमून दिली आहे, तींतच त्यानें समाधान मानून असलें पाहिजे. संसार ह्मणजे एक नाटक आहे. नाटकामध्यें जसा कित्येक पात्रांचा भाग जास्त असतो, कित्येकांचा थोडा असतो, तसें कित्येक मनुष्यांचें आयुष्यमान अधिक असतें, कित्येकांचें कमी असतें.

परंतु मनुष्याचें आयुष्य कितीही थोडें असलें, तरी सन्मार्गानें व सद्धर्मानें राहण्यास तें पुरे आहे.

ज्याप्रमाणें वसंत ऋतूचा बहार सदोदीत राहत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञानीचा नूर सदोदीत राहत नाहीं. तरूणपणानंतर म्हातारपण यावें, हें अगदीं स्वाभाविक आहे, व परिपक्व झालेलें फळ सहजगत्या गळून पडणें जितकें स्वाभाविक आहे, तितकेंच म्हातारपणाच्या शेवटीं मरण येणें हेंही स्वाभाविक आहे. याकरतां मरणाला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

म्हातारपणाविषयीं मला सांगायाचें होतें तें मीं सर्व थोडक्यांत सांगितलें. आतां शेवटीं ईश्वरापाशीं माझें एवढेंच मागणें आहे कीं, तो तुम्हांला दीर्घायु करो, व मी ज्या गोष्टी सांगितल्या त्यांचा अनुभव घेण्यास तुम्हांला ठेवो !

[redacted]

मैत्री.*

मनुष्यस्वभावाच्या रचनेकडे लक्ष दिलें म्हणजे असें दिसून येतें कीं, मनुष्यमात्रांमध्यें परस्परांविषयीं एका प्रकारची स्वाभाविक स्नेहग्रंथि आहे. मनुष्यांचा संबंध जितका लांबचा असतो, तितकी ती ग्रंथि ढिली असते; परंतु तो संबंध जितका जितका निकट होत जातो तितकी तितकी ती घट्ट होतजाते . यामुळें परदेशस्थ लोकांविषयीं जितका आमचा प्रेमभाव असतो, त्यापेक्षां

*सिसरोच्या निबंधावरून

स्वदेशस्थ लोकांविषयीं अधिक असतो; स्वदेशस्थांविषयीं असतो त्याहून स्वनागरिक जनांविषयीं अधिक असतो; त्याहून स्वनातीय लोकांविषयीं अधिक; व आपल्या आप्तांविषयीं तर त्याहूनही अधिक असतो.

याप्रमाणें सर्व संबंधांमध्यें आप्तपणाचा संबंध जरी अगदीं निकट असला, तरी मैत्रीचा संबंध त्याहूनही विशेष आहे. म्हणजे मैत्री हो आप्तपणापेक्षांही श्रेष्ठ आहे. कारण आप्तपणामध्यें जितक्या सद्गुणांची गरज असते, तितक्यांहून मैत्रीमध्यें अधिक सद्गुणांची गरज असते. उदाहरणार्थ उपकारबुद्धि घ्या. आप्तांमध्यें जरी परस्परांविषयीं उपकारबुद्धि नसली, तरी आप्तपणाचें नातें नाहींसें होत नाहीं; कारण, तें जन्मतःच जडलेलें असतें. परंतु मित्रांमध्यें जर उपकारबुद्धि नाहींशी झाली, तर त्यांची मैत्री तत्क्षणीं नष्ट व्हावयाची. आतां सर्व मनुष्यांशी जरी आपला स्वाभाविक संबंध असला, तरी मैत्री ही दोघांमध्यें, किंवा अशा अल्पसंख्येमध्यें मात्र असते. यावरून मैत्री जडण्याला किती कठिण अटी लागतात, हें उघड होतें.

परंतु मैत्रीच्या अटी कितीही कठिण असल्या तरी, त्या सांभाळून मैत्री जोडणें अवश्य आहे. कारण, मनुष्याला संसारांतील ज्या नानाविध विवंचना असतात त्यांनीं त्याचें हृदय होरपळून जातें. त्यावर सांत्वनामृत घालणारा कोणी मित्र नसल्यास हें जीवित्व कोण सहन करूं शकेल! आपण असे कांहीं आपल्याशींच बोलतों आहों अशी रीतीनें हरएक विषयावर बोलायाला दुसरें कोणीतरी असावें, यापेक्षां अधिक सुखद काय आहे? आपल्या ऐश्वर्यापासून आपल्याला जितकें सुख होतें, तितकेंच सुख मानणारा दुसरा कोणी असल्यावांचून त्या ऐश्वर्यांत कसली गोडी? त्याप्रमाणेंच

आपल्या विपत्तीपासून आपल्याला जें दुःख होतें त्याहून तिजसाठीं अधिक दुःख करणारा मित्र असल्याविना विपत्ति तरी कशी-सहन करतां येईल ?

ज्या ज्या वस्तूंची आपण अपेक्षा करतों, त्या त्या प्राप्त झाल्या असतां प्रत्येकीपासून एकच कार्य होतें. उदाहरण, संपत्तीच्या योगें सुखानें राहतां येतें; सत्ता मिळाली तर चार लोक आपल्या मागून असतात; किताब वगैरे मिळाल्यानें प्रशंसा होते; ऐहिक सुखाचें साधन प्राप्त झाल्यास त्या सुखाचा उपभोग घेतां येतो; आरोग्य असल्यास शरीराला व जिवाला आनंद होतो; इत्यादि. परंतु मैत्रीपासून अनेक कार्यें होतात. जिकडे जावें तिकडे ती समागमें असते; तिला कोणत्याही स्थानीं अटकाव नसतो; वेळ अवेळ हा भेद तिला नसतो; व तिचा कधीं कंटाळा येत नसतो. मित्र असला तर निराशेला थारा मिळत नाहीं. मित्र हे परस्परांच्या प्रतिमा होत. यामुळें मित्र एकमेकांपासून दूर असले, तरी परस्परांना जवळसे वाटतात; निर्धन असले तरी श्रीमंतसे वाटतात; अशक्त असले तरी सशक्तसे वाटतात; व (सांगितलें तर खरें देखील वाटावयाचें नाहीं) मरण पावले तरी जीवंत आहेतसें वाटतात. जरी या संसारांतील वस्तूंच्या मोलाविषयीं निरनिराळ्या स्वभावांच्या मनुष्यांमध्यें मतभेद असले, तरी मैत्रीच्या मोलाविषयीं सर्वांचें एकच मत आहे. कित्येक लोक म्हणतात कीं, नीति म्हणजे कांहीं नाहीं; साऱ्या तोंडच्या गोष्टी आहेत; बारीक रीतीनें पाहिलें तर एथून तेथून सारा दांभिकपणा आहे. याकरतां ते नीतीला तुच्छ मानितात. कित्येक मिळेल त्या भाजीभाकरींत समाधान मानतात; ते पैशाला तुच्छ मानितात; मानमरातब, पदव्या, अधिकार, कामगिऱ्या यांना कित्येक

तुच्छ मानितात; तसेंच ज्या वस्तु कित्येकांना प्रिय वाटतात त्याच दुसऱ्यांना तुच्छ वाटतात. परंतु मैत्रीची योग्यता सर्वांना सारखी दिसते. राज्यकारभारांत निमग्न झालेले पुरुष, ज्ञानासक्त होऊन विद्येच्या पाठीस लागलेले पुरुष, आपला प्रपंच चालवून असणारे जन, व विषयांध होऊन सुखोपभोगांत बुडालेले लोक,-या सर्वांना मनापासून वाटतें कीं, आपणांला कोणी तरी मित्र असावा; मित्रावांचून सर्व व्यर्थ. हेंचसें काय, पण **अथेन्स**मधील **टिमोना**सारखे जे जनद्वेष्टे व कुशील असतात, त्यांना देखील सोबत्याची गरज लागते. कारण त्यांच्या दुष्ट वृत्तीचें भांडें कोणाच्या तरी कपाळावर फोडण्यास त्यांना मनुष्य पाहिजे. सारांश, मनुष्याच्या संगतीची इच्छा असणें स्वाभाविक आहे. समजा कीं, कोणी यक्षानें आपल्याला भर वस्तींतून उचलून नेऊन एकाद्या एकांत स्थानीं नेऊन ठेविलें ; आत्म्यांला लागतील त्या वस्तु तेथें यथेच्छ पुरविल्या ; परंतु आमच्या दृष्टीस मनुष्याचें मात्र तोंड कधीं पडूं नये असें केलें ; तर याप्रकारचें जिणें आत्म्यांला सुखावह होईल काय ! किंवा देवानें प्रसन्न होऊन आपल्याला गगनामध्यें उड्डाण करण्याचें सामर्थ्य दिलें, तर या त्रिभुवनाची रचना पाहून अथवा आकाशांत चकाकणाऱ्या चांदण्यांचें सौंदर्य निरखून आत्म्यांला सुख होईल काय ! खचित होणार नाहीं. परंतु तेंच आत्म्यांला झालेला आनंद कळविण्यास दुसरें कोणी असल्यास, आत्म्यांला किती सुख होईल बरें ! तात्पर्य, मनुष्यस्वभावाला एकलकोंडेपणा सहन होत नाहीं. जे लोक जगाचा त्याग करून अरण्यवास स्वीकारतात, त्यांना देखील जनत्यागाचा अनुभव येतो; कारण मानवसंगतीच्या अभावानें झालेली शून्यता भरून काढण्यासाठीं ते श्वापदांची किंवा निर्जी-

व पदार्थांचीही योजना करितात, असें आपण ऐकतों. सारांश, मनुष्यस्वभावांतून जर स्नेहभाव काढून टाकला, तर एक शहर किंवा एक घरही सुरक्षित राहणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर जमिनीची लागवड करण्याचें काम देखील बंद होईल. मैत्रीची किती जरूर आहे, व तिची शक्ति किती आहे, हें पाहणें असलें तर द्वेष व कलह यांजकडे नजर दावी म्हणजे कळेल. ज्या घरांत किंवा ज्या राज्यांत कलह शिरतो, तें घर किंवा तें राज्य किती काळपर्यंत टिकतें? या प्रश्नाचें उत्तर मिळविण्यासाठीं इतिहास धुंडायाला नको. ज्यानें त्यानें आपल्या सभोंवार पाहिलें म्हणजे कळेल.

आतां मैत्री कशापासून उत्पन्न होते? कित्येक लोक म्हणतात कीं, दुर्बलता व पराक्रमशून्यता यांपासून मैत्री उत्पन्न होते; म्हणजे, मनुष्याच्या अंगीं कर्तबगारी नसली अथवा सामर्थ्य नसलें, म्हणजे, आपलें कार्य साधून घेण्यासाठीं, पराक्रमी व यशस्वी लोकांची तो मैत्री करतो. हें म्हणणें जर खरें असलें, तर चार गोष्टी झाल्या पाहिजेत. १, मनुष्य जितका जितका स्वतः पराक्रमहीन असेल, तितक्या तितक्या प्रमाणानें तो अधिक मित्रसंख्या जोडील. २, दोघां मित्रांपैकीं एक पराक्रमहीन व दुसरा पराक्रमी व सामर्थ्यवान् असेल. ३, इच्छित हेतु सफल झाल्यावर मैत्री नष्ट होईल; म्हणजे गरज सरो व वैद्य मरो, हें वाक्य मैत्रीला लागलें पाहिजे. आणि ४, गरीब लोकांमध्यें मैत्री होणार नाहीं. परंतु या चोहोंपैकीं एकही गोष्ट खरी नाहीं हें आपण पाहतों. कोणाचीही मित्रसंख्या त्याच्या सामर्थ्याप्रमाणें अधिक उणी नसते. सामर्थ्य व मित्रांची संख्या यांचा कांहींच संबंध नसतो. समर्थाच्या मागून कार्यवादु लोक शेंकडों असतील, व एक कार्यवादुजन अनेक समर्थांच्या माग

गून असेल ; परंतु त्यांच्यामध्यें मैत्री उत्पन्न होईल ही कल्पनाही करायाला नको. तसेंच दोघां मित्रांपैकीं एक पराक्रमी व दुसरा शौर्यहीन, एक कुबेर व दुसरा कंगाल, असा नसतो. दोघेही बहुतकरून सारखेच कर्तबगार असतात, अथवा सारखेच गरीब असतात. तसेंच स्वार्थसाधन झाल्यावर खरी मैत्री नष्ट होत नाहीं याविषयीं प्रमाणें देण्याची जरूरी दिसत नाहीं. वास्तविक प्रकार पाहिला असतां, ज्या लोकांची स्वार्थावरच नजर असते, ते लोक मैत्री जोडण्यालायक नसतात. जे आपल्यावरच अवलंबून असतात, ज्यांना आपल्या पराक्रमाविषयीं खात्री असते, व ज्यांना दुसऱ्याची फारशी गरज पडत नाहीं, तेच लोक सख्य जोडण्यास विशेष योग्य असतात. अशांची मैत्री जडली ह्मणजे तिजपासून परस्परांना अनेक फायदे होतील हें निःसंशय आहे. परंतु त्या फायद्यांच्या आशेनें ते मित्रत्व जोडतात असें ह्मणतां येत नाहीं. यावरून दुर्बलतेपासून मैत्री उत्पन्न असलें होतें हें ह्मणणे खरें नाहीं. तिचें जनन दुसऱ्या कारणापासून पाहिजे.

मनुष्यामध्यें प्रीति हा विकार उपजतच असतो; व आपला व्यापार चालविण्याला स्थान शोधण्यास तो सदा जागृत असतो. तें स्थान मिळाल्यावर तेथें तो आपली वसती करतो. असें झालें ह्मणजे अमक्याची प्रीति अमक्यावर आहे असें आह्मी ह्मणतों. त्या दोघांच्याही प्रीतीची सदलाबदल झाली ह्मणजे त्यांची मैत्री झाली असें ह्मणतों यावरून मैत्री ही स्वाभाविक आहे, हें उघड होतें. व ज्याप्रमाणें स्वभाव एकाएकीं पालटत नाहीं, त्याप्रमाणें खरी मैत्री एकाएकीं तुटत नाहीं.

ज्या अर्थीं स्नेहभाव स्वभावतःच मनुष्याच्या ठायीं आहे, त्या अर्थीं त्याची योजना ईश्वरानेंच केली आहे हें उघड होतें. आणि

याकरितांच मैत्रीची गणना सद्गुणांमध्यें केली पाहिजे ; अर्थात् मैत्री हा एक सद्गुणच मानिला पाहिजे. असें आहे तर, जे लोक स्वभावानें दुष्ट व अधर्माचरण करणारे असतात, त्यांच्यामध्यें इतर सद्गुणांप्रमाणें हाही सद्गुण वास करणार नाहीं. यासाठीं तसल्या लोकांमध्यें मैत्री असत नाहीं. मैत्री जडण्याला व ती कायम राहण्याला मनुष्य सत्यशील व सद्धर्मी असावा लागतो.

मनुष्याच्या स्वभावांत जर कांहींच व्यंग नसतें, व सर्वच सज्जन आणि निखालस निर्मल असते, तर त्यांच्या मैत्रीला धोका आला नसता. ती त्यांच्या मरणापर्यंत कायम राहिली असती. परंतु सर्व प्रकारें निर्मल असे मनुष्य या जगांत सांपडणें अशक्य आहे. त्यांचे स्वभावही एकसारखे असणें अशक्य आहे. यासाठीं मैत्रीच्या स्थैर्याला अनेक अडथळे असतात. सर्वांना एकच मार्ग आवडतो असें नाहीं; अथवा सर्वांचे स्वभाव स्थिर असतात असेंही नाहीं. यामुळें मित्रांचा वेबनाव होण्याचा संभव असतो. बरें, इतकेंही करून त्यांचो मैत्री कायम राहिली तरी ती विनधास्त नसते. कारण, जर ते एकाच लाभाची इच्छा करीत असले — झगडे पडण्या किंवा पैसा मिळविण्याची त्यांना समान उत्कटेच्छा असली-तर त्यांच्या मैत्रीला मोठीच भीति असते. धनलोभ व मानलोभ यां सारखे भयंकर शत्रु मैत्रीला दुसरे नाहींत. धनलोभ तर बहुतेकांना असतोच, व मानलोभ चांगल्या लोकांनाही असतो. तेव्हां मैत्रीला किती अडचणी आहेत, हें उघड होतें. तथापि ती कायम ठेवण्याला आपण झटलें पाहिजे.

मित्र कोणत्या प्रकारचा असावा, याविषयीं दोन शब्द सांगणें जरूर आहे, आमचीं गुरेंढोरें किती आहेत, आमचें देणेंघेणें कोणाजवळ किती आहे, इत्यादि बाकीच्या

बहुतेक सर्व गोष्टींची आह्मांला सविस्तर माहिती असते. परंतु आमचे मित्र कोण कोण व किती आहेत हें आह्मांला खातरीनें सांगतां येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय? एकादा व्यवहार करतांना आह्मी आपल्या हिताहिताचा पूर्ण विचार करितों; ज्याच्याशीं संबंध ठेवायाचा असतो, तो कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे याविषयीं बारीक चवकशी करितों. परंतु मैत्रीची गांठ बांधण्यापूर्वी आह्मी तशी चवकशी करीत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय! याकरतां मैत्री जोडतांना कांहीं गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. त्या ह्या. जे संभावित, स्थिरबुद्धि, व स्थिरवृत्ति असतील त्यांचाच स्नेह करावा; इतरांचा करूं नये. स्नेह करण्यापूर्वी त्यांची पुरी परीक्षा करावी; व ते कसास उतरल्यास त्यांची मैत्री करावी. कित्येक इतके पाजी असतात कीं, थोड्याशा लालचीनें देखील त्यांची किंमत समजून येते. कित्येक अंमळ वरच्या पायरीचे असतात. म्हणजे थोड्याशा स्वार्थाकरतां ते मित्रद्रोह करणार नाहींत; पण स्वार्थाचा अंश अंमळ बराच अधिक दिसला तर ते आपलें स्वरूप प्रगट केल्यावांचून राहत नाहींत. कित्येक असे असतात कीं, पैशासाठीं ते मित्राची हानि करणार नाहींत; परंतु मानमरातब, पदव्या इत्यादिकांविषयीं त्यांची इच्छा इतकी बलवत्तर असते कीं, त्या वस्तु जर मित्रद्रोहानें मिळण्यासारख्या असल्या, तर मित्रद्रोह करण्यास ते कधींही चुकणार नाहींत. सारांश, मित्राची परीक्षा प्रसंगानुसार होते असें ह्मणतात ते खरें आहे. याकरतां चांगला मनुष्य पाहून त्याच्याशीं मैत्री करावी. तसेंच जे मोकळ्या मनाचे असतील ते मैत्री करण्यास प्रसंत करावे. कारण जो कुढ्या मनाचा आहे, तो आपलें मन मित्राला समजूं देणार नाहीं, व त्याच्या मनांत कपट

असल्यामुळें उभयतांच्या मनाचा मिलाफ होणार नाहीं. जो सुशील असेल व ज्याचे आचारविचार आपल्या आचार-विचारांशीं मिळतील, त्याची मैत्री करावी. जो चांगला असेल तोच मैत्रीला पात्र होईल. कारण तो स्वतः चांगला असल्यामुळें त्याला आपल्या मित्राच्या चांगुलपणाचा संशय येणार नाहीं, व कोणी विघ्नसंतोषी मनुष्यानें त्याच्या मित्राविषयीं वाईट सांगितलें, तर त्याला तें खरें वाटणार नाहीं; तो मित्राचाच पक्ष घेऊन बोलेल.

मित्राशीं कोणत्या रीतीनें वागावें—म्हणजे त्याजवर किती प्रीति ठेवावी—याविषयीं चार मतें आहेत. १ लें, आपण आपल्या स्वतःविषयीं जेवढी काळजी वाहतों तेवढी मित्राविषयीं वाहवी; २ रें, जेवढी मित्राची प्रीति आपल्यावर असेल, तेवढीच आपली त्याच्यावर असावी; ३ रें, आपल्याला जेवढी आपली योग्यता वाटत असेल, तेवढीच तीं आपल्या मित्राबद्दलही वाटावी असें करावें; व ४ थें, आपला मित्र कदाचित् एकाद्या दिवशीं आपला शत्रु होईल असें मनांत बाळगून त्याच्याशीं वर्तन करावें. म्हणत अगदीं खरें असें एकही मत नाहीं. पाहा. आपण स्वतःविषयीं जेवढी काळजी बाळगितों तेवढीच मित्राविषयीं बाळगावी हें जर खरें, तर जी गोष्ट आपण स्वतःसाठीं करणार नाहीं, ती मित्रासाठींही करूं नये असें झालें. परंतु ज्या गोष्टी आपण स्वतःसाठीं करीत नाहीं त्या मित्रासाठीं करतों कीं नाहीं? पाजी मनुष्यांची मनधरणी करण्याचें आम्हांस आवडत नसतें; पण मित्रासाठीं पाजी लोकांची देखील विनवणी करण्यास आम्ही तयार होतों कीं नाहीं? तसेंच आत्मस्तुति करणें बरोबर नाहीं; पण आम्ही मित्राची प्रशंसा करीतों कीं नाहीं? सा-

रांश, जें आपण स्वत:साठीं करणार नाहीं, तेंच मित्रासाठीं करतों, असें दाखविण्यासाठीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील.

दुसरें मत असें आहे कीं, जेवढी मित्राची प्रीति आपल्यावर असेल, तेवढी आपली त्याजवर असावी. या मताप्रमाणें आपण बागायाला गेलों तर आपल्याला एक तराजू व जमाखर्चाचें टिपण हीं नेहमीं बाळगावीं लागतील. कारण जेवढें मित्र आपलें कल्याण करणार, त्याच्या तंतोतंत आपण त्याचें करायाचें, त्याच्या तिळमात्र अधिक उणें करायाचें नाहीं याकरतां, त्यानें केलेले उपकार जमा धरून आपण त्याजवर केलेले उपकार खर्ची घालून, बाकी कोणत्या अंगास निघते, हें पाहण्यासाठीं, तराजूची अवश्य गरज लागेल. व बाकी तर अंगावर ठेवायाची नाहीं ; याकरतां नेहमीं हातांत तराजू घेऊन बसलें पाहिजे. परंतु खऱ्या मैत्रीमध्यें या प्रकारचा जमाखर्च होत नसतो. आपण कदाचित् जास्ती देऊं किंवा जास्ती घेऊं, ही भीति खऱ्या मित्रांना नसते. ज्या ठिकाणीं प्रीतीचा सौदा आहे, त्या ठिकाणीं देण्याघेण्याचीं खातीं नसतात.

तिसरेंही मत बरोबर नव्हे. कारण एकादा मनुष्य भिडस्त असतो; एकाद्याला आपले गुण काय आहेत हें माहीत नसतें; एकादा स्वभावत: निरुत्साह असतो. परंतु त्याची खरी योग्यता मित्रांना माहीत असून त्यांनीं त्याच्यासारखेंच म्हणावें, हें बरोबर नाहीं. त्यांनीं त्याला धीर देऊन त्याचे गुण जनाच्या नजरेस आणिले पाहिजेत, व त्याची चहा होईल असें केलें पाहिजे.

चवथें मत राहिलें तें इतकें दुष्ट आहे कीं, त्याचा विचारही करूं नये. आपला मित्र एकाद्या दिवशीं आपला शत्रु होईल असें समजून त्याशीं वागावें, म्हणजे अर्थात्

त्याशीं नेहमीं कपट करावें असें होतें. कपट करणें हा प्रीतीचा धर्म नव्हे व जेथें कपट आहे तेथें प्रीतीचा प्रवेश होणार नाहीं. जेथें प्रीति नाहीं तेथें मैत्री नाहीं. या मताप्रमाणें वागणारे कोणी असले, तर ते मैत्रीस पात्र नाहींत ; व त्यांची ओळख झालीच तर ती खरी मैत्री नव्हे. मित्र आपला शत्रु होईल असें मनांत वागवून मैत्री करण्यापेक्षां, जो एकाद्या दिवशीं कदाचित् आपला शत्रु होईल अशा मनुष्याशीं स्नेहच करूं नये हें चांगलें.

सारांश, मित्रांमध्यें परस्परांविषयीं अत्यंत प्रीतिभाव असला पाहिजे. त्यांनीं स्वतःचा स्वार्थ मनांत न आणतां एकमेकांचें होईल तेवढें हित केलें पाहिजे, व परस्परांत परकीपणा बिलकुल नाहीं असें समजून एकमेकांशीं वागलें पाहिजे.

मित्रत्वामध्यें पाळण्याचा मुख्य नियम असा आहे कीं, आपण मित्रापाशीं कांहींएक अयोग्य किंवा निंद्य गोष्टीचें मागणें करूं नये; व तसलें मागणें मित्रानें आपल्यापाशीं केल्यास आपण त्याला मान्य होऊं नये. कारण जी गोष्ट निंद्य आहे, ती आपण दुसऱ्यासाठीं केली तरी, आपला दोष कमी होत नाहीं. आपण एकवेळ दोषी ठरलों, म्हणजे आपल्या मनाचें स्वास्थ्य नष्ट होतें; मनाचें स्वास्थ्य नष्ट झालें म्हणजे प्रीतीचा झरा अटूं लागतो; व प्रीति नाहींशी झाली म्हणजे मैत्री नाहींशी होते.

परंतु रास्त असेल तें करण्यास आपण सदा तत्पर असावें; मित्राच्या सांगण्याची वाट पाहूं नये. मित्राच्या कल्याणाची गोष्ट असेल त्यावेळीं आळस बिलकुल करूं नये; त्याला मोकळ्या मनानें सल्ला द्यावा; व कारण पडल्यास कठोर भाषणाचीही योजना करावी. जुन्या मित्रानां टाकून नवीन मित्र

जोडण्यास जाऊं नये. नवीन मित्र जर स्नेहपात्र असले, तर त्यांचीही मित्रमालिकेंत गणना करावी; परंतु असें करतांना जुन्या मित्रांकडे दुर्लक्ष करूं नये. मित्रांमध्यें जो बुद्धीनें, मानानें, किंवा द्रव्यानें श्रेष्ठ असेल, त्यानें इतर मित्रांच्या पायरीचाच मी आहें, असें समजून त्यांच्याशीं वागावें व आपला श्रेष्ठपणा त्यांच्यावर मिरवूं नये. या प्रकारची वागणूक मित्रांनींच करावी असें नाहीं; ती सर्वांनीं करावी. प्रत्येक मनुष्यानें आपल्या बुद्धीचा किंवा द्रव्याचा लाभ दुसऱ्यांस देऊन जे आपल्याहून कमी योग्यतेचे असतील त्यांना आपल्या पायरीप्रत आणण्याचा प्रयत्न करावा. एणेंकरून जगामध्यें प्रीति, ज्ञान, व सुख, यांची वृद्धि होईल.

मित्रांमध्यें जे कमी योग्यतेचे असतील त्यांनीं आपल्या भाग्यवान मित्राचा हेवा करूं नये. त्याच्या मित्रसंख्येमध्यें आपली गणना झाल्यानें आपली योग्यता वाढली असें त्यांनीं समजावें.

मित्रांनीं परस्परांशीं नीतीनें वागलें पाहिजे. मित्रांच्या संगतींत नीतीविरुद्ध आचरण केलें असतां चालेल असें समजूं नये. कारण मैत्री ही नीतीची दासी आहे, अनीतीची नाहीं; नीतिमान मनुष्याला दुसऱ्याच्या साह्यावांचून आपले चांगले उद्देश सिद्धीस नेतां येणार नाहींत. ह्मणून मैत्रीची योजना केली आहे. तिचा उपयोग जर अनाचारांत होऊं लागला तर ती तत्क्षणीं लयास गेल्यावांचून राहणार नाहीं.

परस्परांच्या मनांत परस्परांविषयीं पूज्यबुद्धि राहील अशा रीतीनें मित्रांनीं वर्तन ठेविलें पाहिजे. निंद्य भाषण करणें, हलकट शब्दांची योजना करणें, अयोग्य कृत्यें करणें, इत्यादि प्रकार नसावे.

मित्रांमध्यें परस्परांना बोध करण्याचे व वाकूताडन करण्याचे प्रसंग कितीएक वेळां येतात. अशा प्रसंगीं ज्याचा कमी पक्ष

असेल, त्यानें विषाद मानूं नये, कारण त्याचें कल्याण व्हावें अशी त्याच्या मित्राची इच्छा असते. परंतु मनुष्याचा स्वभाव असा कांहीं विलक्षण आहे कीं, खरें बोलल्यानें द्वेष उत्पन्न होतो, व "हांजी हांजी" केल्यानें सख्य होतें. मैत्रीमध्यें हांजी हांजी करण्याच्या स्वभावापेक्षां घातक दुसरें कांहीं नसेल. मित्राच्या सर्वच म्हणण्यास जो मान डोलवितो, तो मित्राचा हितचिंतक नव्हे. कारण, मित्राचे दोष कायम राखण्यास व त्याला नाशाप्रत नेण्यास तो साधनीभूत होतो. याकरतां तोंडपुजेपणा न करतां खरें असेल तेंच बोलावें. पण फार संभाळून बोलावें; निरर्थक कडू भाषण करूं नये व शब्दताडन करावेंच लागलें, तर त्याच्या हृदयाला टोंचतील अशा शब्दांची योजना करूं नये. मित्रानेंही अशा बोलण्याचा राग मानूं नये. खरें सांगितलें असतां ज्याला राग येतो, त्याचें कल्याण होण्याची मोठीशी आशा नसते.

वर सांगितलेंच आहे कीं, मित्राशीं तोंडपुजेपणा करूं नये. तोंडपुजेपणा करणें हें मित्रत्वालाच शोभत नाहीं असें नाहीं; पर तें मनुष्यपणालाही योग्य नाहीं. मुखस्तुति करणाऱ्या मित्रापेक्षां उघड शत्रु बरा; कारण शत्रु असतो तो अनेक प्रसंगीं खरें बोलतो, परंतु तोंडापुरतें बोलणारा असतो तो नेहमीं खोटें बोलतो.

जे लोक खरोखर सद्गुणी नसतां आपण सद्गुणी आहों अशी शेखी मिरवूं पाहतात, तेच स्तुतीला लुब्ध असतात. त्यांच्या मनाप्रमाणें कोणी भाषण केलें म्हणजे त्यांना वाटतें कीं आपल्या गुणांचें योग्य वर्णन झालें; व तें ऐकून ते फार खुष होतात. परंतु अशा योगानें खरें कायतें त्यांच्या कानीं पडत नाहीं.

तोंडपुजेपणा करणारे लोक दोन प्रकारचे असतात. एक,

हांजी हांजी करणारे; व दुसरे, वाहेरून विरोध दाखवि-णारे. हांजी हांजी करणारे लोक बहुधा नोकर लोकांत असतात. धन्याच्या बोलण्यावर अतिशयोक्ति करण्याची त्यांची चाल असते. धनी अमळ हसमुख झाला कीं त्यांचा खदखदाट सुटतो. धन्याचें तोंड अंमळ दुःखी दिसलें कीं त्यांना ओ-क्सावोक्शी रडूं येतें. सारांश, धन्याच्या कलाप्रमाणें अ-तिशयोक्तीनें वागून धन्याची मर्जी संपादन करण्याची ते खट-पट करतात. यालोकांविषयीं फार सांगण्याची गरज नाहीं. ते तेव्हांच ओळखतां येतात. परंतु मिथ्या बाहेरून विरोध दाखवि-णारे असतात त्यांनाही फार जपलें पाहिजे. कारण त्यांची मसलत एकाएकीं लक्षांत येण्यासारखी नसते. असले लोक आपले वरिष्ठ किंवा मित्र जें कांहीं म्हणतात, त्याचा उलट पक्ष बळेंच उचलून त्यांच्याशीं वाद करण्याचें मिष करितात; व शेवटीं आपण हार घेऊन आपला मोड झाला असें दाखवि-तात. म्हणजे दुसऱ्या पक्षाला स्वाभाविकपणें आनंद व एका प्रकारचा गर्व होतो. आपण शहाणा, आपलें म्हणणें खरें, व तें प्रतिपादन करून दाखविण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे, वगैरे त्याला वाटतें, व हे गुण जरी ख-रोखर त्याच्या अंगीं नसले तरी उलट पक्षाचा मोड झा-लेला पाहून त्याचा तो समज दृढ होतो. म्हणून अशा प्रकारचें वर्तन करून मित्राला फसवूं नये.

येणेंप्रमाणें मैत्रीचे नियम पाळले असतां मैत्री चिरायु होईल. पण इतकेंही करून मैत्रीचे बंध तोडण्याचा प्रसंग दैवयोगानें आलाच तर ते जपून तोडावे; भांडण करूं नये, कठोर शब्द बोलूं नये, वर्म काढूं नये, सारां-श, मैत्रीच्या स्थानीं वैर होईल असें करूं नये.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई.
पुस्तक.
क्रमांक ..... दि. .....

याच ग्रंथकारानें केलेलीं पुस्तकें.

१. **ब्रिटिश राज्यव्यवस्था** म्हणजे इंग्लिशांच्या राज्यास सांप्रतची स्थिति कशी प्राप्त झाली ह्याचें कथन कि० ८ आणे टं० ह० एक आणा.

---

२. **कर्तव्यविचार** अथवा व्यवहारनीति आवृत्ति २ री कि० ५ आणे टं० ह० अर्धा आणा.

निबंधसंग्रह-लार्ड बेकन यानें लिहिलेल्या निबंधांतून उत्कृष्ट ३७ निबंधांचें भाषांतर विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेलें लोकांस माहितच आहे. हल्लीं ते निबंध एकत्र करून स्वतंत्र छापत आहेत. कि० १२ आणे. टं० ह० एक आणा.

वरील १ व २ पुस्तकांस दक्षिणाप्राइज कमिटीकडून बक्षीस मिळालें आहे, आणि नावाजलेल्या वर्तमानपत्रांत यांविषयीं अनुकूळ असेच अभिप्राय आले आहेत. हीं पुस्तकें "विविध-ज्ञानविस्तार पुस्तकालया" मध्यें विकत मिळतील.

स्वशरीरसंरक्षण

किंवा

मनुष्याची मोठी चुकी

अथवा

स्वशरीरसंरक्षणाविषयीं मनुष्यप्राण्याची हयगय.

हें पुस्तक

बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर

यांनीं केलें,

तें

मुंबईंत,

जावजी दादाजी यांच्या

निर्णयसागर छापखान्याचे मालक तुकाराम जावजी

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किंमत ६ आणे.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर केलें असे.

प्रस्तावना.

आपलें शरीर चांगलें सशक्त असावें, आणि आपली संतति सुदृढ व्हावी, ही इच्छा तर प्रत्येक मनुष्याची असते, आणि ह्याप्रमाणें घडणें मात्र कठीण पडतें. पुष्कळ लोक नेहमीं कुरकुरत असतात कीं, काय करावें बोवा ? प्रकृति फार अशक्त, कांहीं इलाज चालत नाहीं ! जेवण जात नाहीं, उद्योग होत नाहीं, थकवा फार येतो; ह्यामुळें आह्मी अगदीं निरुपयोगी होत चाललों आहों ! पण असें कां होतें ? व असें न होण्यास कांहीं उपाय आहे कीं नाहीं. ह्या गोष्टीकडे लोकांचें फारसें लक्ष लागत नाहीं. व शरीरसंरक्षणाची हयगय नेहमीं मनुष्याचे हातून घडत असते. ही न घडावी, व ह्या मुख्य गोष्टीकडे लोकांचें लक्ष लागावें, आणि स्वशरीरसंरक्षण उत्तमप्रकारें व्हावें, ह्या उद्देशानें हें पुस्तक मी लिहिलें आहे. ह्यांत मनुष्याच्या हातून स्वशरीरसंरक्षणाच्या कामीं हयगय कशी घडत असते व ती कोणत्या उपायानें दूर करितां येईल, हें दर्शविलें आहे. लोक जर ह्या विषयाचें मनन करून स्वशरीरसंरक्षण करण्याकडे पूर्ण लक्ष्य देऊं लागतील, तर माझ्या ह्या श्रमांचें सार्थक झालें, असें मी समजेन.

वाळकृष्ण दिनकर वैद्य, कल्याणकर.

ग्रंथ संग्रहालय

श्री

स्तुतिपूर्वक अर्पणपत्रिका.

श्लोक (भुजंगप्रयात).

पहा नाम तें **जावजी** हें असोनी ।
तया बोलती आवजी आदरांनीं ॥
असा मान कां लोक हे त्यास देती ।
चरित्रें धरा त्या गुणाला स्वचित्तीं ॥ १ ॥

आर्याबंध.

जो **कै** लासीं जातां
गे **ला** गेला खरा हिरा कथिलें ॥

ह्या **स** कल वृत्तपत्रीं
तो **वा** नायास योग्य हें जथिलें ॥ १ ॥
त्या **सी** सख्य असुनियां
जो **जा** णूनी तयास नच वर्णीं ॥
तो **व** क्ता कृपणाहुनि
पा **जी** तोटा नसेच कीं वर्णीं ॥ २ ॥
वं **दा** या योग्य नरा
वं **दा** वें हाच आपुला धर्म ॥
रा **जी** यास असावें
कीं **शो** वट हा घडो असें मर्म ॥ ३ ॥
वा **ट** च ही अवध्यांची
मु **नि** जनही हेंच इच्छुनी गेले ॥
अ **र्ण** वभव तरले जे
ह्या **य** तीं ते सदैव जागेले ॥ ४ ॥
ऐ **सा** कित्ता असतां
कां **ग** र्वानें फुगोनियां जावें
प **र** गुण वर्णन करण्या
स्वे **च्छा** दाबूनि काय लाजावें ॥ ५ ॥
क **प** टी अकृतज्ञ असें
सु **खा** सुखीं कां ह्मणूनियां ध्यावें ॥
हा **न्या** य कोठचा वा
ज्या **चे** त्यानें मनांत उमजावें ॥ ६ ॥

स· न्मा नाहीं जहाला
तो ल पवुनियां लपेल कां जगतीं ॥
स क लहि सद्गुण त्याचे
आ हे तच कीर्तिदूत शीघ्रगती ॥ ७ ॥
सु गु णी नरास कोणी
ह्म ण ती तो देवतांश अवतरला ॥
सं ग्रा ह्य पूज्य होतो
स ह जासहजीं मनुष्य भूवरला ॥ ८ ॥
कै क जनीं स्तविला जो
तो अ ति गुणवंत खास समजावें ॥
त्रा स न उगेंच कधीं
म न गुण वर्णावया न लाजावें ॥ ९ ॥
हें स कल मनीं आणुन
स ज्ज न नर जावजीस मी स्तवितों ॥
जो नां दे कीर्तिगुणें
त्या चे हे अल्प सुगुण ऐकवितों ॥ १० ॥
जो मि त्र मानला तो
पु त्र जसा लाडका पिता मानी ॥
रा हो सुखांत इच्छी
त्या ते बघतां उठोनि सन्मानी ॥ ११ ॥
जो व र्णनीय सुगुणी
तो ह्यां चा पूर्ण मित्र होत असे ॥

त्यां च्यां त सदां मिसळे
जा त गरीबी कधीं न पाहतसे ॥ १२ ॥
तो व णिज शूद्र अथवा
व र्ण असो म्लेंछ विप्र वा परभू ॥
कीं यं त्रविज्ञ इंग्लिश
मि त्र जसा नेणतीच अपपर भू ॥ १३ ॥
तत्कु शलार्थ पुसुनियां
तो शा ब्दें गौरवी करी मदत ॥
कीं ल ग्नकार्यसमर्थीं
ज्ञा ता जाई स्वयें असे विदित ॥ १४ ॥
तें व र्णन काय करूं
म न गरिबाचेंच जाणतें त्यास ॥
आ म्र फलाची गोडी
खा ता जाणे कळे न भलत्यास ॥ १५ ॥
दे आ नंद दुजाला
आ णि सदा तो असे प्रसन्नमुख ॥
कीं औ दार्यगुणानें
स दा मिळे स्थान यास जें प्रमुख ॥ १६ ॥
आ र्य श्रेष्ठ खरा तो
पा हे कीं खेळ रोजचे त्याचे ॥
हे गु ण गाते झाले
ह्म णा ती अद्भुत महात्म्य दात्याचें ॥ १७ ॥

नू त न जो ग्रंथ करीं
न र त्याचे पाहुनी गुणावगुण ॥
दे अ ति योग्यच देणें
जो प्र तिमासीं उरे न कुणकूण ॥ १८ ॥

अ ति पुस्तकें जहालीं
ह्या म नुमध्यें प्रसिद्ध याच गुणें ॥
सा च सदा वचनाचा
तो हो ता छापित्या पडे न उणें ॥ १९ ॥
जे ते थें छापियले
ते यां चे ग्रंथ भूतलीं फिरती ॥
त्यां चें स्वरूप बघतां
सा च गमे न्यूनता न पाव रती ॥ २० ॥

ग रि बीमुळें जयाचे
मि त्र हि पूर्वीं गरीबसे होते ॥
ते पा ठ थोपटीती
या ह्र नी अधिक काय राहो तें ॥ २१ ॥

ध न लाभलें मिळाला
त्या स जगीं मान इंग्लिशांकडुनी ॥
ग र्वा चा लेश नसे
ध्या नीं ह्मणुनी सुयोग ये घडुनी ॥ २२ ॥
हा कि ति वांछिति बी० ए०
स त्ता प्रभुची अचिंत्य हेंच खरें ॥

मा **गि** तल्यावांचुनि दे
सं **र** क्षक देव उतरतो नखरे ॥ २३ ॥

ठा **वा** न शब्द इंग्लिश
ते **वा** क्या नेणती न त्या लिपिस ॥
जें **त्यां** स लाभलें पद
त्या **चें** हें नांव जस्टिसॉफ् धि पिस ॥ २४ ॥

ह्या **म** र्त्यलोकचा नर
श्री **ज** गदीश्वर करील देवसम ॥
ह्या **च** र्तनेंच होतो
ग **री** व असला तरी कुबेरसम ॥ २५ ॥

हा **ल** क्षें पूर्ण करी
ह्या **प्रे** साचेंच काम अंतवरी ॥
न **म** हासद्गुण हा कीं
स्त्री **जा** तीवंत वर दुजा न वरी ॥ २६ ॥

हा **णू** नि सर्व विघ्नें
ज **न** हो वागा करा पुरें काम ॥
जो **हें** सद्व्रत पाळी
तो **स्व** गुणें मेळवील सन्नाम ॥ २७ ॥

त्या **श** त्रु नसे कोणी
ख **री** खुरी शुद्ध जरि असे करणी ॥
प **र** मेश्वर त्यास सदा
दे **सं** तोषेंच जय नको सरणी ॥ २८ ॥

घ र दार वा विपुल धन
सा क्ष रतेविण घडेच ईशदया ॥
को णा चें साह्य नको
त्या चें सच्छील आणितें उदया ॥ २९ ॥
जे पु त्र सत्पित्याचे
ते स्त वनायोग्य शील धरतात ॥
लो क पित्यापरि त्याचें
ना मी वर्णन असेंच करतात ॥ ३० ॥
मी त्यां च्या सत्पुत्रां
ह्या स च्छीलास वाढवा कथितों ॥
हा प थ तो वडिलार्जित
ध र णें योग्यच पुनःपुनः जथितों ॥ ३१ ॥
कीं म ज वाटे ऐसें
हें प्री तीचेंच काम हो त्यांचें ॥
जा ती लच ह्याच पथें
मा नें देणें असें विधात्याचें ॥ ३२ ॥
दे अ मृतवेल सत्फल
स र्प कधीं अमृत काय देईल ॥
को ण ह्मणेल तरी कीं
हें क लिपत व्यर्थतेस जाईल ॥ ३३ ॥
भा री काय कथूं मी
सु त द्वयाचें घडो सुकल्याण ॥
हें आ र्याबंधार्पण
आ हें वांछीत बा० दि० कल्याण. ॥ ३४ ॥

स्तुतिपूर्वक अर्पणपत्रिकेंतील आर्यावंधांतील प्रत्येक चरणाच्या द्वितीयाक्षरानें साधलेला मजकूर.

कैलासवासी जावजी दादाजी शेट निर्णयसागर छापखान्याचे मालक हे गुणग्राहक असून सज्जनांचे मित्र होते, व ह्यांच्यांत वर्णयंत्रकुशलता व नम्रता आणि औदार्य हे गुण तर अप्रतिमच होते. यांचें चरित्र पाहून सर्वांनीं कित्ता गिरवावा. त्यांचें मजवरील प्रेम जाणून हें स्वशरीर संरक्षणाचें पुस्तक मी त्यांस परम प्रीतीनें अर्पण करीत आहें.

मिति पौष शुद्ध. }
शके १८१४. }

बाळकृष्ण दिनकर वैद्य,
कल्याणकर.

७८